वर्ष ३५, अंक ४८, ५ रुपये, शहर आवृत्ती, चतुरंगसह पृष्ठे २२
FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS
Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, शनिवार, २३ एप्रिल २०२२
WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

७५ अमृत महोत्सव

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

**शनिवारचा अग्रलेख**

**प्रतीकांची पेरणी**

सत्तेची, ताकदीची, शौर्याची, पौरुषाची प्रतीके आपल्याला सतत अशी सार्वजनिक ठिकाणी का मिरवायची आहेत?

पान ३

**९५व्या साहित्य संमेलनाचे उदगीर येथे उद्घाटन**



## युक्रेन युद्धाच्या अनुषंगाने अमेरिकेचा चीनला पुन्हा इशारा

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

**रशियाच्या युक्रेनवरील** आक्रमणाच्या अनुषंगाने अमेरिकेने चीनला पुन्हा एकदा निर्बंधांचा इशारा देण्याबरोबरच भारताचे रशियावरील शस्त्र अवलंबित्व संपवण्यासाठी मदतीची ग्वाही गुरुवारी दिली.

चीनने कोणत्याही स्वरूपात रशियाला युद्धात मदत केल्यास त्या देशावर आणखी आर्थिक निर्बंध लादण्यात येतील, असा इशारा अमेरिकेने दिला आहे. तसेच भारताचे रशियावरील शस्त्रास्त्र अवलंबित्व संपविण्यासाठी मदत करण्यात येईल, असे अमेरिकेच्या उपपरराष्ट्रमंत्री विन्डी शर्मन म्हणाल्या.

युक्रेनमधील परिस्थिती सुधारावी यासाठी चीन काहीही करताना आढळत नाही, असा आरोप शर्मन यांनी गुरुवारी ब्रुसेल्स येथे एका कार्यक्रमात केला. चीन रशिया युद्धातून योग्य ते धडे घेईल. तसेच चीन अमेरिकेला मित्रराष्ट्रांपासून तोडू शकत नाही, असेही शर्मन म्हणाल्या. जागतिक निर्बंधांमुळे रशियाच्या शस्त्रास्त्र उद्योगावर होणारा परिणाम पाहता, त्या देशावरील भारताचे पारंपरिक अवलंबित्व संपुष्टात आणण्यासाठी अमेरिका सहकार्य करेल, अशी ग्वाही शर्मन यांनी दिली.

# दिवाळीपर्यंत भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार

## मोदी आमचे खास दोस्त! - जॉन्सन

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**ब्रिटनचे पंतप्रधान** बोरिस जॉन्सन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपला 'खास दोस्त' असे संबोधित करून यंदाच्या दिवाळीपर्यंत ब्रिटन आणि भारतात मुक्त व्यापार करार होईल, असा विश्वास व्यक्त केला. पुढील सप्ताहात उभय देशांत या संदर्भातील चर्चेची पुढील फेरी होणार आहे. येत्या दिवाळीपर्यंत याला अंतिम स्वरूप देण्याची सूचना वाटाघाटी करणाऱ्या अधिकाऱ्यांना आम्ही दिल्याचे जॉन्सन यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर ते बोलत होते. कालपासून भारत दौऱ्यावर आलेल्या जॉन्सन यांच्या गुजरातला भेटीनंतर आज, शुक्रवारी सकाळी राष्ट्रपती भवनात त्यांचे दिमाखदार सोहळ्यात स्वागत करण्यात आले. यावेळी मोदींनीही बोरिस यांच्या वक्तव्याशी सहमती दर्शवताना सांगितले, की भारत व ब्रिटनदरम्यान या वर्षाअखेरपर्यंत 'मुक्त व्यापार करार' करण्यात येईल. उभय पक्षांकडून यासाठी काम सुरू असून, वाटाघाटींमध्ये चांगली प्रगती होत आहे. संयुक्त अरब अमिरात आणि ऑस्ट्रेलियाबरोबर केलेल्या मुक्त कराराप्रमाणे ब्रिटनसह केला जाणारा करारही तेवढ्याच गतीने आणि त्याच संकल्पानुसार केला जाईल. यावेळी जॉन्सन यांनी रशिया-युक्रेन युद्धाचा थेट उल्लेख करणे टाळले. ते म्हणाले, की निरंकुश आक्रमकता, बळजबरीचा धोका वाढला आहे. मोदींना उद्देशून ते म्हणाले, की आपण गेल्या वर्षी जी-७ देशांच्या परिषदेला दूरदृश्यप्रणालीद्वारे भेटलो. त्यावेळी आपल्या भेटीने आनंद झाला. परंतु, त्यानंतर कुणालाही न जुमानणाऱ्यांच्या बळजबरीच्या कृत्यांचा धोका वाढला.



### 'आत्मनिर्भर भारत'ला पाठिंबा

मोदी म्हणाले, की संरक्षण क्षेत्रात परस्पर सहकार्य दृढ करण्यावर आमच्यात सहमती झाली असून, या क्षेत्रातील उत्पादन, रचनाशास्त्र, तंत्रज्ञान, संशोधन, विकासाबाबत सहकार्य करण्याचे ठरले. या संदर्भात 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेस ब्रिटनने पाठिंबा दिल्याबद्दल मोदींनी समाधान व्यक्त केले.

### भारतास मुक्त निर्यात परवाना

भारतासह येत्या दशकांत संरक्षण क्षेत्रात सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी ब्रिटन सरकार भारतास 'मुक्त सामान्य निर्यात परवाना'(ओजीईएल) देणार आहे. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रिया कमी होऊन संरक्षण साहित्य वितरणातील वेळ कमी होईल. भारतासह प्रशांत महासागरीय प्रदेशातील (इंडो पॅसिफिक) देशांत असा परवाना मिळणारा भारत पहिला देश असेल, असेही जॉन्सन यांनी जाहीर केले.

मोदींनी मात्र युक्रेन संघर्षाचा उल्लेख करून संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गाने येथे युद्धविराम व्हावा, या अपेक्षेचे पुनरुच्चार केला. ते म्हणाले, की सर्व देशांचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक एकसंधतेचे महत्त्व जाणले पाहिजे. संवाद आणि राजकीय वाटाघाटींद्वारे युक्रेन-रशिया संघर्ष ताबडतोब थांबायला हवा.

भारत-ब्रिटनदरम्यान संरक्षण सहकार्य दृढ करण्यासाठी ब्रिटनतर्फे भारत तयार करत असलेल्या लढाऊ जेट विमानांना अद्ययावत तंत्रज्ञान पुरवेल, असे सांगून जॉन्सन म्हणाले, की हिंद महासागरातील सुरक्षाविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताला संरक्षणविषयक नवे तंत्रज्ञान व सहकार्य करण्यास ब्रिटन तयार आहे. भूमी, सागर, आकाश, अवकाश आणि संगणकीय (सायबर) या पाच क्षेत्रांशी निगडित सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाविषयी आम्ही चर्चा केली. त्यासह सागरातील सुरक्षा आव्हानांना टिपणे व त्यांना तोंड देण्यासाठी अद्ययावत लढाऊ जेट व सागरी तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य करण्यावरही आमच्यात सहमती झाली आहे.

दोन्ही देशांत हवामानबदल, पर्यावरणस्नेही व अक्षय ऊर्जा, आयात खनिज तेलाशिवाय ऊर्जा निर्मितीच्या भारताच्या धोरणास पाठिंबा व सहकार्य आदी मुद्द्यांवरही सहकार्याबद्दल सविस्तर चर्चा झाली.

**मध्य प्रदेश सरकारची उच्च न्यायालयात ग्वाही**

# अतिक्रमणांवर कायदेशीर प्रक्रियेनुसारच कारवाई

**पीटीआय, इंदूर**

**खरगोनमध्ये रामनवमीच्या** दिवशी उसळलेल्या हिंसाचारातील आरोपींनी केलेली अतिक्रमणे ही कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय काढून टाकली जाणार नाहीत, असे मध्य प्रदेश सरकारतर्फे मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठापुढे सांगण्यात आले आहे.

या कारवाईबाबत काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी आक्षेप घेतले होते. हिंसाचाराचे निमित्त करून मुस्लीम समाजाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

खरगोनमधील हिंसाचारप्रकरणी अटक करण्यात आलेला फिरोझ खान याची पत्नी फरीदा बी हिने न्यायालयात केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, आमचे घर सरकारकडून कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेविनाच पाडले जाण्याची शक्यता आहे. न्या. विजयकुमार शुक्ला यांच्या एकलपीठाने गुरुवारी तिची बाजू ऐकून घेतली. त्यावेळी राज्य सरकारतर्फे अतिरिक्त महाधिवक्ता पुष्यमित्र भार्गव यांनी सांगितले की, कायदेशीर प्रक्रियेविना याचिकाकर्तीच्या घरावर कारवाई केली जाणार नाही. त्यामुळे ही याचिका निकालात काढल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. याचिकाकर्तीचे वकील अशहर वारसी यांनी शुक्रवारी पत्रकारांना सांगितले की, फिरोझ खान याला दंगलप्रकरणी अटक करण्यात आली आहे. खरगोन जिल्हा प्रशासनाचे अतिक्रमणविरोधी पथक बुधवारी बुलडोझरसह फरीदा बी यांच्या घराकडे गेले होते. त्यांनी अतिक्रमण हटविण्यास सांगितले होते. पण, याबाबत कोणतीही नोटीस त्यांना देण्यात आलेली नाही.



### 'रासुका'अन्वये कारवाईचे प्रयत्न

फिरोझ खान याच्यावर लोकांना भडकावून दगडफेकीस प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. त्याच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली कारवाई करण्याचा विचार सुरू आहे, असे पोलीस अधीक्षक रोहित कासवानी यांनी सांगितले.

# खालिद याचे भाषण आक्षेपार्हच; दिल्ली उच्च न्यायालयाचे मत

**एक्स्प्रेस वृत्त, नवी दिल्ली**

**विद्यार्थी नेता** उमर खालिद याने फेब्रुवारी २०२० मध्ये अमरावतीमध्ये केलेले भाषण हे अवमानकारक, क्लेशदायी आणि विद्वेषमूलक असल्याचे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे. ईशान्य दिल्लीतील दंगलीचा कट रचल्याप्रकरणी खालिद याच्याविरुद्ध दाखल केलेल्या आरोपपत्रात हे भाषण नमूद करण्यात आले आहे.

खालिद याचे वकील त्रिदीप पैस यांनी न्या. सिद्धार्थ मृदूल आणि न्या. रजनीश भटनागर यांच्या खंडपीठापुढे खालिदचे हे भाषण वाचून दाखविले. त्यावर न्यायालय म्हणाले की, तुम्हाला असे वाटत नाही काय, की यामुळे लोक भडकले. तुमचे पूर्वज इंग्रजांची दलाली करीत होते, या वाक्यावर आक्षेप घेत न्यायालय म्हणाले की, हे अवमानकारक आहे असे तुम्हास वाटत नाही काय? हे वाक्यच अवमानकारक आहे. भाषणात हे तुम्ही किमान पाच वेळा म्हणाला आहात. यातून असे ध्वनित होते की, केवळ एका विशिष्ट समुदायानेच भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला, या शब्दांत न्यायालयाने या भाषणाचे वाभाडे काढले.

याप्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने खालिद याचा जामीन अर्ज नामंजूर केला आहे. त्याविरोधात केलेल्या अपिलावर ही सुनावणी सुरू होती. यातून धार्मिक सलोखा धोक्यात येत नाही का, महात्मा गांधी असो की शहीद भगतसिंग, यांनी कधी ब्रिटिशांविरुद्ध तरी अशी भाषा वापरली होती काय, काही लोक किंवा त्यांच्या पूर्वजांबद्दल अशी भाषा वापरण्याची शिकवण गांधीजींनी दिली होती काय, अशा प्रश्नांचा भडिमार न्यायालयाने खालिद याच्या वकिलावर केला. भाषणस्वातंत्र्याबद्दल आम्हाला काही म्हणायचे नाही, पण तुम्ही काय बोलत आहात, या शब्दांत न्यायालयाने आपली नाराजी व्यक्त केली.

**भाषणस्वातंत्र्याची व्याप्ती कुठवर:** खालिद याचे वकील म्हणाले की, भाषणात खालिद याचे वैयक्तिक मत मांडण्यात आले आहे, आणि त्यातून कोणालाही भडकावण्यात आलेले नाही. नंतर त्यातून समाजात कोणतीही प्रतिक्रिया उमटलेली नाही. पण न्यायालयाने विचारणा केली की, भाषणस्वातंत्र्याचा अधिकार हा इतरांना दुखावणारी विधाने करण्याइतपत असतो काय, याबद्दल भारतीय दंड विधानाचे कलम १५३-अ आणि १५३-ब लागू करता येणार नाही काय?

# हार्दिक पटेल यांची भाजपवर स्तुतिसुमने!

**अहमदाबाद :** पाटीदार समाजाचे नेते आणि काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष हार्दिक पटेल यांनी भारतीय जनता पक्षावर स्तुतिसुमने उधळली आहेत. आपल्यापुढील सर्व पर्याय खुले असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

'इंडियन एक्स्प्रेस'ला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत पटेल यांनी निर्णयप्रक्रियेत काँग्रेसचे नेतृत्व आपल्याला सहभागी करून घेत नसल्याची टीका केली होती.



येथील स्थानिक वृत्तपत्राला शुक्रवारी दिलेल्या मुलाखतीत हार्दिक पटेल यांनी भाजपच्या नेतृत्वाच्या निर्णयक्षमतेची स्तुती केली. ते म्हणाले, की जम्मू-काश्मीरसाठीचा अनुच्छेद ३७० हटवणे, अयोध्येत राममंदिर उभारणे आदी भाजपच्या निर्णयांचा एक हिंदू म्हणून आपल्याला अभिमान वाटतो. भाजपकडे धाडसी निर्णयक्षमता असणारे नेतृत्व आहे. मी काँग्रेसवर नाराज आहे म्हणून असे म्हणत नाही. मात्र, भाजप आपल्या संघटना बांधणीवर भरपूर काम करतो. विविध व्यक्तींवरील जबाबदाऱ्यांमध्ये नियमित बदल करतो. आपल्या फोनची प्रणाली जशी अद्ययावत होत असते, त्याप्रमाणेच भाजप काळानुरूप बदल करत असतो.

भाजपमध्ये प्रवेश करणार का, असे विचारले असता, पटेल यांनी सांगितले, की गुजरातच्या विकासासाठी मी बांधील असून, त्यानुसार माझी वाटचाल असेल.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत
लोकसत्ता मार्ग यशाचा
८

50 Years of Banking Excellence
टीजेएसबी गोल्ड लोन
आपल्या महत्वकांक्षेला द्या नवा आकार, अन् करा आपले स्वप्न साकार !!
फक्त 0.67%* दरमहा
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 223 466 | 1800 266 3466



# स्मार्ट व्यवस्थापक भाग दोन

### आयआयएम रांची

**या संस्थेच्या** इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाला १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एमबीए पदवी प्रदान केली जाते.

अर्हता – या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला १० वी आणि १२ वीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. राखीव संवर्गासाठी ५५ टक्के गुण.

**प्रवेश प्रक्रिया**

या अभ्यासक्रमाला दोन पद्धतीने प्रवेश दिला जातो.

**(१) स्कॉलिस्टिक ॲडमिशन टेस्ट (एसएटी) –** ही परीक्षा देशातील ७० केंद्रावर दरवर्षी मार्च, मे, ऑगस्ट, ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये कॉलेज बोर्डामार्फत घेतली जाते. (संपर्क–collegereadiness.collegeboard.org/sat)

जगभरातील शैक्षणिक संस्थांमधील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी या परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. या परीक्षेत मिळालेले गुण थेट रांची आयआयएमकडे पाठवावयाचे असतात. (पाचही वेळा परीक्षा दिली असल्यास सर्वोत्तम गुण आयआयएमला पाठवता येतात.) आयआयएम रांचीचा सॅट कोड हा ९१०९ हा आहे.

सॅट परीक्षेच्या शुल्कात कुटुंबाच्या उत्पन्नानुसार सवलत मिळू शकते. जर विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी असेल तर या विद्यार्थ्यास परीक्षा शुल्कात ९० टक्के सूट मिळते. जर पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त आणि १५ लाखांपेक्षा कमी असल्यास ५० टक्के सूट दिली जाते.

सॅट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आयआयएम रांचीच्या आयपीएम (इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट) अभ्यासक्रमासाठी स्वतंत्रपणे अर्ज भरणे आवश्यक आहे. कॉलेज बोर्ड संकेतस्थळाच्या साहाय्याने सॅटमधील गुण आयआयएमला मिळाल्यावरच अर्ज प्रक्रिया पूर्ण झाली असे समजले जाते.

**२०२१ चा सॅट कॅटऑफ पुढीलप्रमाणे –** खुला संवर्ग– १३५०, ओबीसी – १०५०, ईडब्ल्यूएस–(इकॉनॉमिकली विकर सेक्शन) – १०३०, अनुसूचित जाती व जमाती संवर्ग– ९३०.

**२) इंटिग्रेटेड प्रोग्रॅम मॅनेजमेंट ॲप्टिट्यूड टेस्ट –** ही परीक्षा आयआयएम मार्फत घेतली जाते. या परीक्षेतील गुणांच्या आधारे रिटन ॲबिलिटी टेस्ट (लेखी क्षमता चाचणी) या टप्प्यासाठी उमेदवारांची निवड करते. त्यानंतर मुलाखती घेतल्या जातात. या दोन्ही प्रक्रिया दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बेंगळुरू आणि रांची येथे पार पाडल्या जातात.

हा पाच वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम पूर्णपणे निवासी स्वरूपाचा आहे. तीन वर्षांनंतर एखाद्या विद्यार्थ्यास अभ्यासक्रमाच्या बाहेर पडावयाचे असल्यास त्याला तशी सुविधा दिली जाते. या विद्यार्थ्याला बीबीए ही पदवी प्रदान केली जाते. इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट फॉर सेकंडरी स्कूल (आयजीसीएसी) आणि इंटरनॅशनल बॅक्कालौरेट (आयबी) या बोर्डाचे विद्यार्थीही अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात.

**काय शिकाल?–**

**पहिल्या तीन वर्षांमध्ये पुढील विषय शिकवले जातात –** बिझिनेस मॅथेमॅटिक्स, नॅचरल सायन्स, कम्युनिकेशन स्किल (ओरल आणि रिटन), इंडियन लिटरेचर, आर्ट्स ॲप्रिशिएशन, सायकॉलॉजी, मॅनेजिंग स्ट्रेस, सोशिऑलॉजी, बेसिक वर्ड/एक्सेल, क्रिटिकल थिंकिंग ॲण्ड प्रॉब्लेम सॉलव्हिंग, इंट्रॉडक्शन टू बिझिनेस, मायक्रोइकॉनॉमिक्स, इंडियन सोसायटी–व्हॅल्यूज ॲण्ड कल्चर, इंट्रॉडक्शन टू प्रोग्रॅमिंग, क्रिएटिव्हिटी ॲण्ड इनोव्हेशन, बिझिनेस इथिक्स ॲण्ड कॉर्पोरेट सोशल रिस्पॉंसिबिलिटी, स्टॅटिस्टिक्स, इन्फॉर्मेशिन सिस्टिम्स, फिलॉसॉफी, फायनांशिअल अकाउंटिंग, बिझिनेस लॉ, प्रिंसिपल्स ऑफ मॅनेजमेंट, ऑपरेशन रिसर्च, डेटा सायन्स, फॉरेन लँग्वेज, मार्केटिंग मॅनेजमेंट, ऑपरेशन मॅनेजमेंट, रिसर्च मेथडॉलॉजी, इकॉनॉमेट्रिक्स, मॅनेजमेंट अकाउंटिंग, फायनांशिअल मॅनेजमेंट, ऑब्जेक्ट ओरिएंटेड प्रोग्रॅमिंग, ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, आंत्रप्रिन्युरशिप, सेल्स/पर्सनल सेलिंग, बिझिनेस ॲनॅलिटिक्स, लेबर लॉ/ इंडस्ट्रिअल रिलेशन, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट, इंडियन इकॉनॉमी. चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी नियमित स्वरूपाच्या एमबीए अभ्यासक्रमाचेच विषय विद्यार्थ्यांना शिकवले जातात.

**संपर्क–** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सूचना भवन, फिफ्थ फ्लोअर, ऑड्रे हाऊस कॅम्पस, मेउर्स रोड रांची–८३४००८, दूरध्वनी– ०६५१ २२८०११३, संकेतस्थळ– iimranch.ac.in

### आयआयएम रोहतक

२०१९च्या शैक्षणिक वर्षापासून रोहतक स्थित इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटने पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू केला आहे. पदवी ते पदव्युत्तर पदवी असा या अभ्यासक्रमाचा व्यापक अवकाश आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर संस्थेमार्फत एमबीए ही पदवी प्रदान केली जाते. एखाद्या विद्यार्थ्यास तीन वर्षांनंतर हा अभ्यासक्रम सोडवावासा वाटल्यास, बीबीए – बॅचलर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन ही पदवी प्रदान केली जाते. तथापि चौथ्या आणि पाचव्या वर्षाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना किमान सीजीपीए (कुमुलिटिव्ह ग्रेड पॉईंट ॲव्हरेज) ५ मिळवावा लागतो. हा अभ्यासक्रम १५ सत्रांमध्ये शिकवला जातो. प्रत्येक वर्षी तीन सत्रे घेण्यात येतात.

हा अभ्यासक्रम दोन भागात विभाजित करण्यात आला आहे. पहिल्या भागात पायाभूत विषयांमध्ये लक्ष केंद्रित केले जाते. दुसऱ्या भागात व्यवस्थापन विषयावर लक्ष केंद्रित केले जाते. प्रत्येक वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांना इंटर्नशिप करावी लागते. १६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

**अभ्यासक्रमाची संरचना–** हा अभ्यासक्रम गणित, अर्थशास्त्र, सांख्यिकी, मानव्यशास्त्र या चार घटकांमध्ये विभाजित करण्यात आला आहे. कम्युनिकेशन मॅनेजमेंट– व्यवसाय संवाद संप्रेषण, इन्फर्मेशन सिस्टीम – माहिती कार्यप्रणाली आणि परदेशी भाषा यांचा अभ्यास करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. चौथ्या आणि पाचव्या वर्षात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी जे विषय शिकवले जातात तेच विषय या अभ्यासक्रमात शिकवले जातात.

**काय शिकाल?**

पहिल्या तीन वर्षी पुढील विषयांचा अभ्यास करावा लागतो. (१) इकॉनॉमिक्स (२) फायनान्स (३) अकाउंटिंग (४) लॉ, (५) स्टॅटिस्टिक्स, (६) मॅथेमॅटिक्स (७) फिलासॉफी (८) सायकॉलॉजी (९) बिझिनेस कम्युनिकेशन (१०) पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन (११) सोशिऑलॉजी (१२) सस्टेनिबिलिटी (१३) प्रिंसिपल्स ऑफ मॅनेजमेंट (१४) मीडिया ॲण्ड जर्नालिझम (१५) ॲडव्हर्टायजिंग (१५) बिझिनेस हिस्ट्री (१६) इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी.

चौथ्या आणि पाचव्या वर्षात पुढील विषय शिकावे लागतात– (१) जनरल मॅनेजमेंट (२) बिझिनेस कम्युनिकेशन (३) मार्केटिंग मॅनेजमेंट (४) स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट (५) मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टीम (६) ऑपरेशन मॅनेजमेंट ॲण्ड क्वॉंटिटेटिव्ह टेक्निक (७) ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट ॲण्ड ऑर्गनायझेशनल बिहेव्हिअर (८) इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी (९) फायनान्स ॲण्ड अकाउंटिंग,

**इतर विषय –** (१) पब्लिक स्पिकिंग (२) क्रिएटिव्ह रायटिंग (३) रुरल ॲण्ड सोशल इमर्शन प्रोजेक्ट (४) बिझिनेस इंटर्नशिप

**अर्हता–** हा अभ्यासक्रम कोणत्याही शाखेतील ६० टक्के गुणांसह १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यास करता येतो. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गासाठी गुणांची मर्यादा ५५ टक्के. २० जून २०२२ रोजी विद्यार्थ्याचे किमान वय २० वर्षे असावे.

**प्रवेश प्रक्रिया**

या अभ्यासक्रमाच्या निवडीसाठी, आयपीएम ॲप्टिट्यूड टेस्ट, द्यावी लागते. (या परीक्षेसाठी नाव नोंदणी करण्याची शेवटची तारीख २ मे २०२२. ही परीक्षा २६ जून २०२२ रोजी घेतली जाईल. महाराष्ट्रातील केंद्रे– मुंबई, नागपूर आणि पुणे) या परीक्षेत, संख्यात्मक कौशल्य चाचणी, तार्किक विचार करण्याची क्षमता आणि कौशल्य चाचणी, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व चाचणी असे तीन विभाग असतात. प्रत्येक विभागासाठी प्रत्येकी ४० प्रश्न विचारले जातील. प्रत्येक भागातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रत्येकी ४० मिनिटांचा कालावधी दिला जातो. प्रत्येक अचूक उत्तराला ४ दिले जातात. चुकलेल्या उत्तरासाठी १ गुण कापला जातो. या चाळणी परीक्षेत विशिष्ट गुणांसह उत्तीर्ण निवडक विद्यार्थ्यांना जुलै २०२२च्या दुसऱ्या आठवड्यात मुलाखतीसाठी बोलावले जाईल. मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी, सामान्यज्ञान आणि संवादकौशल्य याची चाचपणी केली जाते.

अंतिम गुणवत्ता यादी तयार करताना कल चाचणी परीक्षेतील गुणांना ४५ टक्के वेटेज, मुलाखतीतील गुणांना १३ टक्के वेटेज, आणि शैक्षणिक कामगिरीला ४० टक्के वेटेज दिले जाते.

**संपर्क–** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, रोहतक मॅनेजमेंट सिटी, सदर्न बायपास, एनएच – १०, सुनारिआ रोहतक –१२४०१०, दूरध्वनी– ०१२६२ – २२८५४०, संकेतस्थळ– www.iimrohtak.ac.in

वर्ष ३५, अंक ४८, ५ रुपये, शहर आवृत्ती, चतुरंगसह पृष्ठे २२
FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS
Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, शनिवार, २३ एप्रिल २०२२ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

७५ अमृत महोत्सव

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

**तापमान**
कमाल ३९.४° से | किमान २१.७° से
हवामानाचा अंदाज
आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता.



क्रीडा
धोनीतील धावांची भूक कायम -जडेजा











## काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



ध्वनिप्रदूषण दहा डेसिबलने वाढलं तर वैचारिक, राजकीय आणि सामाजिक प्रदूषण किती डेसिबलने वाढलं ते यात कळतं!!

## रविवार विशेषमध्ये...

... तरच फिटेल अंधाराचे जाळे
वीज क्षेत्राची आर्थिक घडी सुधारायची असेल तर कठोर शिस्तीला पर्याय नाही...
**- राजाराम पाटील**

अनाथांची (पाकिस्तानी) आई...
बिल्किस एधी यांच्या कार्याला आदरांजली **- जतीन देसाई**

यासह
'समोरच्या बाकावरून' (पी. चिदम्बरम) आणि 'चाँदनी चौकातून' (दिल्लीवाला) ही सदरे



## एसटीची सेवा लवकरच सुरळीत

**मुंबई :** संपामुळे राज्यातील पाच महिन्यांपासून ठप्प असलेली एसटीची सेवा आता सुरळीत होणार आहे. एकूण ९१ हजार २६६ पैकी ८२ हजार ३६० कर्मचारी कामावर परतल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली. शुक्रवारी ५ हजार ३९८ कर्मचारी कामावर हजर झाले. कामावर रुजू झालेल्यांमध्ये १० हजार बडतर्फ करण्यात आलेले कर्मचारी असून त्यांना रुजू करून घेण्याची सर्व प्रक्रिया हळूहळू पूर्ण करण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात एसटी कर्मचाऱ्यांची संख्या आणखी वाढेल आणि एसटी सोमवारपासून पूर्ण क्षमतेने धावेल, अशी माहिती महामंडळाने दिली. वृत्त...२०

## राज्यात पावसाळी स्थिती

**पुणे :** राज्याच्या अनेक भागांत सध्या पावसाळी वातावरण निर्माण झाले असले, तरी तापमानातील वाढ कायम आहे. विदर्भातील तापमानात किंचित घट झाली असली, तरी मध्य महाराष्ट्र आणि मुंबई परिसरासह कोकण विभागातील तापमानात वाढ झाली आहे. पुढील दोन दिवसांत कमाल तापमानात आणखी काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, शुक्रवारी (२२ एप्रिल) पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी हलका पाऊस झाला. राज्यातील बहुतांश भागात महिन्यापासून कमाल तापमानाचा पारा सरासरीच्या पुढे आहे.

### ९५व्या साहित्य संमेलनाचे उदगीर येथे उद्घाटन

# देश छद्मबुद्धी विध्वंसकांच्या ताब्यात!

## विभाजनवादी नवसंस्कृतीवर संमेलनाध्यक्ष भारत सासणे यांचा प्रहार

**शफी पठाण, लोकसत्ता**

**(भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्य नगरी, उदगीर)** : काळ मोठा कठीण आला आहे. आपण आत्यंतिक अशा भ्रमयुगामध्ये प्रवेश केला आहे. आता पुढच्या टप्प्यात हळूहळू आपण छद्मबुद्धी विध्वंसकांच्या ताब्यात जातोय. हे विध्वंसक आपल्या पुढील पिढीच्या हातात भिकेचा कटोरा देतील, अशा परखड शब्दात ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कादंबरीकार भारत सासणे यांनी विभाजनवादी नवसंस्कृतीवर कडाडून प्रहार केला.

उदगीर येथे आयोजित साहित्य संमेलनाचे उद्घाटन शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी सासणे बोलत होते. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा दोन टप्प्यांत सासणे यांनी आपली अध्यक्षीय भूमिका मांडली. ते *(पान ४ वर)*






साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, संमेलनाध्यक्ष भारत सासणे, स्वागताध्यक्ष संजय बनसोडे, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील आणि इतर मान्यवर.

भारत सासणे यांच्या भाषणाचा संपादित अंश /पान १२

### साहित्यिकांमध्येही चिअर लीडर्स - मावजो

सत्तेला माज चढला की साहित्यावर निर्बंध लादले जातात. आज साहित्यात सत्ताधाऱ्यांना चिअर्स करणारे अनेक चिअर लीडर्स तयार झाले आहेत. हे चिअर लीडर्स सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या कृतीलाही प्रोत्साहन देत आहेत, असे परखड मत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कोकणी साहित्यिक दामोदर मावजो यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, आवडत नसलेले साहित्य जाळणे, त्यावर बंदी घालणे योग्य नाही.

### प्रचारकी साहित्य धोकादायक - पवार

विशिष्ट विचाराधारित साहित्यनिर्मिती अतिशय धोकादायक आहे. अशा प्रचारकी साहित्यनिर्मितीमुळे निरंकुशतेला निमंत्रण मिळत असते, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केले. पवार म्हणाले, राज्यकर्त्यांनी साहित्य आणि माध्यमांची कमकुवत अंगे न्याहाळली आहेत. प्रसारमाध्यमांच्या बाबतीत त्यांनी अत्यंत हुशारीने कॉर्पोरेट जगाची मदत घेतली आहे. चित्रपट क्षेत्रातही त्याचा शिरकाव झाला आहे. हाच कॉर्पोरेटीकरणाचा प्रयोग आता साहित्यात होत आहे.

# राज्यातील राजकारणावर मंथन

## 'लोकसत्ता दृष्टी आणि कोन' उपक्रमात स्थानिक निवडणुकांचा वेध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा या 'प्रति विधानसभा' मानल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तापू लागलेल्या राज्यातील राजकारणाचा आढावा घेणारे चौकोनी विचारसंमेलन 'लोकसत्ता'च्या वतीने येत्या सोमवारपासून 'दृष्टी आणि कोन' या दूरसंवाद मालिकेद्वारे घेण्यात येणार आहे. या व्यासपीठावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, भाजपचे नेते आमदार आशिष शेलार आणि राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे हे चार दिवस स्वतंत्रपणे आपापल्या पक्षांविषयी विचार मांडतील.

महाविकास आघाडी सरकारचा निम्मा कार्यकाळ लवकरच पूर्ण होईल. करोना साथीमुळे गेली दोन वर्षे राज्याला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. आता कुठे सारे पूर्वपदावर येऊ लागले होते, तोच राजकीय *(पान ४ वर)*




**मुख्य प्रायोजक :** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**सहप्रायोजक :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**सहभागासाठी...** http://tiny.cc/LS_Drushti_ani_Kon 2022 येथे ऑनलाइन नोंदणी किंवा क्यू आर कोडद्वारे या वेबसंवादात सहभागी होता येईल.

## सरकारची वीज जुळवाजुळव

**मुंबई :** राज्य सरकारशी केलेला करार मोडून खुल्या बाजारात विजेची विक्री करणाऱ्या अदानी आणि टाटा या वीज उत्पादक कंपन्यांविरोधात सरकारने कारवाईचा पवित्रा घेतल्यानंतर शुक्रवारी या दोन्ही कंपन्यानी महावितरणाला पुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे सरकारला मोठा दिलासा मिळाला असून विजेची मागणी आणि पुरवठ्यातील तफावत कमी होत असल्याने राज्यातील भारनियमन टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येणार असल्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी सांगितले. तर कोळसा टंचाई जाणवू नये म्हणून छत्तीसगड राज्यातील एक खाण घेण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत आहे, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात दिली. वृत्त...२०









## संमेलनाच्या मांडवातून

# पुन्हा पवारच!

**शफी पठाण**

**शरद पवार.** या सहा शब्दांची जादू जसा महाराष्ट्राचा राजकीय पट सातत्याने अनुभवत आलाय तसा या सहा शब्दांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वालाही कायम आपल्या आकर्षणाच्या वलयात गुंतवून ठेवले. पवार आता आपल्या राजकीय उत्तरार्धाच्या शेवटाला पोहोचलेत, असे दावे करून त्यांचे विरोधक कितीही आनंदी होत असले तरी पवारांशिवाय महाराष्ट्राचे पानही हलू नये, अशी 'करेक्ट' तरतूद खुद्द पवारांनीच करून ठेवली आहे. आधी नाशिक आणि पाठोपाठ उदगीरच्या साहित्य संमेलनात पवारांची ही 'पॉवर' पुन्हा ठळकपणे अधोरेखित झाली, असे म्हणतात, एखाद्या संघटनेत चैतन्य टिकून राहायचे असेल तर त्या संघटनेचा नेता प्रसिद्धीच्या क्षितिजावर कायम झळकत राहायला हवा. पवारांनाही असेच वाटते की नाही, माहीत नाही; पण त्यांच्या अनुयायांना असेच वाटत असावे. कारण, असे वाटण्यावरच त्यांचे असणे निर्भर आहे. तसे नसते तर नाशिक असो की उदगीर पाठोपाठच्या संमेलनांना राष्ट्रवादीचेच स्वागताध्यक्ष कसे लाभले असते? राष्ट्रवादीचे 'मीडिया मॅनेजमेंट' जोरदार आहे. कमी वेळात जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचे कसब त्यांनी नेमके हेरले आहे. उदगरीच्या कोणत्याही भागात फिरा पोस्टर्स पवारांचेच दिसतील. 'महाराष्ट्राच्या राजकारणातील चाणक्य' असे विशेषण या पोस्टरवर लागलेले. ऐन वेळी राष्ट्रपतींचा कार्यक्रम रद्द झाला, मुख्यमंत्र्यांनीही पाठ फिरवली. हे असे घडले नसते तरी संमेलनाच्या केंद्रस्थानी पवारच असते. कारण, त्यामागे स्वागताध्यक्षांचे अनेक दिवसांपूर्वी 'दूरदृष्टीपूर्वक' केलेले नियोजन आहे. पवार आले, पवारांनी पाहिले आणि पवारांनी जिंकले, असेच उद्घाटनीय सोहळ्याचे वर्णन करावे, इतके ते पवारमय झाले. मंत्र्यांच्या भाषणात पवारांचा उल्लेख, महामंडळ अध्यक्षांच्या भाषणात पवारांचा गौरव, स्वागताध्यक्षांचे भाषण तर जणू पवारांप्रतिची कृतज्ञताच होती. हे झाले मंचावरचे. मंचाखालीही पवारांवर प्रेम करणाऱ्या माणसांचीच गर्दी होती. पवारांचे भाषण संपले अन् सोहळ्याचा नूरच पालटला. तो इतका की अध्यक्षांना आपले भाषण अर्ध्या रिकाम्या खुर्च्यांपुढे करावे लागले. पवारांचे साहित्य संमेलनाशी नाते हे असे विलक्षण आहे. सर्वाधिक साहित्य संमेलनांच्या उद्घाटनाचा विक्रम माझ्या नावावर होईल, असे पवार गमतीने म्हणाले असतीलही; पण पक्षातील त्यांच्या शिलेदारांनी ते फारच गांभीर्याने घेतलेले दिसतेय. कुणी सांगावे, या विक्रमासाठी पुढच्या संमेलनाचा स्वागताध्यक्ष कामाला लागला नसेल... !








## ग्रंथदिंडीत वेगळेपणा

उदगीरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शुक्रवारी सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडी सुरू झाली. ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे, महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, मनोहर पटवारी, रामचंद्र तिरुके, दिनेश सास्तुरकर व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर दिंडीचे मार्गक्रमण सुरू झाले. ग्रंथदिंडीत सहभागी झालेल्या सर्वांवर ठिकठिकाणी पुष्पवर्षाव करण्यात आला. सायकल रॅलीतून तरुणाईने पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. बुलेटधारी महिलांनी नऊवारी वेशभूषेत 'मराठी आमुची मायबोली'चा गजर केला. बंजारा नृत्य, आदिवासी नृत्याने उदगीरच्या वेगळेपणाच्या वैशिष्ट्याचे दर्शन घडवले.

# विशिष्ट विचाराधारित साहित्यनिर्मिती धोकादायक

## शरद पवार यांचे प्रतिपादन

**स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्य नगरी (उदगीर) :** विशिष्ट विचाराधारित साहित्यनिर्मिती अतिशय धोकादायक आहे. अशा प्रचारकी साहित्यनिर्मितीमुळे निरंकुशतेला निमंत्रण मिळत असते, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केले. पवार साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

पवार म्हणाले, राज्यकर्त्यांनी साहित्य आणि माध्यमांची कमकुवत अंगे ओळखली आहेत. प्रसारमाध्यमांच्या बाबतीत त्यांनी हुशारीने कॉर्पोरेट जगाची मदत घेतली आहे. चित्रपट क्षेत्रातही त्याचा शिरकाव झाला आहे. हाच 'कॉर्पोरेटीकरणा'चा प्रयोग आता साहित्यात होत आहे. तोट्यातील प्रकाशन संस्था ताब्यात घेतल्या जात आहेत. हे असेच सुरू राहिले तर चौथा स्तंभ कोसळण्यास वेळ लागणार नाही. हे टाळायचे असेल तर साहित्यिकांना डोळ्यात तेल घालून दक्ष राहावे लागेल, अशा शब्दांत पवारांनी साहित्यिकांना एका नव्या लढ्यासाठी सज्ज राहाण्याचे आवाहन केले.



### पाच वर्षांतून एकदा तरी महिलाध्यक्ष हवी!

साहित्यविश्वातदेखील राजकारणाचा शिरकाव झाला आहे. विशेषतः संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड निवडणूक पद्धतीने सुरू झाल्यानंतर साहित्यिकांच्या अंतरंगात आमच्यातील राजकारणी घुसू लागला आहे. त्याचा अत्याधिक तोटा महिला साहित्यिकांना संभवतो. महामंडळाच्या घटनेत सुधारणा करून संमेलनाच्या अध्यक्षपदी दर पाच वर्षांतून किमान एकदा तरी महिलाध्यक्ष नियुक्त व्हाव्या, अशी तरतूद असावी. महिला धोरणाचा पुरस्कारकर्ता म्हणून मी येथे उभा राहिलो याची चर्चा साहित्य संमेलनात झाली तर मला आनंदच होईल, असेही पवार म्हणाले.

### साहित्यात संशोधनाची वानवा

साहित्यात संशोधनात्मक लिखाणाची वानवा जाणवत आहे. इतिहासकाराने सबळ पुराव्याधारे न लिहिता ऐकीव व तार्किक माहितीच्या आधारे लिहिणे हा मोठा प्रमाद आहे. तो अनेक दीर्घकालीन वाद-विवादांना जन्म देतो. असे लेखन वेळीच रोखले पाहिजे, असे सांगतानाच पवार यांनी कवितांची पुस्तके आज कमी होत चालली आहेत, अशी खंतही व्यक्त केली. काव्यसंग्रह प्रकाशनाच्या अर्थकारणाचे गणित जुळत नसल्याने हे घडत असावे, असे ते म्हणाले.

# पोटार्थी लेखक कसली मूल्ये जपणार?

## नाटककार राजकुमार तांगडे यांचा सवाल

**प्रदीप नणंदकर, लोकसत्ता**

**स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्य नगरी (उदगीर) :** कोणाच्या तरी चरणी साहित्य अर्पण करणारे पोटार्थी लेखक कसली मूल्ये जपणार? असा सवाल नाटककार राजकुमार तांगडे यांनी 'लेखक आणि लोकशाही मूल्ये' या परिसंवादात बोलताना उपस्थित केला.

येथे सुरू झालेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित उपरोक्त परिसंवादात तांगडे बोलत होते. मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या पुढाकाराने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादात देशपांडे यांच्यासह दिलीप चव्हाण, हेमांगी जोशी, हालिमाबी कुरेशी, सोनाली नवांगुळ, अतुल देऊळगावकर हे सहभागी झाले होते. प्रा. दीपक पवार यांनी परिसंवादाचे सूत्रसंचालन केले.



प्रशासन व्यवस्था शहरे जोडण्यात मग्न असून मने तुटत चालली तर ती कोण जोडणार? असा प्रश्न उपस्थित करून तांगडे म्हणाले, सुचले म्हणून नाही तर बोचले म्हणून लिहिण्यातून लोकशाही मूल्याची जपणूक केली जाईल. अतुल देऊळगावकर यांनी, पर्यावरण हा विषय गंभीर असून याचे गांभीर्य सरकार, जनतेला नाही. लोकशाही मूल्ये रुजविण्याचा विषय सर्वांनीच गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे सांगितले. तर श्रीकांत देशपांडे म्हणाले, निवडणूक म्हणजे लोकशाही नाही. लोकशाही मूल्ये जपणे ही निरंतर प्रक्रिया आहे. साहित्य संमेलनात या विषयावर चर्चा घडविण्यासाठीच हा परिसंवाद आयोजित झाला. दिलीप चव्हाण म्हणाले, रचनात्मक कामाचे महत्त्व कमी होऊन विध्वंसाला महत्त्व दिले जात आहे. भक्ती चळवळीने लोकशाहीचे मूल्य जपले आहे.

धनिक, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि उद्योगपतींकडे लोकशाही झुकत चालली असून सर्वसामान्यांच्या हातून ती निसटते आहे. तिची जपणूक करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज असल्याचे मत हेमांगी जोशी यांनी मांडले. तर वय,वर्ग,जात,पंथ,धर्म यातील अंतर वाढत जात असल्याने लोकशाहीचा संकोच होत असल्याची खंत हालिमाबी कुरेशी यांनी व्यक्त केली. सोनाली नवांगुळ यांनी अपंगत्व असलेली मंडळी इतरांपेक्षा सर्वार्थाने सक्षम आहेत याची जाणीव करून घेण्याची गरज व्यक्त केली.

# सत्तेला माज चढला की निर्बंध लादले जातात : मावजो



**सत्तेला माज** चढला की साहित्यावर निर्बंध लादले जातात. आज साहित्यात सत्ताधाऱ्यांना चिअर्स करणारे अनेक चिअर्स लीडर्स तयार झाले आहेत. हे चिअर्स लीडर्स सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या कृतीलाही प्रोत्साहन देत आहेत, असे परखड मत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कोकणी साहित्यिक दामोदर मावजो यांनी व्यक्त केले.

संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मावजो म्हणाले, चिरंतनाला धक्के देणारे साहित्य कालानुरूप असते. आवडत नसलेले साहित्य जाळणे, त्यावर बंदी घालणे योग्य नाही. इंदिरा गांधी यांच्या काळात आणीबाणीला साहित्यिकांनी प्रखर विरोध केला. आज तसे धाडस करताना कुणी दिसत नाही, हे फारच वेदनादायी आहे. लेखक कधीच घाबरट असू नये. तो कायम बंडखोरच असला पाहिजे. मला वाद नव्हे; संवाद आवडतो. मी कोकणी भाषक, कोकणीत लिहितो. मराठी लेखक आणि आपल्यात कधीच भाषावाद आला नाही. कोकणी व मराठीत द्वेष नको, वाद नको. पुढचे संमेलन गोव्यात घ्या. सहकार्य करू. सर्व वाद संवादातूनच मिटतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## अभिजात दर्जासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी : अशोक चव्हाण



मराठवाडा ही संतांची आणि चळवळीची भूमी आहे. मराठवाड्यात तेलगू, उर्दू, कन्नड, मराठी भाषा बोलल्या जात असल्या तरी येथे मराठी भाषेचा दबदबा आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे, असे मत सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले.

## डिजिटल रूपात साहित्य निर्माण व्हावे : शिवराज पाटील



साहित्य हे व्यावहारिक, आध्यात्मिक आणि वैज्ञानिक अशा विविध पद्धतीचे असू शकते. इतर भाषांतील ग्रंथ मराठीत यावेत. कुराण, बायबल, उपनिषदे यांसारखी अजरामर साहित्य निर्माण व्हावीत. येणारा काळ हा डिजिटल आहे. त्यामुळे डिजिटल स्वरूपात साहित्य निर्माण व्हावे, असे मत माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केले.

## दिनदर्शिका

**शनिवार, २३ एप्रिल २०२२**
भारतीय सौर वैशाख ०३ शके १९४४
मिती चैत्र कृष्णपक्ष सप्तमी : ०६ : २८ पर्यंत
नक्षत्र : उत्तराषाढा १८ : ५४ पर्यंत
चंद्र : मकर

- **मेष** - वरिष्ठांची कृपा राहील.
- **वृषभ** - भाग्याचा दिन.
- **मिथुन** - तुलना करणे टाळा.
- **कर्क** - जोडीदाराचे सहकार्य मिळेल.
- **सिंह** - कोणाला कमी लेखू नका.
- **कन्या** - अंदाज अचूक ठरतील.
- **तूळ** - कौटुंबिक उत्साह वाटेल.
- **वृश्चिक** - भाषेवर प्रभुत्व राहील.
- **धनू** - प्रिय व्यक्तीचा सहवास.
- **मकर** - पत प्रतिष्ठा वाढेल.
- **कुंभ** - शारीरिकता जपा.
- **मीन** - कामे पूर्ण करा.

**शुभ राशी - वृषभ, मकर**

## नेटक्लिप्स




व्हिडीओ बघण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करा..

• दृश्य कथा • दैनिक ब्रीफिंग
• वाचनीय लेख • बातम्यांचा अनुभव

लो | लोकसत्ता.COM

- नाटकासाठी आयुष्य वेचणारे रंगचिंतक मंजुळ भारद्वाज - गोष्ट असामान्यांची - भाग २३
- उद्धव ठाकरेंच्या हस्ते होणार समृद्धी महामार्गाचे लोकार्पण - एकनाथ शिंदे

## वाचकांची पसंती

- अग्रलेख : दमनज्वराचा धडा!
- हवाई, संरक्षण तंत्रज्ञान भागीदारीसाठी बोरिस जॉन्सन- अदानी यांच्यात चर्चा ; आत्मनिर्भर भारत योजनेतील संधींचा शोध
- सत्ता गेली पण भारतप्रेम संपलं नाही, इम्रान खानचा पुन्हा भारतावर कौतुकाचा वर्षाव
- उद्या सकाळी ९ वाजता हनुमान चालीसा वाचण्यासाठी मातोश्रीवर जाणारच, राणा दाम्पत्याचा निर्धार

# देश छद्मबुद्धी विध्वंसकाच्या ताब्यात!

*(पान ३ वरून)* म्हणाले, लोकांना थाळी वाजवताना बघून लेखक, विचारवंत आणि विचारी माणूस चिंतेत पडला. समाजात विभाजनवादी निरर्थक, पण अनर्थकारी, उत्तेजन वाढवणारा खेळ मांडला जात आहे. कला विभाजित झाली आहे. सर्वत्र उपद्रव आणि उन्मादाचा उच्छाद सुरू आहे. विदूषकाच्या हातात अधिकार केंद्रित होत आहेत. सर्वत्र तडे बसवणारी शांतता आहे, कोणीच बोलत नाही, सर्वत्र चतुर मौन पसरले आहे. या मौनात स्वार्थ आहे, तुच्छता आहे, हिशेब आणि व्यवहारदेखील आहे. याच बरोबरीने सामान्य जनतेच्या दुःखाला चिरडणे आहे, भीती, दहशत, प्रलोभने आणि विनाशदेखील आहे, याकडे सासणे यांनी प्रकर्षाने लक्ष वेधले.

या वेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानपीठ विजेते कोकणी कथाकार दामोदर मावजो, यांच्यासह देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण, उद्योग, खनिकर्म व मराठी भाषा विभागाचे मंत्री सुभाष देसाई, उच्चशिक्षणमंत्री अमित देशमुख, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, पर्यटन व सार्वजनिक बांधकाममंत्री व संमेलनाचे स्वागताध्यक्ष संजय बनसोडे, कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर उपस्थित होते.

**...तर गृहयुद्ध अटळ**

सामान्य माणूस सत्याचा शोध घेत नाही, नैतिकतेचा आग्रह धरत नाही. तो पूर्णतः भ्रमित झाला आहे, कुणीतरी मसिहा येईल आणि आपली सुटका करेल, असे भाबडे स्वप्न तो पाहात बसलाय. काही विचारवंत आता दबल्या आवाजात असे सांगत आहेत की, सध्या विषमता वाढू लागली आहे. गरीब लोक आता दरिद्री होत आहेत, श्रीमंत लोक अतिश्रीमंत होत आहेत. मध्यमवर्ग वेगाने विभाजित होत आहे. तो कनिष्ठ मध्यमवर्गात ढकलला जात आहे. दरी वाढते आहे. कदाचित पुढे जाऊन आर्थिक दुर्बल घटक आर्थिकदृष्ट्या बरी परिस्थिती असलेल्या समाजवर्गावर आक्रमण सुरू करेल. त्यातून हळूहळू गृहयुद्धाची परिस्थिती निर्माण होईल.

**अनेक तरुण पुंगीवाल्यांच्या नादी लागलेत**

सध्या काही पुंगीवाले अचानक उगवले आहेत. ते दुष्टबुद्धी, क्षुद्रबुद्धी आणि छद्मबुद्धी आहेत. त्यांना सूड उगवायचा आहे. कधी ते संस्कृतिरक्षक होतात, कधी अभिमानी राष्ट्रभक्त, कधी ज्योतिषी तर कधी ते भाष्यकार होतात. अशा सतत टोप्या बदलतात. एक म्हणतो, मी काशी, दुसरा म्हणतो मथुरा तर तिसरा स्वतःला अयोध्या सांगतोय. आपल्या तरुणांना असे भ्रमित करून हे पुंगीवाले त्यांना अंधाऱ्या खाईत लोटताहेत, असे सांगताना सासणे यांनी कल्पनेतील स्वगताचा आधार घेतला.

### सामान्य माणूस निर्भय होईल तेव्हाच 'अच्छे दिन'

लेखकाला भोवताल अस्वस्थ करतोय. लेखक बघतोय, आणि समजून घेतोय, त्याला जाणवतेय, तो सहकंपित होतोय. सरस्वतीचा अपमान आणि लक्ष्मीचे पूजनही तो पाहतोय. हा लेखक एक दिवस जागेल. तुमच्या आणि माझ्या मनात मेंदूत दडलेला सामान्य माणूस निर्भयतेने जगायला लागेल तेव्हाच 'अच्छे दिन' येतील, याकडेही सासणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून लक्ष वेधले.

# राज्यातील राजकारणावर मंथन

*(पान ३ वरून)* वातावरण तापू लागले. सभा, मेळावे सुरू झाले. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या. राज्यातील १५ महानगरपालिका, २०० पेक्षा अधिक नगरपालिका, २५ जिल्हा परिषदा आणि २००हून अधिक पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या तुताऱ्या फुंकल्या गेल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांद्वारे राज्यातील राजकीय वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याचा अंदाज येऊ शकेल. या निवडणुकांकडे राजकीय पक्ष कोणत्या कोनातून पाहतात यावर या दूरसंवाद मालिकेच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात येईल.

### संवादमालिका...

आगामी निवडणुकांबाबत या नेतेमंडळींची भूमिका वेबसंवादातून जाणून घेतली जाईल. सुरुवात सोमवारी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी होणाऱ्या संवादातून होईल, तर समारोप मुख्यमंत्री ठाकरे यांच्याशी गप्पांतून होईल.

रविवार, २४ एप्रिल २०२२

## लोकरंग

### निकड... संवादाधिष्ठित समाजाची!

▮ डॉ. सदानंद मोरे



अलीकडेच पुण्यात होणारी नास्तिक परिषद काहींनी तिच्या आयोजनाला आक्षेप घेतल्याने रद्द करण्यात आली. खरे तर आस्तिक-नास्तिकतेची चर्चा, त्यावरचा वितंडवाद आणि त्याची मीमांसा हे आपल्याला नवीन नाही. पूर्वापार हे चालत आलेले आहे. महाराष्ट्र तर सुधारणावादी चळवळी आणि वैचारिक खंडनमंडणात नेहमीच अग्रभागी राहिलेला आहे. या पार्श्वभूमीवर हे घडावे हे अधिक दुर्दैवी आहे.



### ऐतिहासिक चित्रपटांमागील सामाजिकता

▮ हेमंत प्रकाश राजोपाध्ये



### दृष्टी अमोलिक

▮ अतुल देऊळगावकर

## शब्दकोडे- ७१०

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ६ | ■ |
| ७ | | ■ | ८ | | | | ■ | ९ | १० |
| | ■ | ११ | | ■ | | ■ | १२ | | |
| १३ | १४ | ■ | १५ | | ■ | १६ | | | ■ |
| ■ | १७ | १८ | | ■ | १९ | | | ■ | २० |
| २१ | | | ■ | २२ | | | ■ | २३ | |
| ■ | | ■ | २४ | ■ | २५ | | २६ | ■ | |
| २७ | | | | २८ | ■ | २९ | | | |
| ३० | | ■ | ३१ | | | ■ | | ■ | |
| | ■ | ३२ | | | ■ | ३३ | | | ■ |

**आडवी विधाने :**
(१) खरा, सच्चा (४) पार्वती (७) संन्यासी, भिक्षुक
(८) तळमळ, अस्वस्थता (९) वेल, वल्लरी (११) मयूर
(१२) डंका, नौबत, एक मोठे चर्मवाद्य (१३) समेट, समझोता
(१५) सर्व बाजूंनी पाण्याने वेढलेली जमीन
(१६) यश, कीर्ती (१७) साहाय्य, हातभार
(१९) घड्याळाच्या घंटेचा आवाज (२१) तनू, काया, देह
(२२) पुष्प, फूल (२३) बर्फ (२५) पलंग विणण्याची सुती जाड पट्टी
(२७) कमळाचा देठ (२९) कर्नाटकातील घोंगड्या-कांबळी विणणारी एक जात
(३०) स्त्री, महिला (३१) धाक, दरारा, जरब
(३२) कैद (३३) वाट पाहणे

**उभी विधाने :**
(१) म्हातारा (२) मृत्तिका, धूळ (३) काटकसर, मितव्यय
(४) इच्छा, वासना, मनोरथ (५) सोडणे, वर्जणे, टाकून देणे
(६) पांढऱ्या पायांचा काळवीट (१०) नक्षत्र, तारका, चांदणी
(१२) दृष्टी, कटाक्ष (१४) अरेतुरे, एकेरीची भाषा, जोराचे भांडण
(१६) एकांतवास, अज्ञातवास (१८) भाव, किंमत, दाम
(१९) जाणे, हलणे (२०) मुलाचे नाव ठेवण्याचा विधी
(२४) खोटा, कृत्रिम (२६) युद्धातील डावपेच
(२७) कापडी भिंत, जवनिका
(२८) उसण, मुरगळणे, चमक

**– सरोज ताठरे**

## सुडोकू - ७१०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ८ | | | | |
| | | ८ | | | ७ | | | |
| ४ | | ६ | | | | | १ | ८ |
| २ | | | | ४ | ६ | १ | ८ | |
| | | | | | | | | |
| | ५ | १ | ३ | २ | | | | ६ |
| १ | ३ | | | | | ९ | | ५ |
| | | | २ | | | ४ | | |
| | | | | ३ | | | | |

## सुडोकू - ७०९चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ७ | ९ | ८ | ५ | २ | ४ | ३ |
| ८ | २ | ९ | ४ | ३ | ७ | ६ | ५ | १ |
| ३ | ४ | ५ | ६ | २ | १ | ८ | ७ | ९ |
| ७ | ६ | २ | १ | ५ | ३ | ९ | ८ | ४ |
| ४ | ५ | ३ | ८ | ६ | ९ | ७ | १ | २ |
| ९ | ८ | १ | ७ | ४ | २ | ५ | ३ | ६ |
| २ | ७ | ४ | ३ | ९ | ८ | १ | ६ | ५ |
| १ | ९ | ६ | ५ | ७ | ४ | ३ | २ | ८ |
| ५ | ३ | ८ | २ | १ | ६ | ४ | ९ | ७ |

## शब्दकोडे - ७०९चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र | ण | धु | मा | ळी | ■ | बे | ब | ना | व |
| ज | ■ | पा | या | ■ | र | का | ना | ■ | क्त |
| त | ग | र | ■ | क | वा | य | त | ■ | शी |
| प | ■ | त | मा | म | ■ | दा | ■ | सू | र |
| ट | व | ■ | न | र | द | ■ | अ | ट | ■ |
| ■ | च | क | म | क | ■ | त | नु | ■ | द |
| ब | क | ■ | रा | स | भ | ■ | न | र | म |
| र | ■ | सा | त | ■ | व | ल | य | ■ | द |
| खा | स | ख | ब | र | ■ | घू | ■ | त | मा |
| स्त | ■ | र | ■ | ग | ती | ■ | क | प | ट |

# पीएमपीला गाड्या पुरविणाऱ्या ठेकेदारांचा संप मागे

## ● ७०० गाड्या पुन्हा मार्गावर ● सार्वजनिक वाहतूक सेवा पूर्ववत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** थकीत रक्कम मिळावी या मागणीसाठी पीएमपीला गाड्या पुरविणाऱ्या ठेकेदारांनी सुरू केलेला संप शुक्रवारी दुपारी मागे घेतला. पीएमपीचे वरिष्ठ अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात चर्चा झाल्यानंतर संप मागे घेण्यात आला. त्यानंतर पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक सेवा पूर्ववत झाली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात पीएमपीच्या प्रतिदिन १५०० गाड्या धावतात. पीएमपीने गेल्या काही महिन्यांपासून थकबाकी दिलेली नाही. त्यामुळे थकबाकीची रक्कम तातडीने न दिल्यास सेवा बंद करण्यात येईल, असे पत्र ठेकेदारांकडून पीएमपी प्रशासनाला देण्यात आले होते. पीएमपीच्या ताफ्यात असलेल्या गाड्यांपैकी निम्म्या गाड्या ठेकेदारांच्या आहेत. गेल्या सहा महिन्यांपासूनची रक्कम मिळाली नसल्याचा दावा करत दैनंदिन संचलनातील सातशेहून अधिक गाड्या बंद ठेवण्यात आल्या होत्या.



पीएमपीला गाड्या पुरविणाऱ्या ठेकेदारांनी अचानक संप पुकारल्याने पीएमपी सेवेवर अवलंबून असलेल्या लाखो प्रवाशांचे शुक्रवारी हाल झाले. थांब्यांवर प्रवाशांची अशी झुंबड उडाली होती.

ठेकेदारांनी अचानक संप पुकारल्याने पीएमपी सेवेवर अवलंबून असलेल्या लाखो प्रवाशांचे हाल झाले. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार आणि पिंपरीचे आयुक्त राजेश पाटील, तसेच पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा यांच्यासमवेत चर्चा केली. दोन्ही महापालिका आयुक्तांनी पीएमपीला तुटीची रक्कम दिल्याचे सांगितले. त्यानंतर तातडीने थकबाकी दिली जाईल असे मिश्रा यांनी सांगितले आणि संपातील सहभागी ठेकेदारांबरोबर बैठक घेऊन तसे आश्वासन दिले. त्यानंतर संप मागे घेतल्याचे ठेकेदारांनी जाहीर केले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून संचलन तूट पीएमपीला देण्यात येते. त्यातून विविध रक्कम अदा केली जाते. ठेकेदारांना ९९ कोटी ९३ लाख १४ हजार २४९ रुपये देणे आहे. यापैकी काही दिवसांपूर्वी ६६ कोटी ५० लाख रुपये देण्यात आले होते.

# १६६ केंद्रांवर आज लसीकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शहरातील अठरा वर्षांवरील सर्व नागरिकांच्या आणि पंधरा ते अठरा वयोगटाबरोबरच बारा ते चौदा वर्ष वयोगटाच्या शनिवारच्या (२३ एप्रिल) लसीकरणासाठी महापालिकेने एकूण १६६ केंद्रे निश्चित केली आहेत. यातील पंधरा ते अठरा वयोगटासाठी स्वतंत्र ६८ केंद्रे, बारा ते चौदा वयोगटासाठी ३० स्वतंत्र केंद्रे असतील. अठरा वर्षांवरील सर्व नागरिकांच्या लसीकरणासाठी एकूण ६८ केंद्रे आहेत.

कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिनच्या ६८ केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि आघाडीच्या कर्मचाऱ्यांना वर्धक मात्रा देण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली. पंधरा ते अठरा वयोगटासाठीच्या प्रत्येक केंद्राला कोव्हॅक्सिन लशीच्या प्रत्येकी शंभर, तर बारा ते चौदा वयोगटासाठीच्या केंद्रांना कोर्बेव्हॅक्सच्या प्रत्येकी दोनशे मात्रा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अठरा वर्षावरील नागरिकांच्या लसीकरणासाठी कोविशिल्डची ६८ केंद्रे असतील. पहिली मात्रा घेऊन ८४ दिवस पूर्ण झालेल्या नागरिकांना उपलब्ध लशीपैकी २० टक्के प्रमाणात दुसरी मात्रा देण्यात येतील. ऑनलाइन नोंदणी शनिवारी सकाळी आठ वाजता सुरू होईल.

# हिंजवडीतील वीजपुरवठा आज सायंकाळी बंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** हिंजवडीतील वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम पूर्ण असून त्या अनुषंगाने काही कामे शनिवारी (२३ एप्रिल) केले जाणार असल्यामुळे हिंजवडी परिसरातील वीज पुरवठा शनिवारी सायंकाळपासून बंद राहणार आहे.

हिंजवडीतील विप्रो चौक ते हिंजवडी फेज तीनपर्यंत भूमिगत केबल टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्या अनुषंगाने काही कामे हाती घेण्यात आली आहेत.

या कामांसाठी शनिवारी सायंकाळपासून काही तासांसाठी वीज पुरवठा बंद राहील, अशी माहिती पुणे आयटी सिटी आणि मेट्रो रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.










# करोना प्रतिबंधक लशीचे उत्पादन बंद

## लशी वाया जाण्यापासून रोखण्यासाठी सीरमचा निर्णय - पूनावाला

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना प्रतिबंधक लशी वाया जाण्यापासून रोखण्यासाठी लशींचे उत्पादन थांबवल्याची माहिती सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी शुक्रवारी दिली. पैसा मिळवणे एवढेच माझे उद्दिष्ट नाही. लशी वाया जाऊ नयेत म्हणून आपण मोफत लसही उपलब्ध करून दिल्याचे पूनावाला यांनी नमूद केले. मुंबईतील एका कार्यक्रमात पूनावाला बोलत होते. करोना महासाथ अद्याप संपलेली नसल्याने लहान मुले असोत किंवा प्रौढ असोत; कोणाही नागरिकांच्या आयुष्यावर त्याच्या 'किमतीचे लेबल' लावणे परवडणारे नाही. त्यामुळे दुसऱ्या लाटेवेळी ज्या प्रमाणे वेळेवर निर्णय घेण्यात आले होते, त्याप्रमाणे वर्धक मात्रा आणि लहान मुलांचे लसीकरण या बाबत निर्णय तातडीने घेण्याची गरज आहे. पहिल्या दोन लाटांमध्ये नागरिकांना झालेला त्रास पुन्हा होऊ नये यासाठी लसीकरणाचा कालावधी नऊ महिन्यांवरून सहा महिने करण्याची आवश्यकता आहे. मात्र दुर्दैवाने ज्यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे, अशा समित्यांनी तातडीने बैठका घेणे आवश्यक असताना, तसे चित्र दिसत नसल्याचे पूनावाला म्हणाले.

लशीच्या मात्रेची किमत ६०० रुपयांवरून २२५ रुपयांपर्यंत कमी करूनही नागरिक लस घेण्याबाबत उदासीन आहेत. त्यामुळे लशी वाया जाऊ नयेत म्हणून लशींचे उत्पादन ३१ डिसेंबर २०२१ पासून थांबवण्यात आले आहे. सध्या २० कोटी लशी शिल्लक आहेत. अनेक देशांनी प्रवासासाठी वर्धक मात्रा बंधनकारक केली आहे. त्यामुळे देशांतर्गत आणि देशाबाहेर प्रवासासाठी वर्धक मात्रा देण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अनेक देशांतील संशोधनातून लशीच्या अंतराली कालावधी वाढवल्यास प्रतिपिंडांची पातळी कमी होत असल्याचे दिसून आले आहे, असे पूनावाला यांनी नमूद केले. ७ ते ११ वयोगटातील मुलांना लस देण्यासाठी सरकारच्या परवानगीची प्रतीक्षा आहे. नियामकांकडून कोव्होव्हॅक्सला परवानगी मिळूनही आणि ऑस्ट्रेलिया, युरोपला लशीचा पुरवठा सुरू करून बराच काळ होऊनही आपल्याकडे मुलांना लस देण्याबाबतचा निर्णय झालेला नाही. सरकारला आरोग्याचे महत्त्व वाटत असूनही तातडीची निकड मात्र वाटत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

# समाजाचे प्रत्येक अंग आज अस्वस्थ

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे मत



महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन मोहन भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. एस. एफ. पाटील आणि अनिल गुजर यांच्या हस्ते भागवत यांचा सत्कार करण्यात आला. बाबा कल्याणी, सुनीता कल्याणी आणि सतीश आगरवाल या वेळी उपस्थित होते.

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** समाजाचे प्रत्येक अंग आज स्वस्थ नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी शुक्रवारी व्यक्त केले. ही अस्वस्थता दूर करण्यासाठी ज्ञान आणि कुशल कर्माबरोबरच आपलेपणाच्या भावाने केलेल्या सेवेची खूप गरज आहे. समाज सशक्त करणाऱ्या कार्यास बळ दिले तरच बलशाली देश घडेल, असेही ते म्हणाले.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अनुदानातून उभारलेल्या महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन भागवत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी आणि सुनीता कल्याणी, महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एफ. पाटील, उपाध्यक्ष सतीश आगरवाल आणि सचिव अनिल गुजर या वेळी उपस्थित होते.

भागवत म्हणाले, आयुर्वेद, अॅलोपॅथी, होमिओपॅथी अशा विविध चिकित्सापद्धती एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या गेल्या, तर सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपचार मिळणे शक्य होईल. सध्या उपचारांवर मोठा खर्च करावा लागतो. त्याचा ताण रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांवर येतो. आयुर्वेदात 'इलनेस'बरोबरच 'वेलनेस'चाही विचार केला गेला आहे.

'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' या साने गुरुजी यांच्या विचारांवर संस्था कार्यरत आहे. करुणा हे धर्माचे मूळ तत्त्व आहे. माणसाकडे परदुःख कातरता ही एक देणगी आहे. त्या प्रेरणेतून दादा गुजर यांनी हे काम उभे केले आहे. त्यांच्यानंतर अनिल गुजर यांनी हे कार्य सुरू ठेवले आहे, अशी कामे वाढली पाहिजेत. एकमेकांना सहकार्य करीत सर्वांना उभे करण्याचे काम झाले पाहिजे, असेही भागवत यांनी सांगितले.

बाबा कल्याणी म्हणाले, डॉ. दादा गुजर यांच्या माध्यमातून आदिवासी आणि ग्रामीण भागात मोठे काम उभे राहिले आहे. सामान्यांना परवडणारी गुणवत्तापूर्ण आणि सुलभ सेवा देण्याचे काम मंडळ अविश्रांतपणे करत आहे.

डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अनिल गुजर यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले.


**विशाल जुन्नर सहकारी पतपेढी मर्यादित,मुंबई**

ऑफीस :- पाटस दौंड रोड, गुरूकुल शाळेच्या मैदानाजवळ, पाटस, ता. दौंड, जि. पुणे ४१२२१९

जावक क्रमांक : विजुसप/ एस.आर.ओ./०७/२०२२-२०२३ दिनांक : २०/०४/२०२२

**स्थावरतारण मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस नमुना 'झेड'**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१(१)प्रमाणे विशाल जुन्नर सहकारी पतपेढी मर्यादीत, मुंबई पाटस दौंड रोड, गुरूकुल शाळेच्या मैदानाजवळ, पाटस, ता. दौंड, जि. पुणे ४१२२१९ यांनी मा. उपनिबंधक / सहाय्यक निबंधक यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचे कडुन त्यांचे असणारे कर्ज वसुली करीता लवादी दाखला प्राप्त केलेले आहे. त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७ (११)(ड-१)(पहीली सुधारणा नियम २०१४ दि. ३०/०८/२०१४ ची अधिसुचना)प्रमाणे वसुली अधिकारी श्री. प्रमोद वसंतराव सागर व्दारा विशाल जुन्नर सहकारी पतपेढी म., मुंबई महाराष्ट्र सहकारी संस्था यांचा आदेश जावक क्र. एस.आर.ओ./१०२/२०२१-२०२२ दि. १६/०३/२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०४/०४/२०२२ या दिवशी खालील थकबाकीदार यांच्या निम्नलिखीत स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला आहे या नोटीशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्तेचा तबदील केल्यास, कोणतीही खाजगी हस्तांतर, स्विकृत करणे किंवा बोजा निर्माण करणे अगर तारण देण्यास या नोटीशी अन्वये मनाई करण्यास येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव , वसुली दाखला क्र. व दिनांक | मालमत्तेचे वर्णन व क्षेत्रफळ व चतु:सिमा |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख सममूल्य | १,३८३.६३ | ६७४.५३ |
| रोख आणि रोख सममूल्यव्यतिरिक्त बँक बॅलन्स | २.१३ | ४.८३ |
| मुल्यक आर्थिक साधने(डेरीव्हेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | ०.०० | १०१.८६ |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | ७२०.१० | ८६७.१८ |
| कर्ज | १,१३,०८९.९४ | १,१३,४१७.०८ |
| गुंतवणूकी | २०,९६९.१२ | २०,१३८.९८ |
| इतर आर्थिक मालमत्ता | ४८७.३३ | ३१९.५१ |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **१,३५,८५२.२५** | **१,३५,६२३.८७** |
| **बिगर-आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | १११.०४ | २०४.५७ |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | ६११.२१ | ८४७.६१ |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | १,०२.४४ | १,०११.१६ |
| भांडवल काम प्रगतीपथावर | ७.०७ | ०.०० |
| विकास अंतर्गत अमूर्त मालमत्ता | ४३.११ | ०.०० |
| अमूर्त मालमत्ता | २७४.८६ | २११.९८ |
| इतर बिगर-आर्थिक मालमत्ता | १३४.१० | ९९.३८ |
| **एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता** | **२,४८६.६४** | **२,३७९.७०** |
| **एकूण मालमत्ता** | **१,३८,३३८.८९** | **१,३८,००३.५७** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| मुल्यक आर्थिक साधने देय | १२७.८७ | |
| व्यापार देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.३४ | ०.३० |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोंची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | ६७६.६२ | ६३६.८६ |
| इतर देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | - | - |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोंची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | १११.०७ | ४०९.४६ |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | ४३,७०१.७१ | ४१,७१३.७७ |
| उधारी (कर्ज रोखे व्यतिरिक्त) | २७,०१२.०१ | ३६,९२३.३२ |
| ठेवी | २५,८०३.४३ | २१,४२७.१० |
| उप-कर्ज | ३,८१८.६१ | ४,५११.८४ |
| इतर आर्थिक देणी | ७४३.६५ | ६६१.१० |
| **एकूण आर्थिक देणी** | **१०१,६१५.३३** | **१०५,६१२.३६** |
| **बिगर-आर्थिक देणी** | | |
| सध्याचे करांचे देणे (निव्वळ) | १७२.८८ | ५२.१० |
| तरतुदी | १२६.५६ | ७८.८७ |
| इतर बिगर-आर्थिक देणी | ४८५.४८ | ३६७.०३ |
| **एकूण बिगर-आर्थिक देणी** | **७८४.८२** | **४९८.००** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | १२०.३२ | ११९.९९ |
| इतर इक्विटी | ३५,८१८.४२ | ३१,६९३.२२ |
| **एकूण इक्विटी** | **३५,९३८.७४** | **३१,८१३.२१** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **१,३८,३३८.८९** | **१,३८,००३.५७** |

**आकस्मिक देणी (स्टॅंडअलोन)**

| तपशील | ३१ मार्च २०२१ रोजी | ३१ मार्च २०२० रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरुद्धचे विवादाचे दावे | ५१.९८ | ४१.१८ |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | ४.२९ | ४.२९ |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | ५.१४ | ५.१४ |

| तपशील | ३१ मार्च २०२१ रोजी | ३१ मार्च २०२० रोजी |
|---|---|---|
| अपील अंतर्गत सेवा कर बाबी | | |
| - व्याज सबसिडीवर | १,९०५.४४ | १,९७१.६५ |
| - दंडव्याज/ चार्जेस वर | २३७.२५ | २२३.१५ |
| - इतर बाबत | ६.४२ | ६.२२ |
| प्राप्तीकराच्या बाबी: | | |
| - कंपनीद्वारे केलेली अपील | ०.०० | ०.३२ |
| - प्राप्तीकर विभागाने केलेली अपील | ०.२८ | ०.२४ |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अॅक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिट्स (रिझर्व्ह बँक) डायरेक्शन्स, २०१६ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: ४९,२५४.५५ कोटी**

**ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२१ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : २५,८०३.४३ कोटी**

ज. ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वरस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उद्दीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरूपाची एकूण देणी (थकीत) ही ५२.५५ कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लिमिटेड - ५.३६ कोटी, बजाज आलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - ४.५१ कोटी, बजाज आलियान्झ जेनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - ३४.२२ कोटी, बजाज फिनसर्व्ह डायरेक्ट लिमिटेड - ०.२५ कोटी, बजाज फिनसर्व्ह हेल्थ लिमिटेड [illegible]

[illegible]

१. [illegible] ... कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खरगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोट्टयम, कोयम्बतूर, कोटा, कोल्लम, कुर्नूल, कुंभकोणम, लातूर, लखनौ, लुधियाना, मछलीपट्टणम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, महाड, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकोईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदूरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पटना, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पॉंडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायपूर, रायचूर, राजमुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, रामनाथपुरम, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपर, साकलेश्पुर, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, शिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, तिरुपती, तिरुनेलवेली, तिरुपती, तिरुप्पूर, तिरुर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमकूर, तुतिकोरीन, उदयपूर, उडिपी, उज्जैन, वडोदरा, वलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगळ, वर्धा, यवतमाळ, यमुनानगर, झिरकपूर आणि आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर भेट द्या.

२. कंपनीच्या उपकंपन्या यांच्या असलेला व्यापार-उद्दीम:

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार-उद्दीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने २० जुलै २०२१ च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि मंडळाने अधिकार दिलेले राजीव जैन, व्यवस्थापकीय संचालक यांनी सही केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे. मुदत ठेवीचा अर्ज आणि KYC च्या पूर्तीनंतरच अटि-शर्ती च्या अनुसार ठेव घेतली जाईल.

पुणे
१९ एप्रिल २०२२

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

**गुंतवणूक कशी करावी:**
गुंतवणूक चेक धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास Bajaj Finance Ltd. A/c 00070350006738 ह्या नावाने काढावा. त्यावर 'अकाउंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS सुविधा असावा. [illegible] आयएफएससी: INDB0000006, बँक शाखा: नरिमन पॉईंट, मुंबई. गुंतवणूक https://www.bajajfinserv.in/fixed-deposit [illegible]
अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी wecare@bajajfinserv.in वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०१०१०१ वर फोन करा.

---

# लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

## नोकरीविषयक

**Urgently** Required Teachers for : Physics, Math (B.Ed. compulsory), Lab Technician, Librarian (B.Lib / M.Lib), Physical Education Teacher (B.P.Ed. / M.P.Ed). Preference will be given to ICSE board experience. Email your resume : pdschool02@gmail.com or WhatsApp on 9175900756
0090302886-1

## विवाहविषयक

## वधू-वर मेळावा

**फक्त** मराठा समाजातील इच्छुक वधूवरांसाठी वधू-वर मेळावा. रविवार २४ एप्रिल २०२२, सायंकाळी ५ वाजता. नोंदणी शुल्क ५००/- (पाचशे मात्र). नोंदणी एक वर्षासाठी चालू राहील. ठाणे मराठा मंडळ हॉल, हरिनिवास सर्कलजवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम). सौ. उज्वला सुर्वे - 9322236541/ 8655480744. सौ. सुरेखा मालुसरे - 9819650959.
0070778824-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

## मालमत्ताविषयक

**तळेगाव** स्टेशनपासून २ किलोमीटर, वराळे रोडवर निसर्गरम्य परिसरात, अत्याधुनिक सोयी असणाऱ्या सोसायटीत 2 BHK (७१०') विकणे आहे. संपर्क- 7887421049.
0070781520-1

**पुण्याजवळच** रिसॉर्ट मेम्बरशिपमध्ये फक्त ११ लाखांत प्लॉटसहीत कमवते घरासाठी तसेच मुंबईजवळच कोंकणात नदीडॅम समुद्रलगत फार्म प्लॉट बंगलोसाठी 9175284426/ 8097641182 www.newunnati.in
0070781885-2

**भविष्यात** पाण्यासाठी महासंकटे येऊ शकतात, आत्ताच घ्या नदीडॅम, समुद्रलगत फार्महाऊस प्लॉट ५०% लोन सुविधा. बुकिंगसाठी- 8010059340/ 8097641181.
0070782102-1

**कणकवली,** सिंधुदुर्ग एनएच-६६ हायवेवरील फॅमिली रेस्टॉरंट व कॅफे भाड्याने देणे आहे. एसी १५०० चौ.फू.+ १००० चौ.फू. गार्डन. संपर्क : 7721875227.
0070781850-1

visit us at WWW.LOKSATTA.COM

## वॉटरप्रूफिंग

**डॉ.फिक्सिट** विना तोडफोड १००% लिकेज बंद करु. टॉयलेट, बाथरुम, टेरेस, वॉलक्रॅक, पाण्याची टाकी पेंटिंग १० वर्षे लेखी वॉरंटी. ९३२५८४३४४३
0090295746-1

## सर्व्हिसेस

## भविष्यविषयक

**अॅस्ट्रॉलॉजी:** गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा-चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ६, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र - कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070780108-1

## वैद्यकीय

**औषधे/ शस्त्रक्रियेविना-** सायटिका, सायनस, स्पॉंडिलायटीस, गुडघेटाच, कंबरपाठ, हिपखांदा, वातपित्तकफ, ॲसिडीटी, मायग्रेन, ई.एन.टी., हाडस्नायू, रक्ताचे, मधुमेहाचे, थायरॉईड, पोटांचे, मूत्राशयाचे, श्वसनाचे, त्वचेचे, मानसिक- आजारांवर, ''सुजोकथेरपी'' बहुपयोगी. डॉ. भुतडा- ९४२०८६१९२१. ''घरपोच सेवा.''
0090302623-1

## यात्रा विशेष

## यात्रासहल

**अमरनाथ-काश्मीर.** पुणे ते पुणे विमान ७ रा. २८ जून शास्त्री ७३७८८४३६६५/ डिंगरे ९८९००७३२००
0090302188-1

**उटी** फ्लॉवर शो सोबत मैसूर, बेलूर, हळेबिड, चिक्कमगळूर २० ते २६ मे. शास्त्री ७३७८८४३६६५/ डिंगरे ९८९००७३२००
0090302189-1

## नावात बदल

Old Name Sapna Mukund Kalantri New Name Sapna Ramkishore JhawarAffidavit No 759/2022 Dt 18/4/22
0090302901-2

Old Name Sapnaa Mukund Kalantri New Name Sapna Ramkishore Jhawar Affidavit No 760/2022 Dt 18/04/2022
0090302901-1

**माझे** लग्नाआधीचे कु. ममता राजेंद्र देवगांवकर हे नाव बदलून आता सौ. राजश्री राजेश खिस्ती असे झाले आहे. सर्वांनी नोंद घ्यावी. ॲफिडेव्हीट नं. १३३३
0090302873-2

**मी मनोजकुमार दत्तात्रय कोकाटे,** रा. पांगरी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद (पिन कोड ४१३५२६) या नावाने सध्या परिचित आहे. शालेय रेकॉर्डवर माझे नाव मनोजकुमार दत्तात्रय कोकाटे असेच आहे. परंतु आधार कार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक इ. वर माझे नाव मनोज दत्तात्रय कोकाटे असे आहे. मनोज दत्तात्रय कोकाटे आणि मनोजकुमार दत्तात्रय कोकाटे या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असून, मी स्वतः आहे. मात्र इथून पुढे माझे नाव हे 'मनोज दत्तात्रय कोकाटे' असेच वापरण्यात यावे. ॲफिडेव्हीट नं. ९३७/२०२२, दिनांक २१/०४/२०२२.
0090302883-1

I have changed my name from Jyoti Subarao Patil to Jyoti Sachin Gilbile as per the documents.
0070782084-1

Name Changed (Old Name) Monika Sudam Sahane to (New Name) as Monika Mukesh Nirmal as per Affidavit No: A/1529/2022
0090302889-1

Old name Sindhubai Madhukar Arude new name Sitabai Madhukar Arude address Antariksha Hsg soc, bldg B-8/303, Udhyamnagar, Pimpri 411018 reg.no.11/2022
0090302888-1

My old name was Mr. Hamid Allaoddin Pirajade change to new name as Mr. Abdulhamid Allaoddin Pirajade Reg No. (P-2014854)
0090302871-1

लोकसत्ता Classifieds

## महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## छोट्या जाहिराती स्वीकारण्याची केंद्रे

**चिंचवड**
**अॅपेक्स अॅडव्हर्टायझिंग,** श्री. आशफाक ए.शेख, सी-२५, एमआयडीसी कमर्शियल बिल्डिंग नं. १, आयबीएमआर कॉलेजजवळ, चिंचवड, पुणे. फोन २७४७०२८२, मोबा. ९८२२७९२५८३.
**मयुरेश्वर एन्टरप्रायझेस,** लोकेश बलकवडे, चाफेकर चौक, चिंचवडगाव, पुणे. मोबा. ९४२२०८२१६४.
**राका अॅडव्हर्टायझिंग,** श्रीमती विमल बाफना, राका चेंबर्स, मुंबई-पुणे रस्ता, चिंचवड स्टेशन, पुणे-१९. फोन २७४७५०५५, २७४७२२५०.
**कॅम्प**
**अॅड इंडिया,** ऑफिस नं. १०२, पहिला मजला, स्टर्लिंग सेंटर, हॉटेल अरोरा टॉवरसमोर, म. गांधी रस्ता, पुणे-१. फोन २६१३१९९३, २६१३५६५९, ९४२२०८३६७०.
**हिंदुस्तान अॅडव्हर्टायझिंग एजन्सी**
श्री. हिरो सुरतानी, ७, गितांजली कुंज, नेहरू मेमोरियल हॉलसमोर, आंबेडकर रस्ता, पुणे-१. फोन २६१३८११३, २६१३३५१०, फॅक्स २६१३१४८७.
**मिनत अॅडव्हर्टायझिंग**
मुकुंद सायगांवकर, ८२७/७, दस्तूर मेहेर रस्ता, कॅम्प, पुणे-१. फोन २६१३०५४२.
**दापोडी**
**व्हेंटेज अॅडव्हर्टायझिंग अॅण्ड मार्केटिंग,** ए-१७, 'सी' बिल्डिंग, तिसरा मजला, काटे रेसिडेन्सी, दापोडी रेल्वे स्टेशनजवळ, दापोडी, पुणे-४११०१२. फोन २७१४३२४३. मोबा. ९८२२८४७२५६, ९८२२१३२५००.
**डेक्कन**
**प्राजक्ता अॅडव्हर्टायझिंग,** श्री. सुधनवा जाधव, ग्रीटवेल, १२५०, डेक्कन जिमखाना, फर्गसन कॉलेज रोड, पुणे-४. फोन २५५३१४०९, ६६०१४१३२.
**देहू रोड**
**मुंदकल एन्टरप्रायझेस,** श्री. रोजी सॅम्युएल राजू, ६, युनिक हौसिंग सोसायटी, टेलिफोन एक्स्चेंजजवळ, देहूरोड, पुणे-४१२१०१. मोबा. ९४२२५१९२६४.
**फर्गसन कॉलेज रस्ता**
**धंधानिया एजन्सीज,** श्री. रवी धंधानिया, पहिला मजला, श्रीनाथ प्लाझा, ज्ञानेश्वर पादुका चौक, फर्गसन रस्ता, पुणे-४११००५. फोन २५५२१६९९, २५५३७९३३.
**कोनार्क मिडिया सोल्युशन प्रा. लि.,** फ्लॅट नं. ६, पहिला मजला, प्रभा तारा अपार्टमेंट, हॉटेल वैशालीमागे, फर्गसन रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४. फोन ३२६०६०१२. मोबा. ९८२३१४२४१०. टेलिफॅक्स २५५३७०१३.
**मिरा सोसायटी,** पहिला मजला, १०, ओसवाल पार्क, रचना लॉजसमोर, सफारी हॉटेलमागे, एस.टी. स्टॅंडजवळ, शिवाजीनगर, पुणे-५. मोबा. ९४२१०१७४५७.
**फातिमानगर**
**अरोरा एन्टरप्रायझेस,** राजेश अरोरा, ऑफिस नं. ६३, बिल्डिंग-I, फेज-III, परमारनगर, वानवडी, पुणे-१३. टेलिफॅक्स ०२०-२६८६०८३४
**घोरपडी**
**कन्या इंटरनॅशनल,** ए-१८, सुचंद्र कॉर्नर, बी. टी. कवडे रोड, घोरपडी, पुणे-४११००१. मोबा. ९४२२०८६७६२, ९९२११७७८१६.
**हडपसर**
**प्लस मिडिया,** फ्लॅट नं. २२, तुलसी कॉम्प्लेक्स, रवीदर्शनसमोर, कल्याण बँकेजवळ, गाडीतळ, हडपसर, पुणे-२८. मोबा. ९७६२५४७२५४.
**पूजा एन्टरप्रायझेस,** एफ-९६, मंत्री मार्केट, हडपसर, पुणे. मोबा. ९०११०३६१२५, ९८९०६३५४२५.
**गुरुवार पेठ**
**टी.व्ही.एस. एन्टरप्रायझेस,** ४६०, गुरुवार पेठ, संत गंगानाथ महाराज रोड, काची गल्ली, पुणे-४११०४२. फोन ०२०-२४४५६२९७, मोबा. ८९७५११०३२५, ९४२१८१५४२८

# करमणूक

महाराष्ट्र टाइम्स - 'नरसिंह सम हा ! म्हणावे असे रूप पडदयावर इतिहास जिवंत करते।
लोकमत फिल्मी - अंगावर काटा आणणारा भव्य दिव्य 'शेर शिवराज'.
लोकमत - शिवरायांचा अफझलखान वधाचा माइंड गेम.
TV9 Marathi - 'शेर शिवराज' ची दुमदुमणारी गर्जना बरंच काही शिकवून जाते.
मुंबई तक - खानाचा डाव उधळणाऱ्या राजांच्या शौर्याची गाथा म्हणजे 'शेर शिवराज'
पिंगमून मराठी - छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्धतंत्र आणि त्यातील बारकावे दिग्दर्शकाने उत्तम मांडले आहेत.
कलाकृती मिडिया - केवळ युद्ध नव्हे तर एक सायकॉलॉजिकल वॉर.
Movie Talkies - The Most Glorious Chapter In Digpal Lanjekar Historical Series On Legend Chhatrapati Shivaji Maharaj.
नवराष्ट्र - महाराजांच्या गुप्तहेरे यंत्रणेचे शौर्य. फिल्मी टाऊन – जबरदस्त चित्रपट.
न्यूज़ डंका – उत्कंठावर्धक चित्रपट. अल्ट्रा मराठी – अभ्यासपूर्ण मांडणी असलेला चित्रपट.




सिटीप्राईड मंगला पुणे ३.३०, १०.००; सिटीप्राईड सातारा रोड ३.००, ९.३०; सिटीप्राईड काथेरुड ११.३०, २.४५, ९.३०; सिटीप्राईड आर डेक्कन १२.३०; सिटीप्राईड रॉयल पिंपळे सौदागर ५.१५; राजहंस पुणे ९.१५, ३.४५; वसंत पुणे ६.४५; अलका पुणे ३.००; राहूल पुणे १२.३०; पीव्हीआर पॅव्हेलियन पुणे १०.००, ४.००, १०.१५; पीव्हीआर मार्केट सिटी पुणे ८.४५,१.१०, ४.२०, ७.३०,१०.४५; पीव्हीआर कुमार पॅसिफिक पुणे ९.००, ४.००, ११.००; आयनॉक्स हेरिटेज मॉल पुणे १.४५, ७.४०; आयनॉक्स अमानोरा मॉल पुणे १.१५, ४.२५, ७.३५; आयनॉक्स बंड गार्डन ४.३०; आयनॉक्स जयगणेश पिंपरी ११.५०, ६.४५; आयनॉक्स एल प्रो मॉल चिंचवड १२.०५, ७.३५; सिनेपोलिस सिझन मॉल मगरपट्टा ९.००, १२.१५, ३.३०, ८.००, ५.१५; सिनेपोलिस वेस्ट एण्ड आधं ९.४५, १.००, ४.१५, ७.३०, १०.४५; शिवरत्न पुणे ६.३०; कार्निवल सभुद्रा बारामती रा. ८.००; कार्निवल प्रिमियर प्लाझा चिंचवड ७.३०; कार्निवल स्पाईन मॉल भोसरी ९.३०, ७.००; अभिरुची सिटीप्राईड सिंहगड रोड ११.४५, २.४५, ७.३०; फनटाईम सिंहगड रोड १२.००, ५.४५; ई स्क्वेअर बॉलिवूड खराडी ९.००, रा. ८.३०; ई स्क्वेअर विशाल पिंपरी ६.००; ट्रायाजे लाणावळा ६.३०; सिनेब्लिज निलकमल लोणावळा ९.३०, ६.३०; वैभव हडपसर १२.४५; प्लॅटिनम जन्नुर १२.३०, ९.३०; श्वेता जन्नुर १२.३०; तारा बारामती १२.४५; राहूल इंदापूर ६.३०; केशर इंदापूर १०.००, ६.३०; डिजीगोल्ड नाव्हा शिरुर ९.३०, १२.३०, ७.००; आझाद शिरवळ १२.००, ६.००; लक्ष्मी प्लेक्स नारायणगाव ६.३०; नवनाथ वणवेडी १२.००; बालाजी शिकरापूर ६.३०; विकास मंचर ६.३०; श्री समर्थ जेजुरी १२.००; शिवम रांझणगाव ६.३०; फनस्क्वेअर घाटावडे फाटा ४.००; आशिष नीरा १२.००; गंजुन पेठ ६.३०; गंजुन न्हावरे ३.३०, ६.३०, ९.३०

BPS




# अस्वस्थतेचा आत्मशोध...

**उदगीर येथे सुरू झालेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांच्या भाषणाचे हे संपादित अंश... लेखकीय अस्वस्थतेचा सामान्यजनांशी संबंध काय, हे शोधू पाहणारे...**

**मित्रहो, काळ** तर मोठा कठीण आला असं विषादपूर्व विधान काळाच्या प्रत्येक टप्प्यावर चिंतनशील लेखकाने नोंदवून ठेवलेलं आहे. प्रत्यक्षात 'काळ' ही भव्य संकल्पना आपल्या चिंतनपरंपरेमध्ये आपण स्वीकारलेली आहे. भर्तृहरीने असं म्हटलं आहे की, दिवस-रात्रीच्या एका आड एक असलेल्या काळ्या-पांढऱ्या चौकटींवर, स्त्री-पुरुषांचे विविध मोहरे फेकून त्यांचा चालू असलेला प्रारब्धविषयक खेळ 'काळ' स्वतःच पाहात रमत बसलेला असतो. मला स्वतःला भर्तृहरीची ही कल्पना भव्य आणि थरारक वाटलेली आहे. स्वतः काळच कर्ता आणि भोक्ता असेल तर सामान्य माणूस कोण आहे असा प्रश्न यातून निर्माण होतो. साहित्याला या प्रश्नाचं उत्तर द्यायचं असतं-द्यावं लागणार असतं.

***

तत्पूर्वी, लेखक का लिहितो याची थोडी चर्चा करूया. निर्मिती प्रक्रियेचा 'आंतरिक अस्वस्थते'शी संबंध असल्यामुळे 'आपण अस्वस्थ आहोत' असं विधान प्रतिभावान कलावंत करताना दिसतात, मात्र आपण अस्वस्थ का आहोत या प्रश्नाचं उत्तर सहसा मिळत नाही. लेखक या नात्याने, मलादेखील हा प्रश्न विचारला गेला आहे आणि मला त्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं आहे.

प्रतिभावंत-कलावंत-स्वतःला साक्षीदाराच्या वेदनामयी भूमिकेतून पाहतात. म्हणजे, 'पाहणारा' आणि 'पाहणाऱ्यालाही पाहणारा' अशी ही दुहेरी भूमिका असते. ही भूमिका मोठी वेदनामयी असते. हे साक्षित्व अज्ञेयाकडे अंगुलिनिर्देश करतं.

निर्मिती प्रक्रियेचा आत्मीय असा एक घटक या नात्याने प्रतिभावंत-कलावंत स्वतःला अस्वस्थ होताना पाहतात. स्वस्थतेत निर्मितीच्या शक्यता नसतात, म्हणून त्याला, त्यामुळे स्वस्थतेची भीती आणि अस्वस्थतेचं आकर्षण वाटत राहतं.

***

आत्मोद्गार अपरिहार्य होऊन प्रकटू लागतो तेव्हा चांगल्या किंवा श्रेष्ठ कलाकृतीचा जन्म होतो. बहुधा असा आत्मोद्गार सहकंपातून निर्माण होतो. भोवताली, अनेक पातळ्यांवरून, अनेक पद्धतीने, अनेक प्रकारे संघर्ष करीत जगत राहणाऱ्या जीवांकडे पाहून जी काही एक वैश्विक करुणा निर्माण होत असेल त्या करुणेतून काहीएक प्रेरणा घेऊन लेखक लिहायला लागतो व अनेकांच्या वेदना स्वीकारून आणि सहकंपित होऊन जीवनदर्शी लेखन करतो. चिंतनशील व प्रामाणिक अशा लेखकाचं हे असं भागधेय असतं. मनोरंजन किंवा बुद्धिरंजन हा लेखनाचा मग हेतू उरत नाही, तर सर्वसामान्य माणसाचा शोध हा हेतू लेखनामागे शिल्लक राहतो. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून अशा माणसाचा शोध घेणं माझ्या लेखनाचं प्रयोजन आहे.

तुमचं लेखन वास्तववादी असलं पाहिजे अशा प्रकारचा आग्रह लेखकाच्या भोवती धरला जातो. वास्तववाद म्हणजे काय याबाबतच्या व्याख्या मात्र वेगवेगळ्या असू शकतात. आपल्या साधनाकाळातच लेखकाने वास्तवाचा हा गुंता सोडवणं हितकारक असतं. एकच एक वास्तव कधीच अस्तित्वात नसतं. एकाचं वास्तव दुसऱ्याचं स्वप्न असू शकतं. त्यामुळे वास्तव व्यक्तिसापेक्ष असतं याची जाणीव लेखकाने ठेवणं गरजेचं असतं. वास्तव बदलत राहतं आणि मुळातून ते बदलतसुद्धा नाही. उदाहरणार्थ चिरंतन मूल्यं किंवा ईश्वरी सत्ता बदलत नाही. समाज बदलतो, मान्यता बदलतात, गरिबी आणि श्रीमंती येते आणि जाते, बेकारी वाढते आणि कमी होते. या बदलत्या वास्तवाची साहित्याने दखल घ्यायची असते.

सामान्य माणसाचं दुःख प्रतिबिंबित करण्याची साहित्याची प्रतिज्ञा असेल तर सामान्य माणूस लेखनप्रेरणेचा केंद्रबिंदू मानावा लागतो हे तथ्य साधनाकाळातच लेखकाने स्वीकृत केलेलं बरं. लेखकासाठी सर्वसामान्य माणूस हा नेहमीच आस्थेचा आणि कुतूहलाचा विषय राहिलेला आहे. लेखकाला सर्वसामान्य माणसाच्या शोधाबाबत आस्था असावी लागते. त्याच्या जगण्याबद्दल, त्याच्या छोट्या छोट्या लढायांबद्दल आस्था बाळगावी लागते. सर्वसामान्य माणसाच्या संभ्रमावस्थेबाबत कुतूहल लेखकाला चिंतनशील बनवतं. सामान्य माणसाच्या दुःखाचा परिहार कसा होऊ शकेल याबाबत काहीएक चिंतन लेखकाला उपकारक ठरून श्रेष्ठत्वाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी साहाय्यभूत ठरतं.

सर्वसामान्य माणसांच्या जीवनव्यवस्थेतील छोट्या छोट्या लढायांबाबत लेखक आस्था बाळगतो तेव्हा तो थोडा स्थिर झालेला असतो. साहित्यक्षेत्रात परिचितही झालेला असतो. येथून पुढे मग 'व्यवस्था' तुम्हाला 'कमिट' होण्याचा आग्रह धरू लागते. तुम्हाला कथित 'सामाजिक बांधिलकी' आहे वा नाही याबाबतची एक झाडाझडती एव्हाना होऊन गेलेली असते. त्यानंतर लेखकावर दबाव वाढू लागतो. कोण आहात तुम्ही? तुम्ही व्यवस्थाविरोधी आहात काय? की व्यवस्थेचे समर्थक आहात? तुम्ही कोणत्या ग्रुपचे आहात? तुम्ही कोणत्या कळपामध्ये जाऊन पोहोचला आहात? प्रश्नांचा हा असा गलबला असला तरी लेखकाला स्वतःच्या अंतःप्रकाशात आपली स्वतःची वाट स्वतःच शोधावी लागते, आणि त्याची किंमतही मोजावी लागते.

कलाकृती ही 'कलाकृती' असल्यास त्याकडे कलाकृती म्हणून पाहिलं पाहिजे असं कोण्या जाणकार समीक्षकाने म्हटलं आहे. आपल्या अपेक्षांचं ओझं लेखकावर आणि कलाकृतीवरही लादणं योग्य नसतं, याचा विचार सहसा कोणी करताना दिसत नाही. लेखकाला हे 'अडाणी ओझं' संत्रस्त करू शकतं. आपल्या निर्मितीच्या प्रक्रियेत अशा अपेक्षा अडकाठी ठरणार नाहीत याची काळजी त्याला घ्यावी लागते. पण मग लेखकाची बांधिलकी कोणती, हा प्रश्न शिल्लक राहतोच. मी स्वतः, सामान्य माणसाला लेखनाचा केंद्रबिंदू मानतो. ज्या मातीशी त्याची नाळ जुळलेली असते आणि ज्या नाळेतून त्याला जीवनरस प्राप्त होतो त्या नाळेशी माझी बांधिलकी आहे.

***

एकूणच उत्तराधुनिक व्यामिश्र जीवनपद्धतीला स्वतःत सामावून घेण्याची व समकालीन परिस्थितीबद्दल काहीएक समर्थपणे सांगण्याची शक्ती दीर्घकथेमध्येच असल्यामुळे येथून पुढे दीर्घकथेकडे आपण आशेने पाहू शकू असं चित्र दिसतं. दीर्घकथेची काहीएक परिभाषा तयार करणं, दीर्घकथेचे तंत्र काही प्रमाणात स्पष्ट करणं असं काही काम मराठी समीक्षेच्या क्षेत्रामध्ये होणं आता गरजेचं आहे. मराठीतल्या दीर्घकथेच्या रूपाने मराठी भाषेने अन्य भाषांना देणगी दिली आहे अशी चर्चा मी नुकतीच वाचली. मी या विधानाचं स्वागत करतो.

आजच्या मराठी साहित्यामधून सामान्य माणसाचा चेहरा हरवून गेलेला आहे. काही वर्षांपूर्वी हा चेहरा नारायण सुर्वेच्या कवितांमधून, क्वचित तेंडुलकरांच्या नाटकांमधून आणि संतोष पवारसारख्या काही कवींच्या कवितांमधून तसेच अन्य काही वास्तवदर्शी लेखकांच्या लेखनामधून दिसला होता. आता मात्र, हा चेहरा धूसर होतो आहे, हरवतो आहे. मनोरंजनपर ,बुद्धिरंजनपर साहित्य अलीकडे मोठ्या प्रमाणात निर्माण होत असताना हा चेहरा दिसेनासा होतो आहे.

जीवन साहित्यामध्ये प्रतिबिंबित होत असेल तर सामान्य माणूस साहित्यदर्शनातून का वगळला जातो आहे हे पाहिलं पाहिजे. त्याला पुन्हा एकदा प्रस्थापित करावं लागेल. मुख्य म्हणजे 'सामान्य माणसा'बाबतचं कोणतं आकलन आपल्या लेखकाला झालं आहे हा प्रश्न तपासून घेण्यासारखा आहे. आपला लेखक अजूनही 'प्रेयस आणि श्रेयस' यात अडकला आहे. तो सत्य म्हणजे काय, याचा शोध घेत नाही, नैतिकतेचा आग्रह धरीत नाही आणि व्यापक अशा जीवनाचा अभ्यास करीत नाही असं निरीक्षण आहे. सध्या सर्वसामान्य माणूस सर्वाधिक संभ्रमावस्थेत आहे. त्याचा आंधळा प्रवास सुरूच असून कोणती तरी अगम्य बधिरावस्था त्याला घट्ट लपेटून आहे. परिवर्तन त्याला हवं आहे. शोषणमुक्त समाज त्याला हवा आहे. भ्रष्टाचारातून पिळवटून निघणं त्याला नको आहे. पण आपल्या दुःखाचा परिहार कसा होणार हे मात्र त्याला समजलेलं नाही. कोणी तरी मसीहा येईल आणि परिस्थिती बदलेल, आपली सुटका करेल असं त्याला वाटतं आहे. पण असा कोणी मसीहा येत नाही आणि त्याचं वाट पाहणं थांबत नाही. द्रष्ट्या कवींनी ती उद्याची पहाट उजाडेल असा दिलासा जरी दिला असला तरी त्याचबरोबर तीव्र उपहास देखील नोंदवलेला आहे, कारण उद्याचा दिवस उजाडणारच नसतो. वाट पाहणं केवळ या सर्वसामान्य माणसाच्या नशिबी आहे. तो भयभीत आहे. त्याच्या भयमुक्तीची घोषणा कधी व कोणत्या पीठावरून केली जाईल याची आपण वाट पाहतो आहोत. या सर्वसामान्य माणसाला न्याय देणारी कथा अस्तित्वात येण्याची आवश्यकता आहे.

***

साहित्याच्या परिघामध्ये एक विचित्र असा तुच्छतावाद निर्माण झालेला आहे. हा तुच्छतावाद अनेक वर्षे जोपासला जातो आहे. परप्रकाशित, परभृत, इतरांच्या प्रभावळीतील सामान्य अनुयायी आपापल्या ठिकाणी घट्ट बसून कथित तुच्छतावाद आणि प्रदूषण पसरवीत राहिलेले असतात ही मात्र चिंतेची बाब म्हणावी लागेल. या तुच्छतावादामुळे मराठी रसिकजनांच्या अभिरुचीचा अपमान होतो आणि मेहनती साहित्यिकांचा अवमानदेखील होतो, याची दखल सहसा घेतली जात नाही. अशा बेजबाबदार टिंगलीतून मराठी साहित्याचं आपण काही नुकसान करतो आहोत याची त्या अनुयायांना जाणीव नसते कारण, काहीएक बौद्धिक विकृती त्यांच्या ठायी निर्माण झालेली असते. ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी या संदर्भात उघडपणे नाराजी प्रकट केलेली आहे. पण हा अपवाद वगळता या तुच्छतावादाबाबत बोलणं टाळलं जातं हा चिंतेचा विषय.

मराठी बालसाहित्यातून आपण अद्भुतरस हद्दपार केलेला आहे. सध्याचे बालसाहित्य शुष्क, माहितीपर, गणित आणि विज्ञान यांच्या कोड्यांनी भरलेलं, नीरस असं झाल्याचं दिसतं आहे. लांब नाकाच्या चेटकिणी, उडते घोडे, साहसी राजपुत्र, राजकन्या इत्यादींना आपण कुलूपबंद तळघरात ढकलून दिलं. संस्कारवादी बालसाहित्याच्या आग्रही निर्बुद्धतेतून ही घटना घडलेली आहे. विशिष्ट वयात अद्भुतरसाचं सेवन ज्या मुलांना करता येतं ती मुलं बुद्धिमान, प्रतिभावान, तरल कल्पनाशक्तीची देणगी असलेली आणि विकसित व्यक्तिमत्त्वाची बनतात असं बालमानसशास्त्र सांगत आलेलं आहे. त्याउलट, अद्भुतरसाचा संपर्क ज्या मुलांच्या मनाशी घडला नाही ती मुलं पोटार्थी, शुष्क, अविकसित व्यक्तिमत्त्वाची, अविचारी, अरसिक निपजतात.

***

मित्रहो, काही टीकाकारांनी असं दाखवून दिलं आहे की, मराठी साहित्याचं विश्व नेहमीच कर्मठ, स्थितीवादी, आत्मकेंद्री व वास्तवाची दखल न घेणारं असं राहिलं आहे. टीका अशी आहे की, स्वातंत्र्यसंग्रामाबाबत मराठी साहित्यविश्वात विशेष असं काही लिहिलं गेलं नाही. महात्मा गांधींच्या खुनाच्या घटनेचे पडसाददेखील मराठी साहित्यात विशेष उमटलेले नाहीत. महात्मा गांधींचं योग्य ते आकलनच मराठी साहित्याला व साहित्यिकांना नीटसं झालेलं नाही अशी टीका केली गेली आहे. मोठ्या अशा समूहाने धर्मांतर करणं, बहात्तरचा मोठा दुष्काळ व त्यानिमित्ताने शेतकऱ्याचं उद्ध्वस्त होणं या घटनादेखील मराठी साहित्यात आल्या नाहीत. वर्तमानाचं भान नसणं हा मराठी साहित्याचा दोष लक्षात घेता जगात, भारतात व महाराष्ट्रात ज्या महत्त्वाच्या घटना अलीकडे घडल्या त्यांचं प्रतिबिंब साहित्यात पडण्याची कितपत शक्यता आहे असा थोडासा टोकदार सवाल आहे.



आजच्या मराठी साहित्याला सर्वसामान्य माणसाच्या जगण्याबाबत काहीएक करुणा वाटते काय, हा जुनाच प्रश्न आहे. या प्रश्नाला अजूनही नकारार्थी उत्तर द्यावं लागतं.

उर्दूमधल्या 'सआदत हसन मंटो'ने अनेक वर्षांपूर्वीच उर्दू कथेला विलक्षण उंचीवर नेऊन उर्दू कथेला मानवी चेहरा दिला. वेश्या, हमाल, डोअरकीपर्स, टांगेवाले, रस्त्यावर अंगमेहनतीची कामं करून जगणारे, अशांच्या जीवनव्यवहाराबाबत विलक्षण करुणा व आस्था मंटोंच्या कथांमधून प्रकट झाली. मराठी कथेला अद्यापही एखादा मंटो मिळालेला नाही.

***

साहित्यांतर्गत काही भाषेचे प्रश्न आहेत, त्यांचा विचार केला पाहिजे. कपड्यावरून माणसं ओळखण्याबाबत वरिष्ठ पातळीवरून चर्चा केली जात असली तरी भाषेवरून माणसांची ओळख पटवण्याचा खेळ जुन्या संहितेमध्ये आढळतो. अभिजन कोण तर अभिजात भाषा बोलतात ते, आणि अभिजात भाषा कोणती तर अभिजन बोलतात ती, असा उपहास पाणिनीच्या सूत्रपाठात नोंदविला आहेच. विद्वानांनी निवाडा दिला नसला तरी 'संस्कृत ही सर्व भाषांची जननी आहे' असा निवाडा राजकीय पक्षाचे पदाधिकारी देतात तेव्हा साहित्याला चिंता वाटली पाहिजे. भाषेवरून माणसांची ओळख कशी करणार? पाली इत्यादी प्राचीन भाषांचं काय करणार? उर्दू ही मुसलमानांची भाषा नसून ती भारतीय भाषा आहे हे कोण सांगणार?

संविधानाला अभिप्रेत असलेला भारत घडवला जातो आहे किंवा नाही याबाबत मराठी साहित्य बोलताना आढळत नाही. आता तर संविधानच बदलण्याची भाषा सुरू आहे. मराठी साहित्यांतर्गत या घटनेचे पडसाद बहुधा पडलेले नाहीत.

## खरं आणि खोटं

लेखकाला 'आंदोलन-जीवी बुद्धिवाद्यां'कडून एक गुप्त वार्ता समजली आहे आणि त्याची छाती धडधडायला लागली आहे. त्याने ऐकलं आहे की, ' Through the looking glass' या पुस्तकाला राष्ट्रीय ग्रंथ म्हणून मान्यता देण्याचं चाललं आहे. लेखक बुचकळ्यात पडतो आहे आणि या मागचं कारण बुद्धिवाद्याला विचारतो आहे. बुद्धिवादी दबल्या आवाजात सांगतो की, चार्ल्स लुटविज् याने 'लेविज् कॅरॉल' या नावाने सन १८७१ मध्ये ही कादंबरी लिहिली. लेखकाला ते थोडं माहीत असतं. तो म्हणतो की, ही तर बालांसाठी लिहिलेली कादंबरी आहे. दबल्या आवाजात पुन्हा उत्तर मिळतं की, नाहीतरी सध्या समाज बालबुद्धी होत चाललेला आहे. या कादंबरीतली ॲलिस नावाची बालनायिका आरशाच्या आतमध्ये प्रवेश करते. आरशाचं जग उलटं असतं. जे डावे ते उजवे दिसतात, जे उजवे ते डावे दिसतात. आंदोलनकारी राष्ट्रद्रोही दिसतात. सत्याचं असत्य होतं.

असत्याचं सत्य होतं. भ्रमाला वास्तव मानलं जातं. वास्तवाला स्वप्न मानलं जातं. जे काही दाखवलं जातं आहे ते खरं, असं मानणाऱ्या आणि संमोहित झालेल्या जनतेसाठी हाच ग्रंथ 'राष्ट्रीय ग्रंथ' ! बुद्धिवादी असं सांगतो की, या कादंबरीचं सार ' Play with the relationship between something and nothing' तसंच 'Unreal world of illogical behaviour' असं आहे. म्हणजेच फॅन्टसीच्या जागी वास्तव आणि वास्तवाच्या जागी फॅन्टसी. त्यातून सामान्य जनतेच्या मनाशी केलेला, जनतेच्या बुद्धीशी केलेला हा खेळच. ते ऐकून लेखक आणखीनच खचून जातो आहे. हताश होतो आहे. स्वतःशीच, कुजबुजत्या स्वरात म्हणतो आहे, 'म्हणजे ही भ्रमयुगाची सुरुवात तर नाही?'

### लेखक पाहतो

लेखक बघतो आहे. पाहतो आहे. समजून घेतो आहे. त्याला जाणवतं आहे. तो सहकंपित होतो आहे. भोवताल त्याला अस्वस्थ करतं आहे. लेखक चिंता वाहतो. तो सामान्य माणसाच्या एकूण फसवणुकीकडे पाहतो. बुद्धिवाद्यांची आणि बुद्धिजीवींची आणि परिणामतः बुद्धिवादाची होणारी टिंगल लेखक पाहतो आहे. 'हार्वर्ड युनिव्हर्सिटी' आणि 'हार्डवर्क' यावर केलेली निर्बुद्ध कोटीदेखील त्यांनी ऐकली-पाहिली आहे. सरस्वतीचा अपमान आणि लक्ष्मीचं पूजन तो पाहतो आहे. पैसे मोजून मोजून हाताला घट्टे पडतात आणि त्यामुळे हळुवार स्पर्श समजेनासा होतो, तसं काहीसं तुमचं, माझं, समाजाचं आणि राज्यकर्त्यांचं झालं आहे का, असं लेखक स्वतःला विचारतो आहे. हताश बुद्धिवाद्यांची स्थलांतरं आणि त्यांचं मौनात जाणं तो पाहतो आहे.

एक देश, एक भाषा, एक पुस्तक, एक संस्कृती असं काहीसं कोणीतरी म्हणतं आहे. लेखकाला यात 'मेथड इन मॅडनेस'चा वास येतो आहे. पण हा केवळ मॅडनेस नाहीए. विचारपूर्वक केलेलं चिथावणीखोर विधानदेखील आहे. मुस्लीम आणि ख्रिश्चन संस्कृती अस्तित्वात नाही, ते धर्मही नाहीत, असलेच तर 'पंथ' आहेत असंही हा कोणीतरी म्हणतो आहे. ऐकून चकित होणारे लोक संस्कृतीची व्याख्या वगैरे शोधू लागले आहेत.

लेखक व्याख्या इत्यादीच्या घोटाळ्यात पडत नाही. त्याला बगलेमधली लपवलेली सुरी नेमकी दिसते आहे.

लेखक बुचकळ्यात पडून समाजाकडे पाहतो आहे. समाजात विभाजनवादी निरर्थक, पण अनर्थकारी, उत्तेजना वाढवणारा खेळ मांडला जातोय. आता, त्या पाठोपाठ कुठल्याशा सिनेमाचं समर्थनसुद्धा करण्यात येतं आहे. आता त्यामुळे, सिनेमाही 'तुमचा' आणि 'आमचा' झाला. कला विभाजित झाली. उपद्रव आणि उपद्रव. उन्माद आणि उन्माद.

जनतेच्या भोळ्या मनाशी चालवलेला हा खेळ लेखक पाहतो आहे. माणसांचं विभाजन होताना पाहतो आहे आणि विद्वेषाचं गणितही मांडलेलं पाहतो आहे. कोणीतरी म्हणतं आहे की, स्वातंत्र्य भिकेत मिळालंय. भिकेत मिळालं? म्हणजे स्वातंत्र्यसेनानी काय भीक मागत होते? पण निर्बुद्ध लोकांकडून स्वातंत्र्याचा अपमान होतो आहे हे आपण उघड्या डोळ्याने पाहतो आहोत. काही कथित साधू मुसलमानांचं शिरकाण करायचं म्हणतायत. ते असंही म्हणतायत की भारतीय संविधानावर विश्वास ठेवणाऱ्यांचा आणि त्यांच्या मुलांचाही मृत्यू होणार आहे. असा हास्यास्पद शाप देणारे हे साधू आहेत?

लेखक एकदा गावी गेला होता. एका बड्या घराच्या अंगणात बांधलेली कुत्री त्याच्यावर अकारण भुंकू लागली. लेखकाने घरमालकाकडे तक्रार केली. त्याला म्हटलं की, तुमचे कुत्रे आमच्यावर भुंकत आहेत. घराचा मालक म्हणाला, आम्ही काही त्या कुत्र्यांना भुंकायला सांगितलेलं नाही. लेखक म्हणाला, पण तुम्ही त्यांना भुंकू नका असंदेखील सांगितलेलं नाही.

लेखक पाहतो की, सरस्वतीचे उपासक दुःखी होतायत आणि लक्ष्मीची उद्धट उपासना चाललीय. अपवाद वगळता सर्वत्र शांतता आहे. सर्वत्र दडे बसवणारी शांतता. कोणीच बोलत नाही. कोणीच हरकत घेत नाही. सर्वत्र आणि सर्वत्र 'चतुर मौन' पसरलेलं आहे. या मौनात स्वार्थदेखील आहे. तुच्छतादेखील आहे. हिशेब आणि व्यवहारदेखील आहे. सामान्य जनतेच्या दुःखाला चिरडणंदेखील आहे. भीती आणि दहशतदेखील आहे. प्रलोभनंदेखील आहेत. विनाशदेखील आहे.

लेखकाने असं ऐकलं आहे की, कवी शंकर वैद्यांच्या कवितेतल्या पुस्तकांनी कपाटामध्येच आत्महत्या केल्या आहेत. उरलेल्या पुस्तकांना दिनांक २३ एप्रिलच्या जागतिक पुस्तकदिनाच्या दिवशी आत्महत्या करायच्यात म्हणे! त्याने असंही ऐकलं आहे की, याच कपाटात भारतीय संविधानानेदेखील आत्महत्येचा प्रयत्न केलेला आहे. लेखक ऐकतो, लेखक पाहतो, लेखक चिंतित होतो. क्वचित कोणी बोलतं आहे, नाही असं नाही.

काही कवी बोलतायत. अशोक बागवे नावाचा कवी 'मौनाचा निःशब्द कोलाहल' ऐकतो आहे. तो म्हणतो,'' *मौनाचा निःशब्द कोलाहल*
*नंग्या तलवारी परजत निघून गेलेला*
*थेट रक्ताच्या पल्याड*''

आणि पुढे हा कवी सद्य परिस्थितीबद्दल बोलताना लिहितो,'' *आकाश ठणकतंय*
*धरती सुन्न*
*भरवसा उडून गेलाय*
*एकमेकांवरचा...* ''

भरवसा उडून गेलाय? माणसाचा माणसांवरचा? राज्यांचा केंद्रावरचा? केंद्राचा राज्यांवरचा? मित्राचा मित्रांवरचा? समाजाचा समाजांवरचा? म्हणजे मग जगण्याचा आधार तरी काय आहे, लेखकाचा प्रश्न स्वतःला.

तिकडे, परकीय नसलेला पण परकीय प्रदेशात राहिलेला एक कवी आश्वासनपूर्ततेची वाट पाहतो आहे. तो म्हणतो की, नियतीशी करार करून स्वातंत्र्य मिळालं. मग विधिच्या विधानात लिहिल्याप्रमाणे आश्वासनपूर्ती तर झालीच पाहिजे ना? जगण्याचे अधिकार तुम्हालाही आहेत मलाही आहेत. एक दिवस या दुःस्वप्नाचा अंत होईल आणि जनताजनार्दनाचं राज्य येईल-'और राज करेगी ख़ुल्क-ए-ख़ुदा' असं स्वप्नं तो कवी पाहतो आहे. ख़ुल्क-ए-ख़ुदा म्हणजे जनताजनार्दन-आम जनता. लेखक त्यामुळे आशावादी आहे.

समाजदेखील आशावादी असतो. 'इडापिडा टळो आणि बळीचं राज्य येवो' असा उद्घोष समाजाने पूर्वीच केलेला आहे. कालपर्यंत लेखक ऐकत होता. आज लेखक हे सगळे पाहतो आहे. उद्या कदाचित तो बोलेल. पण मग त्याने बोललं पाहिजे. त्याने बोललंच पाहिजे. तो न बोलला तर प्रमाद होईल. तो न बोलला तर तो 'चतुर मौनाचा' बळी ठरेल. लेखक आशावादी आहे. लेखक सत्याग्राही आहे, तो सत्यान्वेषी आहे. तो सत्याभिलाषी आहे.

सत्याचा उच्चार करणं, उच्चरवाने सत्याचा उद्घोष करणं ही लेखकाची भूमिका असते, धर्मही असतो, कर्तव्यदेखील असतं. तो बोलेल, कदाचित उद्या.

आणि सत्य बोलण्याचा धर्म स्वीकारणारे आरसेदेखील तडजोड न करता सत्यच सांगत आहेत. आणि म्हणून इथे लेखकाला जोतिबा फुले यांची कविता आठवते आहे. जोतिबांनी सत्याचा उद्घोष केला आहे. सत्य सर्व धर्माचे माहेर आहे, सत्य सुखाचा आधार आहे, त्याव्यतिरिक्त सर्वत्र अंधकार आहे आणि सत्याचं बळ पाहून बहुरूपी भयभीत होत आहेत, असं जोतिराव फुले म्हणतायत. राहूचे छद्मरूपी उपासक सत्याच्या प्रकाशामुळे भयभीत होतील अशी आशा त्यामुळे लेखकाला वाटते. लेखक असं बरंच काही आठवतो आहे.

आणि हो... करोनाने आपल्याला सोशल डिस्टन्सिंग शिकवलं. म्हणजे माणसाने माणसापासून दूर जाणं. ते आपण करीत राहिलो. करोनाने आपल्याला हात धुवायला शिकवलं. पण ज्यांच्या हाताला रक्त लागलं आहे, किंवा पापाचा स्पर्श झाला आहे ती मंडळी शेक्सपिअरच्या त्या नाटकातल्याप्रमाणे 'वॉश माय हँड्स' असं म्हणतदेखील नाहीएत.

- लेखक हे सगळं पाहतो आहे. सगळं आठवतो आहे. पण हे आठवलेलं त्याने सांगितलं मात्र पाहिजे. सत्यवदन हा लेखकाचा धर्म. निर्भयता हा त्याचा धर्म. त्या धर्माला तो जागला पाहिजे. सर्जनबळाचं विस्मरण त्याला, आणि समाजाला परवडणार नाही.

तेव्हा, लेखकाची भूमिका काय असते, तुमची भूमिका काय आहे असे प्रश्न तुम्ही मला विचारता म्हणून तुम्हाला मी हे विस्ताराने सांगितलं. तुमच्या आणि माझ्या मनात-मेंदूत दडलेला सामान्य माणूस निर्भयतेने जगायला लागेल तेव्हा 'अच्छे दिवस' येतील, असा मला विश्वास वाटतो. लेखकाने आशावादी असणं त्याला क्रमप्राप्त आहे आणि त्याला दुसरा कोणता तरणोपायदेखील नाही. आशावादी असणं ही त्याची अपरिहार्यतादेखील आहे.

आशावादी असणं याव्यतिरिक्त तो दुसरं काय करू शकतो?

धन्यवाद!

## भ्रमयुग

**आपण आत्यंतिक** अशा भ्रमयुगामध्ये आता प्रवेश केला आहे. या भ्रमयुगाबाबत, या फसव्या अशा छद्मयुगाबाबत, चिंतास्पद सद्ययुगाबाबत मला आपणाशी थोडं सविस्तर बोलायचं आहे. आपण थाळी वाजवली आणि ती वाजवताना लेखक, विचारवंत आणि विचारी माणूस चिंतेत पडला होता. थाळी वाजवण्याचे भीषण संदर्भ खरंतर राज्यकर्त्यांनासुद्धा माहीत नाहीत. नोंद अशी मिळते की दुर्गादेवीच्या दुष्काळामध्ये बारा वर्षे पाऊस पडला नव्हता आणि समाज भुकेकंगाल होऊन 'त्राहिमाम्' म्हणत सैरावैरा झाला होता. भुकेकंगालांच्या जरत्कारू टोळ्या अन्नाच्या शोधात बाहेर पडून थाळ्या वाजवत गल्लोगल्ली फिरत होत्या आणि समोरून येणाऱ्या माणसांवर तुटून पडत होत्या. अन्नासाठी चाललेली ही भीषण झटापट अशी थाळीनादाशी जोडली गेलेली आहे.

काही विचारवंत आता दबल्या आवाजात असं सांगत आहेत की, सध्या विषमता वाढू लागली आहे. गरीब लोक आता दरिद्री होतायत. श्रीमंत लोक अतिश्रीमंत होत आहेत. मध्यमवर्ग वेगाने विभाजित होतो आहे. तो कनिष्ठ मध्यमवर्गात ढकलला जातो आहे. दरी वाढते आहे. कदाचित पुढे चालून आर्थिक दुर्बल घटक आर्थिकदृष्ट्या बरी परिस्थिती असलेल्या समाजवर्गावर आक्रमण सुरू करेल. त्यातून हळूहळू गृहयुद्धाची परिस्थिती निर्माण होईल. विचारवंत दक्षिण आफ्रिकेतील घटनांकडे अंगुलिदर्शन करीत आहेत. आपल्या देशात अशी परिस्थिती निर्माण होऊ शकेल असा इशारा विश्लेषक विचारवंत देत आहेत.

लेखक हे ऐकून चिंतित होतो आहे. थाळीवादनाचे ध्वनी त्याने ऐकले आणि येऊ घातलेल्या परिस्थितीकडेही तो पाहतो आहे.

लेखकाने सत्य बोललं पाहिजे आणि निर्भयतेने बोललं पाहिजे, असंही साहित्य सांगतं. सत्य आपलं कथन उच्चारत राहात असतं. ऐकण्याचा कान मात्र पाहिजे, कारण हा विवेकाचा आवाज आहे. कोलाहलात हा आवाज उच्चरवानेदेखील उच्चारला जावा लागतो, जरी तो लुप्त भासणारा, न मरणारा असला तरी. द्रष्टा लेखक असं सांगत राहतो. आपण पाहिलं, ऐकलं पाहिजे हे मात्र खरं.

माझी एक आरसा नावाची अप्रकाशित कादंबरी आहे. कथानक असं की, *लेखकाच्या घरातला आरसा फुटलेला आहे. लेखक अवचितपणे असं बोलून जातो की, बरं झालं, आरसा फुटला, नाहीतरी आरसे जरा जास्तच सत्य बोलायला लागले आहेत. आरसे मंडळी हे उद्गार ऐकतात आणि नाराज होतात. त्यांचा प्रतिनिधी लेखकाला भेटायला आलेला आहे. तो लेखकासारखाच दिसतो. पण उलटा आहे. म्हणजे, लेखकाची उजवी बाजू तर याची डावी बाजू इत्यादी.*

*आरशांचा प्रतिनिधी निषेध करून असं म्हणतो की सत्यकथन करणं हे आरशाचं कामच आहे, कारण आरसा सत्यव्रती असतो. लांगुलचालन करणे हा काही त्याचा धर्म नव्हे. पण आरसा असंही सांगतो की, बाजारामध्ये काही बाजारबसवे आरसे आलेले आहेत, जे दिसायला सुंदर दिसतात आणि तुम्हाला जे पाहिजे तेच दाखवतात. उदाहरणार्थ, तुम्ही लठ्ठ असाल तर आरसा तुम्हाला सौष्ठवपूर्ण असं दाखवतो आणि तुमचे पांढरे केस या आरशात पांढरे दिसतच नाहीत. तुम्ही मोठे रुबाबदार, यशस्वी, धोरणी आणि अवतारी पुरुष दिसू शकता. असं दाखवणाऱ्या आरशांची बिलकूल कमतरता नाही. त्याउलट, एक आरशांची गुप्त संघटना भूमिगत राहून काम करते आहे, सत्यघोष करते आहे. 'सांग दर्पणा मी कशी दिसते?' या प्रश्नावर 'तू सुंदर नाहीस' असं स्पष्ट सांगणारा आणि म्हणून फुटलेपणाची शिक्षा भोगणारा आरसादेखील प्राचीन काळापासून या संघटनेचा सदस्य आहे. 'दीने इलाही'ची स्थापना झाली तेव्हा प्रतीकरूपाने ठेवलेला आरसा या संघटनेत सामील आहे. बाळशास्त्री जांभेकरांचा 'दर्पण'सुद्धा या संघटनेत सदस्य आहे. हे आरसे जुने आहेत, आकर्षक नाहीत. पण खरं बोलणारे आहेत. अशा गुप्त संघटनेला भेट देण्याची लेखकाला 'प्रातिनिधिक भीती' वाटू लागते.*

सुदैवाने माझी ही कादंबरी अजून प्रकाशित झाली नाही. पण या भीतीचं कारण तर आहेच. ते कारण सर्वांना माहीतदेखील असतं. परंतु, या कारणामागचं कारणसुद्धा शोधता येतं.

## अमृतकाळ

***मित्रहो! अमृतकाळ*** *सुरू झाला आहे असं सांगितलं जात आहे. लेखकाने अमृतकाळाबद्दल ऐकलं आणि तो थोडा चकित झाला. थोडं आठवू लागला. त्याने स्वतःला विचारलं, ''काय असावं हे? अमृतकाळ कसला?''*

*तेवढ्यात त्याने काही चाहूल ऐकली. कार्टूनच्या चित्रात दडलेला 'कॉमन मॅन' त्याच वेळेला लपतछपत येऊन पोहोचला. तो उत्तेजित, थोडा भयभीत असा वाटला. त्याने फोन केला नव्हता. कारण मोबाइलमधून हेरगिरी केली जाते असं त्याने ऐकलं होतं. त्याने इकडेतिकडे पाहिलं आणि म्हटलं, ''तुम्हाला समजलं नाही? अमृतकाळाबद्दल?''*

*लेखकाला काही समजलं नाही असं लक्षात आल्यानंतर कॉमन मॅन दबल्या, भयभीत आवाजात पण उत्तेजित होऊन सांगू लागला... अहो... !... त्या राहूला काय पाहिजे होतं? अमृताचे दोन थेंब? ते मिळवण्यासाठी त्या बिचाऱ्याने वेषांतर केलं. रूपांतर केलं. छद्मरूप धारण केलं. फसवण्याचा प्रयत्न केला. तो तुमच्या पंक्तीत जाऊन बसला. तेही पुढे, पुढच्या रांगेत, अग्रभागी. द्यायचे होते दोन थेंब अमृताचे. पण तुम्ही तसं केलं नाही. तुम्ही त्याला ओळखलंत. तुम्ही त्याला भर पंक्तीतून उठवलंत. तुम्ही त्याचा अपमान केला. उपहास केला. निर्भर्त्सना केली. तुम्ही त्याला हसलात. पण इतकंच नाही. तुम्ही त्याचा शिरच्छेददेखील केला. नसता केला तर, एकटा एकांडा पण उपद्रवी म्हणून राहिला असता तो! पण शिरच्छेद केल्यामुळे एकाचे दोन झाले-राहू आणि केतू. एकाकडे कुटिल विचार, तर दुसऱ्याकडे अमानुष शक्ती. एकाकडे डोकं, दुसऱ्याकडे निर्बुद्ध शरीर आणि उपद्रवी शक्ती... राहूचे उपासक आता छद्मरूपाने तुम्हाला छळण्यासाठी वावरत आहेत. हे सगळे बहुरूपी उपासक आहेत. ते दुष्टबुद्धी, क्षुद्रबुद्धी आणि छद्मबुद्धी आहेत, आणि त्यांना सूड उगवायचा आहे. एक म्हणतो आहे, मी काशी. दुसरा म्हणतो, मी मथुरा. तिसरा म्हणतो आहे मी द्वारका, मी अयोध्या, मी... मी... मी! हे राहूचे उपासक विविध रूपाने वावरतायत. कधी ते संस्कृतिरक्षक होतात. कधी ते अभिमानी राष्ट्रभक्त होतात. कधी ते ज्योतिषी होतात. कधी ते भाष्यकार होतात. राजकीय विश्लेषक होतात, टोप्या बदलतात. त्यातला एक पुंगीवाला झालेला आहे किंवा बासरीवादक. त्यांनी तुम्हाला आश्वासन दिलंय, की तुमच्या चिंता दूर करू, तुमच्या घरातले उंदीर पुंगी वाजवून आणि मोहित करून दूर घेऊन जाऊ, आणि तुम्ही विश्वास ठेवला आहे. आता मात्र त्या लोककथेप्रमाणेच, समाजातले अनेक तरुण पुंगीवाल्याच्या मागे मोहित होऊन जातायत आणि हा पुंगीवाला त्यांना खाईच्या दिशेने घेऊन जातो आहे.''*

*कॉमन मॅन पुढे सांगू लागला, हळुवार आवाजात... ''नसता केला शिरच्छेद, दिले असते चार थेंब तर ही वेळ आली नसती. आता 'राहू-केतू'चा उच्छाद सहन करणं इतकंच आपल्या नशिबी आहे. ज्योतिषाचार्यांना जाऊन विचारण्याची सोय नाही, कारण ते आधीच विकले गेलेले आहेत. ही तर नियतीचीच इच्छा आहे असं ते तुम्हा नियतीवाल्यांना सांगत आहेत. अमृतकाळ सुरू आहे आणि अमृताच्या चार थेंबांसाठी लढाई सुरू आहे. श्रेयासाठी लढाई सुरू आहे. राहूचे उपासक सूड घेण्याच्या प्रयत्नात आहेत.''*

*कॉमन मॅनचं सांगून झालं असावं. लेखकाने विचारलं, ''मग? एकूण बरं चाललेलं नाही?'' या प्रश्नावर तो थबकला. मग सांगू लागला... उद्याची पहाट सुंदर असेल या त्यांच्या आश्वासनावर खरंतर मी विश्वास ठेवायला नको होता, कारण उद्याची पहाट उजाडणारी नसते, उद्याचा दिवस येतच नसतो. कॉमन मॅनला शेरोशायरीची आवड नाही. ज्ञान पण नाही. पण तो स्टाइलने कपाळाला हात लावतो. मथितार्थ काव्यमय. दाग़ नावाच्या कवीच्या कवितेसारखा. तो सुचवतो-*

*'गज़ब किया, तेरे वादे पर ऐतबार किया ।*
*तमाम रात क़यामत का इंतज़ार किया।'*

*लेखक सामान्य माणसाच्या-कॉमन मॅनच्या या हताशेकडे पाहतो आहे.*

# प्रतीकांची पेरणी

## मध्ययुगापासून सत्तेची, ताकदीची, शौर्याची, पौरुषाची मानली गेलेली प्रतीके आजही आपल्याला सतत सार्वजनिक ठिकाणी कोणत्या हेतूंसाठी मिरवायची आहेत?

**जोसेफ सिरिल** बामफोर्ड नावाच्या कुणा ब्रिटिश उद्योजकाच्या 'जेसीबी' कंपनीचे, 'बुलडोझर' या नावाने ओळखले जाणारे यंत्र सध्या आपल्याकडे फार मानाचे स्थान पटकावून आहे. या यंत्राने बुलडोझर बाबा, बुलडोझर मामा अशी नातीही निर्माण करायला सुरुवात केली आहे. हवे तिथे बाबा-मामा करत नको तिथे आपला वचक कसा निर्माण करता येतो, त्याचा या यंत्राने अलीकडेच घातलेला पायंडाही चित्रवाणी वृत्तवाहिन्यांवरून सगळ्या देशाने नुकताच बघितला. गोष्ट त्याच्याही चारदोन दिवस आधीची. त्याच ठिकाणची. जहांगीरपुरीतील कथित दंगलीच्या निषेधार्थ निघालेल्या रथयात्रेत अवघी १८-१९ वर्षांची पोरे हातात नंग्या तलवारी घेऊन सामील झाली होती. दुचाकींवर बसून अशी पोरे आणि बाप्ये घोषणा देत तलवारी परजत निघाले आहेत, हे दृश्य मोठे 'मनोरम' होते. आमच्या या तलवारी स्वसंरक्षणार्थ आहेत, आमच्यावर कोणी हल्ला केला तर आम्ही त्या वापरू असे ती अजून मिसरूडही न फुटलेली पोरे टीव्ही वाहिन्यांना सांगत होती. या वयात ज्यांच्या हातात पुस्तके असायला हवीत, ज्यांनी आपल्या भवितव्याची वाट चालायला हवी, त्यासाठीची सगळी शारीरिक, बौद्धिक, मानसिक गुंतवणूक करायला हवी, त्या मुलांच्या हातात या तलवारी. त्या असल्या म्हणून काही बिघडत नाही, तलवार हे तर स्वसंरक्षणाचे पारंपरिक प्रतीक, हे या मुलांचा समावेश ज्या मिरवणुकीत होता, त्यातील साऱ्याच सहभागींना जणू पटलेले असावे. हा प्रतीकांचा वापर आता भलताच शक्तिशाली होताना दिसतो.

म्हणजे असे की प्रतीक म्हणूनही आपल्याला एखाद्याची छाती साधीसुधी नाही तर छप्पन्न इंचांची असायला हवी असते. कारण तेच पौरुषाचे प्रतीक; एखाद्याला बांगड्यांचा आहेर पाठवायचा असतो. कारण ते 'नामर्द'पणाचे प्रतीक; एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमात तलवार परजायची असतेच शिवाय कुणा एखाद्याला वाढदिवसाचा केकदेखील तलवारीने कापायचा असतो. कारण ते शक्तीचे, ताकदीचे प्रतीक... तलवार, गदा, त्रिशूळ या शक्तिप्रदर्शनाच्या साधनांच्या जोडीला ताकदीचे प्रतीक म्हणून आता बुलडोझरदेखील आला. सत्तेची, ताकदीची, शौर्याची, पौरुषाची प्रतीके आपल्याला सतत अशी सार्वजनिक ठिकाणी का मिरवायची आहेत? या सगळ्याचा अर्थ काय?

तो हाच की फाइव्ह जीच्या वाटेवर असलेल्या, मंगळावर यान पाठवण्याची क्षमता असलेल्या, आधुनिक म्हणवणाऱ्या या काळात आपली मानसिकता मात्र मध्ययुगाच्या सरंजामी वातावरणातच घुटमळते आहे. आपण भले सर्व प्रकारचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरू, विकसित पाश्चात्त्य जगाशी बरोबरी करण्याची भाषा करू, पण मनाने मात्र मध्ययुगीन, सरंजामी, पुरुषप्रधान वातावरणातच आहोत, याची चुणूक आपला समाज अशा पद्धतीने सतत देत असतो. समूहाने वावरताना अशा पद्धतीने शक्तिप्रदर्शन करणे ही मध्ययुगीन काळाची कदाचित गरज होती. निश्चित अशी राज्यव्यवस्था नसताना, वैयक्तिक आणि सामाजिक सुरक्षेची कोणतीही हमी नसताना समूहाने राहणे, सगळ्या गोष्टी समूहाने करणे, ठरवणे हे कदाचित त्या काळात आवश्यक होते. ज्याच्याकडे शारीरिक ताकद जास्त, मनुष्यबळ जास्त, तो त्या काळात जगण्याच्या लढाईत टिकून राहू शकत होता. त्याला समूहाची मान्यता मिळत होती आणि समूहाचे नेतृत्वही. त्याच्या अंकित राहण्यातून जगणे सुलभ होत होते. दीनदुबळ्यांना टाचेखाली तुडवणारी, स्त्रियांना फक्त दुय्यम मानणारीच नव्हे तर वस्तू ठरवणारी जमीनदारी, सरंजामी व्यवस्था तत्कालीन परिस्थितीतूनच विकसित होत गेली. पौरुषाचे प्रतीक मानली गेलेली छप्पन्न इंची छाती आणि ती पेलणारी तलवार ही त्या काळाची गरज असेलही; पण त्या काळातून आणि त्या गरजेतून आपण आता पुढे आलो आहोत. आजच्या काळातली आपली प्रतीके वेगळी असायला हवीत. कालसुसंगत असायला हवीत. जगण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदा सुव्यवस्थेची हमी देणारी राज्यघटना आपण निर्माण केली आहे. ती राबवण्यासाठीची व्यवस्था आपण उभी केली आहे. या घटनेने प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याची, संरक्षणाची हमी दिलेली आहे. असे असताना हातात तलवारी परजत लोक रस्त्यावरून जातात याचा अर्थ काय? त्यांचा राज्यघटनेवर विश्वास नाही? येथील कायदा सुव्यवस्थेवर विश्वाास नाही? आम्ही राज्यघटना, कायदा सुव्यवस्था जुमानत नाही, हेच तर त्यांना अशा शक्तिप्रदर्शनांमधून सांगायचे नसेल? असा अविश्वास हे राजकीय व्यवस्थेचे अपयश असेल, तर ते फक्त गतकाळातले की आजचेसुद्धा?

**आजकाल प्रत्येकाच्या हातात दिसणारा मोबाइल फोन हे केवळ आधुनिकतेचे प्रतीक नाही, तर व्यक्तिस्वातंत्र्याचेही प्रतीक आहे. मग तसे व्यक्तिस्वातंत्र्य आपण मानतो का?**

अर्थात मध्ययुगात महत्त्वाची असलेली ही प्रतीके फक्त आजच्याच काळात सतत सामोरी येत आहेत, असे नाही. ती गेली अनेक वर्षे सातत्याने आणि वेगवेगळ्या पद्धतीने वापरली जाताना दिसतात. प्रतीकांच्या चढेलपणाची सवयच समाजाला लावून दिली जाते. आपल्या दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील चर्चेचे कार्यक्रमदेखील साधेसुधे नसतात, तर ती कसली तरी 'रणधुमाळी' असते. मुंबई इंडियन्स हे नाव वगळता आपल्याकडच्या आयपीएलच्या संघांची नावेही 'नाइट' रायडर्स, सुपर'किंग्ज', 'रॉयल' चॅलेंजर्स अशी सरंजामी व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारी असतात. आजही कुणी तरी कुठल्या तरी मतदारसंघाचा अनभिषिक्त सम्राट असतो, कुणी कुठला युवराज असतो. कुणी तरी पंतप्रधान झाले तर आपण मुंडन करू असे जाहीर करून कुणाकडून तरी मध्ययुगीन पुरुषप्रधान संस्कृती पुढे रेटण्याचा प्रयत्न केला जातो. 'कन्यादाना'सारख्या प्रथेवर टीका झाली म्हणून कुणी तरी पेटून उठते. जातीबद्दल काही तरी बोलले गेले की कुणाच्या तरी भावना दुखावतात. समाज म्हणून आपण असेच, मध्ययुगीन प्रतिमा-प्रतीकांमध्ये अडकलेले आहोत, हेच खरे.

अर्थात प्रतीके सगळीच वाईट असतात, असे नव्हे. आजकाल प्रत्येकाच्या हातात मोबाइल फोन असतो. तो केवळ आधुनिकतेचे प्रतीक नाही, तर व्यक्तिस्वातंत्र्याचेही प्रतीक आहे. मग तसे व्यक्तिस्वातंत्र्य आपण मानतो का? मध्ययुगीन, सरंजामशाहीची प्रतीके महत्त्वाची मानणाऱ्यांना व्यक्तिस्वातंत्र्याशी काही देणेघेणे असणे संभवतच नाही. व्यक्तिस्वातंत्र्याला नकार देणारे स्त्रीस्वातंत्र्याला, जातीनिर्मूलनाला, धर्मस्वातंत्र्याला नकार देणार हे ओघानेच आले. एखाद्या पुरुषाला बायकी ठरवणे, तृतीयपंथीयांना तिरस्काराने वागवणे, सर्व प्रकारची दमनशाही हा सगळा या मानसिकतेचाच भाग आहे. हातात तलवारी किंवा त्रिशूळ घेऊन रस्त्यावरून फिरणाऱ्यांना आपण नेमके काय करतो आहोत ते समजणे शक्य नाही. पण आपण काय करतो आहोत, ते राजकारण्यांना मात्र नीट समजत उमगत असते. शिक्षणाच्या माध्यमातून ज्यांच्या हातात रोजगाराचे साधन द्यायचे, त्यांच्या हातात खोटेनाटे सांगून तलवारी दिल्या की राजकारण्यांचे काम सोपे होते. कारण मग अशी भडकलेली माथी कोणतेही प्रश्न विचारत नाहीत की कोणतीही उत्तरे मागत नाहीत. पण आजच्या पिढीला अशा पद्धतीने मध्ययुगात नेणाऱ्या राजकारण्यांना का समजू नये की याच समाजात उद्यापरवा त्यांचीही नातवंडे- पतवंडे वाढणार, वावरणार आहेत? आज जे पेरले जाणार आहे तेच तर उद्या उगवणार आहे.

ही सगळी मध्ययुगीन प्रतीके, ती मानसिकता पेरणाऱ्यांना नेमके कशाचे पीक हवे आहे, ते आपल्याला माहीत आहे. ते पीक येऊ द्यायचे का, याचा निर्णय आपण करायचा आहे.

# आणि ते आनंदी राहिले!

**अन्यथा**

**गिरीश कुबेर**

## तुम्हा-आम्हाला आटपाटनगरी माहीत असते... तिथले अनेक बाबा- गुरूही ऐकून माहीत असतात; पण त्यांच्या सगळ्याच 'लीला' कुठे माहीत असतात...?

**आटपाट नगरातली** ही कथा. हे आटपाट नगर आजही आहे. पूर्वी होतं तसं. राज्यकर्ते, प्रजा, लुटणारे, लुटून घेणारे, प्रामाणिकपणे कर भरणारे, प्रामाणिकपणे कर टाळणारे सगळं तसंच. शाळा-महाविद्यालयं तशीच. त्यातून कोणत्या भाषेत विद्यार्थ्यांना शिकवायला हवं यावर वाद घालणारेही तसेच. खरं तर वाद घालणाऱ्यांची मुलं ज्यांच्यासाठी वाद घातला जातोय त्यांच्या शाळेत शिकतच नाहीत. पण तरीही ते वाद घालतात. मग आटपाट नगरातली मुलं शिक्षण झालं की आटपाट नगर सोडून जातात. गेली की परत येतच नाहीत. तिकडेच लग्न. मग त्यांच्या बायका गर्भार राहिल्या की आटपाट नगरातनं ते आपल्या आईवडिलांना तिकडे बोलवून घेतात. कारण त्या परदेशांत आयांसाठी खूप खर्च. त्यापेक्षा आटपाट नगरातली आई फुकटात! बाबांचा घरकामात हातभार आणि आईची बाळंत सुनेला किंवा मुलीला मदत. मुलं मोठी झाली की या आईवडिलांना मग परत आटपाट नगरात पाठवतात. मग आटपाट नगरात राहून हे आपल्या नातू/नातीला स्काईपवर बघतात. आजी स्काईपवरच तीट लावते आणि अशीच दृष्टही काढते. पुढच्या बाळंतपणापर्यंत मग हे दोघे आटपाट नगरात.

या आटपाट नगरात गुरू आणि बाबांचा फारच सुळसुळाट. तो फार पूर्वीही होता. पण आता त्यांची संख्या फारच वाढली. त्यात योगींचीही भर. योगी म्हणजे खरं तर सर्व भौतिकवादापासून दूर गेलेला माणूस. पण आटपाट नगरातले योगी वेगळेच. ते राजकारणात, समाजकारणातच नाही तर सत्ताकारणातही असत. या आटपाट नगरात एक बाबाही होता. तो योगी होता आणि त्यात बाबाही. किंवा आधी बाबा होता मग त्याचा योगी झाला, असंही असेल. तो पोटाचे स्नायू गरागरा फिरवून दाखवायचा. जणू पिठाची गिरणीच. बोलता बोलता खाली डोकं, वर पाय करायचा. एका पायावर उभा राहून तर दाखवायचाच. पण एका हातावर काय; एका बोटावरही उभं राहून दाखवायचा. भले भले त्याचे चाहते. त्याच्यामुळे सगळ्यांनाच आपल्या पोटाच्या स्नायूंची जाणीव झाली. तो इतका लोकप्रिय की समग्र आटपाट नगर रोज सकाळ-संध्याकाळ आपले पोटाचे स्नायू हलवण्यात मग्न. या छंदाचा आटपाट नगराला खूपच फायदा झाला. हे पोटाचे स्नायू हलवण्याच्या नादात त्यातल्या अनेकांना आपल्या पोटात काहीच नाही, याची जाणीवच व्हायची नाही.

या बाबाला अर्थशास्त्रही कळतं. म्हणजे सरकारनं आपलं उत्पन्न कसं वाढवावं, काळा पैसा कसा बाहेर काढावा वगैरे. आटपाट नगरातले धनाढ्य शेजारच्या नगरात पैसा लपवतात म्हणे. त्या नगरात अंधार. पैसा आणि तो ठेवणारे/काढणारे सर्वच काळोखात. म्हणून त्याला काळा पैसा म्हणतात. हा काळा पैसा आपल्या देशात आणायचा, त्यासाठी भलेथोरले पेटारे पाठवायचे, तिकडनं तो काळा पैसा या पेटाऱ्यांत भरायचा, आटपाट नगरात हे पेटारे आणायचे आणि त्यातले पैसे आटपाट नगरातल्या नागरिकांत वाटून टाकायचे, अशी बाबांची कल्पना. म्हणजे सगळेच श्रीमंत. या चमकदार कल्पनेचं स्वागत सगळ्यांनीच केलं. तेवढ्यात निवडणुका आल्या. या निवडणुकांतल्या आव्हानवीरांनाही ही कल्पना आवडली. त्यांनी तसंच करू असं सांगितलं. त्यामुळे या आव्हानवीरांना सत्ता मिळाली. आता सगळ्यांना वाटलं आपल्याला पैसे मिळणार. पण कसंच काय नि फाटक्यात पाय! आटपाट नगरातला पैसा शेजारच्या देशात नव्हताच मुळी. तो आटपाट नगरातच होता. तिथल्या जमिनीत, बाजारपेठा, सोनंनाणं यात तो दडून होता. आता हे कसं विकणार? त्यामुळे बाबांची कल्पना काही यशस्वी झाली नाही. बाबा गप्प बसले.



पण म्हणून काही ते शांत बसले असं नाही. अर्थशास्त्रीनंतर त्यांना आता उद्योगपती व्हायचं होतं. त्यासाठी मग ते बरंच काय काय बनवून विकू लागले. साबण, केस धुवायचा शाम्पू, वेगवेगळे काढे वगैरे असं बरंच काही. आटपाट नगराला जुन्या वनौषधींचं भारी प्रेम. या अशा वनौषधींचे काहीच सहपरिणाम (साइड इफेक्ट्स) होत नाहीत, असं हे आटपाट नगरवासी मानत. पण ज्यांचा सहपरिणाम नसतो, त्यांचा मुळात काही परिणामच नसतो, हे काही त्यांना माहीत नव्हतं. त्यांच्या या अज्ञानाचा फायदा या बाबांसारखे अनेक घेत. आणि आटपाटवासीही त्यांची औषधं मोठ्या प्रमाणावर आनंदाने प्राशन करत. ''एकवेळ परिणाम नसेल, पण सहपरिणाम तर नाही ना'', असा त्यांचा युक्तिवाद. मग या बाबांनी दंतमंजनं आणली, लांबसडक केसांची आश्वासनं देणारी तेलं आणली, बलवर्धकं आणली. असं बरंच काय काय बाबांच्या कारखान्यात तयार व्हायला लागलं. बरं हे सगळे दावे तपासून घ्यायची पद्धतच नव्हती आटपाट नगरात. म्हणजे बाबांचं तेल लावल्यानं केस नक्की किती वाढले, बलवर्धन किती झालं वगैरे काही मोजलंच जायचं नाही. काहीच मोजायचं नाही, हीच तर आटपाट नगराची खासियत. आणि दुसरं म्हणजे बाबांच्या या औषधाचं कौतुक करायला आटपाट नगराचे मंत्रीसंत्रीही असत. मग काय बाबांना राजमान्यताच मिळाली की. पूर्वीच्या काळी असायची तशी. म्हणजे बाबा आटपाट नगरचे राजवैद्यच जणू.

बाबांचं उद्योगविश्व झपाट्यानं वाढू लागलं. इतकं की ते बहुराष्ट्रीय कंपन्यांनाही टक्कर देतील की काय अशी शक्यता निर्माण झाली. आटपाट नगरवासीयांना खूप आनंद झाला. असा आत्मनिर्भर उद्योजक होणे नाही... असं त्यांना वाटू लागलं. हा आनंद इतका मोठा होता की बाबांच्या कारखान्यात तयार झालेल्या कथित औषधांचा दर्जा, त्याची गुणवत्ता, फायदे-तोटे वगैरे कसलेही प्रश्न, किंतु त्यांच्या मनात आले नाहीत. बाबांची पुण्याई आणि आटपाट नगरपित्यांचा पाठिंबा असल्यावर यश किती दूर राहणार? तर बाबा यशाच्या पायऱ्या असे झरझर चढू लागले. पैसाच पैसा. बक्कळ नफा मिळू लागला त्यांना. त्यामुळे त्यातून अनेक अन्य कंपन्यांत त्यांना 'रुची' निर्माण झाली.

तर झालं असं की बाजारात एक कंपनी दिवाळखोरीत निघाली. आटपाट नगरचं सरकार असं मधे काय काय करायचं. त्यामुळे सरकारच्या प्रामाणिकपणावर शिक्कामोर्तब व्हायचं. ही कंपनी आटपाट नगरातल्या सरकारी बँकांची कर्जं फेडू शकत नव्हती. नियमाप्रमाणे मग निघाली ती दिवाळखोरीत. आटपाट नगर सरकारनं अर्ज मागवले ही कंपनी खरेदी करू इच्छिणाऱ्यांकडून. तिची विक्री होण्याआधी या कंपनीला कर्ज देणाऱ्या बँकांना वाटलं आपण थोडा त्याग करायला हवा. त्यांनी मग या कंपनीच्या डोक्यावरची साधारण ५० टक्के कर्जं माफ केली. म्हणजे कंपनीकडून सरकारी बँकांना समजा १०० रुपये येणं होतं तर या बँकांनी उदार अंतःकरणानं सांगितलं, तुमची परिस्थिती अगदीच वाईट आहे... तेव्हा आमच्या देण्यातल्या १०० रुपयांतले फक्त ५० रुपयेच परत करा. बाकीचे ५० आम्ही माफ करून टाकतो. बँकांच्या या औदार्यामुळे या कंपनीच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजा हलका झाला. मग लिलाव पुकारला गेला या कंपनीचा. चांगली भरल्या घरची कंपनी. बुडतीये म्हटल्यावर बाबांप्रमाणे अनेकांना तिच्यात 'रुची' निर्माण झाली. अनेकांचे अर्ज आले.

कोणत्याही लिलावाचा नियम काय? तर जास्तीत जास्त बोली लावेल त्याच्या गळ्यात माळ घालायची. तर बाबांप्रमाणे आणखी एका उद्योगपतीचाही या कंपनीवर जीव जडला. आणि बाबांपेक्षा या उद्योगपतीची ताकद फार म्हणजे फार मोठी. हात 'अगदी वरवर'पर्यंत पोहोचलेले. त्यामुळे त्यानं लिलावात अशी काही बोली लावली की बाकीच्यांचे डोळेच दिपले. ही बुडती कंपनी या उद्योगपतीकडेच जाणार हे अगदी नक्की झालं. म्हणजे बाबांना हात चोळत बसावं लागणार.

पण अखेर चमत्कार झाला. कसं काय कोण जाणे पण या उद्योगपतीनं या लिलावातनं माघार घेतली. आपली बोली मागे घेतली त्यानं. खरं तर हा उद्योगपती तसा काही अडाणी नव्हता, पण तरी त्यानं माघार घेतली खरी. बाबांची कृपा म्हणतात ती हीच. या उद्योगपतीनं माघार घेतल्यामुळे ती बुडीत खात्यात गेलेली कंपनी बाबांना मिळाली.

आणखी एक चमत्कार झाला!

ही कंपनी घेण्यासाठी बाबांना भरपूर कर्जं मिळाली. कोणी दिली ती? तर ज्या बँकांची कर्जं बुडाली म्हणून ती कंपनी दिवाळखोरीत निघाली, ज्या बँकांनी या कर्जांतल्या ५० टक्के रकमेवर पाणी सोडलं त्याच बँकांनी तीच कंपनी घेण्यासाठी त्याच बाबांना रग्गड कर्जं दिली.

आटपाट नगरात कोणालाही काहीही वाटलं नाही.

आटपाट नगरातील प्रजा तशीच आनंदात डुंबत राहिली.

girish.kuber@expressindia.com
@girishkuber

## विश्लेषण

# वीज-भारनियमन का करावे लागते?

**पावलस मुगुटमल**

**मुंबईत टाटा** पॉवर, अदानी आणि बेस्ट या कंपन्यांकडून वीजपुरवठा करण्यात येतो. तर मुलुंड-भांडुप या मुंबईतील उपनगरांसह उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रात महावितरणकडून वीज पुरविली जाते. राज्याला लागणारी वीज महानिर्मितीसारख्या शासनाच्या अखत्यारीत असलेल्या कंपन्यांसह खासगी वीजनिर्मिती कंपन्यांकडून घेतली जाते. विजेची गरज लक्षात घेऊन खासगी कंपनीशी वीज खरेदीचे करार केले जातात. वेगवेगळ्या माध्यमांतून येणारी वीज 'ग्रिड'ला (देशातील विविध स्रोतांतून मिळणारी वीज एकत्र करून त्याचे वितरण करणारी यंत्रणा) जोडून त्याचा हिशेब ठेवला जातो. मागणी वाढण्याची शक्यता असल्यास निर्मिती वाढविली जाते आणि मागणी घटल्यास ती कमी केली जाते. हे सारे एरवी सुरूच असते.

### नेहमी ऐन उन्हाळ्यातच भारनियमन कसे?

उन्हाच्या झळा किंवा इतर कारणांनी विजेची मागणी खूप वाढल्यास आणि नेमकी त्याच वेळी वीजनिर्मिती केंद्रातून पुरेशी वीज उपलब्ध न झाल्यास या असंतुलनामुळे मागणीचा भार पडून ग्रिडवर ताण येऊन ते बंद पडून संपूर्ण राज्य अंधारात जाऊ शकते. हे टाळण्यासाठी काही भागांत वीजपुरवठा बंद केला जातो व मागणी-पुरवठ्याचे संतुलन साधले जाते यास भारनियमन म्हणतात. महाराष्ट्रात राज्य वीज नियामक आयोगाने भारनियमनाची परिस्थिती निर्माण झाल्यास कशा रीतीने ते करावे यासाठी नियमावली तयार केली आहे. त्यानुसार वीजचोरी अधिक असलेल्या भागांत सर्वप्रथम भारनियमन केले जाते.

### सध्याचे भारनियमन कशामुळे?

संपूर्ण राज्यात सध्या उन्हाचा तीव्र चटका आहे. त्यामुळे पंखे, वातानुकूलन यंत्रणा आणि कृषिपंपांचा वापर वाढला आहे. अशा परिस्थितीत विजेची निर्मिती वाढविणे हा सहजसोपा उपाय असतानाही भारनियमन का करावे लागते, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे साहजिकच. मात्र, सद्यःस्थितीत उष्णतेच्या तडाख्यामुळे विजेची विक्रमी मागणी असतानाच वीज प्रकल्पांना पुरेसा कोळसा मिळत नसल्याने विजेची निर्मिती कमी होऊन उपलब्धता कमी होत गेली. त्यामुळे आकस्मिक भारनियमन करण्याची वेळ ओढवली. महावितरणच्या माहितीनुसार, आठवड्यापूर्वी विजेची मागणी २४,००० ते २४,५०० मेगावॉट असताना वीजखरेदीचा करार केलेल्या वीजनिर्मिती कंपन्यांकडून २२,००० ते २२,५०० मेगावॉट वीज मिळत होती. त्यामुळे २००० ते २५०० मेगावॉट विजेची तूट निर्माण झाली होती. काही वेळा खुल्या बाजारातून व इतर स्रोतांद्वारे पुरेशी वीज उपलब्ध केल्यानंतर १५ ते २० एप्रिलदरम्यान भारनियमन झाले नाही. मात्र अदानी पॉवरकडून करारानुसार ३१०० मेगावॉट वीज अपेक्षित असताना ती केवळ १७९५ मेगावॉटच मिळत आहे. त्यामुळे सुमारे १३०० ते १४०० मेगावॉट विजेची तूट निर्माण झाली.

### विजेची उपलब्धता आणि मागणी किती?

२०२१ मध्ये ऑक्टोबर हीटच्या कालावधीतच कोळसाटंचाई निर्माण झाली होती. त्या वेळी राज्याची मागणी १८,२०० तर महावितरणची मागणी १५,८०० मेगावॉट होती. कोळसाटंचाईमुळे १३ वीज संच बंद पडल्यामुळे तब्बल ३३०० मेगावॉट विजेची तूट निर्माण झाली होती. मात्र इतर स्रोतांमधून वीज मिळाल्याने त्या वेळी भारनियमन टळले. सध्या कोळशाची टंचाई आहे. सोबतच उष्णतेच्या तडाख्यात राज्यात प्रथमच विजेची मागणी २८,८०० मेगावॉटवर, तर महावितरणच्या कार्यक्षेत्रात ही मागणी देशात सर्वाधिक २५,१४४ मेगावॉटवर गेली आहे.

### भारनियमनामधील नैसर्गिक न्याय काय?

राज्य २०१२ मध्ये भारनियमनातून मुक्त झाल्याचे सांगितले जाते. विजेची उपलब्धता कमी असल्याने २०१२ पूर्वी राज्याच्या वेगवेगळ्या भागांत घोषित भारनियमन केले जात होते. आता मागणीनुसार विजेची उपलब्धता होऊ न शकल्यास तात्पुरते भारनियमन केले जाते. गेल्या दहा वर्षांत चार-पाच वेळा असे भारनियमन करावे लागले आहे. भारनियमनाची परिस्थिती उद्भवल्यास नैसर्गिक न्यायाप्रमाणे निकष ठेवण्यात आले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने या निकषांना मंजुरी दिली आहे. यामध्ये बिलांचा नियमित भरणा करणाऱ्या ग्राहकांना भारनियमनाची झळ शक्यतो पोहोचणार नाही, याची काळजी घेण्यात येते. सरसकट भारनियमनाऐवजी वीज देयकांची वसुली आणि वीजचोरीचे प्रमाण लक्षात घेऊन फीडरनिहाय किंवा वीजवाहिनीप्रमाणे भारनियमन करण्याची सुरुवात देशात सर्वप्रथम महावितरणकडून करण्यात आली.

### विभागानुसार वेगवेगळे भारनियमन कसे करतात?

पूर्वी वाणिज्यिक आणि तांत्रिक हानीच्या टक्केवारीनुसार विभागनिहाय भारनियमन करण्यात येत होते. त्यामुळे एखाद्या एक ते दीड लाख वीजग्राहकांच्या विभागामध्ये वीज बिल न भरणाऱ्या ग्राहकांचाही वीजपुरवठा सुरळीत राहात होता. तसेच, एखाद्या विभागाची हानी अधिक असल्यास तेथील प्रामाणिक ग्राहकांना अंधारात राहाण्याची वेळ येत असे. ही बाब लक्षात घेऊन महावितरणने ग्राहकसंख्या आणि वीजवाहिन्यांचा अभ्यास केला. विभागाऐवजी फीडरनिहाय भारनियमनाचे निकष तयार करण्यात आले. त्याप्रमाणे पाच ते दहा हजार ग्राहक असलेल्या एखाद्या फीडरची वीजहानी कमी असल्यास भारनियमन कमीत कमी किंवा केलेच जात नाही. मात्र वसुली कमी आणि वीजहानी अधिक असल्यास वीजकपातीचा कालावधी अधिक, असे सूत्र निश्चित केले आहे.

### भारनियमन कोणत्या भागात केले जाते?

भारनियमन करण्याची वेळ आल्यास ते नेमके कोणत्या भागात होते, याबाबत महावितरणच्या पुणे परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी निशिकांत राऊत म्हणाले, की महावितरणने वाणिज्यिक आणि तांत्रिक हानीच्या निकषानुसार वीजवाहिन्यांचे ए, बी, सी, डी, ई, एफ, तसेच जी-१, जी-२ आणि जी-३ असे गट तयार केले आहेत. वीज बिलांची सर्वाधिक वसुली आणि तांत्रिक गळती कमी असलेल्या फीडरची ए ते जी-३ अशी क्रमवारी आहे. वीज बिलांची सर्वात कमी वसुली आणि वीजहानी अधिक असलेल्या जी-१, जी-२ आणि जी-३ (५८ ते ७६ टक्क्यांपेक्षा अधिक हानी) गटापासून तात्पुरत्या भारनियमनाला सुरुवात केली जाते. त्यानंतरही गरज भासल्यास आधी एफ, मग ई अशा रीतीने वरच्या गटातील भागात भारनियमन होते. सर्वात शेवटी ए गटात भारनियमन करावे अशी नियमावली लागू आहे.

pavlas.mugutmal@expressindia.com

## व्यक्तिवेध

**सर्वोच्च न्यायालयाने** पाडकाम थांबवण्याचा आदेश दिल्यानंतर बुलडोझर सुरूच राहिल्याची आणि 'आम्हाला त्या आदेशाची प्रत मिळालीच नव्हती' असा बचाव करून संबंधित मोकळे सुटणार का, याची चर्चा सध्या सुरू असतानाच टी. रामा राव यांची निधनवार्ता आल्यामुळे, 'अंधा कानून' या चित्रपटाची आठवण येणे साहजिक आहे. न्यायालयातच हत्या घडते, हे कळीचे दृश्य असणारा आणि 'कायदा-न्याय म्हणजे केवळ कागदोपत्री पुरावे की परिस्थितीची शहानिशा?' असा प्रश्न उभा करणारा तो हिंदी चित्रपट टी. रामा राव यांनी दिग्दर्शित केला होता. 'दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांतचा पहिलावहिला हिंदी चित्रपट' अशीही १९८३ च्या त्या चित्रपटाची ख्याती आहे. रजनीकांतचे हिंदीतले पदार्पण अमिताभ बच्चन, हेमामालिनी अशांच्या साथीने होण्याची तजवीज 'अंधा कानून'द्वारे टी. रामा राव यांनी केली होती. सन २००० चा 'बुलंदी' हा या टी. रामा राव यांचा अखेरचा गाजलेला हिंदी चित्रपट, त्यातही रजनीकांत यांची भूमिका होती. धर्मेंद्र, जितेंद्र, अमिताभ, अनिल कपूर, रेखा, माधुरी दीक्षित अशा त्या त्या वेळी उच्चस्थानी असणाऱ्या कलावंतांसह सुमारे ३५ हिंदी आणि तेवढेच तेलुगू चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले, २० ते २५ चित्रपटांशी निर्माते आणि पटकथालेखक म्हणूनही ते संबंधित होते.



टी. रामा राव

सन १९३८ मध्ये जन्मलेल्या टी. रामा राव तातिनेनी यांना अगदी कळत्या वयापासूनच चुलत बंधूंमुळे चित्रपटनिर्मितीत सहभागी होण्याची संधी मिळाली. अवघ्या विशीत असताना त्यांचे नाव 'सहायक दिग्दर्शक' म्हणून झळकले. अखेर १९६६ मध्ये 'नवरात्री' या तेलुगू चित्रपटानिशी त्यांनी दिग्दर्शक म्हणून पदार्पण केले. तुलनेने हिंदीत त्यांचा शिरकाव बराच उशिरा म्हणजे वयाच्या चाळिशीत झाला. तोवर लग्न, दोन मुले, चित्रपटांखेरीज पोलाद उद्योगक्षेत्रातही थोडीफार गुंतवणूक असा व्याप वाढला होता. १९७७ मध्ये (पुढे 'तेलुगू देशम्' स्थापणारे) एन. टी. रामा राव व जयाप्रदा यांच्यासह तेलुगूत 'यमगोल' हा चित्रपट टी. रामा राव यांनी केला होता, त्यावर आधारित 'लोक परलोक' (जितेंद्र व जयाप्रदा) १९७९ मध्ये हिंदीत आला. मग गाजलेल्या तेलुगू वा तमिळ चित्रपटांचे हक्क विकत घ्यायचे आणि त्यावर हिंदी चित्रपट स्वतःच्याच दिग्दर्शकीय देखरेखीखाली बनवायचे असा उद्योग त्यांनी सुरू केला. १९८० ते ८२ या दोन वर्षांत जुदाई, मांग भरो सजना, एक ही भूल, मै इंतकाम लूंगा, जीवनधारा आणि ये तो कमाल हो गया हे सारेच चित्रपट चालले, गाजलेसुद्धा! पण 'जीवनधारा' स्त्रीचे कणखर रूप दाखवणारा, तर 'मांग भरो सजना' पूर्णतः परंपराशरण, पुरुषावलंबी (दोन्हीत रेखाची प्रमुख भूमिका)... मै इंतकाम लूंगा मारधाडपट तर कमाल हो गया विनोदी अंगाचा... या आशयवैविध्याचा संबंध टी. रामा राव हे दिग्दर्शक असण्यापेक्षा, ते गुंतवणूकदार असल्याशी अधिक होता. त्यामुळेच कुणी त्यांना प्रतिभाशाली वगैरे म्हणण्याच्या फंदात पडणार नाही, पण मद्रासकडल्या चित्रपटांची वाट १९८० आणि ९० च्या दशकांमध्येही हिंदीत खुलीच ठेवण्याचे श्रेय निर्विवाद त्यांना दिले जाते. गाजलेल्याच चित्रपटांना हिंदीत ते आणत, त्यामुळे फार कमी चित्रपट 'पडले', बाकी सारे चाललेच! पण सुधा चंद्रनचा 'नाचे मयूरी' (१९८६) हिंदीत आणल्याबद्दल हिंदी प्रेक्षकांना नेहमीच टी. रामा राव यांच्याविषयी कृतज्ञता वाटेल, वाटायला हवी.




# वय एक 'आकडा'!

**'असा कसा वागतो हा माणूस, म्हातारचळ दुसरं काय!' किंवा 'तुझ्यापेक्षा जास्त पावसाळे मी पाहिलेत, मला अक्कल शिकवू नकोस,' अशी वाक्यं आपल्याला नवीन नाहीत. त्या त्या वयानुसार विशिष्ट पद्धतीनंच वागलं पाहिजे, हे आपल्याकडे पूर्वापार चालत आलेलं आहे. हाच वयवाद. वयाविषयीच्या पूर्वग्रहबाधित दृष्टीमुळे केल्या जाणाऱ्या भेदभावाला मानसशास्त्रात 'एजिझम' वा 'वयवाद' म्हणतात. या वयवादाचा परिणाम अनेकांना मानसिक रुग्ण बनवतो आहे, तर कित्येकांना निष्क्रिय. म्हणूनच सेवानिवृत्ती म्हणजे 'रिकामटेकडं म्हातारपण' हे समीकरण बदलून सक्रिय वृद्धत्वाला प्रोत्साहन देणं गरजेचं आहे. दिवसेंदिवस आपल्या देशातील वृद्धांची संख्या वाढत जाणार आहे, म्हणूनच साठी ते ऐंशी हा वयाचा टप्पा त्यांच्या प्रगल्भ अनुभवांचं गाठोडं तरुणांच्या हाती सोपवण्यासाठी करता येऊ शकतोच, शेवटी वय हा फक्त एक आकडा आहे, त्याच्याभोवती रचलेलं संपलेपण नाही…**

**दुलारी देशपांडे**



काही वर्षांपूर्वी आपल्याकडच्या पस्तीशी ओलांडलेल्या एका प्रसिद्ध अभिनेत्रीनं लग्न केलं. समाजमाध्यमांतून या अभिनेत्रीला त्या वेळी मोठ्या प्रमाणावर 'ट्रोल' करण्यात आलं. कारण तिचा नवरा तिच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान आहे. लग्न तिनं केलं होतं, पण आपले नेटकरीच जास्त अस्वस्थ झाले होते. याचं कारण विवाह करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या वयाविषयीच्या नेटकऱ्यांच्या साचेबद्ध विचारसरणीला या लग्नामुळे जबर धक्का बसला होता. इथे त्या अभिनेत्रीचं वय हेच तिच्यावर होत असलेल्या जहरी टीकेमागचं खरं कारण होतं. वयाचा हा पूर्वग्रह कोणाकोणाला कशा कशा प्रकारे लक्ष्य करेल हे पाहणं गमतीशीर आहे.

नामवंतांनाच नव्हे, तर सर्वसामान्यांना केवळ वयावरून केल्या जाणाऱ्या अशा प्रकारच्या भेदभावाला आपल्या आयुष्यात कधी ना कधी सामोरं जावं लागतच असणार. याचं कारण आपल्या समाजात 'वय' या गोष्टीचा फारच बाऊ केला जातो. आपल्याकडे कोणी कोणत्या वयात काय करावं, याचे अगदी पूर्वापार चालत आलेले पूर्वग्रह आहेत. अर्थात वयाविषयीचे हे पूर्वग्रह ज्या काळात निर्माण झाले, त्या काळात एखाद्या वेळेस ते योग्य असतीलही, पण पुढे काळ जरी बदलत गेला, तरी वयाविषयीचे ते जुनेपुराणे पूर्वग्रह काळानुसार न बदलता तसेच राहिले. एखादी व्यक्ती अशा एखाद्या संकेताला, एखाद्या रूढीला, एखाद्या परंपरेला छेद जाईल असं वागते. थोडक्यात, तिच्या वयाला न शोभेलसं वागते, तेव्हा पूर्वापार चालत आलेल्या पूर्वग्रहाला धक्का पोहोचवते. साहजिकच अशा वेळी ती सर्व समाजाचा रोष ओढवून घेते. याचा परिणाम म्हणून समाजमाध्यमांमधून ती मोठ्या प्रमाणावर ट्रोल होते. हे झालं वयाविषयीच्या एका पूर्वग्रहाविषयी.

वयावरून केल्या जाणाऱ्या याच भेदभावाला मानसशास्त्रात 'एजिझम' म्हणतात. हा भेदभाव वयाविषयीच्या पूर्वग्रहबाधित दृष्टीमुळे केला जातो. मराठीत 'एजिझम'ला 'वयवाद' म्हणतात. रॉबर्ट बटलर या अमेरिकी जेरंटोलॉजिस्टनं (वृद्धत्त्वविषयक शास्त्रातील तज्ज्ञ) १९६९ मध्ये पहिल्यांदा 'एजिझम' ही संज्ञा वापरली. सुरुवातीला ही संज्ञा वापरताना त्यांच्या डोळ्यासमोर केवळ वयस्कर लोक होते. पुढे एजिझममध्ये तरुणांचाही विचार करण्यात आला. तरुणांच्या वयवादाला 'रिव्हर्स एजिझम' (उलट वयवाद) म्हटलं गेलं.

एखाद्या वयस्कर व्यक्तीनं वयासंदर्भातला 'स्टीरिओटाइप' धुडकावत एखादी गोष्ट केली, की लगेच 'कसं काय बुवा जमतं तुम्हाला या वयात? आम्हाला नाही बुवा जमणार!' असा तिला खवचट टोमणा मारणं किंवा एखादी वयस्कर व्यक्ती थोडी जास्त हसता-खिदळताना दिसली, फॅशनेबल राहिली वा तसे कपडे घातले की लगेच 'शोभतं का या वयात? म्हातारचळ लागलाय नुसता, दुसरं काय!' अशा प्रतिक्रियाही ऐकवल्या जातात किंवा एखादी वयस्कर व्यक्ती जरा अधिक उत्साहानं वागत असेल, तर 'जुनं विमान हल्ली फारच उडतंय!' अशा प्रकारे त्या व्यक्तीची वयावरून खिल्ली उडवणं, हेही अनेकदा होताना दिसतं. ही झाली समाजात हरघडी अनुभवाला येणारी वयवादाची उदाहरणं. तर दुसऱ्या बाजूला 'मला नको अक्कल शिकवूस, तुझ्यापेक्षा जास्त पावसाळे मी पाहिलेत, समजलास!', 'गाढवा, तुला काही अक्कल-बिक्कल आहे की नाही? तुझ्या वयाचा मी होतो तेव्हा, मी दोन पोरांचा बाप झालो होतो! एवढा घोड्यासारखा वाढलास, अजून तुझ्या लग्नाचाच पत्ता नाही!' यांसारखी घरी-दारी-बाजारी रोजच्या अनुभवाला येणारी 'उलट वयवादा'चीही अनेक उदाहरणं देता येतील.

वयवाद आपल्याला सर्व काळी, सर्व ठिकाणी दिसून येतो. कधी तो अजाणतेपणानं, सहजरित्या केला जातो. हा सौम्य स्वरूपाचा वयवाद. मात्र सर्वच वेळी वयवाद इतक्या सौम्य स्वरूपाचा नसतो. काही ठिकाणी हेतूपूर्वक समोरच्याला दुखावण्यासाठीच भेदभाव केला जातो. त्या वेळी वयवादाचं 'लक्ष्य' बनवण्यात आलेल्या व्यक्तीला त्याचा अतिशय मानसिक त्रास होऊ शकतो. आणि याला वयाचा अपवाद नाही. कोणत्याही वयातील कोणत्याही व्यक्तीला टोमण्यापासून ते थेट बोलण्यापर्यंत काहीही ऐकून घ्यावं लागतं.

आज जगात ६ कोटी ३० लाख इतक्या प्रचंड संख्येनं असलेले नैराश्य या मानसिक आजारानं ग्रासलेले रुग्ण हा 'तीव्र वयवादा'चा एक परिणाम असू शकतो, असे संकेत यावर झालेल्या अभ्यासातून मिळतात. 'अमेरिकन सायकिॲट्रिक सोसायटी' ही वयवादाकडे भविष्यकाळातली एक गंभीर समस्या म्हणून बघते. तर 'जागतिक आरोग्य संघटना' वयवादाला चालू काळातली एक वैश्विक समस्या मानते. वयवादाचं हे वैश्विक रूप लक्षात घेता भारताच्या दृष्टीनं वयवादाचं स्वरूप समजून घेणं गरजेचं ठरतं.

वयवादात वयस्कर आणि तरुण व्यक्तींमध्ये त्यांच्या वयांमुळे निर्माण होणारी तेढ दिसते. हे व्यक्तीचं 'शारीरिक वय' असतं. शारीरिक वय म्हणजे नेमकं काय? यावर डॉ. निखिल दातार सांगतात, ''जीवशास्त्राच्या दृष्टीनं माणसाचं वय दर मिनिटाला वाढत असतं. वाढत्या वयानुसार इंद्रियांची काम करण्याची शक्ती हळूहळू कमी-कमी होत जाते. जनुकांमध्ये बदल होतात. शरीरात मुक्त मूलकांचं (फ्री रॅडिकल्स) प्रमाण वाढतं. वयवादाविषयी बोलायचं झालं, तर भविष्यकाळात जसजशी वैद्यकशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञानाची अधिकाधिक प्रगती होत जाईल, तसतशी माणसाच्या जीवितमानात आणि जीवन जगण्याच्या दर्जात निश्चितच वाढ होईल. साहजिकच त्यामुळे एकंदरीत प्रौढ आणि वयस्कर लोकांची संख्या वाढेल. भविष्यात वयवादाचा प्रश्न गंभीर रूप धारण करताना दिसेल. एक वेळ अशी होती, की माणसं चाळिशीतच 'म्हातारी' होऊन मरायची. निसर्गतःच त्या वयात त्यांच्या शरीराची क्रियाशीलता कमी व्हायची. वैद्यकशास्त्रातल्या प्रगतीनं माणसाच्या जगण्याची वयोमर्यादा चाळीसवरून आज ऐंशीवर आणून ठेवली आहे. भविष्यकाळात वयवाद जसा वाढत जाईल, तसा इच्छामरणाच्या प्रश्नाचादेखील आपल्याला गंभीरतेनं विचार करावा लागेल. भविष्यकाळात इच्छामरण हा वैद्यकीय प्रगतीचा 'साईड-इफेक्ट' ठरू शकतो.''

आजच्या काळानुसार म्हातारपणाचे ढोबळमानानं टप्पे करायचे झाले तर ते असे करता येतील-

वय वर्षं ६० ते ७० -
तरुण म्हातारा (यंग ओल्ड)

वय वर्षं ७० ते ८० -
मध्यमवयीन म्हातारा (मिडल ओल्ड)

वय वर्षं ८० व ८० च्या पुढे -
म्हातारा म्हातारा (ओल्ड ओल्ड)

कुठल्याही प्रकारच्या भेदभावामागे काही दूषित पूर्वग्रह असतात. या पूर्वग्रहांचा माणसाच्या मनाशी संबंध असतो. वयवाद सर्व ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणावर दिसण्यामागे कोणती मानसशास्त्रीय कारणं आहेत? याविषयी मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे सांगतात, ''आपल्याकडे पूर्वीपासून कुटुंब आणि संघटना (ऑर्गनायझेशन) या दोन्ही ठिकाणी वयाला धरून भेदभाव केला जात असल्याचं चित्र दिसतं. संघटनेपुरतं बोलायचं झालं, तर इंग्रजांच्या काळापासून ते आजच्या काळापर्यंत सर्व संघटना आदेश (कमांड) आणि नियंत्रण (कंट्रोल) या तत्त्वावर चालताना दिसतात. उदा. आम्ही नेते- तुम्ही अनुयायी. नेता नेहमीच सर्वश्रेष्ठ असतो. तुमच्यात निर्णयक्षमता नाही, आमचे हुकूम पाळणं त्यामुळे तुम्हाला गरजेचं आहे. संघटनेच्या दृष्टीनं तुम्ही केवळ 'हात आणि पाय' असता. स्वतःचं डोकं नसलेली तुम्ही मूर्ख, बिनडोक माणसं असता. त्यामुळे संघटनेच्या प्रमुखाचं काटेकोर आज्ञापालन करण्याची शारीरिक क्षमता ज्या वयोगटाच्या ठिकाणी जास्त आहे, त्या वयोगटाला साहजिकच नोकरभरतीत पहिल्यांदा प्राधान्य दिलं जातं. ब्रिटिशांच्या काळापासूनची ही 'वसाहतवादी' भूमिका आहे. आपल्याकडच्या आजच्या संघटनादेखील याच वसाहतवादी भूमिकेची 'री' ओढताना दिसतात. ब्रिटिशांच्या शिक्षणविषयक धोरणानं भारतीयांना 'सायबा'ला 'होय'बा म्हणणारा 'मजूर' बनवलं. हे झालं संघटनेपुरतं. आपल्याकडे भारतीय कुटुंबव्यवस्थेतही एक 'पदसिद्ध वरिष्ठ' असतो. कुटुंबातला कर्ता पुरुष. कुटुंबाचा वंशपरंपरागत 'मालक'. जो स्वतःला जात्याच हुशार, समजूतदार, शहाणा समजत असतो. अशा 'पदसिद्ध वरिष्ठा'समोर तुम्ही मारून-मारून किती उड्या माराल? शतकानुशतकं चालत आलेली विचारांची हीच पद्धती आपल्या अगदी बोकांडी बसली आहे.''

मानसशास्त्राच्या दृष्टीनं वयवादाबाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, तुमच्या वयाकडे बघण्याचा तुमचा स्वतःचा दृष्टिकोन. उदा. 'मुलं मोठी झाली. माझी 'वेळ' संपली! आता आम्ही निवृत्ती घ्यायची.' तुम्हाला स्वतःबद्दल जर असं वाटत असेल, तर साहजिकच तुम्ही त्याप्रमाणे वागायला लागता. तुम्ही तसे वागता म्हणून लोक तुम्हाला तसं समजतात. कारण तुम्ही स्वतःकडे ज्याप्रमाणे बघता, त्याप्रमाणेच माणसं तुमच्याकडे बघतात. आपल्याकडे या बाबतीत सामाजिक स्थित्यंतर घडणं जरुरीचं आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, पूर्वापार समजुतीपेक्षा जर का कोणी 'वेगळं' वागत असेल, तर समाज त्याला दूषणं देतो. त्या व्यक्तीनं त्याचं 'उथळ' वागणं सोडून 'त्याच्या वयाप्रमाणे' वागावं ही अपेक्षा ठेवतो. यामागे वय या गोष्टीकडे बघण्याच्या आपल्या ज्या रूढीबद्ध,साचेबद्ध धारणा असतात त्याच असतात. त्यात बदल होणं गरजेचं आहे.

वयवादात मुळात असा भेदभावच का केला जातो? याविषयी मानसशास्त्राच्या प्राध्यापक वेदवती परांजपे-सुर्वे एक उदाहरण देतात- समजा, एखादा नातू आपल्या आजोबांना 'ऑनलाइन पेमेंट' करायला शिकवतोय. आजोबा 'या वयात आपल्याला ते जमेल का?' या विचारानं आधीच साशंक आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून नकळत सारख्या चुका होतात. नातू आजोबांना एकदा सांगतो, दोनदा सांगतो, तीनदा सांगतो. पण 'वयामुळे आपल्याला हे करायला जमणारच नाही, अशा विचारानं 'सेल्फ प्रोग्राम्ड' झालेले आजोबा तरीही सारखे चुकतात. एखादी 'स्टेप' विसरतात. लवकरच नातवाचा त्यांना शिकवण्याचा 'पेशन्स' संपतो. 'किती वेळा तीच-तीच गोष्ट तुम्हाला सांगायची आजोबा? इतक्या वेळा सांगितलं तरी तुम्हाला समजत कसं नाही? सारखंसारखं कसं विसरता? तुम्ही 'म्हातारे' झालात. मला नाही वाटत तुम्ही मोबाइल वापरू शकाल.' नातू हे बोलून मोकळा होतो, कारण त्यानंही ही वाक्यं कुठेतरी कधीतरी ऐकलेलीच असतात. आणि वय झाल्यावर नवीन तंत्रज्ञान शिकता येत नाही, असं आजोबांनीही कुठेतरी कधीतरी ऐकलेलं असल्यामुळे (पूर्वग्रह) नातवाचं बोलणं ते मुकाट्यानं सहन करतात. वास्तविक पाहता आपण कुठल्याही वयात काहीही शिकू शकतो. मेंदूच्या संशोधनात सिद्ध झालंय, की आपण आपला मेंदू जितका जास्त वापरतो तितका तो जास्त कार्यक्षम राहतो. म्हातारपणात आपण मोबाईल शिकू शकणार नाही या पूर्वग्रहामुळं आजोबा शिकण्याआधीच हार मानून मोकळे होतात. वैवाहिक जीवनातही आपल्याला 'दृश्य वयवाद' दिसतो. आपल्या वैवाहिक जोडीदाराचे केस पिकायला लागले, की त्याच्याकडे बघण्याचा त्याच्या जोडीदाराचा 'दृष्टिकोन' बदलतो. त्यामुळे प्रियकर वा प्रेयसी असताना जे वागणं आवडत असतं, तेच नवरा वा बायको झाल्यावर अल्लड वा बालिश वाटायला लागतं.

त्याही पलीकडे, एखादी व्यक्ती वयस्कर आहे आणि तिला नैराश्यासारखा एखादा मानसिक आजारही आहे, अशा वेळी तिच्या मानसिक आजाराकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केलं जातं आणि 'ती तशी 'बरी' आहे, 'वया'मुळे ती अशी वागणारच ना', असं त्याचं समर्थनही केलं जातं.

मानसशास्त्रानुसार सगळ्यांच्याच मनात मृत्यूची, अपंगत्वाची, परावलंबित्वाची भीती असते. अस्तित्ववादात आपल्याला या भीतीचं मूळ सापडतं. वयस्कर लोक तरुणांना या गोष्टीची सतत आठवण करून देत असतात. तरुणांसाठी या भीतीपासून स्वतःचं संरक्षण करण्याच्या 'बचाव यंत्रणे'चा भाग म्हणजे वयस्कर लोकांना टाळणं. त्यांना नाकारणं. थोडक्यात, आपल्या डोळ्यांसमोर वयस्कर माणसं नकोत, आपल्याला त्यांच्यात जायचं नाही, असा विचार तरुणांचं मन करतं. त्यातून त्यांच्या मनात वयाबद्दल इतके पूर्वग्रह निर्माण होतात, यातून पुढे वयवाद निर्माण होतो.

आपल्याला कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वयवाद दिसून येतो. साठीपर्यंत 'खुर्च्या' अडवून बसलेले (पान १७ वर)

---

# 'ओळख' स्त्री शेतकऱ्यांची!

**खेडोपाडी अनेक स्त्रिया शेतीत सक्रिय असूनही शेतजमीन त्यांच्या नावावर नाही. अनेक स्त्रिया खंडाने वा मक्त्याने जमीन कसत आहेत, कित्येक जणी शेतमजूर म्हणून किंवा शेतीसंबंधित व्यवसायांवर जगत आहेत. या कष्टकरी स्त्रियांची दखल घेऊन त्यांना शेतकरी म्हणून ठसठशीत ओळख मिळाली, तर त्यांचा खडतर मार्ग काही प्रमाणात सोपा होऊ शकेल. चालू वर्ष 'महिला शेतकरी आणि शेतमजूर सन्मान वर्ष' म्हणून साजरे होणार असल्याच्या निमित्ताने यासंबंधीचे प्रमुख प्रश्न समजून घ्यायला हवेत.**

**सीमा कुलकर्णी, स्नेहा भट**



यंदाचे २०२२ हे वर्ष 'महिला शेतकरी आणि शेतमजूर सन्मान वर्ष' म्हणून साजरे करणार असल्याची घोषणा राज्याचे कृषीमंत्री दादा भुसे यांनी अलीकडेच केली. यासंबंधी आराखडा तयार होत असल्याचेही त्यांनी सांगितले. या निमित्ताने प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार स्त्रियांना शेतकरी म्हणून दर्जा मिळवण्यासाठी त्यांनी साध्या कागदावर अर्ज केला, तरी १५ दिवस ते तीन आठवड्यांमध्ये संबंधित स्त्रीचे नाव सातबाराच्या उताऱ्यावर नोंदवण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

शेतामध्ये काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ७० टक्के आहे. शेतीच्या कामात स्त्रिया योगदान देत असल्या तरी त्यांच्या नावावर शेती नसल्यामुळे त्यांना 'शेतकरी' असल्याचा दर्जा दिला जात नाही किंवा त्यांची औपचारिक नोंद घेण्यात येत नाही. नावावर शेती नसल्यामुळे त्यांना वित्तपुरवठा, तंत्रज्ञान, प्रशिक्षण, शेतमाल तारण योजनांचा लाभ मिळण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे त्यांचे नाव सातबाराच्या उताऱ्यावर नोंदवणे गरजेचे आहे. स्त्री शेतकरी आणि शेतमजुरांच्या शेतीमधील सहभागाची दखल घेणाऱ्या या निर्णयाचे नक्कीच स्वागत आहे. आता प्रतीक्षा हे प्रत्यक्ष घडण्याची.

'महिला किसान अधिकार मंच' (मकाम) हे नेटवर्क २०१८ पासून महाराष्ट्रात स्त्री शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सक्रिय आहे. स्त्री शेतकऱ्यांना शेतकरी म्हणून ओळख मिळवून देणे हा 'मकाम'च्या कामाचा एक प्रमुख उद्देश आहे. तसेच शेतकरी स्त्रियांचा, विशेषतः आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकरी स्त्रियांचा जमिनीवरील अधिकार हा 'मकाम'च्या कामाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या या निर्णयाचे स्वागतच आहे. या वर्षात स्त्री शेतकऱ्यांसाठी अनेक चांगले उपक्रम आखले जातील अशी आशा आहे. त्या दृष्टीने काही मुद्द्यांची मांडणी करावीशी वाटते.

सध्या स्त्रियांना त्यांचा जमिनीवरील अधिकार मिळवण्यामध्ये दोन प्रकारच्या अडचणी आहेत. पहिल्या अडचणी आहेत त्या समाजाच्या पितृसत्ताक व्यवस्थेमधून येणाऱ्या. आजही समाजावर असणाऱ्या रूढी-परंपरांच्या पगड्यामुळे स्त्रियांना संपत्तीवरील अधिकारापासून वंचित ठेवले जाते. स्त्रियांना जमिनीवरील अधिकार मिळवून देण्याच्या उपक्रमात या घटकांची दखल घ्यायला हवी. वारसा हक्काचे कायदे लोकांना, विशेषतः स्त्रियांना सोप्या भाषेत समजावून सांगायला पाहिजेत. त्याचबरोबर स्त्रियांना जमिनीवरील अधिकार मिळवण्यासाठी अर्ज करता यावा म्हणून पोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. हे अर्थातच लांब पल्ल्याचे उद्दिष्ट आहे आणि अशा प्रकारचा सामाजिक-सांस्कृतिक बदल एका वर्षात घडणार नाही. परंतु त्या दृष्टीने समाजात जाणीव जागृती करण्यासाठी काही ठोस उपाययोजना या वर्षाच्या निमित्ताने करता येऊ शकतील. यात एकूण समाजात स्त्रियांच्या हक्कांबद्दल जाणीवजागृती करण्याबरोबरच सरकारी अधिकारी- विशेषतः तलाठी आणि इतर महसूल विभागाशी संबंधित अधिकारी, यांच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये स्त्रियांच्या अधिकारांबद्दल संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी विशेष सत्रांचा समावेश करणे गरजेचे आहे.

दुसऱ्या अडचणी आहेत त्या महसूल विभागाच्या प्रक्रियांशी संबंधित. स्त्रियांना जमिनीवर अधिकार देण्यासंबंधात आज अनेक कायदे, वेगवेगळे शासन निर्णय अस्तित्वात आहेत. परंतु त्यांची योग्य ती अंमलबजावणी न होण्याचे एक कारण म्हणजे त्यासंबंधित प्रक्रियांमधील अडचणी. उदाहरणार्थ- पतीच्या मृत्यूच्या वेळी वडिलोपार्जित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर त्याचे नाव लागले नसेल, तर त्या संपत्तीतील कायद्याप्रमाणे तिचा आणि तिच्या मुलांचाही असलेला अधिकार देण्यासाठी सासरचे लोक विरोध करतात. अशा वेळी तिचा आणि तिच्या मुलांचा त्यामध्ये कायद्याने हक्क असूनदेखील तो मिळवण्यासाठी करावी लागणारी न्यायालयीन प्रक्रिया अवघड आणि खर्चीक असल्यामुळे स्त्रिया तो मिळवू शकत नाहीत. तरी अशा प्रकारच्या प्रक्रिया सुलभ करण्यासाठी गावपातळीवर वारसा कॅम्पस् - 'वारसा मेळावे' घेऊन त्या ठिकाणी स्त्रियांना त्यांचे अर्ज करण्यासाठी प्रोत्साहन देता येऊ शकेल.

(पान १७ वर)



## मागे राहिलेल्यांच्या कथा-व्यथा

- डॉ. शुभांगी पारकर



# केळीचे सुकले बाग!

**एकाकी आत्महत्या मागे उरलेल्या कुणाकुणाच्या आयुष्यावर कसा परिणाम करेल हे सांगता येत नाही. या लेखाच्या पूर्वार्धातल्या रमेशच्या आत्महत्येमुळे त्याच्या बायकोत ना काही फरक पडला, ना त्याच्या आईमध्ये. शेवटी जेव्हा त्या एकमेकांपासून वेगळ्या झाल्या, तेव्हाच त्यांच्यात शांतता निर्माण झाली. पण रमेशच्या प्रेयसीवर, प्रियावर मात्र ही आत्महत्या आघात करून गेली. इतकी, की आपण मागे का राहिलो आहोत, हा विचार तिला त्रास देऊ लागला... तिच्या आयुष्याची बाग सुकत चालली होती, आत्महत्येचे विचार तीव्र झाले. पण... पुढे काय झालं ते सांगणारा या कहाणीचा हा उत्तरार्ध.**

भावनांच्या जाळ्यात अडकलेली नाती जोपर्यंत व्यवस्थित सुटत नाहीत तोपर्यंत त्या नातेसंबंधांना अर्थ राहात नाही. या भावनाकल्लोळात अनेक अशा निरगाठी असतात, त्या सुटता सुटत नाहीत. वैद्यकीय शास्त्रात आत्महत्या जरी जागतिक आरोग्याची समस्या मानली गेली असली, तरी आत्महत्येचा निर्णय हा एखाद्या व्यक्तीचा वैयक्तिक निर्णय असतो. त्यामुळे त्याविषयीचा वैयक्तिक त्रास समजून घेणं जितकं आवश्यक आहे, तितकेच त्या व्यक्तीशी निगडित इतर व्यक्तींच्या बाबतीतले संदर्भही समजून घेणं गरजेचं असतं.

भारतीय संस्कृतीत कुटुंबाला महत्त्व आहे. कौटुंबिक एकोपा एखाद्याला संकटकालीन परिस्थितीत भावनिक आणि नैतिक आधार देऊन सुरक्षित ठेवतो, पण आत्महत्त्येच्या संदर्भात कौटुंबिक कलह आणि अशांती ही नात्यांमध्ये क्लेश आणि असुरक्षितता निर्माण करून एक जोखीम बनून जाते. मनोरुग्णतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ वा समुपदेशक यांना कौटुंबिक कलहाचं विश्लेषण करून व्यक्तींचे वैयक्तिक अनुभव जाणून घ्यावे लागतात. त्यातल्या गुंतागुंतीची उकल करून कुटुंबाला आणि आत्महत्येचा विचार करणाऱ्या व्यक्तीला सखोल मार्गदर्शन करत कौटुंबिक स्तरावर हस्तक्षेप करायला लागतो.

मागच्या लेखात (९ एप्रिल) रमेशच्या आयुष्याची झालेली होळी आपण वाचली. आईच्या आक्रस्ताळ्या हट्टाखातर रमेशनं आपल्या प्रेमाची आहुती देऊन आईनं ठरवलेल्या मुलीशी- सुनंदाशी लग्न केलं आणि आगीतून फुफाट्यात पडल्यागत त्याची अवस्था झाली. त्यातूनच त्यानं आत्महत्या केली. खरं तर त्याला सुनंदाशी लग्न करायचंच नव्हतं. आपली प्रेयसी प्रियाशी या विषयावर बोलताना 'आपण पळून जाऊन लग्न करू या आणि दुसऱ्या शहरात संसार थाटू या' असं मत त्यानं व्यक्त केलं होतं. पण मनातून तो चांगलाच हादरला होता. वाटतो तितका हा निर्णय सोपा नाही, याची त्याला जाणीव होती. त्याच्या आईमध्ये असलेलं क्रौर्य त्यानं इतकी वर्षं अनुभवलं होतं. ती कुठल्याही थराला पोहोचू शकते, याची त्याला खात्री होती. त्यानं प्रियाशी विवाह केल्यास ती क्रोधाच्या अवस्थेत आत्महत्या करून त्याला अडकवू शकते, अशीही शंका रमेशच्या वडिलांनी त्याच्याकडे व्यक्त केली होती. रमेशचा आत्मविश्वास ढासळला होता. आपल्या प्रेमाला विखारी शाप आहे, याची जाणीव ठेवून त्यानं प्रियाला समजावलं होतं. त्या दोघांच्याही मनात त्या वेळी निराशेच्या भरात आयुष्य संपवून टाकायचा विचार आलाही होता. किंबहुना जवळजवळ एक दिवस ते दोघं सोबत राहून आत्महत्येचा विचार करत होते.

स्नेडमन या मानसशास्त्रज्ञानं पुन्हा पुन्हा एक महत्त्वाचा मुद्दा गंभीरपणे मांडला आहे, तो म्हणजे भयानक मानसिक वेदनांपासून मुक्त होण्याच्या भावुक गरजेतून आत्महत्या उद्‌भवत असते. रमेश आणि प्रियासारख्या 'एक दूजे के लिये' जगण्याचा विचार करणाऱ्या युवा प्रेमिकांनी विफल प्रेमाच्या नैराश्यातून आत्महत्येचा उपाय अनेकदा विचारात घेतला असेल आणि नाकारला असेल. या व्यक्ती प्रेमात भावुक झाल्या असल्या, तरी त्या वाहून गेलेल्या असतातच असं नाही. पण प्रेमातलं वैफल्य कधी कधी जगण्याची आंतरिक ऊर्जाच संपवून टाकतं. वास्तविकतेशी सांधलेला बौद्धिक जोम या अनुभवातून जाणाऱ्या व्यक्तींमध्ये कमी पडतो. अखेरीस त्यांचा दृष्टिकोन इतका संकुचित होतो, की आत्महत्येद्वारा या विरह यातनेतून मुक्त व्हायचा मार्ग ते स्वीकारतात. जसं रमेश आणि प्रियानं ठरवलं होतं. मात्र आत्महत्येनंतर आपली निर्भर्त्सना आणि हेटाळणी संपली असती याबद्दल दोघेही साशंक होते. रमेशच्या आईनं त्यांना शिव्यांची लाखोली कायम वाहिली असती. त्यापेक्षा एक आदरयुक्त विधायक आयुष्य का जगू नये, असा सजग प्रश्न तिनं रमेशला विचारला. ते दोघंही आत्महत्येच्या विचाराच्या अगदी जवळ असताना हा प्रगल्भ, विवेकनिष्ठ विचार त्यांना पुन्हा जीवनाच्या मार्गावर मागे घेऊन आला होता. त्या दोघांनाही आत्महत्येच्या विचारातला फोलपणा कळला होता. त्या वेळच्या विरहातल्या निराशेला शरण जाण्याचं त्यांनी नाकारलं, कारण त्यातून काहीही विधायक घडणार नाही ही सूक्ष्मदृष्टी त्यांना मिळाली होती. केवळ नाती संपवली तर प्रीतीचे भावबंध संपत नसतात, याची जाणीव प्रियाला होती. तिनंच रमेशला समजावलं होतं, की आपण आपलं व्यक्तिगत जीवन जगूया, पण एकमेकांच्या नात्यासाठी जिवंतपणे मरण्यात नक्कीच अर्थ नाही. तसं पाहिलं तर काही लोक एकमेकांच्या प्रेमात पडण्यासाठी असतात, पण एकमेकांबरोबर असण्यासाठी नसतात! एकंदरीत आपल्या प्रेमातल्या जगात जे महाभारत घडू शकेल, ते टाळण्याचा रमेश आणि प्रियाचा प्रामाणिक प्रयत्न कौतुकास्पद होता. जड अंतःकरणानं त्यांनी आपल्या प्रेमाचा निरोप घेतला तो कायमसाठी.

रमेशनं प्रियाच्या प्रगल्भ साथीनं आणि आश्वासनानं त्यांच्या घरातलं महाभारत टाळलं. जडावलेल्या मनानं त्यानं एकाच या जन्मी जणू दुसऱ्या जगात शांतपणे प्रवेश केला. पण... रमेशच्या दुर्दैवी आयुष्यात शांतता आलीच नाही. त्याची आई आणि पत्नी या दोन क्रूर व्यक्तींच्या विळख्यात तो पूर्ण सापडला. त्याचा अपरिमित मानसिक छळ झाला. त्याची सहनशीलता हीच या दुष्टचक्रात त्याचा गुन्हा ठरली होती. *Tolerance becomes a crime when applied to evil!* सहनशीलतेलाही मर्यादा असतातच. त्या मर्यादेनंच रमेशचा बळी घेतला.

एखाद्याचा अंत दुसऱ्या व्यक्तीसाठी काय परिणाम घेऊन येईल सांगता येत नाही. रमेशचा अंत सुनंदासाठी नव्या जीवनाची सुरुवात होती! सुनंदाला रमेशच्या घरावर पूर्ण ताबा हवा होता. पण ते घर रमेशच्या वडिलांचं असल्यानं सुनंदाला त्यांना घराबाहेर काढता आलं नाही. रमेशचे वडील पिळवटून निघाले होते. त्याच्या आईचा जीवही तळमळत होता. पण म्हणतात ना, स्वभावाला औषध नसतं. निराशेनं त्याची आई अधिक चिडू लागली होती. तिचा संताप, आक्रमकपणा विकोपाला पोहोचला होता. सुनंदा आणि रमेशची आई रमेशच्या बारा दिवसांच्या शोककाळातसुद्धा जे काही तमाशे करीत होत्या, ते पाहून शेजारीपाजारीही थक्क होत होते. त्या दोघी एकमेकींना रमेशच्या मृत्यूसाठी दोष देत होत्या. त्यांच्यात नुसती शिवीगाळ नाही, तर मारामारीही होत होती. शेवटी मामा-मामीच्या मदतीनं त्यांनी तिला तिच्या माहेरी धाडलं. त्याच वर्षी सुनंदाचं गावातल्या एका व्यक्तीबरोबर लग्न लावून देण्यात आलं. त्यामुळे इकडे रमेशच्या आईवडिलांची मात्र बिनबोभाट सुटका झाली. रमेशशिवायचं आयुष्य त्यांनी स्वीकारलं.

मात्र रमेशच्या मृत्यूचा, तोही आत्महत्येनं झालेल्या मृत्यूचा सर्वांत मोठा आघात झाला तो प्रियावर. रमेशच्या मृत्यूची बातमी त्याच्या चाळीत राहणाऱ्या प्रियाच्या एका मैत्रिणीकडून प्रियाला कळली. ती दुःखानं वेडीपिशी झाली. तिनं लग्नही केलं नव्हतं. समजूतदारपणानं आणि भीषण परिस्थितीचा अंदाज आल्यानं तिनं आपल्या प्रेमाची आहुती दिली होती. पण मनानं ती उदास होती. तिची झोप, भूक सगळंच उडालं होतं. रमेशला टाळण्यासाठी तिनं ती नोकरीही सोडली होती. काही दिवसांनी ती दुसऱ्या ठिकाणी कामावर रुजू झाली. तिच्याही घरी तिच्या लग्नाची बोलणी चालली होती, पण 'नवीन नोकरी आहे, थोडं थांबून लग्न करते' असं तिनं सर्वांना सांगितलं होतं. रमेशच्या आणि तिच्या नात्यातला आवेग तिला तिचं प्रेम विसरू देत नव्हता. जो काही वेगळा व्हायचा निर्णय रमेश आणि तिनं घेतला, तो व्यावहारिक शहाणपणा होता, पण भावनांचा चक्रव्यूह कणखर होता. 'आपलं प्रीतीचं विश्व टिकणार नाही, आपलं जग वेगळं आहे,' हे बुद्धीला जरी पटत होतं, तरी 'दिल हैं के मानता नही' अशी प्रियाची मनःस्थिती होती. तिला असाहाय्य, अनिश्चित वाटत होतं. तिला सतत रडू यायचं आणि कधी कधी तिचे हुंदके कुठेही असली तरी आवरायचे नाहीत. सदैव टवटवीत, आनंदी असणारी प्रिया अगदी कोमेजली होती. कुणाला भेटायची नाही, आपल्याच विश्वात हरवलेली होती. ती कायम थकलेली, सुकलेली दिसत होती. तिला नैराश्य आलं होतं. ज्या असाहाय्य उपद्रवी परिस्थितीत तिनं स्वतःवर संयम ठेवून निर्णय घेतला होता, तो तिला कधी रुचलाच नव्हता. आपलं प्रसन्न विश्व त्या प्रीतीच्या सरणाबरोबर संपलं, असं तिला आता वाटत होतं. 'जसजसे दिवस जात होते, तसं तसं आपण त्या प्रीतीच्या लाटेतून बाहेर येऊ,' असं जे प्रियाला पूर्वी वाटत होतं, तसं होत नव्हतं. आठवणींची ताकद प्रभावी होती. प्रियासारख्या प्रगल्भ व्यक्तीलाही आपल्या भावनांवर मात करता येत नव्हती. कवि अनिल यांच्या शब्दांत- 'केळीचे सुकले बाग असुनियां पाणी' अशी प्रियाची मनःस्थिती झाली होती. तिला उपचार चालू केले होते. तिच्या मनात आत्महत्या करण्याचे विचार जरी येत नसले, तरी प्रियाला आपण या जगात नसतो तर बरं झालं असतं असं सतत वाटत होतं. त्यात रमेशच्या आत्महत्येमुळे तिचं दुःखं अधिकच वाढलं होतं. डोळ्यांची पापणी लवली की रमेशचा शांत, धीर देणारा चेहरा तिच्या नजरेसमोर तरळून जात होता. प्रिया सैरभैर झाली होती. वचनबद्धतेनं दोघांनी मिळून प्रेमाची आहुती दिली आणि हे काय विचित्र घडलं! प्रियालाही आत्महत्या करायची जबर इच्छा होऊ लागली.

जेव्हा ती आमच्याकडे उपचारासाठी आली तेव्हा तिनं प्रामाणिकपणे आमच्यासमोर कबूल केलं, की 'आता माझा माझ्यावर ताबा नाही राहिला डॉक्टर. मी काय करीन हे सांगू शकत नाही.' तिला खूप अपराधी वाटत होतं. आपल्या प्रेमात धैर्य नव्हतं का? आपण घाबरलेले होतो का? आपलं प्रेम मिथ्या होतं का? असे अनेक प्रश्न तिच्या मनात थैमान घालत होते. आधीसुद्धा तिनं रमेशबरोबर आत्महत्या करायचा विचार केला होता. पण आज 'आपण का जिवंत आहोत' याची तिला घृणा वाटत होती. आपण भ्याड वागलो का? काय चुकलं आपलं? आपण का मागे राहायचं? प्रियाच्या मनःस्थितीचं सखोल विश्लेषण करणं आवश्यक होतं. बहुतेक लोकांसाठी आत्महत्येचा आवेग अल्प कालावधीसाठी असतो. पण प्रियाचं नैराश्य, तिचे आधीचे आत्महत्येचे विचार आणि तिच्या प्रियकराचा आत्महत्येनंच झालेला मृत्यू, हे पाहता तिची स्थिती नाजूक आणि गंभीर होती. आत्महत्येचा धोका तीव्र होता. आम्ही तिला रुग्णालयात दाखल करून घेतलं. नैराश्यावरील उपचार चालू ठेवले. मानसोपचार चालू केले, तिला बोलतं केलं. तिच्या विचारांत दिसणारी तिची अपराधीपणाची भावना, विरह भावना व्यक्त करू दिल्या. त्यासंबंधी तिच्या मनात असलेल्या अविवेकी विचारांवर तिला मात कशी करता येईल हे शिकवलं. तिला हैराण करणारी तिची भावुकता आणि आवेग नियंत्रणात आणण्यास तिला मदत केली.

हळूहळू तिची वैचारिक क्षमता वाढली आणि सारासार विचार करत ती संकटातून बाहेर आली.

◆ pshubhangi@gmail.com

---



## आयुष्याचा अर्थ

# संस्कार हीच मूल्यं

- शालिनी करंदीकर



'आयुष्याचा अर्थ' या शीर्षकाअंतर्गत विचार करू गेलं की तत्त्वज्ञानाच्या अनुषंगानं विषय मांडायचा का? असा प्रश्न प्रथम मनात आहे. जग सुंदर आहे. त्या सुंदरतेत आपण आपल्या आचरणानं भर घालायची की ते विद्रूप करायचं? हा प्रश्न पडतो. मला जाणवलेला आयुष्याचा अर्थ तोच आहे, आचरणातून जगण्यात सुंदरता आणायची. तेच मी आयुष्यातल्या छोट्या छोट्या अनुभवातून अनुभवत आलेय.

प्रत्येकाचं आयुष्य ही त्याची स्वतंत्र कहाणी असते. त्याचा जन्म ज्या घरात झाला, त्याचा भवताल, त्याची परिस्थिती, ज्या ज्या माणसांचे संस्कार त्याच्यावर घडले ती माणसं, या सर्वांवर त्याची घडण अवलंबून असते. त्यावर प्रत्येकाचं आचरण अवलंबून असतं. पण तरीही मला वाटतं, की आयुष्य जगत असताना काही नैतिक मूल्यं प्रत्येकानं पाळायला हवीत. विशेषतः आजच्या काळाच्या संदर्भात हे तीव्रतेनं जाणवतं. काही नैतिक मूल्यं म्हणजे कोणती? कदाचित विस्मरणात गेली असतील तर थोडी उजळणी करू या.

परस्परांशी वागताना, बोलताना समोरचा माणूस, त्याचे विचार याबद्दल आदर हवा. भले किती का न पटेना, पण समोरच्याचीही काही मतं असतात हे समजून घ्यायला हवं. 'अहिंसा सत्यमस्तेय...' हे सारं तर आपण बासनात गुंडाळून ठेवूनच बसलो आहोत. फक्त 'मी', 'माझं' नको, इतरांचाही विचार व्हायला हवा. एका शिक्षिकेचा अनुभव सांगते. शाळेतल्या मुलांबरोबर ती शाळेच्या बसमधून येत होती. कोणीतरी तिला चॉकलेटं दिली होती, ती तिच्या हातात होती. काही वेळानं तिच्या लक्षात आलं, की एक छोटा आपल्याकडे बघतो आहे. तिला वाटलं त्याला चॉकलेट हवं असेल. ती म्हणाली, ''घे तुला चॉकलेट.'' त्यानं काय उत्तर द्यावं? तो म्हणाला, ''नाही, नाही मॅडम... तुम्ही ओके आहात ना? तुम्हाला दिसतंय ना नीट?'' तेव्हा तिच्या लक्षात आलं. आपण रोज चष्मा लावतो, आज लेन्स घातली आहेत, म्हणून तो छोटा जीव काळजीत पडला होता. आज या अशा मुलांवर आम्ही मोठी माणसं कोणते संस्कार करत आहोत? त्यांना जगण्याचा कोणता अर्थ समजावत आहोत?

आज भ्रष्टाचाराला पारावार राहिलेला नाही. माझे आजोबा त्या जुन्या काळात तंत्रशास्त्रातले पदवीधर होते. त्यांच्या मोठ्या भावाकडे तेव्हाच्या काँग्रेसच्या नामांकित पुढाऱ्यांचं येणंजाणं होतं. त्या माझ्या आजोबांची 'व्ही.जे.टी.आय.'मधली नोकरी ब्रिटिश सरकारनं काढून घेतली होती. अशा आजोबांची मी नात अणि शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्यलढ्यातल्या सहभागामुळे तुरुंगवास भोगलेल्या, तुरुंगात रोज चार पायलीचं (१६ किलो) दळण दळणाऱ्या आणि असं असूनही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून कोणताही फायदा न घेता 'ज्यासाठी झगडलो ते झालं, आता मला काय हवंय आणखी' असं म्हणणाऱ्या पित्याची मी मुलगी. आमचे संस्कार कसे वेगळे असतील?

अण्णा (वडील) गेल्यावर, समाजकार्य करत देशभर फिरणारा माझा एक आतेभाऊ आईला भेटायला आला होता. म्हणाला, ''मामी, मी मामाला किती वेळा विचारलं होतं. स्वातंत्र्यसैनिक म्हणून तुम्हाला सरकारी योजनेतून पेन्शन वगैरे मिळू शकेल. मी खटपट करू का? पण मामांनी कधीच हो म्हटलं नाही. आता त्यांचं पेन्शन तुम्हाला मिळेल. मी करू का खटपट?'' यावर आईनं काय उत्तर द्यावं? ती म्हणाली, ''ज्याचं होतं त्यांनी घेतलं नाही. मला काय करायचंय?'' मनात येतं, ही माणसं कशी? आणि आताची तथाकथित बडी मंडळी कशी! काय आदर्श ठेवणार आहोत आम्ही आमच्या मुला-नातवंडांसमोर? हीच बजबजपुरी पाहात जर पुढची पिढी वाढणार असेल, तर त्यांच्या 'आयुष्याचा अर्थ' काय असेल?...

सांगायची गोष्ट अशी, की प्रत्येकाच्या आयुष्याकडून असलेल्या अपेक्षा वेगळ्या. आणि त्या दृष्टिकोनाचा पाया लहानपणापासून आपल्यात सामावत जाणाऱ्या संस्कारांनुसार निश्चित होतो, असं मला वाटतं. आज नोकऱ्या गेलेली, अन्नाला मोताद झालेली माणसं समोर दिसत असताना धनदांडग्यांची कोट्यानुकोटींची करमाफी बिनदिक्कतपणे केली जाते तेव्हा असं वाटतं, इतका भ्रष्टाचार अगदी सहजपणे होतो? मग आपण कोण आणि किती भ्रष्टाचार रोखू शकणार!

महानगरपालिकेत सचोटीनं काम करत असूनसुद्धा लोकांची उणीदुणी ऐकून निराश झालेल्या माझ्या यजमानांना मी म्हणत असे, ''अहो, दारूच्या गुत्त्यावर बसले आहात! दूध प्यायलात, तरी लोक 'दारू प्यायले' असंच म्हणणार. नका लक्ष देऊ. लोक दहा तोंडांनी बोलणार. बोलू दे...'' एक दिवस कहर झाला. मी सकाळची शाळा संपवून घरी आले होते आणि स्वयंपाकघरात काम करत होते. माझी दोन्ही मुलं बाहेरच्या खोलीत खेळत होती. धाकटा चार वर्षांचा, मोठा सात वर्षांचा. बेल वाजली आणि मी बाहेर येऊन दार उघडलं. ''साहेब आहेत?'' दारातल्यानं विचारलं. मी म्हटलं, ''नाही''. तो जरा घुटमळला. ''निरोप आहे का काही? बसा, मी पाणी आणते.'' असं म्हणून मी पाणी आणायला आत गेले. बाहेर येते तर एक नोटांचं बंडल त्यानं धाकट्याच्या हातात थोपवलं होतं. ''काय करताय तुम्ही? घ्या ते परत.'' मी सात्त्विक संतापानं ओरडले. ''असू दे,'' असं म्हणून तो उठला. मी धाकट्याच्या हातातले पैसे काढून घेतले. ''आम्हाला नको आहेत तुमचे पैसे'' असं म्हणून वळले, तर तो जिना उतरत होता. ''घ्या तुमचे पैसे.'' मी पाठमोऱ्या त्याच्या अंगावर पैसे फेकले आणि दार लावलं. इकडे धाकटा रडायला लागला. म्हणाला, ''मला हवे होते पैसे,'' त्याला म्हटलं, ''कशाला हवेत तुला पैसे? खाऊ, खेळणी काय आणायचंय? आपण आणू या हं!'' त्याला मी शांत करत होते आणि मोठा काही न बोलता शांतपणे माझ्याकडे पाहात उभा होता. कदाचित या प्रसंगाने त्याला त्याच्या आयुष्याचा अर्थ सापडला असेल.

असं जरी असलं तरी मी निराशावादी नाही. माझ्यासमोर त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे विचार असतात. वैफल्यग्रस्त काळातही निसर्गदत्त निर्माणशक्ती आणि माणसातलं सौहार्द हे अखंड प्रवाही राहतात!

◆ chaturang@expressindia.com

---

# खंत नसणारं खाचखळग्यांचं आयुष्य

- आर. टी. मण्णूर



सर्वसामान्यपणे या जगात जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला आपण कोण आहोत? हू ॲम आय? आपल्याला काय करायचं आहे? काय अनुभवलं, काय केलं, हे या ना त्या मार्गानं सौम्यपणे ओरडून किंवा डरकाळ्या फोडून सांगायची इच्छा असते. मग त्यासाठी वेगवेगळे मार्ग स्वीकारणं क्रमप्राप्त.

रवींद्रनाथ टागोर यांचं सुप्रसिद्ध वाक्य आहे- 'आपलं आयुष्य हे कधी सरळ रेषेत असू नये. ते अनेक चढ-उतारांचं आणि नागमोडी वळणाचं असलं, तरच परिवर्तन घडतं.' जन्म आणि मृत्यू यामधला प्रवास कसा करायचा, हे प्रत्येकानं ठरवायचं. परंतु मुळातच अशी नैसर्गिक जाण किंवा समज नसेल, तर मात्र ते आयुष्य कंटाळवाणं होतं. ज्यांना अशी निसर्गसुलभ प्रगल्भता असते, त्यांना आयुष्याचा अर्थ लहान वयातच गवसतो. उर्वरित लोक आयुष्यभर गटांगळ्या खात राहतात.

असं म्हणतात, की मनुष्य जसा विचार करतो तसा तो घडतो, त्याचं आयुष्य घडतं. आयुष्याचा अर्थ या विचारातून स्पष्ट होतो. आपण जेव्हा सकाळी उठतो, त्या वेळेस आपल्या मनात जे काही विचार उमटतात त्याप्रमाणे आपला दिवस व्यतीत होतो.

*'जसा तू विचार करीशी*
*तसा तू स्वतःस घडविसी'*

हरवलेल्या वस्तू परत सापडू शकतात, परंतु निसटलेलं आयुष्य पुन्हा जगता येत नाही. म्हणूनच,

*'उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।*
*न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः॥'*

अर्थात कार्य केवळ मनोरथांनी नव्हे, तर ते प्रत्यक्ष केल्यानंच होतं.

ज्या क्षणी आयुष्याचा नेमका अर्थ लागत नाही, तेव्हा आपलं मन घड्याळाच्या लंबकाप्रमाणे इकडून तिकडे म्हणजेच नैराश्य आणि उत्साह यांच्या दरम्यान झोके घेत असतं. आपण वाचलंच असेल, की अमृता प्रीतम यांनी 'रसीदी टिकट' हे आत्मवृत्त लिहिण्यापूर्वी लेखक खुशवंत सिंग यांच्याकडे तो विचार बोलून दाखवला असता खुशवंतजी त्यांना म्हणाले होते, की 'तुझं आयुष्य ते काय? सांगण्यासारखं तुझ्याकडे आहे काय? तुझं आयुष्य रेव्हेन्यू स्टॅम्पच्या पाठीमागेही लिहून होईल.' अशा अर्थाचा विचार आपल्याही मनात येतो. परंतु शून्यातून निर्मिती कशी करायची या विचारानं प्रेरित होऊन विचारचक्र फिरायला लागतं. मग छोट्या छोट्या घटनांतून आपलं व्यक्तिमत्त्व विकसित कसं होऊ लागलं, हे आठवायला लागतं.

अर्नेस्ट हेमिंग्वे यांचं एक सुप्रसिद्ध वाक्य आहे, 'आयुष्याविषयी लिहिण्याआधी तुम्हाला जगणं शिकायला यायला हवं.' मला वाटतं, की वयाच्या ८३ व्या वर्षी हा अधिकार मला प्राप्त झाला आहे. जेव्हा आपण लहान असतो, तेव्हा आपलं जगच वेगळं असतं. आपल्याला येणाऱ्या अनुभवांतून हळूहळू आपण घडत जातो. साधारण दहा-अकरा वर्षांचा असताना आम्ही चिंचवड स्टेशनवरील रेल्वे क्वार्टर्समध्ये राहात होतो. त्या काळी, म्हणजेच पन्नासच्या दशकात तुरळक रेल्वेगाड्या धावायच्या. शाळेच्या व्यतिरिक्त आम्ही मग या रेल्वेगाड्या बघण्यासाठी फलाटावर जात असू. फलाटावर नुकताच एक चहाचा स्टॉल झाला होता. त्या स्टॉलवरील काचेच्या बरणीतली बिस्किटं आणि मिठाई बघून आमच्या तोंडाला पाणी सुटायचं. खिशात पैसे नसायचेच. अशा वेळी आमची अवस्था बघून स्टॉल मालकालाच दया आली असावी. त्यानं आमच्यासमोर एक प्रस्ताव मांडला, की गाडीवर तुम्ही जाऊन हे खाद्यपदार्थ विकल्यास तुम्हाला मी फुकट खायला देईन. आम्हाला तो प्रस्ताव मान्य होऊन आम्ही खाद्यपदार्थ विकण्यास सुरुवात केली. या अनुभवातून आम्ही शिकलो, की जगात कुठलीही गोष्ट फुकट मिळत नाही. या अनुभवाचा पुढील आयुष्यात खूप उपयोग झाला. एका अर्थानं आयुष्याचा 'अर्थ' समजला.

दुसरा अनुभव असा, की त्या वेळी चिंचवड स्टेशनवरून हिरवा मटार, भुईमूग, बोरं वगैरे मुंबईला रवाना होत. हुंडेकरी रात्रीच्या वेळी पोती आणून ठेवत. अंधाराचा फायदा घेत त्या पोत्यांवर बसून आम्ही हळूच एक एक भुईमुगाची शेंग आणि मटार खात असू. याच वेळी साने गुरुजींच्या 'श्यामची आई'चं गारूड मनावर संस्कार करत होतं. त्यामुळे अशा प्रकारे चोरून काही खाल्ल्यास आपल्या आई-वडिलांचं नाव बदनाम होईल, असं वाटून आम्ही ते चोरून खाणं बंद केलं. एवढंच कशाला! बिनादमडी, अंगावरच्या वस्त्रानिशी घराबाहेर चार-आठ दिवस पडून काय अवस्था होते, हेही प्रयोग म्हणून करून अनुभवलं.

मॅट्रिकच्या वर्षाला असताना ऐन परीक्षेच्या आधी आमच्या एका वर्गमित्राच्या वडिलांचा अपघाती मृत्यू झाला. तरीही तो मुलगा बोर्डात दुसरा आला होता. पुढे हाच मुलगा इंजिनीअरिंगच्या प्रथम वर्षात नापास झाला, पण 'आयएएस' व 'आयएफएस' परीक्षेत उत्तमरीत्या उत्तीर्ण झाला. त्याच्या 'राइज टू द ऑकेजन' या 'ॲटिट्यूड'मुळे आम्हीही सगळे नकळत कणखर वृत्तीचे झालो.

एवढं असूनही आयुष्य मात्र खाचखळग्यांनी भरलेलं आहे, पण त्याची खंत वाटत नाही. पोटी कर्णबधिर मुलगा जन्मल्यानं सुरुवातीला खूप निराश होऊन मग त्यावर मात करत त्याला त्याच्या पायावर उभं करण्यात खूप काही करावं लागलं. पुढे सूनही तशीच मिळाल्यामुळे जबाबदारी आणखीनच वाढली. या असामान्य अनुभवामुळे आयुष्याचा अर्थ हळूहळू गहिरा होत गेला. त्यामुळेच की काय, करोना महासाथ आणि वृद्धत्वामुळे जराही असुरक्षित वाटत नाही. शेवटी आयुष्य काय आहे? सकाळी हसतमुखानं उठणं, व्यग्र दिनक्रम ठेवत रात्री अंथरुणात पाठ टेकताच झोप लागली, तर आयुष्याचा अर्थ गवसला असं समजायचं. भविष्यात पश्चात्ताप होऊ नये म्हणून आजच चांगलं कृत्य करावं. नैराश्याच्या गर्तेतून 'बाउन्स बॅक' करत पुन्हा समाधानी आणि यशस्वी आयुष्य उपभोगणं म्हणजेच आयुष्याचा अर्थ समजणं होय. घड्याळाच्या लंबकाप्रमाणे हेलकावे खाण्याचे प्रसंगही खूप आले. पण 'नो रिग्रेट्स'.

एकदा आखाती नोकरीच्या मुलाखतीसाठी चुकून मी वरळीच्या पत्त्यावर गेलो. बघतो, तर ऑफिस बंद होतं. मी मला आलेल्या तारेवरचा मजकूर पुन्हा वाचला तर कळलं की वाळकेश्वरला मुलाखत आहे! उशीर झाला होता. पण तरीही नशीब अजमवावं म्हणून अधिक विलंब न करता टॅक्सीनं वाळकेश्वरला गेलो आणि मुलाखत फत्ते होऊन मी मस्कतला रवाना! 'आगे बढते रहो' हा संदेश मला या अनुभवातून मिळाला. आजमितीस, निवृत्त होऊन बावीस वर्षं झाली. या काळात सुरू केलेली 'सेकंड इनिंग' अजूनही चालू असून 'लॉ ऑफ ॲट्रॅक्शन'चा चांगला अनुभव येतो. समोरून काम मिळत राहतं.

मागे वळून बघताना, डोंगराएवढी संकटं येऊनही आपण ताठपणे उभे राहू शकतो हे बघून समाधान आणि शांतता वाटते. अजून काय हवं असतं! काय नाही मिळवलं, यापेक्षा काय मिळालं, असं मानलं तर आयुष्याचा अर्थ समजतो. जन्म आणि मृत्यू यांना जोडणारा सेतू म्हणजे आयुष्य. हा प्रवास कसा करायचा हे ज्याचं त्यानं ठरवावं.

◆ raghman011@gmail.com



## गेले लिहायचे राहून...

**- मृदुला भाटकर**



> ‘‘ माझं आणि आजीचं नातं भावनिक नव्हतं, तर वैचारिक होतं. वाचलेल्या पुस्तकांमधले प्रश्न विचारणं, चर्चा करणं, यासाठीची माझी ती जागा होती. आजोबा-आजी दोघंही जातपात, मानपान न मानणारे.कर्मयोग हाच जगण्याचा आधार मानणाऱ्या आजीच्या, विमलाबाई बेहेरेंच्या आठवणी, तिचे संस्कार हा माझ्यासाठी तिच्या विचारांची जडीबुटी असलेला ‘आजीचा बटवा’च आहे.’’

# ‘आजीचा बटवा’

एकांकिकांच्या ‘पुरुषोत्तम करंडक स्पर्धे’मध्ये सर्वोत्तम अभिनयाचा ‘केशवराव दाते करंडक’ मला १९७६ मध्ये मिळाला होता. त्याच्या बक्षीस समारंभाच्या वेळी ‘महाराष्ट्रीय कलोपासक’चे त्या वेळचे सर्वेसर्वा राजाभाऊ नातू यांची आई मला भेटायला आली.

‘‘तू मृदुला बेहेरे, म्हणजे नागपूरची का?’’

‘‘हो.’’

‘‘विमलाबाई बेहेऱ्यांची नात?’’

‘‘होय.’’

‘‘तरीच! मग तुला पारितोषिक मिळालं यात नवल ते काय! विमलाबाईंची नात तू. मिळालं नसतं तरच नवल!’’ त्यांच्या मनात असलेल्या आजीच्या कर्तृत्वाच्या खात्रीची मला गंमत वाटली आणि आजीचा मिळालेला वारसा मला जबाबदारीची जाणीवही देऊन गेला. माझी आजी, वडिलांची आई - माहेरची यमुना दत्तो तुळजापूरकर. सासरची विमला नारायण बेहेरे. माहेरचा अत्यंत अभिमान असणारी आणि सासरचा मान तितकाच जपणारी आजी होती. माझ्या संस्कारांचा पहिला पाया आजीचा! एका उन्हाळ्यात आम्ही नातवंडं तिच्या माहेरी- म्हणजे मळवलीला दाजीसाहेबांच्या (तुळजापूरकर) बंगल्यात कोणाच्या तरी लग्नाला गेल्याचं मला आठवतं. सकाळी सकाळी चाळीस ते पन्नास जणांच्या पंगतीला नाश्त्याला फोडणीचा भात आणि तिथल्याच झाडांच्या कैऱ्या किसून केलेला तक्कू (मीठ, तिखट, गूळ घालून) मिळायचा. तो द्रोणात घेऊन खायचा. पत्रावळीवर जेवायचं. द्रोण कसा बांधायचा, पत्रावळी कशा करायच्या, याचं शिक्षण तिथे मिळालं.

माझं आणि आजीचं नातं भावनिक नव्हतं, तर वैचारिक होतं. मी तिच्या कधी गळ्यात पडल्याचं, मांडीवर बसल्याचं आठवत नाही. ना तिनं मला कधी गोंजारून जवळ घेतलं. पण सकाळी साडेचारला उठून, लांबसडक केसांचा आंबाडा घालून विळीवर भाजी चिरताना, निवडताना, स्वयंपाक करताना, ती मनाचे श्लोक, मोरोपंतांच्या आर्या, भगवद्गीता म्हणत असे. ते मी शेजारी बसून ऐकत असे. वाचलेल्या पुस्तकांमधले प्रश्न विचारणं, चर्चा करणं, यासाठीची माझी ती जागा होती. आजी म्हणायची, ‘‘ ‘वादे वादे जायते तत्त्वबोधः’ नसून, ‘वादे वादे लाभते तत्त्वबोधः’ (वाद घालण्यानं तत्त्व हरवतं असं नाही, तर ते मिळतंही) हे लक्षात ठेव.’’ त्यामुळे लहानपणापासून घरात चर्चा, वादविवाद, यावर आपले विचार तपासून पाहण्याची सवय लागली.

आजी मॅट्रिकपर्यंत शिकली होती. ती मुंबईत गिरगावात वाढली. तिच्या मैत्रिणी सुशीलाबाई पै, प्रेमाताई कंटक या शेवटपर्यंत घरी येत. प्रेमाताई या गांधींच्या अनुयायी, शंकरराव देवांबरोबर काम करणाऱ्या. त्या घरी जेव्हा राहायला यायच्या, तेव्हा आम्हा बच्चेकंपनीला शांतता पाळा, नीट वागा, अशा सूचना असायच्या. त्या आल्यावर त्यांच्यासाठी आई खास बदामाचा शिरा बनवत असे. त्यांच्याशी मला हिटलर, मार्क्सवादावरून बडबड करून त्यांना उगाचंच छळायला आवडायचं. तेव्हा मी नववीत होते. सुशीलाबाईंनी आजीला ‘तुझ्या घरी कम्युनिस्ट विचारसरणीचा पगडा नव्या पिढीवर दिसतो त्याची काळजी वाटते,’ असं पेपरकार्ड पत्र लिहून पाठवल्याचं मला आठवतं.

आजोबा ना. के. बेहेरे यांनी ‘सप्तर्षी’ कविता लिहिली. ती इंग्रज सरकारविरुद्ध होती. वसिष्ठ, वाल्मीकी नाही, तर राजगुरू, भगतसिंग, सोलापूरचे हुतात्मे हे खरे सप्तर्षी आहेत, अशी. त्या वेळेस आजोबा नागपूरच्या पटवर्धन शाळेत मुख्याध्यापक होते. इंग्रज सरकारनं त्यांना ‘लेखी माफी मागा, अन्यथा राजीनामा द्या,’ असं कळवलं. पत्र हातात पडता त्यांनी त्याच दिवशी पदाचा राजीनामा दिला. घरी आल्यावर आजीला सांगितलं, तेव्हा आजीनं तो निर्णय योग्यच, असं म्हणून विनातक्रार पुढे आयुष्यभर काटकसरीनं जगण्याचा वसा घेतला. आजीचं एक स्वतःचं अर्थशास्त्र होतं. ती स्त्री शिक्षणाची खंदी पुरस्कर्ती तर होतीच आणि बाई सुसंस्कृत असेल तर ते घर प्रगती करतं हा तिचा विश्वास होता.

परंतु स्त्रियांनी नोकरी करून अर्थार्जन करण्याबाबत तिचा खास विचार होता. ज्या स्त्रियांना विशेष कर्तृत्व दाखवायचं आहे, कला-क्रीडा यांसारख्या विशेष खुबी आहेत, त्यांनी जरूर नोकरी करावी. पण घरात भरपूर वस्तू आणणं, दोन-चार गाड्या आणणं, खूप साड्या-दागिने आणणं इत्यादी छानछोकीसाठी पैसे मिळवण्यास तिचा विरोध होता. ती म्हणे, की बायकांनी घरात काटकसरीनं, निगुतीनं राहून संसार करावा. पैसे वाचवणं म्हणजे अर्थार्जनच! जेव्हा एक बाई बाहेर जाऊन नोकरी करते, तेव्हा ती एका कमावत्या पुरुषाची जागा अडवते. पर्यायानं समाजातल्या एका घराची चूल थांबते. असा थोडा साम्यवादाकडे झुकणारा आणि भोगवादी संस्कृतीशी फटकून वागणारा तिचा विचार होता. कदाचित स्वातंत्र्यपूर्व काळाची ती गरज असू शकते. मी त्यावर तिच्याशी वादही घालत असे, पण मला तिनं एक वेगळा दृष्टिकोनही दिला.

नागपूरचे वि. भि. कोलते यांच्या सुविद्य पत्नी उषा कोलते ही माझी मोठी मावशी होती. ना. के. बेहेरे (आजोबा) आणि आजी यांचे जातधर्म न मानणारे सुधारकी विचार त्यांना माहीत होते. भाऊंनी (वि. भि. कोलते) आजोबांना विचारलं, ‘‘तुमची जातीबद्दल हरकत नसेल, तर प्रताप (माझे वडील) यास माझी सर्वांत धाकटी मेव्हणी प्रमिला तर्खडकर (माझी आई) ही योग्य वाटते.’’ आजी-आजोबा बोलके नाही, तर कर्ते सुधारक होते. आजोबांनी प्रतापला सांगितलं, की तू ठरव. मग नागपूरहून प्रताप आणि नाशिकहून प्रमिला पुण्यात भेटले. प्रमिला ‘बी.ए.’ झाली होती. प्रतापनं तिला ‘मॅट्रिक कधी झालात आणि ‘बी.ए.’ किती साली झाला’ ते विचारलं. तिनं उत्तर दिलं, त्यावरून तिला चारच्या ऐवजी पाच वर्षं लागली, असं प्रतापच्या लक्षात आलं. त्यानं तिला विचारलं, ‘‘पाच वर्षं का बरं लागली?’’ प्रमिला म्हणाली, ‘‘नापास झाले एकदा. म्हणून पाच लागली.’’

झालं. प्रतापच्या वधूपरीक्षेत प्रमिला उत्तीर्ण! कारण ती खरं बोलली. प्रतापचं- अर्थात माझ्या वडिलांचं मत तेव्हाही हेच होतं आणि त्यांची मृदुला नावाची मुलगी रमेश भाटकर याच्या प्रेमात आहे कळल्यावर तिलाही त्यांनी हेच सांगितलं, ‘‘लग्नं दोन गोष्टींवर टिकतात. एक प्रेम आणि दुसरा प्रामाणिकपणा!’’ प्रताप-प्रमिलांनी एकमेकाला लगेच, तिथेच होकार दिला. प्रताप नागपूरला परत आला, तर विमलाबाई बेहेऱ्यांनी (अर्थात आजीनं) सांगितलं, ‘‘मुलगी पसंत असेल, तर मुलीकडच्यांना पत्र लिहून ठरवा लग्न महिन्यानं.’’ त्यांना इतरांनी विचारलं, ‘‘अहो, मुलगी तुम्हाला बघायची नाही का?’’ विमलाबाई म्हणाल्या, ‘‘संसार प्रतापला करायचाय. त्याला पसंत मुलगी आणि प्रमिलेला प्रताप पसंत, तर आम्हांला सर्व मान्य! उगाच कशाला मुलीलाही जाण्यायेण्याचा त्रास.’’ जातपात, देणंघेणं, मानपान यापलीकडे आजी-आजोबा उभे होते. कोणालाही माणूस म्हणूनच खणखणीतपणे मोजणारे! आजोबा गेले, तेव्हा घरी थांबलेल्या माझ्या वडिलांना दुसऱ्या दिवशी ती म्हणाली, ‘‘प्रताप कोर्टात जायचं नाही का?’’ मुलांच्या मुंजी, श्राद्ध हे विधी आजी-आजोबांनी कधीही केले नाहीत. आजीच्या वडिलांच्या- दाजीसाहेबांच्या परखड, बुद्धिवादी विचारांचे संस्कार तिच्यावर होते. स्त्रियांना असमान ठरवणारा, जातीच्या भिंती उभा करणारा ‘मुंज’ हा विधी कालबाह्य आहे, हे ती स्पष्टपणे म्हणत असे. त्यामुळे प्रताप (वडील), श्रीकृष्ण आणि प्रभाकर (काका) यांच्या मुंजी आजी-आजोबांनी केल्या नाहीत. ती सकाळी उठून स्वयंपाक करत मुलांची जेवणं आटपून, ४ मुलांची दुपारची न्याहारी तयार करून, त्यांच्या खाण्याच्या ताटवाट्या मांडून घरातून ११ वाजता बाहेर पडे. खादीची नऊवारी साडी, केसांचा अंबाडा किंवा खोपा, त्यावर सुरंगीचा किंवा दारातल्या बकुळीचा गजरा माळलेला, डोळ्यांवर गॉगल, डोक्यावर नागपूरातलं ऊन लागू नये म्हणून पदर, सायकलवर स्वार अशी आजी तळेगावच्या स्वदेशी काच कारखान्यासाठी १ पैसा फंड गोळा करायला घराघरांत जात असे. गांधींचे विचार पटल्यानं ती देशसेवा म्हणून खादीची लुगडी त्या वेळी वापरे. तितकाच स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दलही तिला आदर होता. त्यामुळे ते जेव्हा स्थानबद्धतेतून रत्नागिरीतून सुटून नागपूरला प्रथमच आले, तेव्हा तिनं घरी पुरणपोळ्या करून शंभर लोकांना मेजवानी दिली.

माझं आणि रमेशचं अडीच वर्षांचं प्रेमप्रकरण तिला माहीत होतं. तेव्हा नंदिनीचं- माझ्या मोठ्या बहिणीचं लग्न ठरायचं होतं. तर तिनं सांगितलं, ‘‘प्रताप, मृदुलाचं आधी लग्न करा. मग नंदिनीचं!’’ तिनं आम्हा चारही नातींना लग्नात स्वतः भरतकाम करून अप्रतिम अशा प्रत्येकी पाच साड्या दिल्या होत्या. माझ्या एका साडीवरच्या पदरावरचे मासे उलटे भरले गेले, म्हणून अर्धांगवायूच्या झटक्यातून थोडीशीच बरी असतानाही सांगलीहून जबलपूरला साडी मागवून ७५ व्या वर्षी भरतकाम दुरुस्त करून ती मला पाठवली. त्यानंतर ती वारली. कर्मयोग तिनं शिकवला तो तिच्या आचारातून. तिला शंभर कोशिंबिरी आणि चटण्या येत असत. दरवर्षी ती स्वतः बारा पूर्ण स्वेटर विणायची आणि सगळ्यांना द्यायची. आजोबांच्या दोन पाटलोणी, चार सदरे, एक कोट ती स्वतः वर्षाला शिवायची. तिला आळस माहीत नव्हता. पूर्वीच्या बायकांप्रमाणे डावं-उजवं करायचाही तिचा स्वभाव होता. म्हणजे घरात मोठी उत्तरा लाडकी, दुसरी रोहिणी दोडकी; भाच्यांमध्ये वीरेंद्र लाडका, विराग दोडका; माझी मोठी बहीण लाडकी, मी दोडकी! पण ती स्वेटर विणायची सर्वांना!

तिनं देवपूजा कधी केलेली मी पाहिली नाही. तिनं आजोबांच्या इच्छेनुसार ते गेल्यावर कोणतेही धार्मिक विधी न करता त्यांना भडाग्नी दिला. आजी ८०-८५ वर्षांपूर्वी नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात स्त्री कैद्यांना शिकवायला, पुस्तकं वाचून दाखवायला जात असे. ती उत्तम कीर्तनकार होती. तिच्याकडे विचार होता आणि तो आचारात आणण्याची स्वतंत्र बुद्धी आणि प्रामाणिक धैर्य होतं. विचारांची स्पष्टता आणि स्वतःला पटेल ते नुसतं बोलणंच नाही, तर करणं, हा वारसा मला माझ्या आजीनं दिला.

हे सगळं जे आजीकडून मिळालं, तोच माझ्या आजींच्या विचारांची जडीबुटी असलेला बटवा! आजीची आठवण साठवण!

---

‘सत्य’ या २ एप्रिल रोजी प्रसिद्ध झालेल्या लेखात अनवधानाने ‘अर्जुनाने द्रोणाचार्यांचा वध केला’ असे लिहिले गेले होते. ते ‘धृष्टद्युम्नाने द्रोणाचार्यांचा वध केला’ असे आहे.

- मृदुला भाटकर

◆ chaturang@expressindia.com

---



## संशोधिका

**- रुचिरा सावंत**



# प्रयोगशाळेतून जनमानसापर्यंत

**‘ॲस्ट्रोसॅट’ या भारताच्या पहिल्या बहुतरंगलांबी असणाऱ्या अवकाश दुर्बिणीच्या निर्मितीमध्ये आपल्या सहकाऱ्यांसह उल्लेखनीय योगदान देणाऱ्या डॉ. विनिता नवलकर. भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र हे त्यांचे आवडते विषय. परंतु विज्ञानातील प्रयोग करण्यासाठी आधुनिक, सुसज्ज प्रयोगशाळा असायलाच हवी असं काही बंधन नाही, प्रयोग कुठेही करता येतात असं मानणाऱ्या आणि विज्ञान प्रसाराला महत्त्व देणाऱ्या डॉ. विनिता यांच्याबद्दल...**

शाळेत आपल्या वेळापत्रकात फारशा गांभीर्यानं घेतल्या न जाणाऱ्या आणि बऱ्याचदा अभ्यासाच्या इतर विषयांमुळे न होणाऱ्या काही तासिका असतात. हे वाचल्याक्षणीच खेळाचा तास, कलेचे वर्ग आठवू लागले असतील ना! पण याबरोबरच आणखी एक तासिका असते- अवांतर वाचनासाठीची ‘ग्रंथालय तासिका’. काही विद्यार्थी या तासाची चातकासारखी वाट पाहात असतात, तर काहींना ही डोकेदुखी वाटते. काही शाळांमध्ये मात्र ही तासिका केवळ वेळापत्रकापुरतीच अस्तित्वात असते. ‘त्या’ मुलीच्या शाळेत मात्र हा तास नियमित व्हायचा. घरी पुस्तकं नेण्याची परवानगी नसली, तरी वाचनाच्या तासाला पाहिजे ती पुस्तकं वाचता यायची. आपण वाचन केव्हा आणि कसं सुरू केलं, याची तिला आठवणसुद्धा नाही. पण तिला आठवतंय तेव्हापासून ती वाचतेय. अगदी आवडीनं. इंग्रजी कादंबऱ्या, कथा यांमध्ये रमणाऱ्या तिला विज्ञानविषयक पुस्तकं, कथा वाचण्याची तशी सवय नव्हती. अशातच साधारण आठवी-नववीमध्ये असताना ‘विश्व’ या विषयावरील पुस्तकांची एक मालिका तिला गवसली आणि त्या मालिकेतील तिसरं-चौथं पुस्तक वाचत असतानाच तिला तिचं कार्यक्षेत्र गवसलं. ‘हो, याच क्षेत्रात काम करायचं आहे मला. भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र.’ तिनं स्वतःशीच ठरवलं आणि एक दिवस ते अर्थशास्त्र आणि कलेची पार्श्वभूमी असणाऱ्या आपल्या कुटुंबात जाहीर केलं. भविष्याविषयक या निर्णयाचा सहज स्वीकार झालेली, पालकांचा पाठिंबा मिळाल्यामुळे अवकाशाला गवसणी घालण्यासाठी पंखांना बळ मिळालेली आणि नंतर भारतासाठी अभिमानास्पद ठरलेल्या संशोधन प्रकल्पामध्ये योगदान देणारी ती तरुणी म्हणजे वैज्ञानिका डॉ. विनिता नवलकर. मुळात जीवशास्त्र आणि भाषा या विषयांची फार ओढ नसल्यामुळे शालेय शिक्षण संपल्यावर इलेक्ट्रॉनिक्स हा विषय निवडल्यावर या विषयांपासून आपल्याला सुटका मिळवता येऊ शकते, हे समजल्यावर इलेक्ट्रॉनिक्स या विषयाची निवड त्यांनी केली. इलेक्ट्रॉनिक्स आणि भौतिकशास्त्र या विषयांचा एकमेकांशी असलेला संबंध पाहता विषयांची ही जोडी त्यांना आवडली. जीवशास्त्र आणि भाषा विषयांपासून पळ काढत असताना भेटलेल्या या नव्या दोस्तांनी अनेक बदल त्यांच्या आयुष्यात आणले. त्यांच्या पुढील भविष्याचा पाया रचला असंच म्हणू या. त्यांची आणि भौतिकशास्त्राची मैत्री आणखी घट्ट होण्यात या विषयानं योगदान दिलं आणि इतर मित्रमैत्रिणींप्रमाणे अभियांत्रिकी विषयांचा अभ्यास न करता आपण भौतिकशास्त्र विषयात पुढील शिक्षण घ्यायचं, हे त्यांनी बारावीमध्ये असतानाच ठरवलं. रुईया महाविद्यालयातून पदवीचं शिक्षण घेत असताना खगोल मंडळाशी त्यांचा संपर्क झाला आणि विहार करण्यासाठी एका नव्या जगाची ओळख झाली. तिथे अवकाशाविषयी, ताऱ्यांविषयी ओढ निर्माण झाली आणि अवकाश दर्शन करता करताच ताऱ्यांचं विश्व उलगडण्याविषयीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झालं. तिथे भेटलेल्या अनेक सुहृदांच्या मदतीनं या क्षेत्रात त्या अधिकाधिक मुक्त विहार करू लागल्या.

भौतिकशास्त्रासह इलेक्ट्रॉनिक्स विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर ‘टाटा मूलभूत संशोधन केंद्रा’मध्ये (टी.आय.एफ.आर.) ‘एक्सरे ॲस्ट्रॉनॉमी’ या विषयात एका संशोधन प्रकल्पावर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. ही संधी त्यांच्यासाठी एका नव्या पर्वाची सुरुवात करणारी होती. खरं तर हा त्यांचा पहिला संशोधन प्रकल्प नव्हता. यापूर्वी पदवी शिक्षणादरम्यान अनेक लहान लहान संशोधन प्रकल्पांवर त्यांनी काम केलं होतं. नागरिकांसाठीचं विज्ञान (सायन्स आउटरीच) या विषयाबरोबरच काही प्राचीन ग्रंथांमधील खगोलीय घटनांचा अभ्यास करणं, असे काही प्रकल्प त्यांनी केले होते. मात्र २०११ ते २०१७ या ‘टी.आय.एफ.आर.’मधील



वास्तव्यादरम्यानच्या काळात त्यांना भारतीय अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली. तो प्रकल्प होता- ‘ॲस्ट्रोसॅट’. ‘ॲस्ट्रोसॅट’ या भारताच्या पहिल्या बहुतरंगलांबी असणाऱ्या अवकाश दुर्बिणीच्या निर्मितीमध्ये त्यांच्या समूहानं उल्लेखनीय योगदान दिलं आहे. विश्वाचा आणखी गांभीर्यानं अभ्यास करता यावा, यासाठी या वैज्ञानिक उपग्रहाचं प्रक्षेपण करण्यात आलं. त्याचं यश पाहता आता ‘ॲस्ट्रोसॅट-२’साठीची तयारीसुद्धा सुरू झाली आहे. तर आता आपण ॲस्ट्रोसॅटकडे पुन्हा येऊ या. ॲस्ट्रोसॅटबरोबर पाठवण्यात आलेल्या ५ पे लोड्सपैकी ३ पे लोड्सवरील काम ‘टी.आय.एफ.आर.’मध्ये विविध प्रयोगशाळेत सुरू होतं. त्यापैकी ‘सॉफ्ट एक्स रे टेलिस्कोप’च्या निर्मितीमध्ये विनिता यांच्या संघाचं मोलाचं कार्य आहे. ते जाणून घ्यायलाच हवं.

प्रोफेसर के. पी. सिंह यांच्या नेतृत्वाखाली संशोधन होत असणारा हा विषय विनिता यांच्यासाठी तसा नवा होता. पण विषयात निर्माण झालेल्या कुतूहलामुळे खूप वाचन आणि अभ्यासांती त्यांनी ही फेलोशिप मिळवली. आपण शाळेत असताना प्रकाशाच्या परिवर्तनाचा अभ्यास केला आहेच. आपल्या नुसत्या डोळ्यांनी दिसणारी किरणं (व्हिजिबल रेज्) परावर्तित होत असताना चमकदार पृष्ठभागावरून काटकोनात परावर्तित होतात हे आपण जाणतोच. त्यास नियमित परावर्तन असंही म्हणतात. तर ‘एक्स-रे’ हे ऊर्जाप्रभारी किरण असतात. प्रचंड ऊर्जेसह जेव्हा ही किरणं एखाद्या पृष्ठभागावर आदळतात, तेव्हा पृष्ठभागात ती शोषली जातात. अशा वेळी त्यांच्या परावर्तनाचा कोन खूप कमी करून ही किरणं एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जात असताना पृष्ठभागावर शोषली न जाता पूर्णतः परावर्तित केली जातात. त्यास वैज्ञानिक भाषेत पूर्ण आंतरिक परावर्तन असं म्हणतात. भारतातल्या या पहिल्या ‘सॉफ्ट एक्स रे टेलिस्कोप’मध्ये एकूण ३२० आरसे होते. या अवकाश दुर्बिणीमध्ये सोन्याचा एक थर वापरला असून कमी ऊर्जा असणाऱ्या एक्स रे किरणांसाठी त्याचा वापर केला गेला. विनिता आणि त्यांच्या टीमनं या ३२० आरशांचं कॅलिब्रेशन केलं. म्हणजे एकाच ठरावीक बिंदूवर हे सगळे ३२० आरसे एक्स रे केंद्रित करण्याचं काम त्यांनी केलं. हे काम अजिबात सोपं नव्हतं. त्यासाठी त्यांना तब्बल दोन वर्षं लागली.

या दुर्बिणीनंतर विनिता यांनी आपला मोर्चा ‘हार्ड एक्स रे टेलिस्कोप’कडे वळवला. त्यामध्येसुद्धा आरशांच्या निर्मितीवर त्यांनी काम केलं. सोन्याचा एक थर देण्याऐवजी आरशांची परावर्तन क्षमता वाढवण्यासाठी काय करता येईल हे जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ‘हार्ड एक्स रे टेलिस्कोप’ म्हणजे जास्त ऊर्जा असणाऱ्या एक्स रे किरणांसाठी वापरला जाणारा टेलिस्कोप. वैश्विक एक्स रे स्रोतांविषयी अधिक जाणून घेण्यासाठी या प्रकारच्या टेलिस्कोपमध्ये शुद्ध टंगस्टन आणि सिलिकॉनचे थर वापरून आरसे बनवले जातात. फक्त सोन्याच्या एका थरामुळे १० $keV$ पेक्षा जास्त ऊर्जा असलेले एक्स रे परावर्तित होऊ शकत नाहीत. त्यासाठी एकापेक्षा जास्त थर असणं गरजेचं आहे. एकापेक्षा जास्त थर द्यायचे, तर दोन थरांमध्ये एक अपारदर्शक पदार्थ असणं गरजेचं असतं. यासाठी शुद्ध टंगस्टन आणि सिलिकॉनची निवड करण्यात आली. टंगस्टन हा परावर्तित गुणधर्म असणारा पदार्थ, तर सिलिकॉन हा अपारदर्शक पदार्थ. या प्रयत्नांची परिणती म्हणून एकूण ८० द्विस्तरीय थर देण्यात त्यांना यश आलं. त्यासाठीचं कॅलिब्रेशन शोधण्यात त्यांची जवळपास २ वर्षं गेली. या अशा प्रकारच्या अवकाश दुर्बिणीवर काम करणारी ही भारतातली पहिली टीम आहे. डॉ. विनिता आणि त्यांच्या टीमनं संशोधन करून मांडलेल्या या पद्धतीला अनुसरून अवकाश दुर्बिणीची निर्मिती अजून झालेली नसली, तरी या संदर्भातला शोधनिबंध प्रकाशित झाला आहे. पुढे ही संपूर्ण प्रयोगशाळा ‘टी.आय.एफ.आर.’मधून अहमदाबाद येथील ‘फिजिकल रीसर्च लॅबोरेटरी’ (पी.आर.एल.) येथे हलवण्यात आली. काही काळ या प्रकल्पावर तिथून काम केल्यानंतर काही वैयक्तिक कारणांमुळे विनिता यांना मुंबईस परतावं लागलं. आणि इथून एका नव्या, वेगळ्या प्रवासाची सुरुवात झाली.

मुंबईत परतल्यावर विनिता यांनी अध्ययन क्षेत्राचा रस्ता निवडला. मुंबई विद्यापीठाच्या ‘सेंटर फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस’मध्ये खगोलशास्त्र विषयाची संपूर्ण प्रयोगशाळा उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला. जवळपास १२ नवे प्रयोग त्यांनी तिथे विकसित केले. हे सगळं ‘ऑप्टिकल ॲस्ट्रॉनॉमी’संदर्भात होतं. यादरम्यान या प्रयोगशाळेत प्रयोग विकसित करण्यासारख्या विषयांवर त्यांनी शोधप्रबंध लिहिले. याच काळात त्या प्रयोगशाळेमध्ये त्यांनी एक कमी खर्चीक स्पेक्ट्रोमीटर विकसित केला. आपल्या नेहमीच्या वापरातल्या साधारण अवकाशदुर्बिणीला स्पेक्ट्रोमीटर जोडून त्याचा वापर करण्याविषयीचं संशोधन त्यांनी केलं. याविषयी त्यांनी लिहिलेला शोधप्रबंध त्यांनी प्रस्तुत केला असून तो प्रकाशित होण्याच्या वाटेवर आहे.

या काळातल्या अनुभवांदरम्यान त्यांना आणखी एक महत्त्वाची गोष्ट जाणवली. वर उल्लेख केलेल्या स्पेक्ट्रोमीटर संदर्भातला शोधप्रबंध किंवा ‘सेंटल फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस’मधील त्यांच्या अनुभवामुळे संशोधन, शोध आणि प्रयोग हे केवळ महागड्या प्रयोगशाळेत, जगापासून अलिप्त राहून, दडवूनच होत नसतं, तर ते सामान्य जीवन जगत असताना, समाजाचा भाग होऊन, समाजात राहूनही करता येतं, हे त्यांच्या लक्षात आलं होतं. सगळेच प्रयोग करण्यासाठी आधुनिक, सुसज्ज प्रयोगशाळा असायलाच हवी हे बंधन नाही. प्रयोग कुठेही करता येतात. त्यातूनच प्रयोगशाळेतल्या गुप्त संशोधनासमोर दैनंदिन जीवनातल्या विज्ञानाचा पुरस्कार आणि विज्ञान प्रसार याला त्यांनी जास्त महत्त्व दिलं. सध्या त्या ‘जर्नल ऑफ व्हिज्युअलाइज्ड एक्सपेरिमेंट’ या अमेरिकास्थित संशोधन जर्नलमध्ये भौतिकशास्त्र विषयासाठी वरिष्ठ विज्ञान लेखक म्हणून काम पाहतात. भौतिकशास्त्रातील विविध संकल्पना सोप्या करून समजावून सांगण्यासाठी लेखन आणि प्रयोगनिर्मिती त्या करतात. याव्यतिरिक्त झुनझुनवाला महाविद्यालयात त्या ‘व्हिजिटिंग फॅकल्टी’ म्हणून वर्ग घेतात.

ॲस्ट्रोसॅटसाठी विद्यार्थिदशेत असल्यापासूनच सलग तीन संशोधन प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळालेल्या डॉ. विनिता यांनी सात शोधनिबंध प्रकाशित केले असून एक शोधप्रबंध प्रकाशनाच्या वाटेवर आहे. ‘टाटा मूलभूत संशोधन संस्थे’त मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली काम केलेल्या त्यांच्या संघाचं संशोधनकार्य उलगडून सांगणारा ‘इंडियन स्पेस ड्रीम’ हा माहितीपट ‘बीबीसी’नं बनवला होता. २०१२ मध्ये तुर्कस्तानमधील इस्तंबूल येथे झालेल्या तिसऱ्या ‘अझारक्वेल स्कूल ऑफ ॲस्ट्रॉनॉमी’मध्ये भारताचं प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना मिळाली. याव्यतिरिक्त इतर अनेक पुरस्कार त्यांनी मिळवले आहेत.

विज्ञान आणि संशोधनाचं आपल्या आयुष्यातलं स्थान अधोरेखित करताना आपण या क्षेत्राकडून काय शिकलो, हे त्या भरभरून सांगतात. त्यांच्या मते विज्ञान आणि संशोधन ही क्षेत्रं आपल्याला संयम शिकवतात. एखादी गोष्ट करत असताना पूर्ण तयारीनं, कशासाठीही कुणावरही विसंबून न राहता काम करण्याचं धाडस देतात. विषय कोणताही असो, त्याच्या खोलात जाऊन अभ्यास करण्याची स्फूर्ती देतात. या सगळ्याबरोबरच अनोळखी माणसांशी सहज गप्पा करण्याचा विश्वास देतात. आपल्या परिघाबाहेरील जगात विहार करण्यासाठीचं स्वातंत्र्य आणि हिंमत देतात. संशोधनानं त्यांना दिलेली आणखी एक भेट म्हणजे जगाच्या कानाकोपऱ्यात, प्रत्येक देशात असणारे मित्र. जगात अस्तित्वात असणारे वेगवेगळे विचार, मतप्रवाह आणि याचा स्वीकार करण्याची वृत्ती.

हे क्षेत्र माणूस म्हणून विज्ञानाविषयीच्या ज्ञानापलीकडे व्यक्तिमत्त्वाला आकार देतं. डॉ. विनिता यांनी हा अनुभव घेतला. विज्ञानाच्या जोडीनं कलेचं महत्त्वही त्यांनी जाणलं आणि त्यामुळे दिवसाला थोडा वेळ का होईना, पण त्या कलेच्या सान्निध्यात घालवतात. कला माणसाला केवळ आनंद देत नाही, तर विचारांना मुक्त करते, प्रवाही करते, असा त्यांना विश्वास आहे. संशोधनाकडे कलेच्या नजरेतून पाहणाऱ्या, त्या दोहोंमध्ये साम्य सापडलेल्या आणि पुस्तकं व प्रयोगशाळेपलीकडच्या प्रयोगांना प्रोत्साहन देणाऱ्या, जनमानसात ते रुजवू पाहणाऱ्या, तरुण वयात बरंच संशोधन कार्य केलेल्या आणि आता प्रयोगशाळेबाहेरील एक वेगळी वाट धुंडाळू पाहणाऱ्या डॉ. विनिता ‘संशोधन’ या शब्दाची आपल्याला नव्यानं ओळख करून देताहेत.

हे सारेच संशोधक माझ्यासहित तुमच्यासमोर विज्ञानाचा इतक्या वेगवेगळ्या पद्धतीनं करत असलेला उलगडा समृद्ध करणारा आहे.

◆ postcardsfromruchira@gmail.com

---

## पडसाद

### तसलिमा नासरिन विचारसेनानीच!

मंगला आठलेकर यांचा तसलिमा नासरिन यांच्या पुस्तकावरील लेख (१६ एप्रिल) वाचला. हा लेख वाचकांसमोर आणल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. तसलिमा या एकविसाव्या शतकातील एक विचारसेनानी आहेत यात शंका नाही. समाजातील समस्त स्त्रियांच्या फायद्यासाठी त्या दडपशाहीबद्दल बोलल्या. पुस्तक वाचल्याने आपण राहात असलेल्या समाजाच्या कुरूप चेहऱ्याबद्दल जागरूकता वाढेल यात शंका नाही. मला अधिक त्रास होतो तो म्हणजे ४५ टक्के स्त्रिया/मुली असलेल्या जगात सुरक्षिततेच्या कारणास्तव तसलिमाजी पिंजऱ्यात जीवन जगत आहेत. त्या अधिक सामान्य जीवन का जगू शकत नाहीत? त्या एकट्या नाहीत आणि त्या आपल्या कुटुंबाचा भाग आहेत हे त्यांना कळवण्यासाठी या समाजातील स्त्रिया काय करतात? तसलिमांचे सामाजिक जीवन घडवण्याचा एक मुद्दा बनवू शकतात का? माझ्याकडेही उत्तरे तयार नाहीत, पण भविष्यात आणखी अनेक धाडसी तसलिमा उदयास याव्यात यासाठी या धर्तीवर विचार करायला हवा.

**– ललित अंबळकार**

### ‘कामजीवनाला जीवनशैलीचे ग्रहण’ भावला

९ एप्रिल रोजी प्रसिद्ध झालेला ‘कामजीवनाला जीवनशैलीचे ग्रहण’ हा निरंजन मेढेकर यांचा लेख वाचला. लेख वाचायला सुरू केला तो संपल्यावरच थांबले. एकेक ओळ वाचनीय असून आज प्रत्येकाच्या मर्मावर बोट ठेवणारी आहे. मी माझ्या मैत्रिणींना लेख शेअर केला आणि त्यांनी आपल्या पतीलाही पाठवावा असं सांगितलंय. धन्यवाद खूप छान लिहिल्याबद्दल!

**– स्वाती भाटिया**

### आजच्या जीवनाचं वास्तव

‘कामजीवनाला जीवनशैलीचे ग्रहण’ हा लेख प्रत्येकालाच विचार करण्यास लावणारा आहे. निव्वळ कामजीवन हा लेखाचा विषय न होता आजच्या जीवनाचं वास्तव यात निरंजन मेढेकर यांनी मांडलंय. निसर्गानं मानवाला प्राण्यापासून वेगळं तर केलं, पण आदिम प्रेरणा मात्र कायम ठेवून गेला. त्यामुळे कामप्रेरणा व विवेक याचे मानसिक संतुलन सांभाळणे तारेवरची कसरत होऊन गेली. आपण वाचकांस अंतर्मुख केलेत.

**– रंजन र. इं. जोशी, ठाणे**

### मृदुला भाटकर यांची शैली आवडली

‘गेले लिहायचे राहून’ हे सदर मी नियमित वाचते. वकील म्हणून आणि न्यायाधीश म्हणून मृदुला भाटकर यांचा अनुभव दांडगा असणार आणि सांगण्यासारखे (व काही वेळा न सांगता येण्यासारखे) बरेच काही असणार हे नक्कीच. अनुभवांव्यतिरिक्त मला त्यांची लिखाणाची शैली आवडली आणि प्रत्येक लेखाला एक आकृतिबंध असतो हे विशेषतः सांगायला हवे.

**– संजीवनी चाफेकर**



सोयरे सहचर

“प्राण्यांमध्येच वाढलेल्या माझ्याकडे आज ५ बोके, ३ मांजरी आहेत. मांजरींची ‘डिलिव्हरी’ करण्यापासून त्या पिल्लांना वळण लावणं, त्यांचं उत्तम संगोपन करणं, यात मला अवर्णनीय आनंद मिळतो. मला अनेकांनी विचारलं, एवढी पिल्लं तू कशी सांभाळणार? देऊन का टाकत नाही? पण ज्या पिल्लांची नाळदेखील मी कापली, ज्यांना जन्माला आल्यावर फक्त माझाच स्पर्श झाला, त्या माझ्या पिल्लांना मी कसं देऊन टाकू? माझ्या आयुष्यातल्या काही नाजूक प्रसंगांमध्ये माझ्या बाळांनी मला खूप साथ दिली आहे. त्यांच्यात अफाट ‘हीलिंग पॉवर’ आहे. या बाळांचं आमच्या घरात, माझ्या आयुष्यात येणं हा माझ्या आयुष्यातला सगळ्यात सुंदर अनुभव आहे. जो मी रोजच्या रोज अनुभवते आहे.”
सांगत आहेत प्रसिद्ध अभिनेत्री जुई गडकरी…

# माझी बाळं!









असं म्हणतात, की मूल झाल्याशिवाय मातृत्व येत नाही. पण मला वाटतं, मातृत्व अनुभवण्यासाठी बाळाला जन्मच द्यायला हवा असंही काही नाही! २०१५ मध्ये जेव्हा मी नवीन घर घेतलं, तेव्हा एक गोष्ट पक्की होती, ती म्हणजे माझ्या घरात माऊची म्हणजे ‘माझी’ बाळं असायलाच हवीत! कारण घरात प्राणी असतील तरच मी सुखात राहू शकते. ही आणि इतकीच किमान गरज आहे माझी.

मी मुळातली कर्जतची. आमचं कर्जतचं घर म्हणजे पांजरपोळच! कोणीही रस्त्यावर सोडलेलं, कुणाला सापडलेलं आजारी, लुळंपांगळं कुत्रं, मांजर दारात आणून सोडावं आणि आम्ही लगेच त्यांचा कैवार पत्करावा. असं कधीच झालं नाही की आमच्या घरात कुठला प्राणी नाही. कुत्री, मांजरं, ससे, उंदीर, कोंबड्या, पोपट, मासे, खारुताई, गोगलगाय असे अनेक प्राणी-पक्षी आमच्या घरी पाळलेले होते. पण या सगळ्यांत मांजरं ही अजब रसायन असलेली ‘इरसाल कार्टी’ आजही आमच्या कुटुंबाचा अविभाज्य घटक आहेत!

‘तुला प्राणी एवढे का आवडतात?’ असं कुणी विचारलं, तर मला माझे बालपणीचे दिवस आठवतात. मला आठवतंय तेव्हापासून मला घरात मांजरं, कुत्री, ससे, पोपट, उंदीर, गाई, मासे, कासवं आणि अगदी गोगलगाईंचीही सवय होती. म्हणूनच मी रस्त्यावर एखादं माऊचं, भुभुचं पिल्लू दिसलं, की त्याला सरळ घरी उचलून आणायचे. त्याला स्वच्छ आंघोळ घालायचे, खाऊ घालायचे, मग परत सोडायचे. माणसांपेक्षा मला प्राणीच जास्त आवडू लागले. त्यात मी एकुलती एक. मग मांजरांभोवतीच माझं जग फिरू लागलं. शाळेला सुट्टी असली, की पिल्लांना आंघोळ घालणं, त्यांना ‘ग्रुम’ करणं, असं सुरू असे.

यात माझा छान वेळ जायचा. नुसतीच प्राण्यांची आवड असून चालत नाही, तर त्यांचा अभ्यास पण असायला हवा, म्हणून मी प्राण्यांबद्दल मिळेल ते साहित्य वाचायचे. त्यांचं संगोपन, औषधं, त्यांच्या प्रसूतीची माहिती हे सगळं वाचण्यानं माझ्या ज्ञानातही भर पडत होती. मी आठवीत होते, तेव्हा पहिल्यांदा मी आमच्या टिमूची (मांजर) रात्रभर जागून डिलिव्हरी केली. तिच्या एक प्रकारच्या आजारामुळे तिची सगळी पिल्लं पोटातच गेली आणि नंतर जन्माला आली. माझ्या त्या वयात ही गोष्ट माझ्या मनाला खूपच लागली. मी ‘व्हेटर्नरी सर्जन’ व्हायचं ठरवलं होतं, पण दहावीच्या मार्कांनी गोंधळ केला आणि डॉक्टर व्हायचं स्वप्नं अपूर्ण राहून गेलं! मात्र माझ्या मनातून सतत ओढ प्राण्यांचीच. टिमूच्या दुसऱ्या प्रसूतीनंतर काही दिवसांतच ती आम्हाला सोडून गेली. माझ्या हातून पाण्याचा शेवटचा घोट घेतला आणि माझ्याकडे एकटक बघतच तिनं प्राण सोडला. घरातल्या इतर मांजरींना हे समजलं आणि मग दुखवटाच सुरू झाला. मला ताप भरला. मी जवळजवळ नैराश्यातच गेले होते. पण काही दिवसातच आमच्या शुभीताईला पिल्लं झाली आणि त्यांच्या संगोपनात मी रमले.

मी दहावी झाले तेव्हा माझ्या घरात १२ गावठी म्हणजे ‘इंडी’ मांजरी होत्या. आमचं गडकरी कुटुंबच प्राणीवेडं. आमचे सारे नातेवाईक एकाच इमारतीत राहतात. सर्व काका काकू, चुलत भावंडं सारे एकाच ठिकाणी. त्यामुळे आमचे बोके खालच्या माळ्यावरच्या काकूकडे गरम पोळीचा नाश्ता करायचे, तर कधी मोठ्या काकूकडे चक्क चहा प्यायचे! तुम्हाला नवल वाटेल, पण आमची माऊ टीव्हीचं बटण डावलीनं (पंजानं) चालू करायची आणि सगळी पिल्लं टीव्ही बघायची! टीव्ही का चालू ठेवला, यावरून आमच्याकडे घरकामाला येणाऱ्या मावशींनी बऱ्याचदा ओरडा खाल्ला होता, पण जेव्हा आमच्यासमोर हे घडलं तेव्हा खरे गुन्हेगार पकडले गेले. फ्रीजवर असलेली आमची कित्येक घड्याळं, रेडिओ आमच्या मांजरांनी खाली ढकलून फोडले आहेत. पण त्यांना कधीच बाबांचा ओरडा मिळाला नाही. हेच जर मी केलं असतं तर…! पण रोज त्यांचे नवीन नखरे आम्ही कौतुकानं बघायचो. कर्जतला असताना १२ मांजरं होती घरात. तेव्हा त्यांचं सगळं खाणं-पिणं, त्यांना साफ करणं, प्रसूती सारं मीच करायचे. मला त्यात अवर्णनीय आनंद मिळायचा. गावठी मांजर तसं हुशार आणि थोडं ‘चॅप्टर’ही असतं. त्याचं फार काही करावं लागत नाही. २०१५ मध्ये मी पर्शियन मांजरींची जोडी घरी आणली. तेव्हा मांजर हा प्रकार मला नव्यानं कळला. अत्यंत शांत, तोंडातून ‘ब्र’ही न काढणारी, खूपच स्वच्छ, मासळीचा वास आला तरी नाक मुरडणारी आणि भयंकर शिस्तप्रिय अशी ती दोन पिल्लं होती. वर्षभरानं आमच्या घरी २ गोड, गुटगुटीत पिल्लांचा जन्म झाला. रात्रभर आमच्या चिंगूशेजारी बसून एक-एक पिल्लू झालं, की त्यांची नाळ कापण्यापासून सगळं मी घरात केलं. त्यांची नावं बंडू-बच्चू ठेवली. आणि महिन्याभरात त्यांचा बाबा किडनी आणि लिव्हर फेल्युअरनं गेला. पण पिल्लं होती म्हणून आम्ही सावरलो.

आज आमचा परिवार ८ मांजरींचा आहे. ५ बोके, ३ मांजरी. ५ पर्शियन, ३ हिमालयीन. आताच्या डिसेंबरमध्ये झालेल्या पिल्लांनी आमचं जीवन खूप सुखकर केलंय. मला अनेकांनी विचारलं, एवढी पिल्लं तू कशी सांभाळणार? देऊन का टाकत नाही? पण ज्या पिल्लांची नाळदेखील मी कापली, ज्यांना जन्माला आल्यावर फक्त माझाच स्पर्श झाला, त्या माझ्या पिल्लांना मी कसं देऊन टाकू? या बाळांचं आमच्या घरात येणं हा अनुभव माझ्या आयुष्यातला सगळ्यात सुंदर अनुभव होता.

एक अनुभव सांगते, आमच्या छकुलीकडे ‘गुड न्यूज’ आहे, हे कळल्यापासून मी तिचा आहार, औषधं, सगळं अगदी नीट सांभाळायचे. तिचं हे दुसरं बाळंतपण होतं. तिला आधी दोन पिल्लं झाली, पण तेव्हा मी घरात नव्हते. ही जात गावठी मांजरासारखी हुशार नसते. यांचं सगळं आपल्यालाच करावं लागतं. त्यामुळे तिनं पिल्लं जन्माला घातली, पण ती गुदमरून मेली. मी घरी आले तेव्हा घरात दोन जीव निपचित पडलेले होते आणि छकुली बाजूला बसून होती. तेव्हापासून मी तिला सतत सांगायचे, “छकुल्या, बाळं येणार असतील तेव्हा मला उठव हं…’ मी तिच्यासोबत हॉलमध्ये झोपू लागले. आणि एका पहाटे पावणेचार वाजता छकुलीनं मला चक्क हाताला चावून उठवलं. मला लगेच कळलं, की आता वेळ झालीय. मी चटकन उठून टब, टॉवेल, पाणी वगैरे घेतलं आणि एका मागोमाग एक अशी चार सुंदर पिल्लं छकुलीला झाली. सोमवारचा दिवस होता तो. मी शंकराची भक्त! मग काय, या बाळांची नावं त्यावरूनच ठेवली. शिवा, बिल्व (बिल्लू), शुभ्रा (शुभी), सोमनाथ (सोमू) अशी त्यांची नावं ठेवली. आमचा परिवार वाढला होता. घरात ८ मांजरं आणि माणूस एकच! त्यामुळे खरंतर मीच त्यांच्या घरात राहात होते!

माझी बाळं हळूहळू मोठी होत होती. ‘व्यक्ती तितक्या प्रकृती’ तसेच या आठ मांजरांचे आठ स्वभाव. त्यांच्या आवडीनिवडी वेगळ्या. आमची छकुली आणि बंड्या कोणीही कितीही त्रास दिला तरी सगळं सहन करणारे, तर चिंगू, बच्चू एकदम चिडखोर, मारकुटे! मनासारखं झालं नाही, की जे कोणी समोर येईल त्याला बोचकारून काढलंच म्हणून समजा! अशा भांडणाच्या वेळी मग मला मध्ये पडावं लागतं. त्यांची समजूत काढावी लगते, कधी ओरडावं लागतं. नाहीच ऐकलं तर त्यांच्याशी न बोलण्याची शिक्षा करावी लागते. मी त्यांच्याशी न बोलण्याची शिक्षा दिली, की मग ते मात्र सारे माझ्या अवतीभवती जमून मला लाडीगोडी करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येकाच्या आवडीनिवडी, सवयी, त्यांच्या शी-शू/ भुकेच्या वेळा, या सगळ्याशी मीही ‘सिंक इन’ होत होते. तोच एक दिवस अचानक टाळेबंदीची बातमी आली. मी एकटीच होते बाळांबरोबर. आई-बाबा कर्जतला. मला धडकीच भरली बातमी ऐकून. जणू ‘हम हैं राही प्यार के’ मधल्या मुलांच्या घरात मी एकटीच अडकले होते! एवढा धुडगूस घालायची ही गँग की मला नाकीनऊ यायचे. पण माझ्या बाळांचं संगोपन करण्यात आजूबाजूला असलेल्या करोना आणि टाळेबंदीचं नैराश्य चटकन निघून जायचं. सकाळ झाली, की त्या टाळेबंदीच्या भयाण शांततेत माझ्या घराच्या बाल्कनीत पोपटांचा गोतावळा जोरजोरात, कधी कर्कश ओरडून माझ्या पिल्लांना चिडवत असे. पिल्लं बाल्कनीत गेली, की पोपट, चिमण्या, कावळे, कबुतरं, सगळे जमून त्यांना खूप त्रास द्यायचे. कधी कधी ग्रिलमधून चोचही मारायचे. मग ही आमची माकडंही वेगवेगळे आवाज काढून त्यांना चिथवायची! नंतर नंतर मात्र त्यांची ही दुश्मनी दोस्तीत बदलली. पिल्लं दिसली नाहीत, की पोपट बेडरूमच्या खिडकीत येऊन गोंधळ घालतात आणि त्यांना बघितलं की त्यांचे गोड संवाद सुरु होतात. हो! कर्कश आवाजातली चिडवाचिडवी आता गोड संवादात बदललीय! टाळेबंदीत रोज बाळांचं सगळं करून स्वतःचं जेवण, आवराआवर करण्यात ६ महिने सहज निघून गेले. जेव्हा प्रवासाचे नियम शिथिल झाले, तेव्हा आई ठाण्याच्या घरी आली आणि बाळांना मोठं झालेलं बघून थोडी हिरमुसलीच. कारण तिनं त्यांना मोठं होताना बघणं ‘मिस’ केलं होतं.

मला बऱ्याचदा असा प्रश्न विचारला जातो, की ‘तू शूटला जातेस तेव्हा किंवा कार्यक्रमासाठी जातेस तेव्हा मांजरींना कुठे ठेवतेस?’ तेव्हा आई-बाबा असतातच बाळांना बघायला. पण जेव्हा मी कर्जतला जाते, तेव्हा माझं हे चार पायांचं कुटुंब मोठ्या टोपलीवजा पिंजऱ्यातून माझ्या गाडीतच माझ्याबरोबर प्रवास करतं. आता त्यांनाही छान सवय झालीय प्रवासाची. कर्जतला गेलं, की आजी-आजोबांकडे छान रमतात माझी बाळं! माझ्या बाबांनी माझे एवढे लाड केले नसतील, पण पिल्लांचा सतत विचार! त्यांना काय हवं-नको, त्यांची तब्येत, त्यांचा खाऊ, या सगळ्यात बाबांचा दिवस छान जातो. आता पिल्लंही कर्जतला जाताना खूश असतात.

प्राण्यांचं आयुष्य किती सोपं असतं! त्यांच्या मनात हेवेदावे नसतात. त्यांना फक्त प्रेम करता येतं. कधी कामावरून यायला उशीर झाला, तर ते रुसत नाहीत. आपण कितीही त्रासून घरी आलो तरी आपल्याला सगळा ताण विसरायला लावतात. माझ्या आयुष्यातल्या काही नाजूक प्रसंगांमध्ये माझ्या बाळांनी मला खूप साथ दिली आहे. त्यांच्यात अफाट ‘हीलिंग पॉवर’ आहे. आमच्याकडे सगळ्या पिल्लांचे वाढदिवस केले जातात. त्यांना औक्षण करतो, मी खास केक बनवते. लाल कुंकवाचा टिळा लावल्यावर खूपच लोभसवाणी दिसतात बाळं. सणावाराला आवर्जून या बाळांना मी देवाजवळ नेऊन पाया पडते. त्यांना आता सवय झाली आहे. गणपती विसर्जनासाठी जायला निघाले, की एक एक करून येऊन बसतात मखराजवळ. मग मी त्यांचं डोकं टेकवते देवाच्या पायाशी. त्यांना मी फक्त मांजरं किवा प्राणी समजूच शकत नाही. मी सतत ‘कुटुंब’, ‘कुटुंबातली’ म्हणते, कारण माझा भाई काका, दादा काका, आमची उषा आई- म्हणजेच मोठी काकी असे सगळेच त्यांच्यावर खूप प्रेम करतात! माझं हे आणि एवढंच कुटुंब नाही, तर मी जिथे जाईन तिथले प्राणी माझ्या कुटुंबाचे सदस्य बनतात. सेटवरचे कुत्रे, मांजरी, पक्षी या सगळ्यांसाठी माझ्या गाडीत नेहमी त्यांचं खास खाणं असतं. सोसायटीतल्या कुत्र्यांची जणू मीच कैवारी आहे! त्यांचं खाणं-पिणं, औषध-पाणी एवढंच नव्हे, तर पालिकेने त्यांना उचलून नेल्यावर त्या शेल्टरला जाऊन, वेळ पडल्यास भांडून त्या कुत्र्यांना परत घेऊन येणं, ही पण माझीच जबाबदारी आहे. मी ठाण्यात ज्या कॉम्प्लेक्समध्ये राहाते, तिथे गेल्यापासून ३ कुत्रे माझे लाडके आहेत. माझ्या गाडीचा हॉर्न वाजला की असतील तिथून माझ्या गाडीमागे पळत येतात. कोण जाणे कसं, पण त्यांना माझ्या गाडीचा हॉर्न बरोबर कळतो. माझ्यासाठी हीच त्यांच्या प्रेमाची पोचपावती आहे.

माझं प्राणीप्रेम फक्त इथवर थांबणार नाहीये. पुढे मला प्राण्यांसाठी एक वृद्धाश्रम काढायचाय. बऱ्याचदा गाय-बैल, इतर प्राणी माणसाच्या उपयोगाचे राहिले नाहीत की त्यांना नरकयातना सहन करायला सोडून दिलं जातं. म्हातारं कुत्रं, मांजर, त्यांची आजारपणं आता झेपत नाहीत म्हणून त्यांना सोडून दिलं जातं.

ज्या प्राण्यांचं कोणी नाही, त्यांचं निदान म्हातारपण तरी सुखात जावं अशी माझी इच्छा आहे. देव करो आणि माझं ते स्वप्न लवकर पूर्ण होवो!

◆ jui.gadkari@gmail.com

# वय एक ‘आकडा’!

(पान १४ वरून) वयस्कर आणि ते तिथून कधी उठतात याची ताटकळत वाट पाहणारे तरुण, असं चित्र आपल्या अगदी परिचयाचं आहे. वयवादाचा अर्थशास्त्राशी संबंध स्पष्ट करताना अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. नीरज हातेकर सांगतात, “भारत कृषिप्रधान देश आहे. भारतातली ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. पूर्वी आपल्याकडे एकत्र कुटुंब-पद्धती होती. पुरुष शेती करत, स्त्रिया घर सांभाळत. शेतीसाठी बरीच मुलं जन्माला घातली जात. त्या वेळी जननदर जास्त होता. वैद्यकीय सोयीसुविधांचा, स्त्री-शिक्षणाचाच नव्हे, तर एकूणच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्या काळी मृत्युदरही जास्त होता.

मुलांची संख्या जास्त जरी असली, तरी कुटुंबावर त्यांचा भार नव्हता. मुलं थोडी आणखी मोठी झाली, की शेतीला हातभार लावायची. मुलं त्या काळी ‘इन्व्हेस्टमेंट गूड’सारखी होती. नंतर वैद्यकशास्त्र प्रगत झालं. तंत्रज्ञानाचा विकास झाला. स्त्री-शिक्षणाचा प्रसार झाला. या गोष्टींचा परिणाम जननदर आणि मृत्युदरही कमी होण्यात झाला. त्यानंतरच्या काळात शहरीकरण मोठ्या प्रमाणावर झालं. स्त्री-पुरुष दोघांनाही नोकऱ्या करणं आवश्यक झालं. मुलांना वाढवणं खर्चीक झालं. शहरात मुलं ‘कन्झमशन गूड’सारखी झाली. या सर्वांचा परिणाम जननदर आणखी घसरण्यावर झाला. आपला जननदर आज कमी ( २.१ रीप्लेसमेंट लेव्हल फर्टिलिटी - म्हणजे प्रत्येक स्त्रीला किती मुलं होणं वा असणं शक्य आहे तो गृहीत धरलेला दर) होत चालला आहे. बालमृत्यूचं प्रमाण घटलंय. यापुढे तिसऱ्या टप्प्यात कमी मुलं जन्माला येतील. मृत्युदर कमी झाल्यामुळे असलेल्या लोकसंख्येचं वय वाढेल. लोकसंख्या ‘म्हातारी’ होत जाईल. तिसऱ्या टप्प्यात भारतात सरासरी पंचावन्न ते साठ वयोगटातले लोक असतील. समाजात ऐंशी वर्षांपेक्षा जास्त वयाचे बरेच लोक असतील. बाकीचे तीस-पस्तीसच्या वयोगटातले लोक असतील. लहान मुलांची संख्या तुलनेनं कमी असेल. आपण ‘तरुण’ देश आहोत ही ‘मिथ’ बाजूला ठेवून शासनाला यासाठी काही यंत्रणा उभी करावी लागेल. कुटुंबात मुलांमध्ये गुंतवणूक केली जाते. भविष्याकरिता ही गुंतवणूक असते. मात्र त्याचवेळी म्हाताऱ्यांची आबाळ होते, कारण त्यांच्यासाठी अशी वेगळी तरतूद अनेकदा केली जात नाही. हा स्पष्टपणे वयवाद आहे. सरकारी नियमानुसार नोकरीतून वयाच्या ५८ व्या वर्षी व्यक्ती सेवानिवृत्त होते खरी, पण ती सर्व दृष्टीनं ‘फिट’ असते. परंतु तरुणांना संधी मिळावी म्हणून प्रौढांना सेवानिवृत्त व्हावं लागतं. नोकऱ्यांच्या संदर्भात बोलायचं, तर सरकारी नोकरीशिवाय आपण फारसे पर्याय निर्माण करू शकलो नाही. हा खरा प्रश्न आहे. वयस्कर व्यक्ती काम करायला ‘सक्षम’ आहेत की नाहीत हा मुळात प्रश्नच नाही आहे.”

सेवानिवृत्तीला म्हातारपणातील आपण मानत असलेल्या निष्क्रियतेशी जोडणं आपण थांबवलं पाहिजे. वयाविषयीच्या आपल्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल होणं गरजेचं आहे. फेसबुक, इंस्टाग्रामसारखी समाजमाध्यमं (हे तरुणाईचं माध्यम आहे असं सांगत) वयवादाला मोठ्या प्रमाणावर खतपाणी घालताना दिसतात. वयवादाविषयी समाजशास्त्राचा दृष्टिकोन सांगताना, प्राध्यापिका सुश्री संगीता सांगतात, “आज समाजात ६० ते ८० वयोगटांतल्या ‘आरोग्यसंपन्न’ व्यक्तींची संख्या वाढलेली आहे. वयस्करांच्या या वाढत्या लोकसंख्येचा, त्यांच्या कार्यानुभवाचा समाजाला कसा फायदा करून घेता येईल, याचा समाजशास्त्र विचार करत आहे. साठनंतरच्या व्यक्ती ‘पे रोल’ वर जरी नसल्या, तरी त्यांच्या कार्यानुभवाचा अगदी देश पातळीवरती नसला, तरी स्थानिक पातळ्यांवर- जसं ग्रामपंचायती, महानगरपालिका, तालुका-जिल्हा पातळ्यांवर स्थानिक सुधारणा घडवण्याच्या कामी मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेता येऊ शकतो. स्थानिक पातळीवरील कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण यांसारख्या कामांमध्ये वयस्करांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेता येऊ शकतं. समाजात, कुटुंबात वयस्कर व्यक्तींचं ‘अलगीकरण’ न करता, समाजाच्या ‘मुख्य धारे’त त्यांचा कसा समावेश करता येईल, यावर, एकंदरीतच ‘सक्रिय वृद्धत्वा’वर समाजशास्त्राचा भर आहे.

‘सक्रिय वृद्धत्वा’ची कल्पना प्रत्यक्षात येण्याकरिता योग आणि ध्यान-धारणा बरीच उपयोगी ठरू शकते, असा विचार योग-शिक्षिका, विजया इखारे मांडतात. त्यांच्या मते, योगासनं-ध्यानधारणा केल्यामुळे म्हातारपण टाळता जरी आलं नाही, तरी निश्चितच लांबवता येतं. योगासनांमुळे शरीर लवचीक, निरोगी राहतं. ध्यानामुळे मेंदूकडे जाणारा रक्तप्रवाह वाढतो. त्यानं स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते. ध्यानामुळे गुणसूत्रांच्या टोकाला असलेल्या ‘टेलीमीटर्स’ची लांबी वाढते. या ‘टेलीमीटर्स’ची लांबी कमी झाली की पेशी ‘म्हातारी’ होते. त्यामुळे म्हातारपण येतं. ध्यानानं मेंदूत एन्डॉर्फिन्स, डोपामाइन, ऑक्सिटोसिन आदी खुशीची संप्रेरकं स्त्रवतात. त्यामुळे मन आनंदी, उत्साही राहतं. म्हातारपण लांबणीवर पडतं.

कायद्याच्या दृष्टीनं याचा विचार करता भेदभाव कमी करण्यासाठी कायद्याचा बडगा नेहमीच उपयोगी ठरतो. आपल्याकडे कायदा वयवादाकडे कोणत्या दृष्टीनं बघतो, याविषयी बोलताना अ‍ॅड. नीता कर्णिक सांगतात, “हिंदूंमध्ये पूर्वीपासून एकत्र कुटुंबपद्धती होती. आपल्या पितृसत्ताक समाजात कुटुंबाचा कर्ता पुरुष केवळ त्याचं वय वाढलंय म्हणून कुटुंबावरचा त्याचा अधिकार गमावत नाही. हिंदू एकत्र कुटुंबपद्धती या संकल्पनेचा स्वीकार व्यक्तिगत कायद्यापुरता (पर्सनल लॉ) मर्यादित नाही. आयकरासाठीदेखील याचा फायदा होतो. आपल्याकडे वयस्कर व्यक्तींच्या हिताची बऱ्याच नागरी आणि फौजदारी कायद्यांमध्ये तरतूद करण्यात आली आहे. यातले काही कायदे हे मुलांच्या पालकांप्रती असलेल्या जबाबदारीविषयी आहेत. काही पालक आणि वयस्कर व्यक्तींचा सांभाळ त्यांच्या नातेवाईकांकडून केला जात नाही त्याविषयीही आहेत. एखाद्याला एखादी प्रॉपर्टी प्रेमानं ‘बक्षीस’ दिली जाते. परंतु ज्याला ती प्रॉपर्टी मिळते तो, ती प्रॉपर्टी ज्यानं दिली, त्याला मूलभूत सुविधा पुरवायला, तसंच त्याचा सांभाळ करण्याला अपयशी होतो. त्यावेळी ते बक्षीस परत घेण्याची सोय कायद्यात आहे. आपल्याकडे वयस्कर व्यक्तींना त्यांच्या कल्याणासाठी कायद्याअंतर्गत अनेक सोयीसुविधा आणि सवलती देण्यात आल्या आहेत. भविष्यकाळात, कामाच्या ठिकाणी होणारा वयवाद कमी करण्यासाठी नवीन कायदे बनवण्याची गरज निर्माण होऊ शकते. येत्या वीस-पंचवीस वर्षांत वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागातही एकत्र कुटुंबपद्धतीऐवजी विभक्त कुटुंबपद्धती मोठ्या प्रमाणावर वाढेल. अशा वेळी एकत्र कुटुंबपद्धतीला समोर ठेवून निर्माण केले गेलेले कायदे निरुपयोगी ठरू शकतात. त्यासाठी नवीन ‘पर्सनल लॉ’बनवावे लागतील.”

भारतापुढे येत्या काही वर्षांमध्ये वयवादाची मोठी समस्या उभी राहणार आहे. वयवाद कमी करण्यासाठी सरकारला त्या दिशेनं ठोस पावलं उचलावी लागतील. समाजात शिक्षणाद्वारे याविषयी जागृती निर्माण करता येईल. कामाच्या ठिकाणी होणारा वयवाद कमी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना विशेष ‘वय-लक्ष्यी’ प्रशिक्षण देता येईल. भिन्न वयोगटांच्या व्यक्तींमध्ये सुसंवाद निर्माण करण्यासाठी त्यांचे काही एकत्र सामाजिक उपक्रम राबवता येतील. समाजातील वयस्कर व्यक्तींचं अलगीकरण टाळून त्यांचं समाजाच्या मुख्य धारेत सहभागीकरण करण्यासाठी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांना सहभागी करून घेता येईल. वैयक्तिक पातळीवरची सर्व आर्थिक नियोजनं ८० वर्षांचं वयोमान धरून करावी लागतील. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, शतकानुशतकं चालत आलेले वयाविषयीचे आपले दूषित पूर्वग्रह आपल्याला बदलावे लागतील.

वयानं ‘लहान’ आणि ‘मोठा’ या सापेक्ष संज्ञा आहेत. तुमच्या आधी जन्मलेल्यांसाठी तुम्ही ‘लहान’ आणि नंतर जन्मलेल्यांसाठी तुम्ही ‘मोठे’ आहात. पोटात असणाऱ्या मुलापेक्षा आज जन्मलेलं मूल हे सापेक्षतः ‘मोठं’ आहे. त्यामुळे तसं पाहायला गेलं, तर एकाच वेळी तुम्ही लहानदेखील आहात आणि मोठेदेखील आहात. तुम्ही स्वतःच्या वयाकडे कसं पाहता यावर बरंच काही अवलंबून आहे. तो दृष्टिकोन तुम्हाला ‘तरुण’ किंवा ‘म्हातारा’ ठरवतो. असं असताना वयाचा उगाच बाऊ करण्याची अजिबातच गरज नाही.

कारण वय म्हणजे दुसरं-तिसरं काही नसून फक्त केवळ एक ‘आकडा’ आहे!

◆ dularid111@gmail.com

# ‘ओळख’ स्त्री शेतकऱ्यांची!

(पान १४ वरून) स्त्रियांचे नाव सातबारा उताऱ्यावर लावण्याच्या उपक्रमाची आखणी करत असताना या गोष्टींचा विचार केल्यास हा उपक्रम चांगल्या प्रकारे राबवता येऊ शकेल. तसेच ही आखणी करत असताना ती वारसा हक्क कायदे, मालमत्ता हस्तांतरणाचा कायदा, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम आणि महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम यांच्या चौकटीत राहून करणे महत्त्वाचे ठरेल. अन्यथा या उपक्रमाचा चांगला हेतू सफल होऊ शकणार नाही.

स्त्रियांची सातबारा उताऱ्यावर नोंदणी या विषयाला धरून आणखी एक उपक्रम या वर्षाच्या निमित्ताने घेता येईल, तो म्हणजे ‘जेंडर डिसअ‍ॅग्रिगेटेड डेटाबेस’ तयार करण्याचा. आज महाराष्ट्रात नेमकी किती स्त्रियांच्या नावाने जमीन आहे याबद्दल ठोस आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध नाही. कृषी गणना किंवा राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणासारखी जी माहिती उपलब्ध आहे, त्यामधून नेमकी किती स्त्रियांच्या नावाने जमीन आहे हे सांगता येत नाही. उदाहरणार्थ, कृषी गणना २०१५-१६ प्रमाणे महाराष्ट्रात भूधारक (ऑपरेशनल लॅण्ड होल्डर्स) स्त्रियांचे प्रमाण १५ टक्के आहे. परंतु त्यामधून जमिनीची मालकी लक्षात येत नाही. राज्यात १९९४ मध्ये ‘हिंदू वारसा हक्क सुधारणा कायदा’ लागू झाला. परंतु तेव्हापासून किती स्त्रियांना प्रत्यक्षात जमीन मिळाली याचा व्यापक अभ्यास झालेला नाही. कदाचित स्त्रियांच्या नावाने जमीन असण्याचे प्रमाण अधिकही असू शकेल. परंतु अशा प्रकारची माहितीच उपलब्ध नसल्याने स्त्रियांच्या जमिनीवरील अधिकाराच्या दृष्टीने धोरण बनवणे शक्य होत नाही. त्यामुळे या वर्षाच्या निमित्ताने ही यंत्रणा उभी करण्याचा उपक्रम सुरू करता येईल.

शेवटचा मुद्दा आहे तो ‘शेतकरी’ म्हणून ओळखीचा. स्त्रियांना संपत्तीवर आणि विशेषतः जमिनीवर अधिकार मिळणे, त्या कसत असणारी जमीन त्यांच्या नावाने असणे हे महत्त्वाचेच आहे आणि त्या दृष्टीने ठोस कार्यक्रमदेखील राबवला जायला हवा. परंतु त्याचबरोबर ‘ज्याच्या नावाने जमीन तो शेतकरी’ या संकल्पनेला छेद देण्याचीही गरज आहे. आज अनेक स्त्रिया त्यांच्या उपजीविकेसाठी खंडाने/ मक्त्याने जमीन कसत आहेत किंवा गायरान जमिनीवर शेती करत आहेत. सध्याच्या शेतकऱ्याच्या व्याख्येमध्ये त्यांचा समावेश होत नाही आणि त्यांना शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ मिळू शकत नाही. शेती आणि शेती संलग्न व्यवसायांवर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या अनेक स्त्रिया त्यामुळे या प्रवर्गातून सुटून जातात. त्यामुळे राष्ट्रीय कृषी धोरणामध्ये (२००७) केलेल्या शेतकऱ्यांच्या व्यापक व्याख्येनुसार शेती कसणारे, शेतमजूर, पशूपालक, मासेमार, अशा शेती आणि शेती संलग्न उपजीविकांवर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण कष्टकरी स्त्रियांचा विचार ‘शेतकरी आणि शेतमजूर सन्मान वर्षा’च्या निमित्ताने व्हायला हवा. त्यासाठी सातबारा नोंदणीच्या बरोबरीने गावपातळीवर शेतकऱ्यांच्या नोंदणीचा उपक्रम राबवून, त्या आधारे स्त्रियांना विविध योजनांचा लाभ कसा देता येईल, याबद्दल आखणी करता येईल.

या वर्षाच्या निमित्ताने स्त्रियांना खऱ्या अर्थाने शेतकरी म्हणून ओळख मिळवून देऊन त्यांना अधिक सक्षमपणे शेती करता यावी यासाठी पुढील काही ठोस उपाययोजना आखाव्यात असे सुचवावेसे वाटते-

- स्त्रियांच्या संपत्तीवरील आणि विशेषतः जमिनीवरील अधिकाराबाबत समाजात जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी उपक्रम.
- स्त्रियांचे हक्क डावलले जाऊ नयेत या दृष्टीने संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी तलाठ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम.
- वारसा मेळाव्यांचे आयोजन आणि त्या माध्यमातून स्त्रियांच्या सध्या अडकलेल्या जमिनीवरील अधिकारासंबंधित प्रकरणांचे निराकरण.
- सातबारावर नाव नसले तरी शेतकरी म्हणून ओळख.
- स्त्री शेतकऱ्यांचे प्रश्न नेमके काय आहेत हे समजून घेण्यासाठी प्रभागाप्रमाणे, तसेच एका राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन.

या उपाययोजनांची सरकारने दखल घेतल्यास आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने हे उपक्रम राबवल्यास स्त्री शेतकऱ्यांच्या चांगल्या भविष्याच्या दृष्टीने एक पाऊल नक्कीच पुढे पडेल असा विश्वास वाटतो.

(लेखिका ‘सोपेकॉम’ संस्थेत कार्यरत असून ‘महिला किसान अधिकार मंचा’शी जोडलेल्या आहेत.)
◆ seemakulkarni2@gmail.com

epaper.loksatta.com

## दैनंदिनी

● क्रीडा स्पर्धा : पूना ॲमॅच्युअर कबड्डी संघटना, शिवसेना कसबा विभाग, हिंदूहृदयसम्राट चषक जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन, हस्ते - सचिन अहिर, प्रमुख उपस्थिती - विशाल धनवडे, चंदन साळुंखे, वैभव वाघ, उमेश गालिंदे, स्थळ - नेहरू स्टेडियम, सकाळी ११

● प्रकाशन : मराठीदेशा प्रकाशन, प्राकृत प्रकाशन, कै. वा. सी. बेंद्रे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नऊ ऐतिहासिक ग्रंथांचे प्रकाशन, प्रमुख उपस्थिती- डॉ. सदानंद मोरे, मृणाल कुलकर्णी, दिग्पाल लांजेकर, भगवान चिले, पांडुरंग बलकवडे, अमर जाधवराव, साधना बेंद्रे, स्थळ- पंडीत जवाहरलाल नेहरू सभागृह, घोले रस्ता, शिवाजीनगर, सायं. ५

● नाट्यसंगीत : पुणे महानगरपालिका, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळ ट्रस्ट, कै. चित्तरंजन कोल्हटकर वाचन कट्टा, कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कथामय नाट्यसंगीत 'एकच प्याला', कलाकार- तेजस मिस्त्री, डॉ. ऋतुपर्ण पिंगळे, मोनिका आसोलकर, सुचेता अवचट, साथसंगत- संजय गोगटे, कार्तिक स्वामी, स्थळ- भारतमाता अभ्यासिका, पर्वती पायथा, लक्ष्मीनगर, सायं. ६

● शास्त्रीय गायन : भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाउंडेशन, सांस्कृतिक प्रसार कार्यक्रम, 'रागमाला... एक रत्नमाला', संकल्पना- महेश पाटणकर, कलाकार- अश्विनी कुलकर्णी, प्रशांत कुलकर्णी, भाग्यश्री गोडबोले, महेश पाटणकर, स्थळ- भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह, सेनापती बापट रस्ता, सायं. ६

## पिंपरी चिंचवड शहरावर लादलेली पाणीकपात रद्द करण्याची मागणी

**पिंपरी:** जवळपास अडीच वर्षापूर्वी तत्कालीन आयुक्तांनी शहरावर लादलेली पाणीकपात अजूनही कायम आहे. ती तत्काळ रद्द करण्यात यावी आणि शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी पालिकेचे प्रशासक राजेश पाटील यांना याबाबतचे निवेदन दिले आहे. यापूर्वीचे आयुक्त श्रावण हार्डीकर यांनी तांत्रिक कारणे देत २४ नोव्हेंबर २०१९ रोजी दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. ही पाणीकपात केवळ सहा महिने असेल, त्यानंतर नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन हर्डीकरांनी शहरवासीयांना दिले होते. प्रत्यक्षात ते पाळले गेले नाही. अजूनही दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आंद्रा व भामा-आसखेड धरणाच्या पाण्याचे गाजर अजूनही दाखवले जात आहे. आता आश्वासने थांबवा आणि नागरिकांना दररोज पाणी द्या. अन्यथा, तीव्र आंदोलन करू, असा इशारा मनसेने दिला आहे.

# आरोग्य विद्यापीठाची पुण्यात प्रयोगशाळा

### महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, भारतीय औषध संशोधन संस्था यांच्यात सामंजस्य करार

**लोकसत्ता प्रतिनिधी**



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि भारतीय औषध संशोधन संस्था यांच्यात शुक्रवारी झालेल्या सामंजस्य करारावेळी कुलसचिव डॉ कालिदास चव्हाण, कुलगुरू लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) आणि संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुहास जोशी उपस्थित होते.

**पुणे :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून जनुकीय आणि रेण्विय जीवशास्त्र या विषयात संशोधनाला चालना देण्यासाठी भारतीय औषध संशोधन संस्थेच्या साहाय्याने कॅन्सरवरील संशोधनासाठी पुण्यात 'स्वर्गीय डॉ. के. सी. घारपुरे जेनेटिक अँड मॉलिक्युलर लॅबॉरेटरी' ची स्थापना करण्यात येत आहे. या प्रयोगशाळेद्वारे वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठाच्या पहिल्या उत्कृष्टता केंद्राची (सेंटर ऑफ एक्सलन्स) स्थापनाही करण्यात येईल.

प्रयोगशाळेच्या स्थापनेसाठी आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि भारतीय औषध संशोधन संस्था यांनी शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करार केला. या करारावर कुलगुरू लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) आणि संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुहास जोशी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी डॉ. कानिटकर यांनी माहिती दिली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण, संस्थेचे विश्वस्त आर. जी. शेंडे, कोषाध्यक्ष मंदार अक्कलकोटकर, डॉ. गजानन एकबोटे, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे आदी उपस्थित होते.

कानिटकर म्हणाल्या की, डॉ. घारपुरे यांच्या शिवाजीनगरमधील बंगल्यात आधुनिक पद्धतीने उभारण्यात येणाऱ्या या प्रयोगशाळेद्वारे वैद्यकीय आणि संशोधनाच्या सुविधा उपलब्ध होतील. पहिल्या टप्प्यात वैद्यकीय अभ्यासक्रमांचे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधन आणि नव्याने तयार करण्यात येणारे एकात्मिक अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळेल. त्यानंतरच्या टप्प्यात रुग्णांना कमी खर्चात तपासणीची सुविधा मिळणार आहे. येत्या जूनपासून या प्रयोगशाळेच्या माध्यमातून काम सुरू करण्याचा प्रयत्न आहे. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून कॅन्सरवरील औषध आणि उपचार पद्धतीवरील संशोधन करण्यात येईल. या प्रयोगशाळेसह विद्यापीठाचे प्रादेशिक केंद्रही प्रयोगशाळेच्या इमारतीतच स्थलांतरित करण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्टता केंद्राची निर्मितीही करण्यात येईल. त्यासाठी एक कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. डॉ. घारपुरे यांनी संशोधन प्रयोगशाळेचे स्वप्न पाहिले होते. या सामंजस्य कराराद्वारे त्यांची ती कल्पना आता प्रत्यक्षात येत असल्याचे डॉ. जोशी यांनी सांगितले.

### पाठ्यवृत्ती अभ्यासक्रमांचा आढावा

आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून साधारण विविध प्रकारचे पाठ्यवृत्ती अभ्यासक्रम राबवले जातात. मात्र हे अभ्यासक्रम कालसुसंगत आहेत का याचा आढावा घेऊन अनावश्यक असणारे अभ्यासक्रम बंद करण्यात येईल, तर काही अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली जाईल. तसेच विद्यापीठाकडून अत्याधुनिक मोबाइल स्कील व्हॅन सुरू केल्या जाणार आहेत. त्याद्वारे विद्यार्थ्यांना नव्या संधी उपलब्ध होतील, तर ग्रामीण भागातील गरजू व्यक्तींची तपासणी केली जाणार आहे, असे डॉ. कानिटकर यांनी सांगितले.

### अभ्यासक्रमांची निर्मिती

सामंजस्य कराराद्वारे विद्यार्थ्यांसाठी एक वर्ष कालावधीचा फेलोशिप कोर्स इन जेनेटीक डायग्नोस्टीक्स फॉर क्लिनीशीयन्स राबविण्यात येईल. या अभ्यासक्रमासाठी दहा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. तसेच सर्टिफिकेट कोर्स इन जेनेटीक डायग्नोस्टीक या अभ्यासक्रमात वीस विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. तसेच सहा महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमही सुरू करण्यात येतील, असे कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांनी सांगितले.

## पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वेमार्ग प्रकल्प

### ११ गटातील जमिनीच्या भूसंपादनाचे खरेदीखत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वेमार्गाच्या कामाकरिता हवेली तालुक्यातील मांजरी खुर्द, तुळापूर, भावडी या तीन गावांतील जमिनीच्या भूसंपादनाचे खरेदीखत जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. स्वच्छेने जमीन देणाऱ्यांना मोठ्या रकमेत मोबदला मिळत असल्याने संबंधित शेतकऱ्यांनी भूसंपादनाच्या मोबदल्याचा सदुपयोग करावा, असे आवाहन डॉ. देशमुख यांनी या वेळी केले.

हवेली तालुक्यातील मांजरी खुर्दचे आठ गट, तुळापूर दोन आणि भावडीतील एका गटाचे खरेदीखत करण्यात आले आहे. यामध्ये शेतकऱ्यांना ७८ कोटी रुपयांचा भूसंपादन मोबदला वाटप करण्यात आला आहे. हवेली तालुक्यातील पेरणे, भावडी, तुळापूर आणि मांजरी खुर्द गावातील ७० टक्के खरेदीखताची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे, तर उर्वरित खरेदीखते लवकरच पूर्ण करण्यात येईल. खेड तालुक्यातील बाह्यवळण रस्ता आणि रेल्वे मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून लवकरच त्यांचाही भूसंपादनाचा मोबदला वाटप करण्यात येणार आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तातडीने रेल्वेमार्गाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी सांगितले.

दरम्यान, मांजरी खुर्दचे माजी सरपंच किशोर उंद्रे यांनी जमीन खरेदीला चांगला मोबदला दिल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानले. जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांच्या हस्ते मांजरी खुर्द, तुळापूर आणि भावडी गावातील जमीनधारक शेतकऱ्यांना स्वाक्षरीसाठी खरेदीखताचे दस्त वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी रोहिणी आखाडे, महारेल (जमीन) सहमहाव्यवस्थापक भानुदास गायकवाड, महारेलचे सहमहाव्यवस्थापक सुनील हवालदार उपस्थित होते.

## सकारात्मक गोष्टींसाठी विद्रोह गरजेचा

### नागराज मंजुळे यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** चांगल्या आणि सकारात्मक गोष्टींसाठी विद्रोह गरजेचा आहे, असे मत प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी गुरुवारी व्यक्त केले. जुने, जळमटलेले आणि खराब मागे सोडण्यासाठी केली जाणारी कृती विद्रोही म्हणावी लागेल. आजकाल प्रेम करणे हादेखील विद्रोहच आहे. पण, विद्रोह म्हणजे विध्वंस नाही हे ध्यानात ठेवले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजित वार्तालापामध्ये नागराज मंजुळे यांनी विविध विषयांवर संवाद साधला. अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करण्याचा अनुभवही त्यांनी सांगितला. संघाचे अध्यक्ष मंगेश कोळपकर, सरचिटणीस सुजित तांबडे आणि खजिनदार नीलेश राऊत या वेळी उपस्थित होते.

नागराज मंजुळे म्हणाले,की महाविद्यालयाच्या प्रकल्पासाठी लघुपट करण्यापासून सुरू झालेल्या प्रवासामध्ये दहा वर्षे कशी निघून गेली ते कळलेच नाही. मी चित्रपटांच्या व्यावसायिक यशाकडे जास्त बघत नाही. जी गोष्ट आहे ती त्याच पद्धतीने समाजापुढे मांडली पाहिजे. पैसे कमवावे म्हणून मी 'झुंड' बनवला नाही. 'सैराट' चालला म्हणून मी भारी दिग्दर्शक आहे असेही नाही.

सेन्सॉरशिप असायला हवीच. कशाला आणि कोणत्या गोष्टीला सेन्सॉरशिप असावी हे कळले पाहिजे. संवेदनशील चित्रपट झाले पाहिजेत. तो जगण्याचा कोपरा त्यात आलाच पाहिजे. त्यातून मनोरंजनही झाले पाहिजे. मराठीत अनेक संवेदनशील चित्रपट बनत आहेत. आपल्याकडे खूप साध्या जगण्याला धरून चित्रपट तयार होतात. असे चित्रपट हे मराठीचे शक्तिस्थळ आहे.


धारिवाल नर्सिंग इन्स्टिट्युटच्या परिचारिकांच्या पदवीप्रदान कार्यक्रमाच्या दीपप्रज्वलन प्रसंगी राजेश शहा, पुरुषोत्तम लोहिया, राजकुमार चोरडिया, श्री. संतोष कुमार देशमुख, देवीचंद जैन, डॉ. जे. रविंद्रनाथ आणि सुशीला आनंद यांची उपस्थिती होती.

## धारिवाल नर्सिंग इन्स्टिट्युटच्या परिचारिकांना पदवीप्रदान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पूना हॉस्पिटल रसिकलाल एम. धारिवाल नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या प्रशिक्षणार्थी परिचारिकांच्या पदवीप्रदान कार्यक्रमात उत्तीर्ण स्नातकांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली.. कार्यक्रमाची सुरूवात शपथग्रहणाने झाली.

पुण्याचे उप विभागीय अधिकारी संतोषकुमार देशमुख कार्यक्रमास प्रमुख पाहुणे होते. नर्सिंग अधीक्षक सुशीला आनंद यांनी परिचारिका म्हणून काम करताना व्यावसायिक कौशल्य तर आवश्यक आहेतच, पण माणुसकीची जाणीव आणि कोमलता यामुळे हा व्यवसाय अधिक अर्थपूर्ण होतो, असा कानमंत्र दिला. पूना हॉस्पिटलचे अध्यक्ष देवीचंद जैन, उपाध्यक्ष डाह्याभाई शहा, कार्यकारी विश्वस्त राजकुमार चोरडिया, सह कार्यकारी विश्वस्त पुरुषोत्तम लोहिया, विश्वस्त भबुतमल जैन, राजेश शहा, नैनेश नंदु, अशोक ओसवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जे. रविंद्रनाथ या वेळी उपस्थित होते.

## लोणावळ्यात पर्यटकाला लुटणारे गजाआड

**लोकसत्ता वार्ताहर**

**लोणावळा :** लोणावळ्यातील टायगर पॉइंट परिसरात पर्यटकाला लुटणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी पकडले. चोरट्यांकडून मोबाइल संच आणि सोनसाखळी जप्त करण्यात आली.

सुनील लक्ष्मण आखाडे (वय २३, रा. घुसळखा, आंबवणे, ता. मुळशी, जि. पुणे), चिंतन लक्ष्मण पठारे (वय १९, रा. ओकाळाईवाडी, ता. मावळ, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. सहारा सिटी रस्त्यावर लादेन नबी अहमद खान (वय १८, रा. गोरखपूर, उत्तर प्रदेश) आणि त्याचे मित्र गप्पा मारत थांबले होते. त्या वेळी आखाडे आणि पठारे दुचाकीवरून तेथे आले. दोघा आरोपींनी खान आणि त्याच्या मित्रांना शस्त्राचा धाक दाखविला. त्यांच्याकडील मोबाइल संच आणि गळ्यातील सोनसाखळी असा मुद्देमाल लुटून आखाडे आणि पठारे पसार झाले. त्यानंतर खानने लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. लोणावळ्यातील सेंटर पॉइंट हॉटेलजवळ आखाडे, पठारे दुचाकीवरून आले होते. दोघांनी खानला लुटल्याची माहिती खबऱ्याने दिली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून दोघांना पकडले. आखाडे विरोधात यापूर्वी विनयभंग आणि चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. न्यायालयाने दोघांना २५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. दोघांनी पर्यटकांना लुटण्याचे आणखी काही गुन्हे केल्याचा संशय पोलिसांना आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, अतिरिक्त अधीक्षक मितेश घट्टे, उपविभागीय अधिकारी राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण मोरे, सहायक निरीक्षक सचिन राऊळ, विलास गुजर, कुतबुद्दीन खान, युवराज बनसोडे, विजय गाले, किशोर पवार आदींनी ही कारवाई केली.

## नागरी सहकारी बँकांना कामाची संधी

### अजित पवार यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीयीकृत बँकांचे विलीनीकरण देश पातळीवर होत असून केवळ सात ते आठ बँका राहाव्यात, असे रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मनात आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात निर्माण होणारी पोकळी भरून काढण्याचे काम नागरी सहकारी बँकांनी करावे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी व्यक्त केले. सहकार हा महाराष्ट्राच्या विकासाचा पाया आहे, असे ही ते म्हणाले.

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनतर्फे पुण्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नागरी बँकांचा अजित पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्याप्रसंदी पवार बोलत होते. सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, उपाध्यक्ष ॲड. साहेबराव टकले, सचिव संगीता कांकरीया यांच्यासह संचालक या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात असोसिएशनचे ज्येष्ठ संचालक विद्याधर अनास्कर यांची महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सहकारी बँकिंग क्षेत्रात प्रदीर्घ सेवा देणारे असोसिएशनचे ज्येष्ठ संचालक प्र. दी. उर्फ आबासाहेब शिंदे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. नागरी बँकांच्या कामकाजात भरीव योगदान देणाऱ्या नंदा लोणकर आणि पुष्पलता जाधव या दोन संचालिकांना मीराताई देशपांडे पुरस्कार प्रदान करण्यात आला.


पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनतर्फे अजित पवार यांच्या हस्ते प्र. दी. उर्फ आबासाहेब शिंदे यांना जीवनगौरव पुरस्काराने शुक्रवारी गौरविण्यात आले. बाळासाहेब पाटील, ॲड. सुभाष मोहिते आणि विद्याधर अनास्कर या वेळी उपस्थित होते.

पवार म्हणाले, सहकारी बँकेबाबत बदनामी केली जाते. प्रत्यक्षात राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये घोटाळ्याची ३७६६ प्रकरणे असून गुंतलेली रक्कम ६४ हजार ५०९ कोटी इतकी आहे. नागरी सहकारी बँकांतील २२० कोटींच्या घोटाळ्याचे वृत्त मोठ्या प्रमाणात देण्यात आले. प्रत्यक्षात देशात नागरी बँकामध्ये घोटाळ्याची १८१ प्रकरणे असून १२७ कोटी ७० लाख रुपये इतकी रक्कम आहे. खासगी बँकांमध्ये ५ हजार ५०० कोटी तर परदेशी बँकांमध्ये १ हजार कोटी रुपयांचे घोटाळे आहेत. या कोणत्याही गोष्टीचे मी समर्थन करीत नाही. परंतु सहकारी बँकेबाबत दाखविले जाणारे चित्र चुकीचे आहे.

महाराष्ट्रातील सहकार चळवळ टिकली आणि वाढली पाहिजे. आव्हानांवर मात करून सहकारी बँकांची चळवळ ग्राहकाभिमुख करायला हवी. पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनला मावळ भागात प्रशिक्षण केंद्राकरिता हव्या असलेल्या जागेबाबत प्रयत्न करण्याचे आश्वासन पवार यांनी या वेळी दिले.

अनास्कर म्हणाले, राजकारणात सहकार अपेक्षित आहे. मात्र, सहकारात राजकारणात नको, हे वाक्य प्रत्येकाने आपल्या मनावर बिंबविले, तर सहकारात उत्तम कार्य करता येईल.

पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. ॲड. सुभाष मोहिते यांनी प्रास्ताविक केले.

## कोथरूडमधील वस्त्रदालनात महिलेचे मंगळसूत्र चोरीस

**पुणे :** कोथरूडमधील वस्त्रदालनात खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील ३० हजारांचे मंगळसूत्र लांबविण्यात आल्याची घटना घडली. महिला भांडारकर रस्ता परिसरात राहायला आहेत. महिला आणि पती कोथरूडमधील वस्त्रदालनात साडी खरेदीसाठी आले होते. दालनातील कर्मचारी महिलेला साड्या दाखवित होता. महिलेच्या नकळत गळ्यातील मंगळसूत्र चोरीला गेले. मंगळसूत्र चोरीची महिलेने तक्रार दिल्यानंतर कोथरूड पोलिसांकडून वस्त्रदालनातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस कर्मचारी ठोंबरे तपास करत आहेत.

### पेटा इंडियाचा उपक्रम

## प्राण्यांवरील अत्याचारासंदर्भात प्रात्यक्षिकांतून जनजागृती

**लोकसत्ता प्रतिनिधी**


प्राण्यांवर केल्या जात असलेल्या अत्याचारासंदर्भात पेटा संस्थेच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी प्रात्यक्षिकांमधून जनजागृती केली.

**पुणे :** पिंजऱ्यात बंदिस्त, बेड्यांमध्ये जखडून ठेवलेली आणि विषारी औषध प्राशन करून प्राण्यांवर केल्या जात असलेल्या अत्याचारासंदर्भात शुक्रवारी प्रात्यक्षिकांतून जनजागृती करण्यात आली. या प्रात्यक्षिकांमध्ये पूजा राठोड या युवतीने प्राण्याची भूमिका साकारली होती.

जागतिक प्राणी दिन आणि प्रयोगशाळांमध्ये प्राण्यांसाठी जागतिक आठवडा याचे औचित्य साधून 'पीपल फॉर द एथिकल ट्रिटमेंट ऑफ ॲनिमल्स' म्हणजेच पेटा इंडियाच्या कार्यकर्त्यांनी भारत आणि जगभरातील प्रयोगशाळांमध्ये प्राण्यांवर अत्याचार करून त्यांना कसे मारले जाते याचे प्रात्यक्षिकासह सादरीकरण केले. फर्ग्युसन रस्त्यावरील नामदार गोखले पुतळा परिसरात झालेल्या या पथनाट्य आणि प्रात्यक्षिकांद्वारे युवकांमध्ये जागृती करण्यात आली. या प्रात्यक्षिकांमध्ये प्राण्याची भूमिका साकारणाऱ्या पूजा राठोड या युवतीला पिंजऱ्यात बंदिस्त करण्यात आले. तिला साखळदंडाने जखडून ठेवण्यात आले. जबरदस्तीने रसायने पाजून ठार मारण्यापूर्वी तिला प्रतीकात्मक स्वरूपात विजेचा धक्का दिला गेला. पेटाच्या कार्यकर्त्यांनी या अत्याचाराचा सामना करणाऱ्या प्राण्यांची छायाचित्रे असलेले फलक हाती धरले होते.

प्राण्यांवरील अनैतिक चाचण्यांपासून दूर जाऊन त्यांच्यामध्ये गुंतवणूक करणे हे माणूस, अन्य प्राणी आणि विज्ञानाच्या भवितव्यासाठी अधिक चांगले ठरेल या भूमिकेतून ही प्रात्यक्षिके सादर करण्यात आली, असे पेटाच्या वरिष्ठ प्रसार समन्वयक राधिका सूर्यवंशी यांनी सांगितले.

## एकास ऑनलाइन गंडा

**पुणे :** बँक अधिकारी असल्याच्या बतावणीने एकास सायबर चोरट्यांनी ऑनलाइन गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत गणेश वीरकर (वय ४२, रा. मांगडेवाडी, कात्रज) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दोन महिन्यांपूर्वी चोरट्यांनी वीरकर यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. बँक अधिकारी असल्याची बतावणी करून त्यांच्याकडून क्रेडीट कार्डची गोपनीय माहिती घेतली होती. या माहितीचा गैरवापर करून चोरट्यांनी वीरकर यांच्या बँक खात्यातून ऑनलाइन पद्धतीने ९२ हजार ९१६ रुपये लांबविले. वीरकर यांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक विजय पुराणिक तपास करत आहेत.

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढ्याची जागतिक पातळीवर नोंद'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांवर होणाऱ्या अन्यायाचा जेवढा विरोध केला, तेवढा आफ्रिकन अमेरिकन लोकांनी केला नाही. बाबासाहेबांनी लोकशाही मार्गाने अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्याची नोंद जागतिक पातळीवर घेण्यात आली, असे मत अमेरिकेतील प्रा. केविन ब्राऊन यांनी शुक्रवारी मांडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान कार्यक्रमात प्रा. ब्राऊन बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीजचे विभागप्रमुख डॉ. विजय खरे आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार डॉ. योगीराज बागुल यांना, डॉ. सोमनाथ कदम, तुकाराम रोंगटे, डॉ. विलास आढाव यांना उत्तेजनार्थ पुरस्काराने गौरवण्यात आले. तर डॉ. चित्रा कुऱ्हे आणि सुभाष वारे यांना कार्यकर्ता पुरस्कार, डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ. रोहिदास जाधव यांना उत्तेजनार्थ पुरस्कार, डॉ. मिलिंद आवाड यांना संशोधन पुरस्कार प्रदान करण्यात आला. ब्राऊन यांचे आफ्रिकन आणि अमेरिकन संघर्षात भारताची अधिनता विषयावर व्याख्यान झाले. प्रा. ब्राऊन म्हणाले, की बाबासाहेबांचे काम एकूणच मानवी जातीवर होणाऱ्या अन्यायाविरोधातील व्यापक स्वरूपाचे होते.

## अत्याधुनिक, सुसज्ज अग्निशमन विभागासाठी पीएमआरडीए प्रयत्नशील

शहरीकरण ही एक अपरिहार्य बाब आहे. महाराष्ट्रातील शहरीकरणाचा वेग लक्षात घेता पुणे महानगराच्या विस्तार, विकासाची गती सर्वाधिक आहे. सात हजार चौरस किलोमीटरचे क्षेत्र असलेल्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) क्षेत्राची व्याप्ती पाहता देशभरातील प्रमुख प्राधिकरणांपैकी हे एक प्राधिकरण ठरते. महानगरपालिका, नगररचना योजना, नगरपंचायत, ग्रामपंचायत अशा विविध शहरी आणि ग्रामीण क्षेत्रांचा यामध्ये समावेश आहे. यामधील महापालिका क्षेत्र वगळता उर्वरित ग्रामीण भागात पीएमआरडीए अग्निशमन दल आपत्कालीन स्थितीसाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी साठ कर्मचाऱ्यांसह सज्ज आहे. नागरीकरण, औद्योगिक विकास यांचा विचार करून पीएमआरडीए क्षेत्रात ३० अग्निशमन केंद्रासाठी प्रत्येकी किमान एक एकराचे (४००० चौरस मीटर) भूखंड राखीव ठेवण्यात आले आहेत. या केंद्रांमधून किमान तीन आगरोधक बंब, बचाव वाहने, लॅडर्स, मोटारबाइकवरील वॉटर मिस्ट टेक्नॉलॉजीसह वाहनांची उपलब्धता करण्याचे नियोजन सुरू आहे. अत्याधुनिक, सुसज्ज अग्निशमन विभागासाठी पीएमआरडीए प्रयत्नशील आहे.

पीएमआरडीएचा अग्निशमन विभाग २०१६ साली कार्यान्वित झाला. पहिल्या वर्षभरात नांदेड सिटी, लाइफ रिपब्लिक या टाउनशिपमधील अत्याधुनिक अग्निशमन केंद्रांना पीएमआरडीएच्या अग्निशमन विभागात समाविष्ट करून घेण्यात आले. त्यानंतर वाघोली येथे एका अत्याधुनिक अग्निशमन केंद्राची उभारणी पूर्ण झाली असून या तीन केंद्रांमधून सध्या पुणे जिल्ह्यातील नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्याबरोबर येथे अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रही चालवले जाते.



देवेंद्र पोटफोडे
मुख्य अग्निशमन अधिकारी, पीएमआरडीए

मुळातच आग लागूच नये यासाठी जनजागृती आवश्यक असून त्यासाठी नागरिकांच्या सुरक्षाविषयक जाणिवा अधिक जागरूक होणे गरजेचे आहे. हा उद्देश समोर ठेवून पीएमआरडीएकडून अग्निशमन विभाग नागरिकांमध्ये जनजागृती घडवून आणण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. नागरिकांचे समूह, शाळा, महाविद्यालयांच्या मागणीनुसार त्यांना आवश्यक माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रसंगी विविध नागरिकांच्या गटासमोर प्रात्यक्षिकांसह जनजागृतीवरही आमचा भर असतो. जनजागृतीचा आणखी एक प्रभावी पर्याय म्हणून उद्योग, निवासी सोसायटी आदींसाठी एक माहिती पुस्तिका तयार करण्यात येत आहे. नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये आग लागू नये म्हणून कशी काळजी घ्यावी, आग प्रतिबंधक उपाययोजना कशा रीतीने कराव्यात आदी विषयांवर सचित्र मार्गदर्शन या पुस्तिकेमधून केले जाणार आहे.

गेल्या पाच वर्षांत पीएमआरडीए क्षेत्रात रस्त्यावर झाड कोसळून वाहतुकीस अडथळा, रस्त्यावर तेल सांडणे, अपघात, पूरस्थिती अशा दोन हजारांहून अधिक घटनांना तातडीने प्रतिसाद देत आमच्या विभागातील कर्मचारी मदतीसाठी धावून गेले आहेत. याशिवाय पुणे जिल्ह्यातील जंगल आणि आदिवासी भागात गेल्या पाच वर्षांत पीएमआरडीए अग्निशमन विभागाने जंगलातील शंभराहून अधिक वणव्याच्या घटनांचा सामना वनविभागाच्या मदतीने केला असून मोठ्या प्रमाणात वृक्षसंपदा व प्राण्यांना वाचविण्यात आम्हाला यश आले आहे. वणवा पसरण्याला अटकाव करण्यासोबतच पीएमआरडीए अग्निशमन विभागाने दीड लाख वृक्षांचे रोपण केले आहे. करोनातील टाळेबंदी काळात ग्रामीण व आदिवासी भागातील ६५०० पेक्षा अधिक कुटुंबांना १५ दिवस पुरेल एवढ्या धान्याचे वाटप आम्ही केले. तसेच पीएमआरडीए अग्निशमन विभागाने ७३७ करोना रुग्णालयांचे अग्निसुरक्षा लेखापरीक्षण पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, एमआयडीसी या अग्निशमन सेवांच्या सहकार्याने पार पाडले.

पीएमआरडीए व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार दोन्ही संस्था एकमेकांना आपत्कालीन परिस्थिती व आगप्रतिबंधक उपाययोजनांच्या प्रशिक्षणाचे आदान-प्रदान करणार आहेत. दोन्ही संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने आपत्कालीन परिस्थिती वा आगीच्या घटनांचा सज्जतेसह सामना करण्यासाठी प्रशिक्षित केले जाणार आहे. तसेच ठरावीक कालावधीनंतर अभ्यासवर्ग व कार्यशाळांचे आयोजन देखील या कराराद्वारे करण्यात येणार आहे.

## अग्निशमन सेवा सप्ताह



सुनील गिलबिले
मुख्य अग्निशमन अधिकारी, पीएमसी

सन २०२२ च्या अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने मध्यवर्ती अग्निशमन केंद्र येथे दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता अग्निशमन ध्वजाचे अनावरण, ध्वजास मानवंदना, शहीद झालेल्या अग्निशमन कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली असे कार्यक्रम पार पडले.

दिनांक १५ ते २० एप्रिल या अग्निशमन सेवा सप्ताहाच्या कालावधीत शहरामध्ये जनजागृतीसाठी हॉस्पिटल, उंच इमारती, व्यावसायिक इमारती या ठिकाणी प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. तसेच, शहरामध्ये विविध ठिकाणी होर्डिंग लावून माहितीपर, प्रबोधनपर माहिती नागरिकांसाठी देण्यात आली होती.

दिनांक २० एप्रिल रोजी सांगता समारंभ पार पडला.

## अग्निशामक दल सुरक्षेसाठी कटिबद्ध

राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने आपण सर्व आपले जीवित व वित्त या सर्वांचे अग्नी व नैसर्गिक आपत्ती अथवा मानवनिर्मित आपत्ती यापासून सुरक्षित राहावे ही सदिच्छा. वर्षानुवर्ष तापमान मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे व त्यामुळे आगीच्या घटनांमध्येदेखील मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. नागरीकीकरण, औद्येगिकीकरण, शहरीकरण व त्या माध्यमातून सिमेंट काँक्रिट, विविध रसायने, प्लास्टिक, फोम,इंधन या सर्वांचा होत असलेला मोठ्या प्रमाणातील वापर व त्याउलट झाडे–झुडपे, हिरवळ, माती व पाणी यांचे होत असलेले प्रदूषण; या सर्वांचा एकत्रित परिणाम ग्लोबल वॉर्मिंग व त्यामुळे आगीच्या घटना मोठ्या प्रमाणात होत आहेत. या दृष्टीने आपण सर्वांनी अधिक दक्ष राहण्याची गरज आहे. अग्निशमन विषयक नियम, कायदे, विविध उपकरणे, त्यांचा वापर, हाताळणी व एकूणच अग्निशमन व बचाव बाबतची संपूर्ण माहिती आपण सर्वांनी यानिमित्ताने घेणे व त्याची काटेकोरपणे आपण राहत असलेल्या ठिकाणी अंमलबजावणी करावीच लागेल. आग लागणार नाही,जर लागल्यास ती त्वरित विझवता येईल याबाबतचे,तसेच जीवितहानी कोणत्याही प्रकारे होऊ द्यायची नाही याबाबतचे ज्ञान व प्रशिक्षण घेणे व त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज झाली आहे. त्यानुसार आपण सर्वांनी अग्निशमन व बचावविषयक प्रशिक्षण, ज्ञान, माहिती याचा अवलंब करावा व आपले घर, आपला परिसर, आपले शहर, आपला देश, अधिक अग्निसुरक्षित करावा ही कळकळीची विनंती. अग्निशामक दल, कर्मचारी व यंत्रणा आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे व कटिबद्ध आहे.



किरण गावडे
मुख्य अग्निशमन अधिकारी, पीसीएमसी

## अग्निसुरक्षेविषयी...

१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरात एका मालवाहू जहाजाला अचानक आग लागली. या आगीवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न करताना अग्निशमन दलाचे ६६ जवान शहीद झाले म्हणून भारतात तेव्हापासून १४ एप्रिल ते २० एप्रिल हा 'अग्निशमन सप्ताह' साजरा करण्यात येतो.

प्रत्येक वर्षी अग्निशमन सप्ताहमध्ये नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या साठी कार्यक्रम घेतले जातात आणि असे कार्यक्रम आम्ही आमच्या २०१७ मध्ये स्थापन केलेल्या फायर कॉन्ट्रॅक्टर अँड कन्सल्टंट असोशिएशनच्या माध्यमातून घेत असतो. ज्या मध्ये, आग लागूच नये आणि लागली तर काय करावे आणि आग विझवण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात, असे काही जनजागृतीचे कार्यक्रम घेतले जातात.

भारतात मोठमोठ्या शहरामध्ये अग्निशमन दल कार्यरत आहेत परंतु शहरापासून लांब अंतरावर अग्निशमन दल नसल्याने काही घटना घडली तर फार मोठी जीवित व वित्त हानी होऊशकते. वास्तविक सध्या शहरामध्ये गगनचुंबी इमारती होऊलागल्याने शहरामध्ये अग्निशमन दल सुसज्ज असले तरीही शहराचा परीघ वाढत असल्याने अग्निशमन दलातील अपुरे मनुषयबळ, शहरामध्ये अरुंद रस्ते या मुळे अग्निस्थळी पोहोचण्यासाठी जवानांना वेळ लागू शकतो. याच कारणाने कोणत्याही इमारतीमध्ये स्वतःची अग्निशमन यंत्रणा नियमाप्रमाणे डिझाईन व सुस्थितीत असली पाहिजे. तसेच अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असली, तरी ती वेळ आल्यास कशी वापरावी याचे ज्ञान आत्मसात करणे प्रत्येक इमारतीमधील प्रत्येकाची जबाबदारी आहे आणि इच्छा असली पाहिजे. तसेच इमारतीमधून बाहेर पडण्याचा मार्ग माहीत असला पाहिजे आणि तो opstraction free असला पाहिजे. फायरच्या जिन्यामध्ये कोणतेही सामान ठेवू नये, फायर डोअर डोअर क्लोजरने बंद असावेत, उंच इमारतीचे जिने प्रेशराइज्ड असले पाहिजेत.

**आणीबाणी प्रसंगी काय करावे**

**१) धोक्याची सूचना :** वेगवेगळ्या प्रकारच्या सूचना/इशारे/आवाज याद्वारे आगीची अथवा धोक्याची सूचना दिली जावी.

**२) विद्युत दाब :** संयंत्रे आणि विविध प्रक्रियांचे विद्युत दाब अंशतः अथवा पूर्णतः बंद करून विद्युतप्रवाह खंडित करावा.

**३) अंतर्गत अग्निशमन खात्यास पाचारण :** पहारेकरी, सुरक्षा रक्षक किंवा स्वागतकार यांना अंतर्गत अग्निशमन खात्यास पाचारण करण्यासाठी सूचना द्याव्यात.

**४) स्थानिक अग्निशमन दलास पाचारण :** आगीचे स्वरूप पाहून नागरी अग्निशमन दलास पाचारण करावे आणि अग्निविमोचन आणि बचाव कार्यात त्यांना सहकार्य करावे.

**५) धोका :** प्रथम खोली, शौचालये इत्यादी भागात कोणीही नाही याची खात्री करून दरवाजे, खिडक्या बंद कराव्यात.

**६) एकत्र जमण्याचे ठिकाण :** सर्व लोकांनी आगीपासून दूर, सुरक्षित व सोईच्या ठिकाणी जमा व्हावे.

**७) उपस्थित गट :** इमारतीतील रहिवाशांची उपस्थिती तपासून करून कोणी इमारतीत राहिले नसल्याची खात्री करावी.

**८) तपास :** अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या मदतीने बेपत्ता व्यक्तीचा शोध घ्यावा.

**९) अग्निशमन :** छोट्या स्वरूपाची आग उदा. ज्वालाग्रही रसायने सांडून लागलेल्या आग तातडीने विझवाव्यात, परंतु मोठ्या प्रमाणात लागलेल्या आगीचा सामना करतेवेळी जीवितहानी टाळण्यासाठी प्रथमतः स्वतःची काळजी घेऊन आगीवर नियंत्रण करणे महत्त्वाचे असते.

१०) अग्निशमन खात्याचा दूरध्वनी क्रमांक १०१ हा कायम लक्षात ठेवा.

**— टीम एफसीसीए**

## FIRE CONTRACTORS AND CONSULTANTS ASSOCIATION

### Proud Members

| S.No. | Member Name | Contact No |
|---|---|---|
| 1 | Aarush Fire Systems Pvt.Ltd. | 7447411101 |
| 2 | M/s. Aditya Infrasafety Solutions | 9595047101, |
| 3 | M/s Agnisuraksha Engineers | 9767422877 |
| 4 | M/S.A G Corporation | 9923208956 |
| 5 | M/s. AGS Technologies India Pvt. Ltd. | 9623447061 |
| 6 | M/s. Atharva Engineers | 9822292502 |
| 7 | M/s Delta Fire System | 9890421884 |
| 8 | M/s. Disnyr Fire Enterprises Pvt. Ltd | 9822026705 |
| 9 | M/S. DNA Fire Enterprises | 7588184999 |
| 10 | Fire Fight Safety Solution | 9970548822 |
| 11 | M/S. Fire Safety Systems | 8805667799 |
| 12 | M/s. Glotech Fire Engineers | 8888895135 |
| 13 | M/S. Gurutech Fire Systems | 9822960101 |
| 14 | Ideal Fire Services | 9820612528 |
| 15 | M/S. India Automation & Fire Solutions | 9822524984 |
| 16 | M/S. Kaushal Fire Protection | 9890609101 |
| 17 | M/S. Logitech Fire Technology | 9373682113 |
| 18 | Luminosity Infra Projects Pvt.Ltd. | 9975444828 |
| 19 | M/S. Maruti Enterprises | 7720037101 |
| 20 | Master Fire Engineers Pvt. Ltd. | 9890000101 |
| 21 | Multi Amp Engineers | 9881480051 |
| 22 | M/s. National Fire Protection Armour | 9673407788, |
| 23 | M/s. Om Sai Enterprises | 9673900101 |
| 24 | M/s. Om Sai Fire Systems | 9922443940 |
| 25 | M/s. Prevent Fire Engineers | 9850566101 |
| 26 | Prompt Fire Engineers | 9975592044 |
| 27 | M/s Rapid Fire & Safety Engineers Pvt Ltd. | 9881442200 |
| 28 | Red Air Fire Solutions (India) | 9890086768 |
| 29 | M/s. Safemax Fire Services | 9923276723 |
| 30 | Safety Engineers & Consultants | 9823794941 |
| 31 | M/s. Sai Systems | 9850829621 |
| 32 | Saitech Fire Systems Pvt.Ltd. | 9850333101 |
| 33 | M/S. Satyam Fire | 9822757322 |
| 34 | SFS Fire Protection India Pvt. Ltd. | 9822018160 |
| 35 | M/S. Shivam Fire Enterprises | 9158007101 |
| 36 | M/s Shriram Fire Controlling Systems | 9422322444 |
| 37 | Sneha Electrical Corporation & Co. | 9326733715 |
| 38 | M/S.S R Enterprises | 9822411828 |
| 39 | M/s. Star Fire Systems Pvt.Ltd. | 9890610092 |
| 40 | Success Fire Systems | 9822018150 |
| 41 | M/s. Suchi Turnkey Projects Pvt. Ltd. | 9860093721 |
| 42 | M/s. Sujay Fire LLP | 9423001051 |
| 43 | Sumeet Fire Engineering Pvt.Ltd. | 9822495357 |
| 44 | M/s. Sumeet Sales & Services | 9028256101 |
| 45 | Sunlight Fire Solution | 9595987032 |
| 46 | M/S. Sunrise Fire Pvt ltd | 9503340107 |
| 47 | M/S. Tech Fire Safety Services | 9422884059 |
| 48 | M/s Technowings Systems | 9923204481 |
| 49 | M/s. Tejfire Safety India Pvt. Ltd. | 9225623101 |
| 50 | M/S. Ultra Firetech Systems Pvt Ltd | 8888849918 |
| 51 | M/s. Vishal Fire Sysems | 9503010095 |

# एसटीची सेवा सुरळीत

## ८२ हजार ३६० कर्मचारी कामावर रुजू; बडतर्फ कर्मचाऱ्यांसाठी २८ एप्रिलपर्यंतची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** संपामुळे राज्यातील पाच महिन्यांपासून ठप्प असलेली एसटीची सेवा आता सुरळीत होणार आहे. एकूण ९१ हजार २६६ पैकी ८२ हजार ३६० कर्मचारी कामावर परतल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली.

शुक्रवारी ५ हजार ३९८ कर्मचारी कामावर हजर झाले. कामावर रुजू झालेल्यांमध्ये १० हजार बडतर्फ करण्यात आलेले कर्मचारी असून त्यांना रुजू करून घेण्याची सर्व प्रक्रिया हळूहळू पूर्ण करण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात एसटी कर्मचाऱ्यांची संख्या आणखी वाढेल आणि एसटी सोमवारपासून पूर्ण क्षमतेने धावेल, अशी माहिती महामंडळाने दिली.

एसटीत संपाआधी ९२ हजार २६६ कर्मचारी होते. संपकाळात एक हजार कर्मचारी निवृत्त झाले. त्यामुळे या कर्मचाऱ्यांची घटली. हे सर्व कर्मचारी संपात सामील झाले होते. संपामुळे शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल झाले. तर परीक्षाकाळात विद्यार्थ्यांनाही पायपीट करावी लागली. याचा गैरफायदा घेऊन खासगी प्रवासी वाहतुकदारांनी प्रवाशांची लूट चालवली. कारवाया मागे घेण्याचे आश्वासन आणि कर्मचाऱ्यांना परतण्याचे आवाहन केल्यानंतर अनेक कर्मचारी हळूहळू परतू लागले. यात प्रथम प्रशासकीय व यांत्रिकी कर्मचारीच आघाडीवर होते. चालक, वाहक रुजू होत नव्हते. मात्र ७ एप्रिलला न्यायालयाने एसटी कर्मचाऱ्यांना २२ एप्रिलपर्यंत हजर राहण्याचे आदेश दिले तर कामावर हजर न झाल्यास त्यानंतर कारवाई केली जाईल, असे महामंडळाने परिपत्रक काढून स्पष्ट केले. त्यानंतर कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या हळूहळू वाढू लागली.

### सदावर्तेसह ११५ आंदोलकांना जामीन

मुंबई : राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानाबाहेर झालेल्या हिंसक आंदोलनाप्रकरणी वकील गुणरतन सदावर्ते आणि ११५ एसटी कर्मचाऱ्यांना सत्र न्यायालयाने शुक्रवारी अखेर जामीन मंजूर केला. सदावर्ते यांना जामीन मंजूर झाला असला तरी ते सध्या कोल्हापूर पोलिसांच्या ताब्यात असल्याने त्यांची सुटका होणार नाही.

### सद्य:स्थिती...

गुरुवारी २ हजार ९९२ कर्मचारी कामावर परतल्याने एसटीच्या एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ७६ हजार ९६२ झाली होती. तीस हजारहून अधिक फेऱ्या झाल्या. त्यातून १९ लाख प्रवाशांनी प्रवास केला. त्यामुळे ११ कोटी ४४ लाख रुपये उत्पन्न मिळाले. शुक्रवारी ५ हजार ३९८ कर्मचारी कामावर आले. त्यामुळे हजर कर्मचाऱ्यांची एकूण संख्याही ८२ हजार ३६० झाली.



### २८ एप्रिलपर्यंत मुदत

जे कर्मचारी सेवेतून बडतर्फ झाले आहेत आणि त्यांनी प्रथम अपील केले आहे, त्या आदेशापासून चार आठवड्यांच्या आत ताकिद देऊन निकाली काढण्यात येणार आहे. तसेच ज्यांनी प्रथम अपील केलेले नाही, अशा कर्मचाऱ्यांना तीन आठवड्याची मुदतही देण्यात आली आल्याचे महामंडळाने ८ एप्रिल रोजी काढलेल्या परिपत्रकातच नमूद करण्यात आले होते. त्यानुसार २८ एप्रिलपर्यंत मुदत असल्याचे महामंडळाकडून सांगण्यात आले. बडतर्फ कर्मचाऱ्यांनी दिलेल्या मुदतीत अपील न केल्यास त्यांना एसटी सेवेत स्वारस्य नसल्याचे समजण्यात येणार आहे.

**बडतर्फ कर्मचारी परतण्यास सुरुवात:** एसटीचे १० हजार ३०८ कर्मचारी बडतर्फ झाले आहेत. यातील ९ हजार ५७७ जणांनी अपील केले असून ४ हजार ७०० कर्मचाऱ्यांचे अर्ज निकाली काढले आहेत. यातील काही कर्मचारी हजर होत असून काहींचे वैद्यकीय चाचणी व अन्य प्रक्रिया शिल्लक आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात या कर्मचाऱ्यांचीही संख्या वाढेल आणि एसटीची सेवा पूर्णपणे सुरळीत होईल, अशी आशा एसटी महामंडळातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# सरकारची वीज जुळवाजुळव

## खासगी कंपन्यांकडून पुरवठा पूर्ववत; भारनियमन टप्प्याटप्प्याने कमी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य सरकारशी केलेला करार मोडून खुल्या बाजारात विजेची विक्री करणाऱ्या अदानी आणि टाटा या वीज उत्पादक कंपन्यांविरोधात सरकारने कारवाईचा पवित्रा घेतल्यानंतर शुक्रवारी या दोन्ही कंपन्यानी महावितरणाला पुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे सरकारला मोठा दिलासा मिळाला असून विजेची मागणी आणि पुरवठ्यातील तफावत कमी होत असल्याने राज्यातील भारनियमन टप्याटप्याने कमी करण्यात येणार असल्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी सांगितले.

कोळसा टंचाई आणि खाजगी वीज कंपन्यानी पुवठ्यात कपात केल्यामुळे राज्यात सुमारे २३०० ते २५०० मेगावॉट विजेची तूट निर्माण झाली होती.त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून वीजेची गळती आणि थकबाकी अधिक असलेल्या भागात चार ते पाच तासापर्यंतचे भारनियमन लागू करण्यात आले. खाजगी कंपन्यानी राज्याशी केलेला करार मोडून खुल्या बाजारात वीज विक्री करीत असल्याची बाब समोर येताच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या कंपन्यांवर कारवाईचे आदेश ऊर्जा विभागास दिले होते. त्यानुसार सरकारने अदानी, टाटा आणि जेएसडब्ल्यू या कंपन्यांना नोटिसा बजावल्या. एवढेच नव्हे तर या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यासमोर पाचारण करण्यात आले. दुपारी मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानी ऊर्जामंत्री तसेच खाजगी कंपन्याची बैठक पार पडली. त्यात महावितरणने आपले १८ हजार कोटी थकविले असून ते पैसे द्यावेत अशी मागणी अदानी कंपनीकडून करण्यात आली. केंद्राने परवानी दिल्यानंतर वीज उत्पादन वाढले असून वाढीव वीज देण्याची तयारी टाटा कंपनीने दर्शविली.

करारानुसार वीज पुरवठा न करणाऱ्या कंपन्यांना नोटीस बजावण्यात आली असून काही ठिकाणी पाऊस झाल्याने मागणी कमी झाली आहे. तसेच वाढीव वीजेमुळे काही प्रमाणात भारनियमन कमी झाले आहे. गुरुवारी एक लाख ३७ हजार २०० मेट्रीक टन चांगल्या प्रतीचा कोळसा आला असून शनिवारपासून भारनियमन टप्प्याटप्प्याने कमी होईल असे राऊत यांनी सांगितले.



**झाले काय?** अदानी सोबतचा वाद न्यायालयात असून सरकारशी केलेल्या कराराप्रमाणे वीज पुरवठा करावाच लागेल, नाहीतर कठोर कारवाई केली जाईल असा इशारा सरकारने दिला. त्यानंतर महानिर्मिती, टाटा आणि अदानी वीजनिर्मिती कंपन्यांनी महावितरणला अधिकची वीज उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

### उपलब्धता किती?

महावितरणला महानिर्मितीकडून साधारणतः ६ हजार ८०० मेगावॉटपर्यंत वीज मिळत होती, ती आता ७ हजार ५०० मेगावॉटपर्यंत मिळणार आहे तर अदानी पॉवर कंपनीकडून १७०० मेगावॉट वरून २२५० मेगावॅट पर्यंत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. विजेच्या उपलब्धततेनुसार मागणी व पुरवठा यातील तूट कमी होईल त्याप्रमाणे राज्यातील भारनियमन टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येणार असल्याचे महावितरण कंपनीने स्पष्ट केले.

# महाबळेश्वर, पाचगणीसह साताऱ्याला अवकाळी पावसाने झोडपले

**लोकसत्ता वार्ताहर**

**वाई :** साताऱ्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण निर्माण झाल्यानं प्रचंड उकाडा वाढला होता. त्यामुळे सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. महाबळेश्वर, पाचगणी, सातारा शहरासह जिल्ह्याला अवकाळी पावसानं झोडपलं. ढगांच्या गडगडाटासह जोरदार वाऱ्याने नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली.

सातारा शहरासह जिल्ह्यात आज सायंकाळी विजांच्या प्रचंड कडकडाटासह जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली. पर्यटनस्थळ असलेल्या महाबळेश्वर-पाचगणी येथील भिलार,कास पठार ,वाई, उत्तर कोरेगाव मधील पिपोडे,वाठार,शिवथर,सतारारोड या भागात जोरदार पाऊस झाला. आज सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्यानं उकाड्यात प्रचंड वाढ झाली होती. सोसाट्याच्या वाऱ्याने अनेकांची तारांबळ उडाली. वारा सुटल्याने सुमारे एक तासाहून अधिक काळ वीज गायब झाली होती. महाबळेश्वर मार्केटमध्ये अचानक पाऊस आल्यानं पर्यटकांची धावपळ उडाली. पावसात भिजत पर्यटकांनी पर्यटनाचा आनंद घेतला.मात्र विजांच्या व ढगांच्या गडगडाटाने अनेकांना धडकी भरली.उन्हाच्या कडाक्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला.

पाऊस सुमारे पाऊण तास जोरदार कोसळत होता, त्यामुळे सातारा शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली होती. तसेच पावसाच्या पाण्याचे मोठे लोट तयार होऊन राजवाडा, राधिका रोड, नगरपालिका चौक येथे पाण्याची तळी आणि डबकी साचली होती. मेघगर्जनेसह सुरू असलेल्या पावसात परिसरातील वीज गुल झाल्यामुळे आणखीनच भर पडली. सायंकाळी उशिरा वीज वितरण कंपनीकडून काही भागांमध्ये वीज चालू करण्यात आली. मात्र सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे तसेच मोठ्या फांद्या पडल्यामुळे अनेक परिसरात वीज रात्री उशिरापर्यंत गेलेलीच होती. दरम्यान अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्ग चिंतेत पडला असून काढणीला आलेला कांदा, न्हाळी ज्वारी, उन्हाळी भुईमूग, तसेच आंबा उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला. जोराच्या वाऱ्यामुळे शेकडो झाडाला लगडलेल्या कैऱ्यांचा खच शेतात पडून नुकसान झाले.



# राणा दांपत्याला पोलिसांची नोटीस

## मातोश्रीसमोर हनुमान चालिसा पठणाच्या इशाऱ्यामुळे कारवाई

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**मुंबई:** अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांना मुंबई पोलिसांनी शुक्रवारी प्रतिबंधात्मक नोटीस बजावली.

नवनीत राणा आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या मातोश्रीबाहेर हनुमान चालिसा पठण करणार असल्याचे जाहीर केले होते.

शुक्रवारी राणा दांपत्य मुंबईत दाखल झाले. त्यांच्या मुंबईतील खार येथील निवासस्थानी उपायुक्त मंजुनाथ सिंगे यांनी प्रतिबंधात्मक नोटीस बजावली.

मुंबईत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशी कुठलीही कृती करू नका असे आवाहनही यावेळी त्यांना करण्यात आले. वांद्रे पूर्व परिसरात शिवसैनिकांची वाढती संख्या लक्षात घेऊन पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवला होता.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ अंतर्गत खेरवाडी पोलिसांनी ही नोटीस बजावली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय निकुंबे यांच्या स्वाक्षरीने ही नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटीशीमध्ये जमावबंदीचा अथवा सार्वजनिक शांततेचा भंग होईल, असे कोणतेही कृत्य न करण्याची समज राणा यांना देण्यात आली आहे. त्यानंतरही तसे कृत्य केल्यास त्याला आपणास जबाबदार धरण्यात येईल. तसेच ही नोटीस न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात येईल, असेही या नोटीशीत नमूद केले आहे.

दरम्यान, पोलिसांनी मातोश्री, वर्षासह शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवास्थानीही अतिरिक्त बंदोबस्त ठेवला आहे.

### राणे यांना अटकेपासून दोन आठवडे संरक्षण

**मुंबई :** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी धुळे पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उच्च न्यायालयाने शुक्रवारी दोन आठवडे अटकेपासून अंतरिम संरक्षण दिले.

या प्रकरणी राणे यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन पोलिसांना कठोर कारवाईसह आरोपपत्र दाखल करण्यापासून मज्जाव करण्याचे आदेश देण्याची मागणी केली होती. न्यायालयाने राणे यांच्यावर कठोर कारवाई करणार नसल्याची हमी देणार का, अशी विचारणा करून सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते.

# मोहित कंभोज यांच्या गाडीवर शिवसेना कार्यकर्त्यांचा हल्ला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** भाजपचे नेते मोहित कंभोज यांच्या गाडीवर 'मातोश्री' परिसरात शिवसेना कार्यकर्त्यांनी शुक्रवारी रात्री हल्ला केला. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना रोखले.

खासदार नवनीत राणा यांनी 'मातोश्री'पुढे हनुमान चालिसा पठण करण्याचा इशारा दिल्यानंतर वातावरण तापले होते. शिवसेना कार्यकर्ते त्या परिसरात मोठ्या संख्येने उपस्थित होते. कंभोज मातोश्री बंगल्यापुढे गाडीतून उतरले आणि ध्वनिचित्रमुद्रण करीत होते. कंभोज पाहणी करीत असल्याचा संशय शिवसेना कार्यकर्त्यांना आल्याने ते त्यांच्यावर धावून गेले.

आपण एक विवाह समारंभ आटोपून चाललो होतो. आमदार प्रसाद लाड यांच्या गाडीतून उतरून माझ्या गाडीत बसण्यासाठी रस्त्यावर उतरलो होतो, असा दावा कंभोज यांनी केला.

शिवसेना कार्यकर्त्यांनी कंभोज यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. काही कार्यकर्त्यांकडे बॅट आणि अन्य साहित्य होते. त्यांनी गाडीची तोडफोड केल्याचा दावा कंभोज यांनी केला. कंभोज मातोश्री पुढेच गाडीतून का उतरले, असा सवाल शिवसेना कार्यकर्त्यांनी केला.

# रुपीच्या सारस्वत बँकेतील विलीनीकरणाबाबत प्रश्नचिन्ह

**लोकसत्ता प्रतिनिधी**

## खातेदारांचे ७०० कोटींचे दावे मंजूर

**ठेवींची वर्गवारी (रुपये कोटींमध्ये)**

| ठेवनिहाय वर्गीकरण | खातेदारांची संख्या | शिल्लक | विमा सुरक्षित ठेवी | असुरक्षित ठेवी |
|---|---|---|---|---|
| पाच लाखांपर्यंतचे ठेवीदार | ४,८६,५०८ | ७०२.४२ | ७०२.४२ | – |
| पाच लाख व त्यावरील ठेवीदार | ४७३१ | ६०१.८५ | २३६.५५ | ३६५.३० |
| एकूण | ४,९१,२३९ | १३०४.२७ | ९३८.९७ | ३६५.३० |

**पुणे :** ठेव विमा संरक्षण सुधारित कायदा २०२१ प्रमाणे रुपीच्या पात्र ठेवीदारांना ७०० कोटींच्या ठेवी परत मिळाल्या आहेत. त्यामुळे बहुसंख्य ठेवीदारांना दिलासा मिळाला असला, तरी ही बाब विलीनीकरणात अडथळा ठरली आहे. सारस्वत बँकेने रुपीच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव आरबीआयकडे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सादर केला होता. मात्र, आरबीआयने तब्बल दीड महिन्याने या प्रस्तावाला तत्त्वतः मान्यता दिली. पाच लाखांपर्यंतच्या ठेवीदारांना संरक्षण या कायद्यानुसार रुपी बँकेच्या ७०० कोटींच्या ठेवी ठेवीदारांनी सुचित केलेल्या अन्य बँकांत जमा केल्या. त्यामुळे सारस्वत बँकेची व्यावसायिक हानी झाली आहे. त्यामुळे सारस्वत बँकेसोबत विलीनीकरणाबाबतच सध्या प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सारस्वत बँकेने आरबीआयकडे काही सवलती मागितल्या आहेत, जेणेकरून विलीनीकरणामुळे बँकेच्या आर्थिक स्थितीवर अनावश्यक ताण येणार नाही. मात्र, त्याला आरबीआयने सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. रुपीच्या विलीनीकरणासाठी संबंधित बँकेला आरबीआयने सवलती व लागू असलेल्या वैधानिक निकषांमध्ये काही कालावधीसाठी शिथिलता देणे यासाठी रुपीकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. तरी देखील विलीनीकरणास मूर्त स्वरूप न आल्यास रुपीचे पुनरुज्जीवन किंवा लघु वित्त बँकेत रूपांतर करण्यासाठी आरबीआयकडे रितसर प्रस्ताव दाखल करण्यात येणार आहे. पुण्यातील आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या गोखले इन्स्टिट्यूट फॉर पॉलिटिक्स आणि इकॉनॉमिक्स या संस्थेकडून त्यावर अभ्यास अहवालही तयार करण्यात आला आहे. बँकेचे पुनरुज्जीवन किंवा लघु वित्त बँकेत रूपांतर करण्यासाठी पाच लाखांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या ठेवीदारांचे संपूर्ण योगदान आवश्यक आहे, अशी माहिती रुपीचे प्रशासक सनदी लेखापाल सुधीर पंडित यांनी दिली.

दरम्यान, ठेव विमा महामंडळाने रुपी बँकेकडून पात्र ठेवीदारांचे मागणी अर्ज मागवून घेतले. त्याप्रमाणे रुपी बँकेच्या ६४ हजार २४ खातेदारांकडून त्यांच्या विविध प्रकारच्या अंदाजे एक लाख २५ हजार ठेव खात्यांसाठी विहित नमुन्यात मागणी अर्ज सादर करण्यात आले. त्यांची छाननी झाल्यानंतर ठेव विमा महामंडळाने एकूण ७०० कोटींचे दावे मंजूर करून बँक ऑफ बडोदाद्वारे ठेवीदारांच्या एकूण ६८७.४२ कोटींच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत. आरबीआयच्या हार्डशिप योजनेंतर्गत एक लाख ठेवीदारांना ३० सप्टेंबर २०२१ पूर्वी ४०० कोटींच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत. काही अर्ज त्रुटींमुळे संबंधित बँकांकडून परत आल्याने अशा ठेवीदारांना त्यांची ठेव परत मिळू शकलेली नाही. ही संख्या १८०० असून त्या ठेवीदारांशी संपर्क करून त्रुटी दुरुस्त करण्यात येत आहेत, असेही पंडित यांनी सांगितले.

# कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या विस्ताराला काँग्रेस, शिवसेनेचीच वेसण

## जनसंवाद यात्रेचा आज करवीरनगरीत समारोप

**दयानंद लिपारे, लोकसत्ता**

**कोल्हापूर :** राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्ष विस्तार आणि लोकप्रतिनिधी संख्याबळ वाढावे यासाठी राज्यव्यापी जनसंवाद यात्रा सुरू आहे. पक्षाचे राष्ट्रीय नेते राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत उद्या शनिवारी करवीरनगरीत सभा होणार असली तरी त्यातून कोल्हापूर जिल्ह्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेमकी कोणती भर पडणार हा प्रश्न आहे. एकीकडे काँग्रेसचे वाढते संख्याबळ, संभाव्य जागावाटपात शिवसेनेचा अधिकचा दावा या दुहेरी कोंडीतून राष्ट्रवादीला लोकप्रतिनिधींचे पंख विस्तारण्यास अंगभूत मर्यादा आहेत. यावर मार्ग काढण्याची रणनीती या मेळाव्यात ठरणार का आणि ती आगामी काळात फलद्रूप होणार का हे यानिमित्ताने महत्त्वाचे ठरणार आहे.

जिल्ह्यात काँग्रेस, शेकापचे प्राबल्य राहिले. राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर एकाच वेळी तीन मंत्री, दोन खासदार ,अर्धा डझन आमदार असे राष्ट्रवादीचे आकडेवारीच्या पातळीवरचे स्थान भक्कम होते. पुढे पक्ष विस्तार खुंटला. लोकसभा निवडणुकीत धनंजय महाडिक यांच्या रूपाने असणारे खासदारकीचे पद गेले. त्याला काँग्रेसच्या नेत्याप्रमाणे राष्ट्रवादीचाही हातभार लागला होता. ही पक्षाने स्वतःच्याच पायावर मारून घेतलेली कुऱ्हाड असली तरी नेत्यांच्या राजकीय सोयीच्या दृष्टीने ते फायद्याचे गणित होते. शिवसेनेचे संजय मंडलिक यांना मदत केल्याने कागल, चंदगड येथे विधानसभेला पैरा फेडला गेला. पक्षाला जिल्ह्यात अन्यत्र विस्तार करायला वाव उरला नाही. विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचीही पीछेहाट झाली. ही पोकळी भरून काढत काँग्रेसने हात पसरत चार आमदार निवडून आणले. पदवीधर मतदारसंघातही स्थान मिळवले.

सध्या लोकसभेच्या दोन्ही जागा शिवसेनेकडे आहेत.महाविकास आघाडीने आगामी काळात एकत्रित लढण्याचे ठरवले तर येथे राष्ट्रवादीला मुळीच संधी राहणार नाही. स्वतंत्र लढण्याचे ठरले तर कोल्हापूर, हातकणंगले या दोन्ही मतदार संघात सक्षम उमेदवारांची वानवा आहे. प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी पुत्र प्रतीक यांस लोकसभेसाठी चाचपणी सुरू ठेवली आहे. तसे झाल्यास तुल्यबळ उमेदवार मिळू शकतो. विधानसभेसाठी कागल येथे भाजपने हसन मुश्रीफ यांच्यासमोर आत्तापासूनच आव्हान उभे करायला सुरुवात केली आहे.

चंदगडचे आमदार राजेश पाटील यांचा मार्गही सोपा म्हणावा असा नाही. राजकीय लागेबांधे सांधण्यात मुश्रीफ माहेर असल्याने ते त्यांची जागा राखू शकतील; पण जिल्ह्यात अन्य ठिकाणी पक्षवाढीस अंगभूत मर्यादा आहेत. शिरोळ मध्ये राजेंद्र पाटील-यड्रावकर हा सक्षम पर्याय शिवसेनेने मंत्रीपद देऊन हिरावून घेतला आहे. परिणामी हातकणंगले, इचलकरंजी, शाहूवाडी, कोल्हापूर उत्तर आणि दक्षिण या मतदारसंघात तोलामोलाचा उमेदवार मिळणे हेच मुळात आव्हान आहे.

राधानगरीमध्ये माजी आमदार के. पी. पाटील आणि जिल्हाध्यक्ष ए. वाय. पाटील या मेव्हण्या - पाहुण्यांमध्ये विकोपाला गेलेल्या वादात कोणाला उमेदवारी द्यायची हा कळीचा प्रश्न आहे.तुलनेने कोल्हापूर महापालिका, काही नगरपालिका, जिल्हा परिषद येथे प्रभाव दिसू शकेल. पण संसद आणि राज्याच्या विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस संख्याबळाच्या मर्यादा कसे ओलांडणार याचे आव्हान आहे. याची काही मात्रा जनसंवाद यात्रेतून मिळणार का याचे कुतूहल आहे.

### पिंपरीतील तरुणाचा थायलंड येथे मृत्यू

#### बाबर परिवारावर शोककळा

**पिंपरी :** थायलंड येथील एका आंतरराष्ट्रीय कंपनीत नोकरी करत असलेल्या पिंपरीतील तरुणाचा हृदयविकाराने मृत्यू झाला. तेथील सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यानंतर शनिवारी (२३ एप्रिल) त्याचे पार्थिव पिंपरीत आणले जाणार आहे.

सत्यजित संभाजी बाबर (वय ३५, रा. खराळवाडी, पिंपरी) असे या तरुणाचे नाव आहे. बँकॉक येथील अगोडा इंटरनॅशनल सर्व्हिस कंपनीत तो व्यवस्थापकपदी नोकरीला होता. गेल्या शनिवारी (१६ एप्रिल) कंपनीतील सहकाऱ्यांसमवेत सत्यजित थायलंड महोत्सवात सहभागी होण्यासाठी गेला होता. तेथे फिरण्यासाठी त्याने सायकल घेतली. उन्हात काही किलोमीटर सायकल चालवल्यानंतर सत्यजितला त्रास होऊ लागला. चक्कर आली व त्याच्या छातीत दुखू लागले. मित्रांनी त्याला रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. कंपनीने याबाबतची माहिती पिंपरीत बाबर कुटुंबीयांना कळवली, तेव्हा संपूर्ण परिवारावर शोककळा पसरली. सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यात आली. शनिवारी सकाळी पार्थिव पिंपरीत आणले जाणार आहे. त्यानंतर नेहरूनगर स्मशानभूमीत अंत्यविधी केले जाणार आहेत.

### महाविद्यालयाचे माहितीपुस्तक, प्रवेशअर्ज मराठीतून उपलब्ध करण्याचे विद्यापीठाचे निर्देश

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थांना नामफलक मराठीतून करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच महाविद्यालयाच्या पत्रव्यवहारात प्राधान्याने मराठीचा वापर करावा, महाविद्यालयाचे माहितीपुस्तक आणि प्रवेश अर्जही मराठीतून उपलब्ध करून देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाने शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्या अनुषंगाने युवा सेनेकडून महाविद्यालयांचे नामफलक मराठीतून लावण्याच्या मागणीचे निवेदन विद्यापीठाला देण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सहज दिसेल अशा पद्धतीने महाविद्यालयाचे, परिसंस्थेचे नाव दर्शनी भागात मराठीत असावे, महाविद्यालयाचे माहितीपुस्तक आणि प्रवेश अर्जही मराठीतून उपलब्ध करून द्यावेत, महाविद्यालयाच्या पत्रव्यवहारात प्राधान्याने मराठीचा वापर करावा, महाविद्यालयाच्या सूचना मराठीतून लिहिण्यास प्राधान्य द्यावे, कार्यशाळांमध्ये प्राधान्याने मराठीचा वापर करावा, मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात यावा, विविध चर्चासत्रे, स्पर्धांचे आयोजन करावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### संदीप कर्णिक यांच्याकडे सहपोलीस आयुक्तपदाची सूत्रे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सहपोलीस आयुक्तपदाची सूत्रे संदीप कर्णिक यांनी शुक्रवारी सायंकाळी स्वीकारली. मावळते सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्याकडून कर्णिक यांनी पोलीस आयुक्तालयात पदभार स्वीकारला. सहपोलीस आयुक्त शिसवे यांची मुंबईतील मानवी हक्क आयोगाच्या विशेष पोलीस महानिरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. बृहन्मुंबई पोलीस दलात अतिरिक्त पोलीस आयुक्त असलेले कर्णिक यांची पदोन्नतीने पुण्याच्या सहपोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्याचे आदेश गृहविभागाने नुकतेच दिले.

सहपोलीस आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी कर्णिक यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात 'श्रीं'चे दर्शन घेतले.

कर्णिक पुणे ग्रामीण पोलीस दलाचे अधीक्षक होते. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कर्णिक यांच्यावर शहरातील कायदा-सुव्यवस्था सांभाळण्याची धुरा सोपविण्यात आली आहे.

# विदर्भातील शंभर वर्षे जुन्या ग्रंथालयांची दुरवस्था

**राम भाकरे, लोकसत्ता**

**नागपूर :** वाचनाने माणूस घडतो आणि ही जडणघडण ग्रंथालयांमधून होते. अशाप्रकारे वाचन संस्कृतीला हातभार लावणारी विदर्भातील शंभर वर्षे जुनी १८ ग्रंथालयांची अवस्था सध्या अतिशय वाईट आहे. जागतिक ग्रंथ दिवस शनिवारी साजरा होतो आहे, त्या पार्श्वभूमीवर हे चित्र क्लेशदायक ठरते.

अनेक ग्रंथालयातील प्राचीन ग्रंथांना वाळवी लागलेली आहे, तर काही ग्रंथालयाच्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. शासकीय अनुदान मिळणे कमी झाल्याने व उत्पन्नाचे फारसे साधन नसल्यामुळे इमारती दुरुस्त करण्यासाठी निधी नाही, असे या ग्रंथालयांचे चित्र आहे.



शंभर वर्षे जुन्या ग्रंथालयांमध्ये नागपूरमधील महालातील राष्ट्रीय ग्रंथालय त्यापैकीच एक. त्याची स्थापना १८६१ ची. लोकमान्य टिळकांसह अनेक थोर पुरुषांनी याला भेटी दिल्या. पण आज ग्रंथालयाची इमारत पडायला आली. वर्धा जिल्ह्यातील आर्वीचे लोकमान्य ग्रंथालयाला स्वातंत्र्यवीर सावरकर, महर्षी कर्वे यांनी भेटी दिल्या असून त्याची तीच अवस्था आहे. अचलपूर, अमरावती, परतवाडा, खामगाव, वाशीम, अकोला, पुसद, यवतमाळ, वर्धा येथील ग्रंथालयांना मिळणारे अनुदान दोन वर्षापासून बंद आहे.

शंभर वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना ५ लाख रुपये देण्यात येणार असल्याचे यापूर्वी शासनाने जाहीर केले होते. पण तेही काही निवडक ग्रंथालयांना देण्यात आले.

गेल्या पाच-दहा वर्षात विदर्भातील ग्रंथालयाकडे सरकारचे दुर्लक्ष असल्यामुळे येणाऱ्या काळात ही शतकी पार केलेली ग्रंथालये बंद होतात का, अशी भीती कर्मचारी व ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये निर्माण झाली आहे.

> “पश्चिम महाराष्ट्रातील ग्रंथालयांना प्रोत्साहन देताना विदर्भातील ग्रंथालयाकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. जुन्या ग्रंथालयांना टिकवणे आवश्यक आहे. शतकोत्तर अनुदान एक वर्ष देण्यात आले नंतर बंद करण्यात आले.”
> – रवींद्र पांडे
> सहसचिव, ग्रंथालय भारती-

> “शंभर वर्षांपेक्षा अधिक जुन्या ग्रंथालयांच्या इमारत जीर्ण झाल्या आहेत. अनुदान पुरेसे मिळत नाही, त्यामुळे देखभाल दुरुस्तीवर मर्यादा आल्या आहेत. अनेक ग्रंथालयांना स्वमालकीच्या इमारती नाहीत.”
> – पद्मश्री तांबेकर
> अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रंथालय, महाल

### विदर्भातील शंभरी पार केलेली ग्रंथालये

- राष्ट्रीय वाचनालय महाल, नागपूर स्थापना- १८६१
- राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय - १८६९
- लोकमान्य वाचनालय, आर्वी - १८६५
- सत्यनारायण बजाज सार्वजनिक ग्रंथालय, वर्धा - १८७०
- महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय, हिंगणघाट - १८९५
- सार्वजनिक वाचनालय, परतवाडा - १८६९
- अमरावती नगर वाचनालय - १८६७
- सार्वजनिक वाचनालय, अचलपूर शहर - १८९५
- नगर वाचनालय, वणी - १८७४
- नागर वाचनालय, यवतमाळ - १८८७
- देशभक्त शंकरराव सर नाईक सार्वजनिक वाचनालय - १८८६
- नगर वाचनालय अकोट - १८८५
- दस्तुर रतनजी ग्रंथालय खामगाव - १८८९
- सार्वजनिक वाचनालय भंडारा - १८९१
- राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालय, वाशीम - १८९९
- लोकमान्य टिळक वाचनालय, ब्रम्हपुरी - १९०३
- बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला - १८६०

# महाराष्ट्र दिनी कोकण रेल्वेच्या दहा गाड्या विजेवर धावणार



**रत्नागिरी, प्रतिनिधी**

**कोकण रेल्वे** मार्गावरील विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले असल्याने महाराष्ट्र दिनाचे (१ मे) औचित्य साधून पहिल्या टप्प्यात दहा गाडया विजेवर चालवण्याचा निर्णय कोकण रेल्वे महामंडळाने घेतला आहे.

कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या मांडवी एक्स्प्रेस, जनशताब्दी, कोकणकन्या, मत्स्यगंधा, नेत्रावती, मंगला एक्स्प्रेस इत्यादी प्रमुख गाड्यांचा यामध्ये समावेश आहे.

रोहा ते ठोकूर या सुमारे ७०० किलोमीटर लांबीच्या कोकण रेल्वेचा मार्गावर विद्युतीकरणाचे काम २०१५ मध्ये हाती घेण्यात आले. सहा टप्प्यातील योजनेसाठी सुमारे १ हजार १०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. रोहा ते रत्नागिरी, रत्नागिरी ते थिविम, थिविम ते वेरणा, वेरणा ते कारवार, कारवार ते बिजूर, बिजूर ते ठोकूर या सहा टप्प्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गेल्या मार्च महिन्यात या कामाची तपासणी केली. त्यानंतर प्रायोगिक तत्त्वावर प्रथम मालगाड्या आणि नंतर प्रवासी गाड्या या मार्गावर सोडण्यात आल्या. त्याही चाचण्या यशस्वी झाल्यामुळे आता या मार्गावर दहा प्रमुख गाड्या नियमितपणे विजेवर धावू लागणार आहेत.

यापूर्वी विद्युतीकरण नसल्यामुळे एखाद्या पट्टयात लांब पल्ल्याच्या गाड्या धावताना समस्या येत होती. मध्य रेल्वेच्या रोहा स्थानकापर्यंत विद्युतीकरण असल्याने विजेवरील लोको मेल, एक्स्प्रेस गाडयांना जोडल्या जात होत्या. त्यापुढे विद्युतीकरण नसल्याने डिझेलवरील लोको जोडून मेल, एक्स्प्रेस चालवण्याशिवाय पर्याय नव्हता. ही समस्या आता दूर झाली आहे. पहिल्या टप्प्यात रोहा ते रत्नागिरीचे काम पूर्ण झाले होते. या मार्गावर प्रथम विजेचे इंजिन लावून गाडी चालवण्यात आली. त्यात कोणत्याही अडचणी आल्या नव्हत्या. त्यानंतर पुढील टप्प्यात रत्नागिरी ते मडगावचे काम पूर्ण करण्यात आले. रेल्वे सुरक्षा पथकाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर सर्व गाड्या सोडण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. विजेचे इंजिन जोडून मंगळूरु सेंटर ते मडगाव पॅसेंजर, तिरुवंतपुरम ते निजामुद्दीन राजधानी एक्स्प्रेस, मडगाव ते निजामुद्दीन राजधानी एक्स्प्रेससह मंगला एक्स्प्रेस, मांडवी, जनशताब्दी, कोकणकन्या, मत्स्यगंधा, नेत्रावती एक्स्प्रेस याही गाडया विजेवर चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे वेळेची बचत आणि प्रदूषणाला आळा बसणार आहे.

# मिटकरी यांच्याविरोधात कोल्हापुरात तक्रार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

कोल्हापूर :आमदार अमोल मिटकरी यांच्याविरोधात हिंदू धर्माच्या धार्मिक विधींची टिंगल केल्याप्रकरणी येथील गांधीनगर पोलीस ठाण्यात विक्रम चौगुले, अजित पाटील यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी संघटनांनी केली असल्याचे सुनील घनवट यांनी शुक्रवारी सांगितले.

राष्ट्रवादी आमदार मिटकरी यांनी जाहीर कार्यक्रमात हिंदू धर्मातील कन्यादान विधी, त्यांतील मंत्र आणि पुरोहितवर्ग यांचा अपमान केला. ‘या विधींच्या माध्यमातून बहुजन समाजाला फसवले जात आहे,’ असे वक्तव्यही केले. त्यांनी या भाषणातून एका समाज घटकाच्या विरोधात जातीय तेढ निर्माण होईल, अशी भाषा वापरली आहे. कन्यादान विधीच्या मंत्राची टिंगल मिटकरींनी केली, तशी टिंगल अजानबाबत करण्याची हिंमत आहे का ? असा सवाल समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने घनवट यांनी केला आहे.

# पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २० जुलैला!

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २० जुलैला घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली असून आता ३० एप्रिलपर्यंत अर्ज भरता येईल, तर २ मेपर्यंत शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल. राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

राज्य परीक्षा परिषदेमार्फत पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा जानेवारी-फेब्रुवारीमध्ये घेण्यात येते. मात्र करोना प्रादुर्भावामुळे विलंबाने सुरू झालेल्या शाळा, टीईटी गैरव्यवहारप्रकरणी सुरू असलेला पोलिस तपास, परीक्षेचे कामकाज देण्यात आलेल्या खासगी कंपनीने न्यायालयात दाखल केलेली याचिका अशा कारणांमुळे शिष्यवृत्ती परीक्षेच्या नियोजनावर परिणाम झाला. शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख जाहीर झाली नसल्याने विद्यार्थी, पालक, शिक्षकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. तसेच या परीक्षेच्या तारखेकडे लक्ष लागले होते. या पार्श्वभूमीवर यंदा २० जुलैला राज्यभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाचवेळी पाचवी आणि आठवीची परीक्षा घेण्याचे नियोजन परीक्षा परिषदेकडून करण्यात आले आहे. तसेच अर्ज करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी ३० एप्रिल आणि शुल्क भरण्यासाठी २ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

गेल्यावर्षीही करोनाच्या प्रादुर्भावामुळे शिष्यवृत्ती परीक्षा लांबली होती. आता सलग दुसऱ्या वर्षी परीक्षा लांबल्याचे स्पष्ट झाले आहे.

# इतर राज्यात शिक्षण घेणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा मार्ग मोकळा

**राजेश्वर ठाकरे, लोकसत्ता**

**नागपूर :** आर्थिक अडचणीमुळे परराज्यात व्यावसायिक शिक्षण घेऊ न शकणाऱ्या व्हीजेएनटी, एसबीसी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परराज्यातील नामवंत शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेणे सुलभ झाले आहे. विशेष म्हणजे ही शिष्यवृत्ती ऑफलाईन पद्धतीने दिली जाणार आहे.

महाराष्ट्रातील रहिवासी असणारे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थी जे इतर राज्यातील खासगी विनाअनुदानित व कायम अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात त्यांना २०१७-१८ या वर्षापासून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, निर्वाह भत्ता देण्याला राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यासंदर्भातील परिपत्रक २५ मार्च २०२२ ला काढण्यात आले आहे. दरम्यान, इतर मागास बहुजन कल्याण विभाग ९ मार्च २०१७ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामधून वेगळा झाला. परंतु या विभागाने परराज्यातील शिष्यवृत्ती संदर्भात परिपत्रक काढले नव्हते. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित होते. दुसरीकडे सामाजिक न्याय विभागाने परपरिपत्रक (६ फेब्रुवारी २०१९) काढल्याने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत होती. यासंदर्भात ओबीसी संघटनांनी पाठपुरावा केल्याने आता इतर मागास बहुजन कल्याण विभागानेही परिपत्रक काढल्याने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दुसरे म्हणजे महाराष्ट्र शासनाने महाडिबीटी पोर्टल निर्माण करून राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन मागितले होते, परंतु या पोर्टलवर इतर राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्थांचा उल्लेख नसल्यामुळे परराज्यात शिक्षण घेण्याऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना भारत सरकारची पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशीप शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करणे शक्य नव्हते. त्यामुळे या विद्यार्थ्यांकडून सत्र २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात आले. परंतु त्यांचे अर्ज नूतनीकरण करून सत्र २०१८-१९, २०१९-२० आणि २०२०-२१ ची शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली नाही. याचा फटका विद्यार्थ्यांना बसत होता. आता राज्य सरकारने या अडचणी दूर केल्या आहेत. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने परराज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाचा मुद्दा मुख्यमंत्री आणि ओबीसी खात्याकडे उपस्थित केला होता. शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन ओबीसी विद्यार्थ्यांची अडचण दूर केली, असे संघटनेचे चे सरचिटणीस सचिन राजूरकर यांनी सांगितले.

‘टीईटी’ गैरव्यवहार

# सनदी अधिकारी खोडवेकर यांना जामीन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेले सनदी अधिकारी, शालेय शिक्षण विभागाचे तत्कालीन उपसचिव सुशील खोडवेकर यांना शुक्रवारी जामीन मंजूर करण्यात आला. या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाले असून तपासही पूर्ण झाल्याचे नमूद करून अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. के. पत्रावळे यांनी खोडवेकर यांची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

शिक्षक पात्रता परीक्षा २०१९-२० मधील गैरव्यवहार प्रकरणाचा पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेकडून तपास करण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असताना शालेय शिक्षण विभागाचे तत्कालीन उपसचिव सुशील खोडवेकर (वय ४३) गैरव्यवहार प्रकरणात सामील असल्याचे आढळून आले होते.

खोडवेकर यांनी या प्रकरणात अटकेत असलेला आरोपी शिक्षण विभागाचा तांत्रिक सल्लागार अभिषेक सावरीकर याच्याकडून अपात्र उमेदवारांना पात्र ठरविण्यासाठी पैसे घेतले, अशी माहिती शिक्षण परिषदेचे आयुक्त तुकाराम सुपे यांनी चौकशीत दिली होती. त्यानंतर या प्रकरणात २९ जानेवारी रोजी खोडवेकर यांना ठाण्यातून अटक करण्यात आली होती. खोडवेकर यांच्या वतीने ॲड. एस. के. जैन, ॲड. अमोल डांगे, ॲड. अमेय गोऱ्हे, ॲड. तन्मय गिरे यांनी बाजू मांडली.

प्रथम माहिती अहवालात (एफआरआय) खोडवेकर यांचे नाव नाही. त्यांच्याकडून मोबाइल, पेन ड्राइव्ह जप्त करण्यात आला होता. त्या शिवाय खोडवेकर यांच्याकडून अन्य काही साहित्य जप्त करण्यात आले नाही. या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाले असून खोडवेकर यांचा जामीन मंजूर करण्याची विनंती ॲड. एस. के. जैन आणि ॲड. अमोल डांगे यांनी युक्तिवादात केली. त्यानंतर खोडवेकर यांची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

# चोरीच्या विजेतून संजय राऊत यांची सभा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्यात भारनियमन सुरू असताना व त्याविरुद्ध जनमानसात असंतोष असतानाच ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या नागपूर शहरात शिवसेना नेते संजय राऊत यांच्या जाहीर सभेसाठी वीजचोरी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

विजेची मागणी आणि पुरवठ्यात तूट निर्माण झाल्याने राज्यात भारनियमन केले जात असल्याचे गुरुवारी ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी जाहीर केले होते तसेच वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशाराही दिला होता. नेमक्या त्याच दिवशी नागपुरात रात्री शिवसेना नेते संजय राऊत यांची गजाननगर परिसरात जाहीर सभा झाली. या सभेसाठी वीज चोरी करण्यात आल्याचे उघड झाले आहे. आयोजकांनी सभेसाठी महावितरणच्या वीज वाहिनीवर आकडे टाकून वीज घेतल्याचे तपासणीत उघड झाले.

एकीकडे राज्यातील जनता ऐन उन्हाळ्यात होणाऱ्या भारनियमनाचे चटके सहन करीत असताना दुसरीकडे सत्ताधारी पक्षाच्या जाहीर सभांसाठी वीजचोरी केली जात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



> ‘सभेसाठी वीजचोरी करण्यात आल्याचे वृत्तवाहिनीवर बघितले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी पक्षांतर्गत समिती स्थापन केली आहे. त्यानंतर योग्य कारवाई केली जाईल.’
> – संजय राऊत, खासदार, शिवसेना.

> ‘सभेसाठी परिसरातील गजानन महाराजांच्या मंदिरातून व्यवस्थापनाच्या परवानगीने वीज पुरवठा घेतला होता. मात्र कंत्राटदाराने ‘हॅलोजन’साठी आकडे टाकून वीजपुरवठा घेतला का? याची आम्ही विचारणा केली आहे.’
> – नितीन तिवारी, शहर प्रमुख, शिवसेना, नागपूर.

> ‘गजाननगर येथे २१ एप्रिल रोजी झालेल्या सभेसाठी अवैधरित्या वीजपुरवठा होत असल्याची तक्रार मिळाली. त्यानुसार महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तपासणी केली असता बिरजू मसराम (कंत्राटदार) याने वीज तारांवर आकडे टाकून वीज घेतल्याचे आढळून आले. विद्युत कायदा कलम १३५ नुसार मसराम यांच्याविरोधात कारवाई करून ३,४९७ रुपये दंड वसूल करण्यात आला.’
> – प्रवीण स्थूल, जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर.

# सह्याद्री व्याघ्रप्रकल्पात विशेष व्याघ्र संरक्षण दलाची गरज

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** व्याघ्रप्रकल्पात वाघांसोबतच इतरही जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन व्हावे आणि जंगल सुरक्षित राहावे यासाठी राज्यातील इतर व्याघ्रप्रकल्पांप्रमाणेच सह्याद्री व्याघ्रप्रकल्पातही विशेष व्याघ्र संरक्षण दलाची नेमणूक करावी, अशी मागणी गेल्या सात-आठ वर्षांपासून केली जात आहे. याबाबत केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना पुन्हा एकदा पत्र देण्यात आले असून त्यांनी यावर सकारात्मक आश्वासन दिले आहे.

अलीकडच्या काही वर्षात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पासह लगतच्या बफर क्षेत्र आणि वेगवेगळ्या संवर्धन राखीव क्षेत्रात शिकारी, वृक्षतोडीच्या घटना वाढल्या आहेत. वन्यप्राण्यांच्या हालचाली टिपण्यासाठी लावलेले कॅमेरा ट्रॅपची चोरी, औषधी वनस्पती तस्करी, वणवे लावणे, अशा वेगवेगळ्या घटना समोर आल्या आहेत. तत्कालीन क्षेत्र संचालकांनी शासन व राष्ट्रीय संरक्षण प्राधिकरण नवी दिल्ली, यांच्याकडे याबाबत अनेकदा पत्रव्यवहार केला. २०१४ मध्ये साताऱ्याचे मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनी ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या लक्षात आणून दिली. त्यांनीही तत्कालीन केंद्रीय वनमंत्री विरप्पा मोईली यांना पत्र लिहून याकडे त्यांचे लक्ष वेधले. या पत्रावर कार्यवाही करत केंद्राने मेळघाट व्याघ्रप्रकल्पाला विशेष व्याघ्र संरक्षण दल मंजूर केले, पण सह्याद्री अजूनही त्यापासून वंचित आहे. त्यानंतर याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वर्तमान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही पत्र लिहिण्यात आले. आता केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांचेही याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. त्यांनी भाटे यांचे पत्र विशेष अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवले आहे.

**केंद्राची परवानगी**

२००९ साली केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना काढल्या होत्या. त्यामध्ये १३ व्याघ्र प्रकल्पामध्ये ‘विशेष व्याघ्र संरक्षण दल’ निर्मिती करण्याची परवानगी दिली होती व वनविभागाने त्यांच्या पातळीवरच स्वतंत्र्य दलाची निर्मिती करावी, असे स्पष्ट निर्देश दिले.

**व्याघ्रप्रकल्प कुठे...**

महाराष्ट्रात मेळघाट, ताडोबा-अंधारी, पेंच, नवेगाव-नागझिरा, बोर, व सह्याद्री हे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून त्याची व्याप्ती सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी जिल्ह्यात आहे. ११६५ चौ.किमी. मध्ये हा प्रकल्प विस्तारला आहे. त्यापैकी ताडोबा-अंधारी, पेंच या व्याघ्रप्रकल्पांना २०११-२०१२ मध्ये तर मेळघाट व्याघ्रप्रकल्पाला २०१४ मध्ये विशेष व्याघ्र संरक्षण दल देण्यात आले.

# शरद पवारांवरील नास्तिकतेचा आरोप चुकीचा – सुप्रिया सुळे

**वार्ताहर कराड**

**कराड :** शरद पवार हे नास्तिक नसून तेही हिंदू मंदिरात दर्शनासाठी जातात. त्यांनी अनेक मंदिरांसाठी निधीदेखील दिला असल्याने त्यांच्यावरील नास्तिकतेचा किंवा हिंदूविरोधी असल्याचा आरोप चुकीचा असल्याचा खुलासा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी कराड येथे माध्यमांशी बोलताना केला.



पवार यांच्या नास्तिकतेबद्दल किंवा हिंदूविरोधी असल्याबद्दल विरोधकांकडून त्यांच्यावर सध्या टीका केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून पवारांच्या मंदिर भेटीचे, देवदर्शनाचे अनेक पुरावे सध्या सादर केले जात आहेत. याच मुद्द्यावर बोलताना सुळे यांनी हा मुद्दा खोडून काढत वरील वक्तव्य केले.

सुळे म्हणाल्या, की नुकतीच मी सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिरात गेले असता तेथील अध्यक्षांनी तुम्ही दुसऱ्यांदा येथे आलात. अजित पवारही दोनवेळा आलेत. तर शरद पवार येऊन गेले असून, त्यांनी या मंदिरासाठी निधीही दिला असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्यावरील नास्तिकतेचा किंवा हिंदूविरोधी असल्याचा आरोप चुकीचा आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी हिंदू धर्मातील कन्यादान विधीची नक्कल करत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर बोलण्यास सुळे यांनी नकार दिला. या विषयावर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सविस्तर बोलले असल्याचे सांगत सुळे यांनी बोलणे टाळले.

**आ. ह. साळुंखे यांच्याशी चर्चा**

वाई : राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी ज्येष्ठ साहित्यिक आ. ह. साळुंखे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या वेळी दोघांमध्ये सुमारे सव्वातास चर्चा झाली. मात्र या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना ही सहजभेट असल्याचे सांगत सुळे यांनी यावर अधिक बोलण्याचे टाळले.

सुळे शुक्रवारी सातारा दौऱ्यावर आल्या आहेत. या वेळी त्यांनी अचानकपणे ज्येष्ठ साहित्यिक आ. ह. साळुंखे यांची भेट घेतली. या राजकीय भेट नसून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आपण येथे आल्याचे त्यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, की साळुंखे यांचा व माझा फार पूर्वीपासून परिचय आहे. त्यांच्या साहित्याची मी पहिल्यापासून प्रशंसक आणि वाचक आहे. या भेटीमध्ये त्यांच्या साहित्य संदर्भाच्या अनुषंगाने चर्चा केल्याचे सुळे यांनी सांगितले.

# छत्तीसगडमध्ये कोळशाची खाणच घेण्याचा राज्याचा प्रयत्न

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यात भारनियमन सुरू असले, तरी भारनियमन न करता सुरळीत वीज पुरवठा होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. परदेशातून कोळसा आयात करण्याचा निर्णय झाला आहे. याशिवाय छत्तीसगड राज्यातील एक खाण घेण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत आहे, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिली.

पुणे दौऱ्यावर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले,की राज्याला कोळसा उपलब्ध होत नाही. अन्य कोणत्या राज्यांमध्ये कोळसा उपलब्ध आहे किंवा कसे, याची माहिती घेण्यात येत आहे.

मी दर आठवड्याला ऊर्जा विभागाची आढावा बैठक घेणार आहे. राज्यातील वाढती विजेची मागणी पाहता अखेर भारनियमन करण्याचा निर्णय ऊर्जा मंत्रालयाकडून घेण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्रात भारनियमन लागू करण्यात आले आहे. सध्या विजेचा तुटवडा वाढल्याने त्यावर परदेशातून कोळसा आयात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

छत्तीसगडमध्ये महाराष्ट्र सरकार कोळशाची नवी खाणच विकत घेण्याचा विचार करत आहे. छत्तीसगडमध्ये आमच्या विचारांचे सरकार आहे. राज्यातील कोळसा तुटवड्यावर तोडगा काढण्यासाठी त्याचा उपयोग होईल. देशात कोळशाची मागणी वाढली आहे. महाराष्ट्राला अन्य राज्यांपेक्षा कमी कोळसा मिळत आहे.

कोळशाची वाहतूक करण्यासाठी योग्य वेळी रेल्वेसेवा उपलब्ध होत नसल्याने त्याचा वीजनिर्मितीला फटका बसतो आहे, असेही पवार यांनी सांगितले.

### घरचा आहेर

राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कोणत्याही समाज किंवा घटकांवर वक्तव्य करताना तारतम्य बाळगले पाहिजे, अशा शब्दांत पवार यांनी आमदार मिटकरींना सुनावले.



तसेच करोना काळात राज्यातील मंत्र्यांनी खासगी रुग्णालयांमध्ये उपचार करून घेतल्यावर सरकारी पैशांऐवजी स्वतःचे पैसे देणे आवश्यक होते. मी खासगी रुग्णालयात उपचार घेतले ; पण देयक मी दिले आहे, असे सांगत पवार यांनी स्वपक्षासह महाविकास आघाडीतील मंत्र्यांना सुनावले. करोनाबाधित रुग्ण दिल्लीमध्ये वाढू लागले आहेत. त्यामुळे करोना पूर्णपणे गेला, अशी स्थिती नाही. सरकारने बंधने काढली असली, तरी मुखपट्टी लावायचा की नाही हे ऐच्छिक आहे. मी नियमितपणे मुखपट्टी वापरतो, तुम्हीही माझ्यासारखे पालन करू शकता, असे पवार यांनी सांगताच उपस्थितांमध्ये एकच हंशा पिकला.

# जालन्यात दुधाच्या दराची शंभरी

**जालना :** जालन्यात येत्या ३ मे रोजीच्या अक्षय तृतीयेपासून शुद्ध दुधाचा दर लिटरमागे शंभर रुपये करण्याचा निर्णय दूध उत्पादक संघटनांकडून घेण्यात आला. या संदर्भात महाराष्ट्र गवळी समाज संघटना व जिल्हा दुग्ध उत्पादक संघाच्या वतीने शुक्रवारी संघटनेच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष सुनील रुपा पहेलवान खरे, तर मुख्य मार्गदर्शक म्हणून बाबुमामा सतकर, भीम पहेलवान लाड, विठ्ठलआप्पा अवघड, गणेश चौधरी, नरेंद्र जांगडे, नारायण आप्पा काटकर उपस्थित होते. जनावरांच्या खली, चारा, सरकी, कडबा आदीच्या दरवाढीमुळे दुग्ध व्यावसायिकांना दूध उत्पादनात तोटा सहन करावा लागत आहे. यामुळे दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांना आपले पशुधन विकण्याची वेळ आली असून या अनुषंगाने जिल्ह्यातील दुग्ध व्यावसायिकांना दुधाची दरवाढ करावी लागत असल्याचे बैठकीत ठरले.

जालना जिल्ह्यात शुद्ध दुधाचे दर प्रति लिटर १०० रुपये व फॅटप्रमाणे १० रुपये, असे राहील, याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले.

सायं. ५ वा. प्रीमियर लीग फुटबॉल — आर्सेनल वि. मँचेस्टर युनायटेड | थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स ३, सिलेक्ट २

रात्री १० वा. बुंडेसलिगा फुटबॉल — बायर्न म्युनिक वि. बोरुसिया डॉर्टमंड | थेट प्रक्षेपण : सोनी टेन २



एरिक टेन हाग यांची इंग्लंडमधील बलाढ्य फुटबॉल संघ मँचेस्टर युनायटेडच्या प्रशिक्षकपदी नेमणूक झाली आहे. ते पुढील हंगामापासून प्रशिक्षकपदाचा कार्यभार सांभाळतील.





## संक्षिप्त

### बॅडमिंटन : सिक्की, अश्विनीची माघार

**नवी दिल्ली :** दुखापतींमुळे सिक्की रेड्डी आणि अश्विनी पोनप्पा या भारताच्या दुहेरी बॅडमिंटन जोडीने आगामी उबेर चषक स्पर्धेतून माघार घेतली आहे, अशी माहिती भारतीय बॅडमिंटन संघटनेने दिली. बँकॉक येथे ८ ते १५ मे या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. सिक्कीच्या पोटाच्या आतड्यांना दुखापत झाली असून, डॉक्टरांनी तिला सहा ते आठ आठवडे विश्रांती सल्ला दिला आहे. त्यांच्या जागी निवड समितीने सिमरन सिंग आणि रितिका ठक्कर जोडीला संधी दिली आहे, असे भारतीय बॅडमिंटन संघटनेचे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी सांगितले.

### तिरंदाजी : तरुणदीप–रिद्धी अंतिम फेरीत

**अंताल्या :** सांघिक गटात अपयशी ठरल्यानंतर तरुणदीप राय आणि रिद्धी फोर जोडीने शुक्रवारी रीकर्व्ह मिश्र दुहेरीत स्पेनचा ५-३ असा पराभव करून जागतिक तिरंदाजी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारताच्या दुसऱ्या पदकाची निश्चिती केली. पाचव्या मानांकित भारतीय जोडीने ३८-३५, ३६-३९, ३८-३८, ३६-३५ अशा फरकाने सामना जिंकला. आता तरुणदीप-रिद्धी जोडीची रविवारी सुवर्णपदकाच्या लढतीत ब्रिटनच्या जोडीशी गाठ पडणार आहे.

### रायन कॅम्पबेल यांची प्रकृती चिंताजनक

**लंडन :** नेदरलँड्सचे माजी प्रशिक्षक रायन कॅम्पबेल यांची प्रकृती चिंताजनक आहे. आठवड्यापूर्वी हृदयविकाराच्या झटक्यामुळे त्यांना लंडनमधील रॉयल स्टोक युनिव्हर्सिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शुक्रवारी कॅम्पबेल यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबीयांनी माहिती दिली. जानेवारी २०१७ मध्ये कॅम्पबेल यांनी नेदरलँड्सच्या प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारली.

# धोनीतील विजयवीर अबाधित!

## संस्मरणीय खेळीनंतर चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार जडेजाचा विश्वास

**पीटीआय, नवी मुंबई**

**महेंद्रसिंह धोनी** कारकीर्दीच्या अखेरच्या टप्प्यावर असला, तरी त्याच्यातील धावांची भूक कायम आहे. तो अजूनही जगातील सर्वोत्तम विजयवीर आहे, अशा शब्दांत

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमधील चेन्नई सुपर किंग्ज संघाचा कर्णधार रवींद्र जडेजाने आपल्या अनुभवी सहकाऱ्याचे कौतुक केले.

चेन्नईने गुरुवारी झालेल्या 'आयपीएल'च्या सामन्यात मुंबई इंडियन्सवर तीन गडी राखून मात केली. चेन्नईचा हा सात सामन्यांत दुसरा विजय ठरला. त्यामुळे चेन्नईने आपले यंदाच्या स्पर्धेतील आव्हान कायम राखले आहे. या सामन्यात चेन्नईला अखेरच्या चार चेंडूंत विजयासाठी १६ धावांची आवश्यकता होती. धोनीने जयदेव उनाडकटच्या गोलंदाजीवर दोन चौकार, एक षटकार आणि एका दुहेरी धावेच्या साहाय्याने या धावा करत चेन्नईला अशक्यप्राय वाटणारा विजय मिळवून दिला. त्याने केवळ १३ चेंडूंत नाबाद २८ धावांची खेळी केली. त्यामुळे धोनीने आपले महत्त्व पुन्हा सिद्ध केल्याचे जडेजा म्हणाला.

''धोनीतील धावांची आणि संघाला विजय मिळवून देण्याची भूक अजूनही कायम आहे. या सामन्यात अखेरच्या षटकांमध्ये दोन्ही संघांवर दडपण होते. मात्र, धोनी मैदानात असल्याने आम्हाला फारशी चिंता वाटत नव्हती. त्याने याआधी भारताला आणि 'आयपीएल'मध्ये चेन्नईला अनेक सामने जिंकवून दिले आहेत. तो अखेरच्या षटकापर्यंत खेळपट्टीवर असल्यास आम्हाला सामना जिंकण्याची खात्री होती आणि तसेच झाले. आपण अजूनही सर्वोत्तम विजयवीर असल्याचे धोनीने पुन्हा एकदा दाखवून दिले,'' असे जडेजाने सामन्यानंतर मुंबईविरुद्ध सांगितले.



### रोहित, इशानला जयवर्धनेचा पाठिंबा

पाच वेळा 'आयपीएल' विजेत्या मुंबई इंडियन्सला यंदाच्या हंगामात सलग सात सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे. तसेच कर्णधार रोहित शर्मा आणि इशान किशन या मुंबईच्या सलामीवीरांनीही निराशा केली आहे. मात्र, मुंबईचा प्रशिक्षक महेला जयवर्धनेने या दोघांना पाठिंबा दर्शवला आहे. ''इशानला पहिल्या दोन-तीन सामन्यांनंतर कामगिरीत सातत्य राखता आले नाही. रोहितला १५-२० धावांपर्यंत पोहोचण्यात यश येत आहे. मात्र, तो मोठी खेळी करू शकलेला नाही. परंतु मला या दोघांबाबत फारशी चिंता वाटत नाही. ते सरावादरम्यान चांगली फलंदाजी करत आहेत. त्यांचा आत्मविश्वासही खालावलेला नाही. त्यामुळे ते लवकरच दमदार कामगिरी करतील याची मला खात्री आहे,'' असे प्रशिक्षक जयवर्धनेने नमूद केले.

### मोक्याच्या क्षणी खेळ उंचावणे गरजेचे -सचिन

ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये एखादी चूकही खूप महागात पडू शकते. त्यामुळे मुंबई इंडियन्सने चूका सुधारून मोक्याच्या क्षणी खेळ उंचावणे गरजेचे आहे, असे मत या संघाचा प्रेरक सचिन तेंडुलकरने व्यक्त केले. ''ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये प्रत्येक चेंडू खूप महत्त्वाचा असतो. तुम्ही एखादी चूक केली, तरी तुम्हाला सामना अवघ्या दोन-तीन धावांनी गमवावा लागतो. त्यामुळे मोक्याच्या क्षणी खेळ उंचावणे गरजेचे असते आणि मुंबईला यातच यंदा अपयश आले आहे. आम्ही या चूकांमधून धडा घेणे आवश्यक आहे,'' असे सचिन म्हणाला.

## बटलरमुळे राजस्थानचा दिल्लीवर विजय

**मुंबई :** जोस बटलरचे यंदाच्या 'आयपीएल'मधील तिसरे शतक आणि प्रसिद्ध कृष्णाचा भेदक मारा (२२ धावांत ३ बळी) या बळावर राजस्थान रॉयल्सने शुक्रवारी दिल्ली कॅपिटल्सवर १५ धावांनी विजय मिळवला.



राजस्थानने २ बाद २२२ अशी 'आयपीएल'मधील सर्वोत्तम धावसंख्या उभारली. यात बटलरने ६५ चेंडूंत नऊ चौकार आणि नऊ षटकारांच्या साहाय्याने ११६ धावांची खेळी उभारली. याचप्रमाणे देवदत्त पडिक्कल (३५ चेंडूंत ७ चौकार, २ षटकारांसह ५४ धावा) समवेत १५.५ षटकांत १५५ धावांची सलामी दिली. संजू सॅमसनने नाबाद ४६ धावांचे योगदान दिले.

त्यानंतर, पृथ्वी शॉ (३७) आणि डेव्हिड वॉर्नर (२८) यांनी ४३ धावांची सलामी दिली. मग कर्णधार ऋषभ पंतने ४४ धावांसह धावसंख्येला आकार दिला. ललित यादव (३७) आणि रोव्हमन पॉवेल (१४ चेंडूंत ३६ धावा) यांनी उत्तरार्धात वेगाने धावा काढत सामना वाचवण्यासाठी केलेले शर्थीचे प्रयत्न अपयशी ठरले.

## बुद्धिबळपटू गुकेशची क्रमवारीत विक्रमी झेप

**वृत्तसंस्था, मुंबई**

**भारताचा १५** वर्षीय ग्रँडमास्टर डी. गुकेशने मेनोर्का खुल्या बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत जॉर्जियाच्या निनो बात्सिएश्विलीला पराभूत केले. या निकालानंतर गुकेशचे एलो २६५१.४ गुण झाले असून जागतिक क्रमवारीत त्याने अव्वल १०० बुद्धिबळपटूंमध्ये झेप घेतली आहे. ही कामगिरी करणारा तो सर्वात युवा भारतीय ठरला आहे.



जागतिक क्रमवारीत अव्वल १०० बुद्धिबळपटूंमध्ये प्रवेश मिळवणारा सर्वात युवा भारतीय खेळाडू ठरताना गुकेशने पाच वेळा विश्वविजेत्या विश्वनाथन आनंदचा विक्रम मोडीत काढला. आनंदने सप्टेंबर १९८७ मध्ये ही कामगिरी केली होती आणि त्या वेळी तो १७ वर्षांचा होता. जागतिक क्रमवारीत अव्वल १०० बुद्धिबळपटूंमध्ये सध्या गुकेश आणि आनंदसह एकूण सात भारतीयांचा समावेश आहे.

## उमरान, कार्तिककडे लक्ष

### आज हैदराबाद-बंगळूरु यांच्यात सामना

**मुंबई :** उमरान मलिकचा लक्षवेधी वेग आणि भुवनेश्वर कुमारचे सातत्य हे सनरायजर्स हैदराबादचे बलस्थान. तर दिनेश कार्तिकची स्फोटक फलंदाजी आणि फॅफ ड्यूप्लेसिसचे कुशल डावपेच ही रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुची वैशिष्ट्ये. शनिवारी होणाऱ्या हैदराबाद विरुद्ध बंगळूरु 'आयपीएल' लढतीत हेच द्वंद्व प्रमुख आकर्षण असेल.



उमरान मलिक

यंदाच्या हंगामात उमरानने आपल्या भेदक माऱ्याने प्रतिस्पर्धी श्रेयस अय्यरसह अनेक मानांकित फलंदाजांना अडचणीत आणले. याआधीच्या पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यातही उमरान आणि भुवनेश्वर जोडीन एकूण सात बळी घेत विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. गुणतालिकेत अव्वल चार संघांत असलेल्या हैदराबादच्या संघात टी. नटराजनसारखा गोलंदाजसुद्धा आहे.

दुसरीकडे, बंगळूरुचा नवा संघनायक ड्यूप्लेसिसने संघाला ७ पैकी ५ सामने जिंकून दिले आहेत. लखनऊविरुद्ध ड्यूप्लेसिसने ९६ धावांची खेळी साकारली होती. कार्तिकच्या विजयवीराच्या क्षमतेचे कौतुक केले जात आहे. बंगळूरुकडे जोश हॅझलवूड, हर्शल पटेल, मोहम्मद सिराज, वानिंदू हसरंगा यांच्यासारखे गोलंदाज आहेत.

● वेळ : सायं. ७.३० वा. ● थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, सिलेक्ट १

## पाँटिंग विलगीकरणात; नातलग करोनाबाधित

**नवी दिल्ली :** कुटुंबातील सदस्याला करोनाची लागण झाल्यामुळे दिल्ली कॅपिटल्सचा मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंगला पाच दिवस विलगीकरण करावे लागणार आहे.



गेले काही दिवस दिल्लीच्या संघातील काही सदस्यांना करोनाची लागण झाल्यामुळे त्यांचे दोन सामने पुण्याहून मुंबईत हलवण्यात आले होते. या नातलगाच्या संपर्कातील पाँटिंगच्या दोन चाचण्या नकारात्मक आल्या आहेत. मात्र संघाच्या हितासाठी व्यवस्थापन आणि वैद्यकीय पथकाने त्याच्या विलगीकरणाचा निर्णय घेतला आहे.

## कोलकातापुढे गुजरातचे पारडे जड

**नवी मुंबई :** सलग तीन पराभवांतून सावरत पुन्हा विजयपथावर परतण्यासाठी कोलकाता नाइट रायडर्सचा संघ उत्सुक आहे. कोलकातापुढे शनिवारी 'आयपीएल' क्रिकेट गुणतालिकेत आघाडीवर असलेल्या गुजरात टायटन्सचे आव्हान असेल.



रशीद खान

पहिल्या चार सामन्यांपैकी तीन विजय मिळवणारा कोलकाताचा संघ पराभवांच्या मालिकेमुळे गुणतालिकेत सातव्या क्रमांकावर फेकला गेला आहे. त्यामुळे पहिल्याच हंगामात सहापैकी पाच विजय अशी वर्चस्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या गुजरातला हरवणे कोलकातासाठी आव्हानात्मक ठरेल.

फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील गुजरातकडे दर्जेदार खेळाडू आहेत. परंतु हार्दिक दुखापतीमुळे चेन्नईविरुद्ध खेळू शकला नसताना रशीद खानकडे प्रभारी कर्णधारपद सोपवण्यात आले होते. रशीद (२१ चेंडूंत ४० धावा) आणि डेव्हिड मिलर (५१ चेंडूंत नाबाद ९४ धावा) यांनी संघाला विजय मिळवून दिला.

कोलकाताच्या वेगवान माऱ्याची धुरा पॅट कमिन्स, उमेश यादववर आहे. सुनील नरिनही त्यांच्याकडे आहे. श्रेयस अय्यर, रसेल, नितीश राणा, वेंकटेश अय्यर यांच्यावर फलंदाजीची जबाबदारी आहे.

● वेळ : दुपारी ३.३० वा. ● थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, सिलेक्ट १

## अंशू, राधिकाला रौप्यपदके; मनीषाला कांस्य

आशियाई कुस्ती स्पर्धा

**उलनबाटार :** अंशू मलिकला आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या ५७ किलो वजनी गटात शुक्रवारी रौप्यपदक मिळाले. याचप्रमाणे राधिकाला (६५ किलो) रौप्य आणि मनीषाला (६२ किलो) कांस्यपदक मिळाले.

२० वर्षीय अंशूला अंतिम फेरीत जपानच्या त्सुगुमी साकुराईने चीतपट केले. त्याआधी, वर्चस्वपूर्ण कामगिरीच्या बळावर तिने तिन्ही लढती जिंकल्या. उझबेकिस्तानच्या शोखिदा अखमेडोव्हा आणि सिंगपूरच्या डॅनिले सू चिंग लिम यांना पहिल्या दोन लढतींत नामोहरम केले. मग उपांत्य लढतीत मंगोलियाच्या बोलोटुया खुरेलखूचा पराभव केला.

राधिकाने कझाकस्तानच्या डारिगा अॅबेनविरुद्धच्या अंतिम लढतीत पराभव पत्करला, तर मनीषाचा कोरियाच्या हॅनबिट लीविरुद्धच्या लढतीत पराभव झाला.



# नागरी सहकारी बँकांतील मानद पदांना चाप

## रिझर्व्ह बँकेचे पदे रद्द करण्याचे आदेश

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



**मुंबई :** नागरी सहकारी बँकांच्या कामकाज व व्यवस्थापनाला व्यावसायिक वळण देण्याच्या उद्देशाने रिझर्व्ह बँकेने गुरुवारी आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. संचालक स्तरावरील समूह अध्यक्ष अथवा तत्सम इतर कोणत्याही मानद पदांची निर्मिती न करण्याची आणि अशी सर्व विद्यमान मानद पदे वर्षभरात रद्द करण्याचे तिने गुरुवारी आदेश दिले.

रिझर्व्ह बँकेने यासंबंधाने गुरुवारी परिपत्रक प्रसिद्ध केले. त्या तारखेपासून एक वर्षाच्या आत सर्व नागरी सहकारी बँकांना संचालक स्तरावरील सर्व विद्यमान मानद पदे रद्द करण्याची आणि नवीन पदांची निर्मिती करण्यास मनाई करण्यात आली आहे.

नागरी सहकारी बँकांकडून बऱ्याचदा बँकेच्या संचालक मंडळामध्ये काही व्यक्तींना सामावून घेण्यासाठी मानद पदांची निर्मिती करण्यात येते. तसेच त्यांना कायदेशीररीत्या निवडलेल्या संचालक मंडळाच्या सदस्यांप्रमाणे अधिकार किंवा संचालकांच्या बैठकांमध्ये सहभागी होण्यासह काही विशेषाधिकारदेखील देण्यात येतात. मात्र यामुळे बँकेचे संचालक मंडळ आणि मानद सदस्यांच्या हितसंबंधांत संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते.

शिवाय याकडे समांतर व्यवस्था म्हणून पाहिले जाऊ शकते. जे कायदेशीररीत्या स्थापन केलेल्या व्यवस्थापन मंडळाच्या आणि सर्व भागधारकांच्या हितासाठी धोक्याचे आणि त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करणारे ठरू शकते, असे रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकात म्हटले आहे.

## मंदीवाले सक्रिय; सेन्सेक्समध्ये ७१४ अंशांची घसरण

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** जागतिक भांडवली बाजारात झालेली घसरण आणि इन्फोसिस, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रीज या अग्रणी समभागात गुंतवणूकदारांनी विक्रीचा सपाटा लावल्याने भांडवली बाजारात सप्ताहअखेर दोन दिवसांच्या तेजीला लगाम बसला.

शुक्रवारी दिवसअखेर सेन्सेक्स ७१४.५३ अंशांच्या घसरणीसह ५७,१९७.१५ पातळीवर स्थिरावला. दिवसभरातील सत्रात सेन्सेक्सने ५७,१३४.७२ अंशांचा तळ बघितला. तर निफ्टीमध्ये २२०.६५ अंशांची घसरण झाली आणि तो १७,१७१.९५ पातळीवर बंद झाला.

अत्यंत अस्थिर बनलेल्या भांडवली बाजारावर सध्या बाह्य आणि अंतर्गत अशा दोन्ही घटकांचा प्रभाव दिसून येत आहे. बाह्य घटकांमध्ये जागतिक पातळीवर अमेरिकी भांडवली बाजारात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार सुरू असून त्याचे पडसाद देशांतर्गत भांडवली बाजारावर उमटत आहेत. दुसरीकडे बाजारावर परिणाम करणारा अंतर्गत घटक म्हणजे विदेशी संस्थामक गुंतवणूकदारांकडून समभाग विक्रीचा मारा कायम आहे, तर देशांतर्गत गुंतवणूकदार अधिक सक्रिय झाले असून बाजारात समभाग खरेदी करत आहेत. अशा दोन्ही घटकांच्या प्रभावामुळे बाजाराला निश्चित दिशा मिळत नसून तो अधिक अस्थिर बनला आहे, असे निरीक्षण जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे मुख्य गुंतवणूक धोरणकार व्ही. के. विजयकुमार यांनी नोंदविले.

महागाईवर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक बनले आहे, अशी फेडने केलेली टिप्पणी म्हणजे मे महिन्यात तेथे व्याजदरात थेट अर्ध्या टक्क्यांची वाढ केली जाण्याची शक्यता आहे, असेही विजयकुमार यांनी संकेत दिले.

# ग्राहकांच्या संमतीविना क्रेडिट कार्ड वितरण नाही - रिझर्व्ह बँक

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** ग्राहकांच्या स्पष्ट संमतीविना त्यांना परस्पर क्रेडिट कार्ड दिले जाऊ नये तसेच विद्यमान कार्डवर अधिक लाभ देण्याचा नावाखाली सुधारित कार्ड न देण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने गुरुवारी दिले. मध्यवर्ती बँकेने दिलेल्या सूचनांचे उल्लंघन केल्यास कार्ड जारी करणाऱ्या बँकेकडून देयकाच्या दुप्पट रक्कम दंड वसुली केली जाईल, असे रिझर्व्ह बँकेने परिपत्रकात म्हटले आहे.

रिझर्व्ह बँकेने कार्ड जारी करणाऱ्या बँकांना तृतीयपक्षी अथवा त्रयस्थ एजंटांमार्फत ग्राहकांना धमकावून किंवा त्रास देऊन थकबाकी वसुलीसही मज्जाव केला आहे. क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या बँकांकडून बऱ्याचदा वसुलीसाठी एखाद्या भाडोत्री संस्था अथवा एजंटांची निवड केली जाते. क्रेडिट आणि डेबिट कार्डासंबंधी हे नवीन निर्देश १ जुलै २०२२ पासून लागू होतील, असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे.



### बँकेतर वित्तीय संस्थांना परवानगी आवश्यक

बँकेतर वित्तीय संस्थांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीशिवाय क्रेडिट कार्ड व्यवसाय करता येणार नाही. त्यामुळे बँकेतर वित्तीय संस्थांना डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, चार्ज कार्ड किंवा त्यासारखी इतर बँकिंग उत्पादने भौतिकरीत्या जारी करण्याआधी रिझर्व्ह बँकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

कार्डधारक ग्राहकावर अन्याय झाल्यास ती व्यक्ती रिझर्व्ह बँकेच्या 'लोकपाल' यांच्याकडे तक्रार नोंदवू शकतील. तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास लोकपाल योजनेच्या तरतुदींनुसार, ग्राहकाला नुकसान भरपाईची मिळण्याची तरतूद असेल.

रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निर्देशांनुसार, १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता असलेल्या व्यापारी बँकांना स्वतंत्रपणे किंवा इतर कार्ड जारी करणाऱ्या बँका किंवा बँकेतर वित्तीय संस्थांसोबत क्रेडिट कार्ड व्यवसाय करता येणार आहे. प्रादेशिक ग्रामीण बँकांनादेखील त्यांच्या प्रायोजक बँक किंवा इतर बँकांच्या सहकार्याने क्रेडिट कार्ड जारी करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

# उर्वरित पात्र ठेवीदारांच्या ठेवींसाठी रुपी बँकेकडून पाठपुरावा

**पुणे :** गेली नऊ वर्षे रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक निर्बंधांखाली असलेल्या रुपी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सुमारे ६४ हजार पात्र ठेवीदारांना त्यांच्या ७०० कोटींच्या ठेवी अलीकडेच परत मिळून मोठा दिलासा मिळाला आहे, तर उर्वरित ठेवीदारांच्या अर्जातील त्रुटी दुरुस्त करून त्यांच्याही ठेवी परत मिळून देण्याचे प्रयत्न बँकेने सुरू केले आहेत.



ठेव विमा संरक्षण कायद्यातील दुरुस्तीप्रमाणे पाच लाख रुपयांपर्यंतच्या विम्याचे संरक्षण प्राप्त असलेल्या विविध प्रकारच्या अंदाजे सव्वा लाख खाते असलेल्या ६४,०२४ खातेदारांकडून विहित नमुन्यामध्ये मागणी अर्ज सादर करण्यात आले. अशा ठेवीदारांच्या ठेव रकमेचे एकूण ६८७.४२ कोटी रुपये बँक ऑफ बडोदाद्वारे ठेवीदारांनी सूचित केलेल्या बँक खात्यात जमाही करण्यात आले. मात्र अर्जातील काही त्रुटींमुळे १,८०० ठेवीदारांना त्यांची ठेव रक्कम मिळू शकली नाही.

केवायसी पूर्तता नसणे, मयत ठेवीदारांच्या वारसा हक्काबद्दल विवाद असणे, ठेवीदार उपलब्ध नसणे अथवा ठेवीदारांची उदासीनता अशा विविध कारणांमुळे बँकेने पाठपुरावा करूनही काही ठेवीदारांचे वेळेत मागणी अर्ज येऊ शकलेले नाहीत. अशा व इतर पात्र ठेवीदारांच्या ठेवी परत मिळविण्यासंबंधात रुपी बँकेकडून ठेव विमा महामंडळाशी पुन्हा संपर्क साधला जात आहे, असे बँकेचे प्रशासक सुधीर पंडित यांनी सांगितले.

तथापि रुपी बँकेचे पुनरूज्जीवन किंवा लघु वित्त बँकेत रूपांतर करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडे रीतसर प्रस्ताव दाखल करण्यात येईल. या कामी पाच लाख रुपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या खातेदारांचे संपूर्ण योगदान आवश्यक आहे, असे आवाहनही पंडित यांनी केले.

# 'बीपीसीएलच्या विक्रीच्या अटी-शर्तींमध्ये बदल आवश्यक'

**पीटीआय, नवी दिल्ली**

**सार्वजनिक क्षेत्रातील** तेल व वायू विक्री व विपणन कंपनी - भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात बीपीसीएलचे खासगीकरणाच्या प्रक्रियेचा बदललेल्या परिस्थितीत नव्याने विचार आवश्यक ठरेल, असे सरकारी अधिकाऱ्याने गुरुवारी स्पष्ट केले.



सध्याची भू-राजकीय परिस्थिती, ऊर्जाविषयक संक्रमण अशा मुद्द्यांना लक्षात घेऊन, त्याचा बीपीसीएलच्या विक्री प्रक्रियेवरील परिणामांसह नव्याने विचार करणे आवश्यक बनले आहे. बीपीसीएलवरील मालकीसाठी आतापर्यंत तीन कंपन्यांनी स्वारस्य दर्शविले आहे. वेदान्त समूहाचे संस्थापक अध्यक्ष अनिल अगरवाल यांच्याबरोबर अपोलो ग्लोबल आणि आय स्क्वेअर कॅपिटल या दोन अमेरिकी कंपन्यांनी गेल्या वर्षी बीपीसीएलमधील सरकारची संपूर्ण ५२.९८ टक्के हिस्सेदारी खरेदी करण्यासाठी प्रारंभिक बोली लावली होती. मात्र सध्याच्या हरित आणि अक्षय्य ऊर्जेच्या दिशेने सुरू झालेल्या संक्रमणामुळे त्याच अटी-शर्तींवर खासगीकरण कठीण झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेचाच पुन्हा नव्याने विचार आवश्यक असल्याचे सरकारी सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

कंपनीचे सध्याचे बाजार भांडवली मूल्य ८६,२७१ कोटी रुपये आहे. त्यानुसार संपूर्ण ५२.९८ टक्के हिस्सेदारी विकून ४५,००० कोटी रुपयांचा निधी सरकारला मिळण्याची अपेक्षा आहे. केंद्र सरकारने मार्च २०२० मध्ये बीपीसीएलच्या विक्रीसाठी अर्ज मागविले होते. तर नोव्हेंबर २०२० पर्यंत तीन कंपन्यांकडून इरादापत्र प्राप्त झाली. कंपनीसाठी आर्थिक निविदा अद्याप मागविण्यात आलेल्या नाहीत.




हे पत्र वैदेही ठकार यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०… मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१…
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास या पुनरुत्पादनास मनाई.

epaper.loksatta.com